डॉ. स्मिता दामले

# कावेरीचा दुभंग







# कावेरीचा
# दुभंग

डॉ. स्मिता दामले

# कावेरीचा दुभंग

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला
पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.
दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कावेरीचा दुभंग

डॉ. स्मिता दामले
३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,
कोथरूड, पुणे, ४११०३८.
मोबाईल :- ९८६७३६४६३४.
smitasuhas67@rediffmail.com
suhasdamle341@hotmail.com
Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity. com

esahity@gmail. com

**प्रथम आवृत्ती  : ३० मार्च २०१९**

**द्वितीय सुधारित आवत्ती: १८ फ़ेब्रुवारी २०२१**



©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे आठवे पुस्तक, “कावेरीचा दुभंग” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया.

डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी

कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फे डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा

झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली सहा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य डॉ. स्मिता दामले यांची कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.


या पुस्तकातील चित्रे गुगलवरून घेतली आहेत. ती अपलोड करणाऱ्यांचे आभार.

टीम ई साहित्य

इ. सन १३९९ मध्ये यदुराज वोडीयार
घराण्याचा सत्ताप्रवाह मैसूरमध्ये सुरु झाला.
इ. सन १७६१ मध्ये या राजसत्तेचा प्रवाह
हैदर अलीने
आपल्या घराण्याकडे वळवला.
इ. सन १७९९ मध्ये टिपू सुलतानाला
वीरगती मिळाली.
आणि
वोडीयार घराण्याचा सत्ताप्रवाह परत एकरूप
झाला.

**त्या**
**श्रीरंगपट्टणच्या**
**वोडीयार**
**घराण्याचा**
**इतिहास.**

श्रीरंगपट्टण किल्ला
आणि विळखा घातलेली कावेरी.



SERINGAPATAM, 1792.
From a Plan drawn by Capt. Kyd, Surveyor General with the Army.

# कृष्णराज वोडीयार III



# प्रस्तावना.

मैसूर. दक्षिण भारतातील एक समृध्द संस्थान. विजयनगर साम्राज्याचा अंत झाल्यावर उदयाला आलेलं, सुंदर, निसर्गाने नटलेलं, कावेरी नदीच्या विळख्यात बहरलेलं, वोडीयार घराण्याच्या राजसत्तेने श्रीमंत केलेलं, सुंदर साम्राज्य....कावेरीच्या तीरावर वसलेलं, श्रीरंगपट्टण, ही त्याची राजधानी. या राज्याचं चरित्रही तेवढंच रोमहर्षक. अनेक लढाया, राजकारण, सत्ता संघर्ष, कौटुंबिक संघर्ष, हेवेदावे, डावपेच यांनी रंगलेलं. श्रीरंगपट्टणमधल्या श्रीरंगनाथस्वामींच्या देवस्थानाने हे सर्व खेळ पाहिले. या देवतेने १४०० सालच्या आरंभापासून १८ व्या शतकाच्या अंतापर्यंत ५०० वर्षांच्या कालखंडात अनेक कठपुतळ्या नाचवल्या. परदेशात होकायंत्राचा शोध लागला आणि त्यामुळे जहाजं भरकटेनाशी होऊन नेमकी हव्या त्या किनाऱ्याला लागू लागली. पश्चिम किनाऱ्यावर १५ व्या शतकाच्या अखेरीला २ वर्षे असतांना. सन १४९८ मध्ये वास्को-द-गामा नावाच्या ( पोर्तुगीज ) फिरंग्याने आपलं गलबत पश्चिम किनाऱ्यावर लावलं आणि दक्षिणेतील राजकारणाचा रंग बदलला.. पाठोपाठ ( वलंदाज ) डच, ( ताम्र ) इंग्रज, ( फरांचीस ) फ्रेंच इत्यादि साहसी,

व्यापार करण्याच्या निमित्ताने मसाल्यांच्या वेलींनी लगडलेल्या देशाची, समृद्धीची कीर्ती ऐकून भारतीय किनाऱ्यावर उतरले. दक्षिणेतील राजकारणाच्या पटावरची प्यादी वाढायला लागली.

त्या आधीच हिमालयाच्या पलिकडून आलेल्या अफगाणी, तुर्की योद्ध्यांनी १२ व्या शतकाच्या शेवटी दिल्लीचा हिंदू नृपती पृथ्वीराज चौहानचं ( अजमेरचे चाहमान ) सिंहासन मोडून तिथे आपल्या तख्ताची स्थापना केली होती. हे सर्व १२ व्या शतकापासून अखेरीपासून उत्तरेत रंगलेलं सत्तेचं, स्पर्धेचं राजकारण अल्लाउद्दीन खिलजीच्या देवगिरी स्वारीनंतर १३ व्या शतकापासून दक्षिणेकडे पसरलं. दक्षिणेतील या यवनी लाटेला थोपवण्यासाठी हरिहर - बुक्क यांनी विजयनगरची स्थापना केली. उदय – विलय या खेळात त्यांचाही अंत झाला आणि त्यातून उदयाला आलं ते मैसूरचं वोडीयार घराणं. एक संपन्न कर्तृत्ववान पुरूषांचं राजघराणं.

विजयनगर साम्राज्याच्या काळात, इ.सन १३९९ मध्ये यदुरायाच्या घराण्याने, विजयनगरच्या अंतानंतर मैसूरला स्वतंत्र परगणा म्हणून घोषित केलं. आणि वोडीयार म्हणजे राजा, हे नाव धारण केलं. राजा वोडियारपासूनच्या  वारसांनी राज्याच्या सीमा रुंदावत नेल्या आणि एका संपन्न, समृध्द राज्यात त्याचं रुपांतर केलं. साहित्य, संगीत, वादन, शिल्प या कलांना, प्रोत्साहन दिलं.

चक्रवर्ती चिक्कदेवराजाने मैसूरला साम्राज्याचं रूप दिलं आणि वैभवावर नेलं. इ. सन १७०४ मध्ये चिक्कदेवराय या समर्थ चक्रवर्ती राजाच्या निधनानंतर मात्र वोडीयार घराण्याच्या सत्तेची घसरण सुरु झाली. १८ व्या शतकाचा पूर्वार्धापासून अर्धशतकभर मैसूरची सत्ता आणि कारभार एकवटला होता तो दलवाई देवराजैया आणि त्याचा चुलत भाऊ सर्वाधिकारी नंजराजैया यांच्या हाती..वोडीयार राजघराणं आणि कारभारी यांच्यात कमालीची कपट कारस्थानं सुरु झाली. त्यात वोडीयार सत्तेला ग्रहण लागलं.

कावेरी श्रीरंगपट्टणजवळ दुभंगते..शहराला आपल्या कवेत घेते आणि वळसा घालून पुढे एक होते. हा खेळ मैसूरच्या राजप्रसादातही घडला. दलवाई देवराजैया आणि सर्वाधिकारी नंजराजैया या दोन बंधूंच्या हातून इ. सन १७६० मध्ये ती हिसकावून घेतली ती हैदरअली याने. लष्करात ५० घोडे, १०० पाईक बाळगणारा नाईक असणारा हैदरअली, आपल्या पराक्रमाने, मुत्सद्दीपणाने, मोठ्या हुद्द्यावर चढत गेला आणि कमकुवत झालेल्या वोडीयार घराण्याला, कावेबाज, सत्तालोभी दलवाई देवराजैय्या, सर्वाधिकारी नंजराजय्या यांना मागे सारून सत्तेचे दोर आपल्या हाती घेतले. उत्कृष्ट हेरखातं, निपुण युद्धनीती, फ्रेंचांची आधुनिक शस्त्रास्त्रं, आणि मराठ्यांचा गनिमी कावा, शौर्य यात श्रेष्ठ असलेल्या नबाबबहादूर हैदरअलींनी, अत्याधुनिक उत्कृष्ट

युद्धासामग्रीवर दक्षिणेत प्रबळ झालेल्या इंग्रजांना गुडघे टेकायला लावले. त्यांची साम्राज्य स्थापण्याची स्वप्नं रोखून धरली.

रानावनात दाबा धरून बसणे, शत्रूवर अचानक कोसळणे, शत्रूला खेचत आपल्यामागे आणणे, कधी तह करायचा, कधी कपटनीतीचा प्रयोग करायचा याची उत्तम जाण आणि हिकमत असल्याने अनेक प्राणघातक हल्ल्यातून धाडसाने जीव वाचवत नबाब बहादूर हैदरअली कायम यशस्वी झाले. इंग्रजांवर त्यांनी दहशत ठेवली. म्हणूनच इतिहासतपस्वी वासुदेवशास्त्री खरे, त्यांची तुलना, सेनापती या नात्याने दक्षिणेतील शिवाजी अशी करतात.

इ. सन १७६० ते १७९९ या ३९ वर्षांमध्ये ज्यांनी मैसूरवर सत्ता चालवली, इंग्रज नावाच्या सामर्थ्यवान सत्तेला आव्हान देत मैसूर राज्याचं रक्षण केलं आणि त्यांना ते गिळू न देण्यासाठी पराक्रमाची शर्थ केली ते होते नबाबबहादूर हैदरअली आणि त्यांचे पुत्र टिपू सुलतान. बंगालपासून दिल्लीपर्यंत देश गिळत आलेल्या इंग्रजांना दक्षिणेत दोनच आव्हानं होती. एक म्हणजे मराठे आणि दुसरे हैदरअली नबाबसाहेब. त्यांच्या कारभाराच्या काळात भारत ही इंग्रज आणि फ्रेंच यांच्या जागतिक राजकारणाच्या खेळाची रणभूमी झाली होती. सत्ता हाती अली तरी मैसूर गादीवर हक्क न सांगता त्याचे मालक वोडीयार घराणं आणि बिदनूर हे स्वकष्टार्जित

आपलं राज्य असं नबाब हैदरअलीसाहेब मानत. या पितापुत्राच्या अफाट पराक्रमामुळे, उत्तर भारत जिंकून सार्वभौम होण्यासाठी टपलेल्या इंग्रजांना हैदरअली आणि टिपू या पितापुत्रांच्या सत्तेशी ४० वर्षे झुंजावं लागलं. इस्लाम धर्माचा प्रसार करण्यासाठी जागरूक असलेल्या या दोघांनी निष्प्रभ झालेल्या असमर्थ वोडीयारला मात्र इस्लाम धर्म स्वीकारायला लावला नाही, ना त्यांचं घराणं नामशेष करून टाकलं. ना तुरुंगात टाकलं. हैदरअलींचा दुसरा मोठा सामना झाला तो पेशवे माधवराव पेशवे यांच्याशी. मैसूरच्या सीमा तुंगभद्रेच्यावरती कृष्णेपर्यंत स्वराज्याशी आणून भिडवण्याच्या हैदरअलींच्या प्रयत्नाला माधवराव पेशव्यांनी सतत खीळ घातली आणि ते आव्हान पार पाडलं ते मिरजेच्या पटवर्धन सरदार घराण्याने. माधवराव पेशव्यांच्या अकाली कैलासवासानंतर पुण्याचा कारभार जबाबदारीने पार पडला तो नाना फडणीस यांनी. स्वराज्य ताब्यात घेण्यासाठी राघोबादादांना हाताशी धरणाऱ्या इंग्रजांशी, नाना फडणीस, हैदरअली आणि हैद्राबादचे निजाम यांनी मिळून मोठी टक्कर दिली.

वयाच्या ६० व्या वर्षी, ७ डिसेंबर १७८२, या दिवशी नबाब हैदरअलीसाहेबांचा पैगंबरवास झाल्यावर त्यांचे तेवढेच पराक्रमी पुत्र टिपू सुलतान यांनी इंग्रजांशी लढा दिला. फ्रान्सच्या

नेपोलीयनच्या साथीने इंग्रजांना देशातून हाकलण्याचं त्याचं स्वप्न नियतीला मंजूर नव्हतं. म्हणूनच ईजिप्तहून नेपोलियनने टिपू सुलतानाला लिहिलेलं मदतीचं पत्र मधल्यामध्ये इंग्रजांच्या हाती पडलं आणि दोघांची सल्ला मसलत होऊ शकली नाही असं म्हणावं लागेल.. इंग्रजांनी श्रीरंगपट्टणवर ४ मे १७९९ या दिवशी इंग्रजांशी झालेल्या निर्णायक लढाईत श्रीरंगपट्टण किल्ल्यात त्यांना वीरगती मिळाली, आणि मैसूर राज्य इंग्रजांच्या ताब्यात आलं. इंग्रजांनी परत मैसूरच्या गादीवर वोडीयार घराण्याची स्थापना केली. जशी श्रीरंगपट्टणजवळ दुभंगलेली कावेरी पुढे एक होते, तसाच वोडीयार घराण्याचा दुभंगलेला सत्ताप्रवाह परत चालू झाला. हैदरअली-टिपू सुलतान यांनी समरांगणावर गाजवलेला पराक्रम म्हणजे इंग्रज, फ्रेंच, निजाम, मराठ्यांशी झालेल्या लढायांचं आणि राजकारणाचं चित्रण.

सी. हयवदन राव, मार्क विल्क्स, यांनी लिहिलेल्या “ हिस्टरी ऑफ मैसूर ‘’ वासुदेवशास्त्री खरे यांनी लिहिलेल्या “ ऐतिहासिक लेखह संग्रह ‘’ पेशवे दप्तर, नरेंद्र सिन्हा, फ्रेंच लेखक जी. आर. जोयसर यांचं ‘’ यादव डायनास्टी’ ‘’ आणि बाउरिंग यांच्या ऐतिहासिक अभ्यासपूर्ण ग्रंथांवरून निवडलेला, त्या मैसूरच्या कर्तृत्ववान वोडीयार राजांचा आणि राजसत्तेला वेगळं वळण

देणाऱ्या नबाबबहादूर हैदरअलीचा, मैसूरसाठी धारातीर्थी पडलेल्या टिपू सुलतान यांचा हा इतिहास...

डॉ. स्मिता दामले..

Email -smitasuhas67@rediffmail.com. suhasdamle341@hotmail.com.

# वोडीयार घराण्याचा उदय.

**बीजारोपण** -

नदीच्या उगमाचा शोध घेत गेलं तिथे असतो एक लहानसा झरा..पण त्या पाण्याकडे पाहिलं तर हीच पुढे गंगा आहे यावर कुणाचा विश्वास बसत नाही, तसंच वोडीयार घराण्याचं आहे. द्वारकेच्या यादवांच्या राज्यातून यदुराय आणि कृष्णराय हे दोन, आत्रेय गोत्राचे तरुण, चाकरीसाठी आणि नशीब अजमावण्यासाठी एका शुभदिवशी बाहेर पडले. यदुरायचं नाव राजघराण्याच्या वंशावळीत विजय असंही आहे. समृद्ध देशात चाकरीला तोटा नसतो, म्हणून तरुणांची धाव त्या शहराकडे असते. तसंच झालं. विजयनगर साम्राज्य त्या काळात वैभवाच्या शिखरावर होतं. विंध्यपर्वत ओलांडून हे दोन्ही बंधू विजयनगरला पोचले. विजयनगरच्या साम्राज्याचं नाव ते ऐकत होते. तिथे जाऊन काहीतरी धन मिळवावं एवढंच त्यांचा उद्देश होता. तिथून ते दोघे यदुगिरीला (मेलूकोटे) आले. तिथे श्रीविष्णू आणि मग महाबलाचल डोंगरावरच्या चामुंडेश्वरीचं दर्शन घेऊन हदनाडुच्या कोडीभैरवाच्या देवळात विश्रांतीसाठी उतरले. समोर छान तलाव होता.

या वेळी त्या भागातील ३३ गावांचा मुखिया चामराज हा मरण पावला होता. त्याच्या मागे त्याची पत्नी देवजम्माण्णी आणि तिची त्याच नावाची कन्या देवजम्मा राहात होत्या.  ( यांचा वेगवेगळा संदर्भ मिळतो.) यदुराय आणि कृष्णराय बसले होते त्या तलावावर काही बायका आपली धुणी धुवत गप्पा मारत होत्या. करमणूक म्हणून हे दोन्ही तरूण त्यांच्या गप्पा ऐकत बसले.. भाषा कळत नव्हती, पण त्यांच्या हावभावावरून त्या काहीतरी चिंतेत होत्या, एवढा मात्र अंदाज त्यांना करता आला. त्यांनी त्या महिलांकडे विचारणा केली. आम्ही काही मदत करू शकतो का असं विचारलं. तेव्हा त्या स्त्रियांनी सारी हकीकत या दोन्ही बंधूंना सांगितली. त्या हकिकतीप्रमाणे, करुगहळ्ळी गावाचा मुखिया, मरा नायकने देवाजम्माणीला निरोप पाठवला की तुझी मुलगी मला दे. नाहीतर लढायची तयारी ठेव. मुलगी द्यायची म्हणजे ३३ गावांवर पाणी सोडायचं, लढाई करायची म्हणजेही तेच होण्याची शक्यता.

हे सारं ऐकल्यावर यदुराय आणि कृष्णराय यांनी एकमेकात चर्चा करून निर्णय घेतला आणि त्या राणीला मदत करायचं ठरवलं. त्या गावाच्या स्त्रियांना त्यांनी आम्ही तुम्हाला मदत करतो असं सांगितलं आणि त्या गावातील लोकांची भेट घेतली. लग्न ठरल्याप्रमाणे होऊ द्या असं म्हणाले. ठरल्याप्रमाणे मरा नायक आपली वऱ्हाडी मंडळी घेऊन लग्नासाठी गावात आला.

गावातील प्रमुख लोकांशी चर्चा करून ठरलेल्या बेताप्रमाणे, नवरदेवाला त्यांनी एका घरात आणि त्याच्याबरोबर आलेल्या इतर वऱ्हाडी मंडळींना दूर दुसऱ्या घरात उतरवण्याची सोय करण्यात आली. नंतर यदुराय आणि कृष्णराय या दोन्ही भावांनी गावातील लोक सोबतीला घेऊन वऱ्हाडी मंडळींवर हल्ला केला काहींना ठार केलं, काही पळून गेले. नंतर लग्नघरात येऊन घडलेल्या घटनेबद्दल अनभिज्ञ असलेल्या नवरदेव मंडळींनाही ठार केलं. यदुरायाच्या या पराक्रमावर खूष होऊन त्याच्याशी त्या नववधूने त्याच मंडपात विवाह केला. अशारितीने अचानकपणे हदनाडू आणि करुगाहळ्ळी या दोन्ही गावांचा कारभार यदुरायाच्या हाती आला. या लग्नानंतर यदुरायने, स्वत: वैष्णव असूनही, त्या मुलीचा लिंगायत धर्महीं स्वीकारला. यदुराय आणि त्याची स्त्री यांच्यापासून पुढे मैसूरच्या वोडीयार घराण्याचा अशारितीने प्रारंभ झाला. ही घटना आहे इ. सन १३९९ मधली. यानंतर यदुरायाने हदनाडूची ३३ गावं स्वत:जवळ ठेवून करुगाहळ्ळीची मालकी आपल्या भावाला, कृष्णरायला दिली. तिथे त्याचा वंश सुरु झाला.

३३ गावांचा प्रमुख झाल्यावर यदुरायाने स्वत:लाही वोडीयार म्हणवून घ्यायला सुरुवात केली अशी आख्यायिका आहे. पुढे २४ वर्षे, इ सन १४२३ पर्यंत यदुरायने सर्व कारभार सांभाळला. ज्या देवीमुळे आपल्या भाग्याचा दरवाजा उघडला त्या देवीचं ऋण

म्हणून आपल्या कारकीर्दीत त्याने एका टेकडीवर ४ दरवाजांनी रेखलेला एक सुंदर किल्ला बांधला आणि त्याला मेलूकोटे असं नावं दिलं. यदुरायला दोन मुलगे झाले. हिरिया बेट्टद चामराज, आणि चामराज. धाकटा चामराज हा केंचलगुड या शाखेचा संस्थापक झाला.

२. यदुरायाचा मोठा मुलगा हिरिया बेट्टदा चामराज याचा विवाह बिट्टदकोट्टे गावाच्या गोपजम्मा नावाच्या मुलीशी झाला.. हिरिया चामराज इ. सन १४२३ ते १४५९ - मध्ये गादीवर आला तेव्हा तो १५ वर्षांचा होता. त्याने ३६ वर्षे राज्य केलं. त्यांना पुत्र झाला तो थिम्मा राजा.

३. थिम्माराज वोडीयार - इ. सन १४५९ ते १४७८ –

हिरिया बेट्ट चामराजानंतर त्याचा मोठा मुलगा थिम्माराजा वोडीयार बनला. याचा विवाह कळाले घराण्यातील कन्येशी झाला. या शाही जोडप्याला जो पुत्र झाला त्याचं नाव हिरिया चामरजरास द्वितीय. याला ६ बोटे असल्याचा उल्लेख आहे.

४. हिरिया चामराजरस द्वितीय वोडीयार - इ. सन १४७८ ते १५१३

त्यानंतर गादीवर आला तो हिरिया चामराजरास द्वितीय. याचा विवाह पद्मजाम्मा नावाच्या कन्येशी झाला. त्यांचा पुत्र हिरिया


बेट्टदा चामराज तृतीय. याचा जन्म २९ सप्टेंबर १४९२ साली झाला. याच्या जन्मापासून वोडीयार घराण्याच्या वंशावळीचा तपशील व्यवस्थित मिळतो.

## ५. हिरिया बेट्ट चामराज तृतीय वोडीयार – इ.सन १५१३ ते १५५३.

या वोडीयारचा उल्लेख थिम्माराज असाही केला गेला आहे. याचा विवाह गोपरसम्मा हिच्याशी झाला. त्यांना ३ मुलगे झाले. त्याला ३ मुलीही झाल्या. धोड्ड - थोरली देवीरम्मा, चिक्क ( धाकटी ) देवीरम्मा आणि नंजाम्मा. थोरल्या दोघी मुली कळाले कुटुंबात दिल्या. या वोडीयारने आपल्या जहागिरीचे तीन भाग केले आणि आपल्या तीन मुलांमध्ये वाटले. पहिला मुलगा थिम्माराजा याला हेमनहळ्ळी, दुसरा मुलगा कृष्णराज याला केम्बले आणि तिसरा मुलगा बोला चामराज याला मैसूरचा भाग दिला. इथे मैसूरजवळ पुरागेरी नावाचा किल्ला होता. या किल्ल्याच्या ईशान्येला सोमेश्वरचं देऊळ होतं. आणि चोलाकेरे नावाचा चोला घराण्याच्या काळातील तलाव होता. चामराजरासने तो दुरुस्त करून त्याला महिषासूर नाव दिलं. आणि नवीन गाव वसवलं. तेच पुढे मैसूर या नावाने प्रसिध्द झालं. मैसूरच्या गादीवर आलेल्या वारसांनी आपल्या प्रदेशाचा विस्तार केला आणि संस्थांनाचं रूप आणलं. कृष्णराजाचा उल्लेख कृष्णराज नृपती असा केला जात असे. तो पराक्रमी होता आणि देखणा होता. बोळा चामरजा आपल्या वडिलांबरोबर मैसूरमध्ये राहत असे. या बोळा (टकलू)

चामराजने चामुंडी टेकडीच्या मागे एक सुंदर तलाव बांधला. या चामराजची एक आख्यायिका सांगितली जाते. एकदा चामुंडेश्वरी देवीच्या दर्शनाला जात असतांना अचानक त्याच्या अंगावर वीज पडली पण तो देवीकृपेने वाचला, पण त्याचे केस मात्र त्यावेळी जळले. त्याला जे टक्कल पडलं, त्याच बोळा विशेषणाने तो प्रसिध्द झाला. हिरिया बेट्टद चामराजा वोडीयार ७ फेब्रुवारी. १५५३ मध्ये मृत्यू पावला.

थिम्मराजाने आपल्या तीन मुलांच्यात मुलूख वाटून दिला. ज्येष्ठ पुत्राला हेमनहळ्ळी, दुसऱ्याला केमबले आणि तिसऱ्याला मैसूर.



## ६. थिम्मा राज द्वितीय वोडीयार –

## इ. सन १५५३ ते १५७२.

त्यानंतर त्याचा मुलगा थिम्माराजा द्वितीय गादीवर आला. त्याने १९ वर्षे राज्य केलं. हा पराक्रमी, राजकारण निपुण होता. याच्या पत्नीचं  नाव केंपन्नाम्मा होतं. या राजाला संतती नव्हती. त्याने सन १५५३ ते १५७२ पर्यंत राज्य केलं. त्याला मूल नसल्यामुळे त्याच्यानंतर, आधी ठरलेल्या व्यवस्थेप्रमाणे बोळा चामराज मैसूरच्या गादीवर विराजमान झाला.

**७. बोळा चामराज वोडीयार –**

**इ. सन १५७२ ते १५७६.**

सन १५७२ ते १५७६, ४ वर्षे बोळा चामराजाने कारभार पाहिला. हा अत्यंत शूर होता. युद्धसामग्री हाताळण्यात याची ख्याती होती. तीर-कमान चालवण्यात तो प्रवीण होता. याला दोन स्त्रिया होत्या. बेळिकेरेला माहेर असलेली केंपम्मा, आणि हेग्गडदेवन्कोटेची देवेजाम्मा.. दोन्ही स्त्रियांना दोन दोन मुलगे होते. आणि ३ मुली होत्या. ९ नोव्हेंबर १५७६ मध्ये याचं निधन झालं. आपल्या हयातीत याने चोला तलावात पडून राहिलेली मूर्ती बाहेर काढून त्या त्रिनेत्रेश्वराचं म्हणजे शंकराचं मंदिर उभारलं.

**८. बेट्टद चामराज वोडीयार - इ. सन १५७६ ते १५७८.**

याच्यानंतर त्याचा पुतण्या बेट्टदा चामराज हा फक्त २ वर्षे गादीवर राहिला. याने सत्ता हाती आल्याबरोबर एवढी उधळमाधळ केली की खजिना रिकामा झाला. ५००० रुपयांचं कर्जही झालं. श्रीरंगपट्टणला देणं असलेला साराही त्याने बुडवला होता. त्यामुळे त्याला काढून टाकून त्याचा धाकटा भाऊ राजा वोडीयारने सिंहासनावर बसणं अनिवार्य झालं. त्याप्रमाणे त्याला पदच्युत करून त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ राजा वोडीयार, याने इ. सन १५७८ मध्ये कारभाराची सूत्रं हातात घेतली. घरातील स्त्रियांचे

दागिने मोडून आणि जमिनी विकून त्याने कर्ज फेडलं. राजा वोडीयार गादीवर येणं अनिवार्य झालं. हा संस्थापक यदुरायापासून वोडीयार कुळातील सातवा वंशज होता.तोपर्यंत वोडीयार घराणं जवळपासचे परगणे जिंकत जिंकत विस्तारत गेलं होतं.

मैसूर या लहानश्या संस्थानाला सीमा विस्तारून राज्याचं रूप देऊन एक महत्वाचं हिंदू राज्य म्हणून त्याची ख्याती करण्याचं श्रेय या राजा वोडीयारकडे जातं. राजा वोडीयारच्या कारभाराच्या सुरुवातीला राजकीय परिस्थिती बदलली होती. विजयनगर साम्राज्य नुकतंच लयाला गेलं होतं. मैसूरप्रमाणेच इक्केरी, मदुरा, त्रिचनापल्ली, असे मोठे सुभेदार स्वतंत्र होण्याची धडपड करू लागले होते. अनेक लहान पाळेगारही त्याच महत्त्वाकांक्षेने झपाटले होते. विजापूर, हैदराबाद, येथील मुसलमानी अंमलाने हातपाय पसरायला सुरुवात केली होती. विजयनगरचं घराणं पेनुकोंडे येथून आता कारभार हाकत होतं. अशावेळी राजा वोडीयार गादीवर आला.

## ९. राजा वोडीयार - १५७८ ते १६१७.

## मैसूरचा भाग्यविधाता.

राजा वोडीयारची कारकीर्द मैसूरच्या वोडीयार इतिहासात खूप गाजली. त्याचा जन्म २ जून १५५२ मध्ये झाला. वयाच्या २६ व्या वर्षी तो राजा झाला ती तारीख होती २६ नोव्हेंबर १५७८. भावाने उधळून टाकलेल्या, रिकाम्या झालेल्या खजिन्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. हा वोडीयार अत्यंत पराक्रमी, सूज्ञ आणि धोरणी होता. प्रजाप्रेमी होता. त्याने सत्तेत आल्याबरोबर पदच्युत झालेल्या आपल्या भावाला दोन पर्याय दिले. एकतर राजघराण्यातील इतर व्यक्तींप्रमाणे तो दरबारात नुसता येऊन बसू शकतो, नाहीतर निवृत्त होऊ शकतो. त्याच्या पर्यायाप्रमाणे बेट्ट चामराज त्यानंतर मैसूरमधेच निवृत्त जीवन जगत राहिला.या काळात तग धरून संकुचित झालेल्या मुलखावर विजयनगरची सत्ता चालू होती. विजयनगरतर्फे विजयनगरच्या राजाचा चुलत भाऊ सुभेदार तिरूमल हा श्रीरंगपट्टणमध्ये कारभार करत होता. जवळपासच्या प्रदेशाचा सारा वसूल करणं त्याच्या अधिकाराखाली होतं. मैसूरचा महसूल तिरूमलकडे जायचा. त्यामुळे राजा वोडीयार श्रीरंगपट्टणच्या तिरुमलच्या दरबारी जात असे. तिरूमल आणि राजा वोडीयार सुरुवातीला सलोख्याचे संबंध

होते. तिरूमल राजा वोडीयारची हुशारी जाणून होता. पण हळूहळू दोघांच्यात दुरावा येऊ लागला. यातून मार्ग काढण्यासाठी आणि सलोखा वाढवण्यासाठी तिरूमल आणि राजा वोडीयार यांनी रंगनायकी मंदिरात भेटण्याचंही ठरलं. पण तेवढ्यात राजाचे भाऊ आणि तिरूमल यांच्यात शाब्दिक चकमक होऊन तिरुमलने राजा वोडीयारला अटक करायचं ठरवलं. राजा वोडीयारच्या विश्वासू नोकराने वेळीच राजाला ही खबर दिल्यामुळे राजा वोडीयार ब्रह्मपुरी दरवाजाने गुपचूप निघून गेला. संतापेल्या तिरुमलाने मैसूरवर हल्ला करायचं ठरवलं. १८ ऑगस्ट १५९६ या दिवशी आपली फौज घेऊन तो केसरे किल्ल्याभोवती वेढा घालायला गेला. पण या झुंजीत शेवटी तिरुमलला माघार घ्यावी लागली. राजा वोडीयार आणि तिरूमलमधला संघर्ष वाढतच गेला. त्यातूनच इ. सन १६०७ मध्ये राजा वोडीयारवर खुनाचा प्रयत्न झाला. बेलागुळा गावच्या सिंगाप्पा वोडीयार नावाच्या एका माणसाला त्यासाठी नेमण्यात आलं. सिंगाप्पा राजा वोडीयारच्या भेटीला गेला.

सुभेदार तिरुमलाचा खासगी आणि महत्वाचा निरोप द्यायचा आहे म्हणून राजाच्या अंगरक्षकांना त्याने बाहेर घालवायला सांगितलं. राजा वोडीयारने आपल्या लोकांना बाहेर जायचा हुकूम दिला. पण राजाचा पुतण्या, येलेगुरू गावाचा दीपराज मात्र एका

मोठ्या खांबामागे लपून राहिला. महाल रिकामा झाल्यावर सिंगाप्पाने कट्यार काढली आणि राजावर प्राणघातक हल्ला केला. त्याबरोबर दीपराजने झडप घातली आणि सिंगाप्पाला पकडलं. राजाचे प्राण वाचले.

इ. सन १६१७ पर्यंत आपल्या एकहाती कारभारात, गादीवर आल्याबरोबर राजा वोडीयारने  सीमेला लागून असलेली एकेक ठाणी जिंकायला सुरुवात केली. इ. सन १६०६ मध्ये सोसला आणि बेन्नूर, १६०८ मध्ये कन्नमबाडी, येलेन्डूरू, सत्यागाला, पुढील वर्षी नरसिपूर, १६१० मध्ये सिरीउरू, श्रीरंगपट्टण, करगहळ्ळी, १६१२ मध्ये सरगउरू, १६१४ साली उमतूर आणि तरीकनम्बी, १६१५ मध्ये, हुरे, तलकडी, हरदनहळ्ळी, हुळाहळ्ळी, बेलीकेरे, मुगुर, पाठोपाठच्या वर्षात रामसमुद्र आणि मावतुरू. बघता बघता त्याने आपल्या पराक्रमाने जवळची सर्व गावं आपल्या अधिकाराखाली आणली. आपल्या प्रदेशाच्या सीमा रुंदावल्या. त्यानंतर त्याने या जिंकलेल्या सर्व गावांमध्ये सारा वसुलीसाठी आणि गावाचा कारभार हाकलण्यासाठी आपली माणसं नेमली. कारभारात शिस्त आणली. श्रीरंगपट्टणच्या सुभेदार तिरूमलची, राजा वोडीयारचा वाढता प्रभाव आणि हातून निसटणारी ठाणी यामुळे चिंता वाढली. त्याने मैसूरवर स्वारी करायचं ठरवलं. त्यासाठी त्याने विजयनगरचा सत्ताधारी वेंकट राजाला

वोडीयारविरुध्द लढण्यासाठी फौज मागितली. मैसूरला ही बातमी पोचताच राजा वोडीयार लढण्याच्या तयारीला लागला. तेवढ्यात इ. सन १५०९ ते १५१० साली बेलुराचा कृष्णप्पा नायक, मुगुरचा बालनायक, उम्मत्तुरचा मलयराजैय्या असे सगळे पाळेगार एक होऊन चालून येत आहेत, अशी बातमी राजा वोडीयारला मिळाली. हे कळल्यावर राजा वोडीयार त्यांना फौज घेऊन सामोर गेला. त्यांना पळवून लावलं. राजा त्यातून मोकळा झाला.

त्याचवेळी हुळेनरसापुरावरून तिरूमल श्रीरंगपट्टणला परत जात असतांना लक्ष्मप्पा नायकाने तिरूमलवर हल्ला करून त्याला पकडलं. तिरुमलाने राजा वोडीयारकडे मदत मागितली. राजा धावून आला आणि त्याने तिरुमलची सुटका केली. अपराध्यांना पकडून त्यांचे कान-नाक कापले. ही बातमी विजयनगरला पोचल्यावर विजयनगरच्या वेंकटराजाच्या मनातली राजा वोडीयारची प्रतिमा त्यामुळे खूप उजळली. ज्याच्याविरुध्द फौजेची मदत मागायला तिरूमल गेला होता, त्याच राजा वोडीयारने तिरूमलला वाचवलं होतं. आधीच तिरुमलाच्या फौजेच्या मागणीला वेंकट राजाने नकार दिला होता. त्यात ही भर पडली. या घटनेवर खूष होऊन वोडीयारला काही खेडी वेंकटराजाने बक्षीस दिली. वेंकटच्या मनातून तिरूमल पार उतरला. त्याने तिरूमलला सुभेदार पदावरून काढून टाकण्याचं ठरवलं. तिरूमल अडचणीत

सापडला. सारा वसुली नाही, त्यामुळे जवळ पैसा नाही, डागडुजीला पैका नाही, अशावेळी काही पाळेगारांनी तिरूमलला मदत करायचं ठरवलं. राजा वोडीयारविरुध्द लढायचा त्यांचा आंतरिक हेतू होता. राजा वोडीयार त्यांच्यावर चालून गेला आणि जिंकल्यामुळे तिरूमलची अवस्था वाईट झाली.

तिरूमल आपला परिवार श्रीरंगपट्टणमधेच सोडून तलकाडूजवळ मलंगीला जाऊन राहिला. तेव्हा  राजा वोडीयार आपल्या धाकट्या भावाला, बेट्टदा चामराजला घेऊन श्रीरंगपट्टणला निघाला. त्याने तिरूमलची पत्नी रंगम्माला, इतमामाने मलंगीला पोचवण्याची व्यवस्था केली. तिरूमल याला २ स्त्रिया होत्या. दुसरी पत्नी अलमालम्मा. यानंतर तिरुमलचा मृत्यू झाला. त्याची दुसरी पत्नी अलमलम्मा तिरूमलच्या अखेरीच्या दिवसांमध्ये मलंगीला राहू लागली.

८ फेब्रुवारी, १६१० या दिवशी राजा वोडीयारने श्रीरंगपट्टणमध्ये थाटामाटात प्रवेश केला. अशा तऱ्हेने श्रीरंगपट्टण मैसूरच्या वोडीयार घराण्याकडे आलं. त्यानंतर २१ मार्च हा शुभदिवस पाहून त्यादिवशी राज्यारोहण केलं. त्या सिंहासनाचा उल्लेख भोज-सिंहासन, दक्षिण सिंहासन आणि रत्न सिंहासन असा केला गेला आहे. मैसूर राज्याची श्रीरंगपट्टण ही तेव्हापासून

राजधानी बनली. विजयनगरपासून हे राज्य मुक्त झाल्यातच जमा झालेलं होतं. यावेळी राजा वोडीयारने ज्येष्ठ पुत्र नरसराज याला युवराज पद घोषित केलं. म्हणजे राजानंतर सिंहासनावर बसण्याचा त्याचा हक्क मान्य झाला. पण हा नरसराज सप्टेंबर ७, १६१० मध्ये वारला, त्यानंतर दुसरा राजकुमार बेट्टद चामराज युवराज बनला.


विजयनगरच्या वेंकटराजाने हत्ती-घोडे, नजराणा पाठवून राजा वोडीयारच्या अधिकारग्रहणाला मान्यता दिली, पण ती श्रीरंगपट्टणचा सुभेदार म्हणूनच दिली होती. इ. सन १६१७ पर्यंत राजा वोडीयार खूपच सामर्थ्यवान बनला. राजा वोडीयारने साहित्य कलाकृतीलाही मोठा आसरा दिला. कन्नड साहित्यातील प्रसिध्द श्रीरंग महात्म्य, कर्णवृत्तांत कथे, ही त्याच्याच काळातील साहित्य कृती..मैसूरमधील नवरात्रातील उत्सव, आणि दसरा मिरवणूक समारंभ, जो अजूनही जगप्रसिध्द आहे, तो राजा वोडीयारने दिमाखदार केला. खरंतर १६१० मधील त्या पहिल्या नवरात्र उत्सवाच्या वेळीच युवराज नरसराजचा मृत्यू झाला होता, पण राजा वोडीयारने राजघराण्यातील मृत्यूसाठी नवरात्र महोत्सवात खंड पडू नये, असा दंडकच केला. त्यामुळे कितीही अनिष्ट घटना घडल्या तरी ती प्रथा आजवर कायम चालू राहिली आहे. हा राजा श्रीरंगपट्टणच्या रंगास्वामी देवाचा, मैसूरमधील कुलदैवत, लक्ष्मीकांतस्वामीचा आणि यदुगिरी-मेलूकोटेच्या नारायणाचा

मोठा भक्त होता. म्हणून त्याने लक्ष्मीकांतस्वामीच्या मंदिराला सोन्याचा कळस केला. मंदिराचा मंडप बांधला. राज्यातील अनेक मंदिरांना देणग्या दिल्या. या राजाने प्रजेच्या हिताची खूप कामं केली. इ. सन १६१० मध्ये मैसूर प्रदेशाचा विस्तार झाला आणि सैन्यबळ वाढलं तेव्हा राजा वोडीयारला सैन्यासाठी दलवाई-सेनापती नेमण्याची निकड भासायला लागली. त्याने विचारपूर्वक निवड केली ती करीकालू मल्लराजैय्या याच्या मदतीने. हा मल्लराजैय्या, तिम्मराजैय्या पहिला याचा मुलगा होता. जोपर्यत वोडीयार राजघराणे गादीवर आहे, तोपर्यंत कळाले या घराण्यात वंशपरंपरेने दलवाई पद कायम राहील असा करार राजा वोडीयार याने  मल्लराजैय्या याच्याशी केला. या कराराप्रमाणे वाढत जाणाऱ्या राज्याची सत्ता वोडीयार वंशजांकडे आणि सर्वाधिकारी ( प्रधानपद ) आणि दलवाई पद ( सेनापतीपद ) या घराण्याकडे राहाण्याचं भाषापत्र ( करारपत्र ) तयार झालं. या कराराप्रमाणे करीकालू मल्लराजैय्या हा पहिला दलवाई बनला.

कळाले अरसू घराणं.

मैसूर साम्राज्याच्या चरित्रात कळाले घराण्याला अनन्यसाधारण, महत्वाचं स्थान आहे. या कळाले घराण्याची कहाणी मैसूरच्या वोडीयार घराण्याला समांतर अशीच आहे. इ. सन १५०० च्या जवळपास द्वारकेहून दोन बंधू कांता आणि आणि कृष्णराज नशीब अजमावण्यासाठी बाहेर पडले. विजयनगर हे त्या काळातील मोठं साम्राज्य असल्याने तिथे पोचले. तिथे राजाच्या पदरी चाकरी तर मिळाली, पण वरचेवर मतभेद होऊ लागल्याने फार काळ तिथे टिकले नाहीत. मग भावाला आणि कुटुंबाला घेऊन कांता शहर सोडून बाहेर पडला आणि कळालेला आला. तिथे स्थिरावला. शेतजमीन घेऊन एक दिवस नायक बनला. त्याचा वंश पुढे चालू झाला. हा कांता या कळाले घराण्याचा संस्थापक झाला. हे घराणं अरसू कळाले नावाने प्रसिद्धीला आलं. या घराण्यात आणि वोडीयार घराण्यात आधीच रोटीबेटी व्यवहार सुरु झाला होता. हिरिया बेट्टदा चामराजाच्या मुली कांता नायकाच्या घरात सुना, नातसुना म्हणून आल्या. कांता नायकाने २० वर्षे कारभार सांभाळला..

**कळालेचं अरसू दलवाई घराणं –**



मैसूर साम्राज्याच्या चरित्रात कळाले घराण्याला अनन्यसाधारण, महत्वाचं स्थान आहे. या कळाले घराण्याची कहाणी मैसूरच्या वोडीयार घराण्याला समांतर अशीच आहे. इ. सन १५०० च्या जवळपास द्वारकेहून दोन बंधू कांता आणि आणि कृष्णराज नशीब अजमावण्यासाठी बाहेर पडले. विजयनगर हे त्या काळातील मोठं साम्राज्य असल्याने तिथे पोचले. तिथे राजाच्या पदरी चाकरी तर मिळाली, पण वरचेवर मतभेद होऊ लागल्याने फार काळ तिथे टिकले  नाहीत. मग भावाला आणि कुटुंबाला घेऊन कांता शहर सोडून बाहेर पडला आणि कळालेला आला. तिथे स्थिरावला. शेतजमीन घेऊन एक दिवस नायक बनला. त्याचा वंश पुढे चालू झाला. हा कांता या कळाले घराण्याचा संस्थापक झाला. हे घराणं अरसू कळाले नावाने प्रसिद्धीला आलं. या घराण्यात आणि वोडीयार घराण्यात आधीच रोटीबेटी व्यवहार सुरु झाला होता. हिरिया बेट्टदा चामराजाच्या मुली कांता नायकाच्या घरात सुना, नातसुना म्हणून आल्या. कांता नायकाने २० वर्षे कारभार सांभाळला..

या काळात उमत्तुरच्या प्रमुखाशी त्याचा सतत संघर्ष चालू होता. पण या काळात एक वेळ अशी आली की गावचा प्रमुख आणि हे अरसू घराणं यांच्यात शत्रुत्वाची मोठी ठिणगी पडली आणि त्यात ह्या अरसू घराण्याची मोठी कत्तल झाली. या

घराण्यात भाऊबंदकीही प्रत्येक पिढीत होत गेलीच होती.. त्यावेळी कांता नायकाचा ५ वर्षांचा असलेला मल्लराज नावाचा पणतू दैवी चमत्काराने वाचला..अरसू घराण्यातील एका अश्रिताने त्या मुलाला आणि त्याच्या आईला, दिपराजम्मा हिला माहेरी म्हणजे राजा वोडीयारकडे पोचवलं. दिपराजाम्मा ही बोळा चामराजाची कन्या होती त्यामुळे मैसूरमध्ये मल्लराज लहानाचा मोठा झाला. राजा वोडीयार हा त्याचा मामा. मल्लराजा मोठा झाल्यावर कळालेचं वतन त्याच्या भाऊबंदाच्या तावडीतून ताब्यात घेण्याची इच्छा त्याने राजा वोडीयारकडे बोलून दाखवली. तेव्हा राजाने त्याला लष्करी सहाय्य तर दिलंच पण यलांदुरच्या हिरिया रामराजा नायकाकडूनही मदत देववली. त्या रामराजा नायकाने आपली कन्या देवरम्मा मल्लराजला दिली. या लग्नाच्या वेळी मंडपात आग लागली. त्या आगीत मल्लराजाचा पाय भाजला. त्या भाजण्याच्या काळया डागांमुळे त्यामुळे त्याला “ करे-काळे, कालू-पाय – “ काळया पायाचा मल्लराज “ असं नाव पडलं.

भाऊबंदांशी झालेल्या या चढाईत मल्लराजचा विजय झाला. त्याचं शौर्य आणि वकूब लक्षात घेऊन राजा वोडीयारने त्याला आपल्या सेनेचं दलवाई पद देऊ केलं आणि हे दलवाई पद त्या कळाले घराण्यात वंशपरंपरेने राहील असा करार केला. अशारितीने मैसूरच्या वोडीयार घराण्याच्या भरभराटीमुळे अरसू


घराण्याचीही प्रतिष्ठा वाढायला लागली. या दलवाई पदाच्या करारामुळे वोडीयार घराण्याला पुढील शतक भराच्या काळात मोठं वादळ सोसावं लागलं.

राजा वोडीयारच्या काळात एक फार वाईट शापित घटना घडली. ही वोडीयार घराण्याला वर्षानुवर्षे, पिढ्यान पिढ्या भोगावी लागली. ही घटना घडली तलकाडू या गावात. ती घटना अशी होती – विजयनगरचा प्रतिनिधी म्हणून कारभार पाहणार सुभेदार तिरूमल ज्या तलकाडू गावात जाऊन राहिला ते गाव मैसूरपासून ३३ मैलांवर आहे. त्याची पत्नी अलमाल्लम्मा ही रंगनाथस्वामीची आणि रंगनायकी देवीची भक्त होती. ती श्रीरंगपट्टणमधेच राहत होती. आपला पती शेवटच्या घटका मोजत आहे हे कळल्यावर ती पतीच्या भेटीला गेली आणि पतीनिधनानंतर श्रीरंगपट्टणचं वास्तव्य सोडून तलकाडूजवळच्या मलंगी गावात राहू लागली. तिचे मौल्यवान जडजवाहीर ती मंगळवार आणि शुक्रवार या दोन दिवशी श्रीरंगपट्टणमधील रंगनायकी देवीला चढवत असे. त्यात एक अनमोल नथही होती.

अलमल्लम्मा जेव्हा तलकाडूला निघून गेली, तेव्हा जातांना देवीला घालायच्या दागिन्यांसकट जडजवाहीर ती घेऊन गेली. राजा वोडीयारला देवीला घालायच्या त्या मौल्यवान

अगणित जडजवहीराचा लोभ सुटला. राजा वोडीयारने अलमल्लम्माला तिच्याजवळचे देवीला घालायचे दागिने राजाला देण्याचा हुकूम पाठवला. तिने हुकूम मानला नाही तर सैन्य पाठवून सारं जडजवाहीर ताब्यात घ्यायचा दम भरला..या मगरूरीने आणि अपमानाने राजा वोडीयारवर संतापलेल्या अलमल्लम्माने सारे दागिने घेऊन कावेरी गाठली. आपले दागिने कावेरीच्या पाण्यात फेकले आणि शापवाणी उच्चारली,

" सारे तलकाडू वालुकामय होवो, मलंगीजवळच्या कावेरीच्या पाण्यात भोवरे निर्माण होवोत आणि वोडीयार घराणं नि:संतान होवो. एवढं बोलून तिनेही कावेरीत आपला देह झोकून दिला. राजा वोडीयार या बातमीने भानावर आला. त्याला पश्चात्ताप झाला. अलमालम्माच्या शापाचा उपशम व्हावा म्हणून राजाने, अलमल्लामाचा सुवर्णपुतळा करून तो राजप्रासादात ठेवला. दर नवरात्रात त्या पुतळ्याची पूजा सुरु केली. तिच्या शापवाणीचा परिणाम वोडियार घराण्याला कायम भोगावा लागला. दर पिढीत दत्तक घ्यायचा प्रसंग पुढच्या वारसांना भोगावा लागला. आजही तलकाडूमधील मंदिरांच्या बाहेर वाळूचे थर भरलेले दिसतात. आधीच तिथली जमीन तशी असती तर मंदिरं बांधताच आली नसती. मलंगीजवळ कावेरी नदीत भोवरेही सापडतात हे वास्तव आहे. पण या आख्यायिकेला शास्त्रीय लिखित पुरावा नाही.




राजा वोडीयार एक समर्थ, युध्दनिपुण, पराक्रमी, प्रजेचा लोभ असलेला राजा अशी त्याची कारकीर्द राहिली. राज्यव्यवस्था त्याने चोख ठेवली. ठिकठिकाणी महसूल, आणि गावाचा कारभार करण्यासाठी अधिकारी नेमले. या राजाच्या काळात मैसूरची भरभराट खूप झाली. राज्याच्या सीमाही दूरवर पसरल्या. या राजाने मैसूरची राजधानी श्रीरंगपट्टणला हलवली. मूळ पुरुष यदुरायाने त्यागलेला वैष्णव धर्म परत स्वीकारला. राजा वोडीयारच्या पट्टराणीचं नाव होतं विरम्बा. ती बोम्मनहळ्ळीची होती. दुसरी

धोड्डम्मा बेलीकेरीची, तिसरी केंपम्मा हुरा गावाची, तुमजम्मा बेळूगाची, आणि तिप्पूरची मुद्दम्मा. विराम्बाला ३ मुलगे, आणि तुमजाम्माला एक असे त्याला ४ मुलगे झाले. त्याला बेट्टदा चामराज हा एक सख्खा भाऊ आणि दोन सावत्र भाऊ होते. या भावांचं त्याला राज्यकारभारात पूर्ण सहाय्य होतं. आयुष्याच्या अखेरीच्या काळात राजा वोडीयारला खूप दु:ख पचवावं लागलं. त्याचे चार तरुण मुलगे त्याच्या हयातीतच मरण पावल्यानंतर गादीला वारस कोण याची काळजी राजाला लागली. आपल्या भावांशी त्याने विचार विनिमय केला. राजा वोडीयारचे भाऊही वृद्धत्वाकडे झुकले होते. त्यामुळे राजाचा नातू, नरसराज या ज्येष्ठ पुत्राचा पुत्र चामराज याला सिंहासनावर बसवण्याचा विचार नक्की झाला.

२० जून १६१७ या दिवशी वयाच्या ६६ व्या वर्षी राजा वोडीयार स्वर्गवासी झाला.


## १०. चामराज वोडीयार प्रथम. – इ. सन १६१७ ते इ. सन १६३७

राजा वोडीयारनंतर १३ व्या दिवशी त्याचा नातू चामराज प्रथम याचा राज्याभिषेक झाला. २१ एप्रिल १६०३ हा त्याचा जन्मदिवस. गादीवर आला तेव्हा १५ वर्षांचा होता. पण प्रत्यक्ष कारभार दलवाई बेट्टदा अरसू छामप्पा याच्या हाती आला. हा राजा बनला तेव्हा मैसूरच्या उत्तरेला जगदेव रायचं चिन्नपट्टण, दक्षिणेला मदुरा, आणि पूर्वेला लहान मोठे पाळेगार, नायक, देसाई भूप्रदेश सांभाळून होते. यांच्यात सतत जमिनीवरून कुरघोड्या चालत.

यावेळी मैसूरच्या भोवती मुसलमानी आदिलशाही-कुतुबशाही अंमल सुरु झाला होता आणि त्यांचा प्रभाव वाढायला लागला होता. शिवाय काही नायक स्वतंत्र होण्याच्या प्रयत्नात होते. इ. सन १६१७ ते १६२० ही ४ वर्षे त्या घटना हाताळण्यात गेली. तोपर्यंत चामराज वोडीयार सज्ञान झाला होता आणि कारभारात लक्ष घालायला लागला होता. ४ वर्षे अनियंत्रित सत्ता उपभोगणाऱ्या बेट्टदा अरसू दलवाईला याचा त्रास वाटायला लागला. त्यावर उपाय म्हणून दलवाईने राजाचे अंगरक्षक, बोम्मरसा वैद्य, रंगनाथ दीक्षित शिक्षक असे लोक बाजूला करून स्वत:ची माणसं वोडीयारभोवती नेमली.

त्यानंतर अरसू दलवाईचा मोठा भाऊ धोड्ड ( थोरला ) छामप्पा आणि त्याचा स्वत:चा मुलगा ( धाकटा ) चिन्न छामप्पा यांनी आपल्या घरात सत्ता राहावी म्हणून या वोडीयारला काढून त्या जागी इमादीराज या तान्ह्या राजपुत्राला गादीवर नेमून आपल्या हाती सत्ता ठेवायचा कट रचला. पण वोडीयार चामराजाच्या सुदैवाने राजमहालातील एका सेवकाने हे संभाषण ऐकलं आणि वोडीयारला सावध केलं. वोडीयार चामराजाने दोनही गुन्हेगारांना पकडून त्यांचा गुन्हा शाबित करून त्यांना ठार केलं, बेट्टदा अरसू दलवाईला पकडून आणून त्याचे डोळे काढले आणि त्याला कायमचं तुरुंगात डांबलं. त्यानंतर बेन्नुरच्या लिंगाण्णाला दलवाई नेमून कारभार सुरु केला. यानंतर त्याने राज्य विस्ताराला सुरुवात केली. जानेवारी १६२६ सालच्या चिन्नपट्टणच्या स्वारीत हा दलवाई मारला गेला आणि त्याजागी वोडीयार चामराजने बसवलिंगाण्णा याची नेमणूक केली. पण १६३० मध्ये याचा मृत्यू झाल्यावर विक्रमराय अरसू याची दलवाईपदी नेमणूक झाली.

या चामराज वोडीयारच्या काळात मैसूर राज्याचा खूप विस्तार झाला. यावेळेपर्यंत मैसूरच्या सीमा चिन्नापट्टणपासून नागमंगलपर्यंत उत्तर-दक्षिण पसरल्या होत्या आणि पेरीयापट्टण - चिन्ना रायपट्टण ते मळवल्लीपर्यंत विस्तारल्या होत्या.




इ. स. १६१७ ते १६३७ पर्यंत मैसूर राज्याचा विस्तार.

या वोडीयारने कारभारातील सुव्यवस्थेसाठी ठिकठिकाणी “ कार्यकर्ता '' म्हणजे आताचे कमिशनर नेमले. लष्करात सुधारणा केल्या. नवीन नवीन युध्दशस्त्रं सामग्री बनवली जाऊ लागली. लष्कराचं सामर्थ्य गजदळ हे सतत पुरवठ्याला येत राहावं याच्यासाठी कायम स्वरूपी व्यवस्था करण्यात आली. शत्रूकडून लुटण्यातून आलेली आणि राज्यात बनवली जाणारी युद्धसामग्री यासाठी इ.सन १६३५ मध्ये स्वतंत्र खातं निर्माण केलं.

त्याच्या राज्यात शैव-वैष्णव-जैन इत्यादि पंथांना आश्रय मिळाला. त्याची स्वत:ची शैव आणि वैष्णव पंथांवर श्रद्धा होती. श्रावणबेळगोलचे मुख्य पुरोहित गुरु चारुकीर्ती पंडित योगेंद्र हे जैन धर्माची होणारी अवनती पाहून नाराज होऊन सोडून गेले हे कळल्याबरोबर राजाने माणसं पाठवून त्यांना परत येण्याची विनंती

केली. त्यांचं वाढलेलं कर्ज फेडलं. त्यांच्या धर्मवृद्धीसाठी लागणाऱ्या सर्व सोयी पुरवल्या. कावेरीतून श्रीरंगपट्टणजवळ कालवे काढले. मेलूकोटेला तलाव बांधला, नदीवर घाट बांधले. तो स्वत: क्रीडापटू होता. विद्वान होता, संगीतप्रेमी होता. त्याने विद्वानांचा गौरव केला, दरबारात विविध धर्माच्या साहित्याच्या चर्चा घडवून आणल्या. त्यांच्या हातून श्रेष्ठ दर्जाची साहित्यकृती निर्माण केली. पदण्णापंडिताकडून अश्वशास्त्र आणि हयसरा-समुच्चया नावाची अश्वशास्त्रावरची पुस्तकं लिहून घेतली. शैव धर्माचं तत्वज्ञान सांगणारा "ब्रह्मोत्तरखंड" आणि चामराजोक्तीविलासा " हे रामायणावरचे दोन ग्रंथ त्याच्या प्रोत्साहनाने निर्माण झाले. या त्याच्या कर्तृत्वामुळे विजयनगराच्या अस्तानंतरचं हिंदू साम्राज्य म्हणून मैसूरची प्रतिष्ठा वाढली.

या राजाला ५ राण्या होत्या. येळंदूरच्या मुद्दमजाम्मा, बेळूगलीची देविराम्मा, मुगुरची सिद्दमज्जा, मुद्दनकोटेची छन्नजम्मा आणि धोड्डजम्मा. याला संतती नव्हती. २० वर्षे राज्य करून वयाच्या ३५ व्या वर्षी २ मे, सन १६३७ मध्ये चामराज मृत्यू पावला.

## ११. राजा वोडीयार द्वितीय –

## इ. सन १६३७ ते १६३८.

राजा वोडीयार मृत्यू पावला तेव्हा त्याची पत्नी ४ महिन्यांची गर्भवती होती. वडिलांच्या मृत्युनंतर ६ महिन्यांनी याचा जन्म झाला. पण याची सत्ता एक वर्ष चालली. १४ मे १६३७ या दिवशी त्याने राज्यारोहण केलं तेव्हा तो १९ वर्षांचा होता. याला २ राण्या होत्या. १. वेंकटजम्मा २. नंजम्मा. पण दोघींनाही संतती नव्हती.. पण प्रबळ झालेल्या विक्रमराय या दलवाईबरोबर न पटल्यामुळे तो वर्षभरातच आजारी पडला आणि मरण पावला. त्याच्या निधनाचं कारण विषप्रयोग हे ठरलं आणि त्याचा कर्ता होता सेनापती असावा असं म्हटलं गेलं. याला पुत्र नसल्यामुळे याच्या मृत्यूमुळे राजा वोडीयारची वंशशाखा संपली.

## १२. रणधीर कांतीरव नरसराज वोडीयार – इ. सन १६३८ ते इ. सन १६५९

एक वर्षातच राजाचा मृत्यू झाल्यामुळे आता मैसूर सिंहासनावर कोणाला बसवायचं हा प्रश्न निर्माण झाला. पहिल्या राजा वोडीयाराचे दोन धाकटे भाऊ होते. एक सख्खा भाऊ बेट्टदा चामराज आणि आणि एक सावत्र भाऊ मुप्पाणा देवराजैया. सख्ख्या भावाला दोन मुलगे होते, थिम्माराज वोडीयार आणि गुरवाम्बा या पत्नीचा कांतीरव नरसराज वोडीयार.

त्यात राजघराण्याच्या प्रथेप्रमाणे कांतीरव नरसराज सिंहासनावर बसला. २ मे १६१५ हा त्याचा जन्मदिवस. याचं बालपण वडिलांबरोबर तेरेकानम्बी इथे आणि पुढचा काल मामेभावांबरोबर आजोळी, हुरे गावी गेलं. याला उत्तम लष्करी शिक्षण मिळालं होतं. हा अत्यंत पराक्रमी, उत्कृष्ट खेळाडू, कुस्ती जाणणारा होता. त्याच्या कुस्तीतील नैपुण्याबद्दल एक कथा सांगतात. एकदा वडिलांबरोबर रामेश्वराहून परतीचा प्रवास करत असतांना त्रिचनापल्लीमधल्या राजदरबारातील एका बलवान मल्लाने त्याच्याशी लढून त्याला हरवण्याचं आव्हान राज्यातील सर्वांना दिलं आहे असं कांतीरव नरसराज राजपुत्राने ऐकलं. या राजपुत्राने आपली ओळख लपवून त्या मल्लाचं आव्हान

स्वीकारलं आणि त्रिचनापल्लीतील दरबारात प्रवेश केला. दरबारात राजासह सारा दरबार कुस्तीची ही लढत पाहायला बसला. ह्या नवख्या तरुणाने, त्या मल्लाला सहज जमिनीवर लोळवलं. प्रेक्षक श्वास रोखून ही लढत पहात होते. नंतर एक क्षणभर दोघेही मल्ल उभे राहिले, तेव्हा कांतीरवाने त्या मल्लाचं मस्तक धरलं आणि आपल्या कमरेला लपवलेल्या तलवारीने लीलया त्या मल्लाचं शीर धडावेगळं केलं. प्रेक्षकांना अचानक एक मस्तक जमिनीवरून गडगडतांना दिसलं. राजाने या नवख्या मुलाचा विजय मान्य केला, आणि त्याला तो बक्षिस देणार इतक्यात तो अचानक उगवलेला तरुण निघूनही गेला होता. एवढंच नव्हे तर हा राजपुत्र आपल्या मार्गाला लागला, तेव्हा वाटेत एका चुना-मातीने तयार केलेल्या खांबालाही त्याने त्याच तलवारीने २ तुकड्यांमध्ये कापून काढलं, इतकी त्याची तलवार सुंदर बनावटीची होती.

अशीच दुसरी त्याच्या शौर्याची कथा सांगितली जे, ती म्हणजे, त्रिचीच्या नायकाने त्याला ठार करण्यासाठी २५ मारेकरी पाठवले. ते सर्व कांतीरव वोडीयारच्या शयनगृहात लपून बसले. जेव्हा कांतीरव निद्रेसाठी महालात आला, तेव्हा त्याला संशयास्पद काहीतरी जाणवलं. तेव्हा अचानक २५ लोकांनी त्याच्यावर एकत्र हल्ला केला. कांतीरव नरसराज वोडीयार या सर्वांशी एकटा लढला. “ विजयनरसिंह ” या आपल्या तलवारीने सर्वांना कापून

काढलं. काहींना मारामारी करून अर्धमेले केलं. नंतर चौकशी करताना आपले पहारेकरी त्रिचीच्या नायकाला विकले गेले आहेत हे त्याला कळलं.

वयाच्या २४ व्या वर्षी, २२ नोव्हेंबर, १६३८, या दिवशी कांतीरव सिंहासनावर बसला. आपल्या कारकीर्दीत त्याला मोठं राजकारण खेळावं लागलं.

कारण आता दक्षिणेतील राजकीय परिस्थिती खूपच रंगतदार झाली होती. अनेक खेळाडू त्या रणपटलावर उतरले होते. १५ व्या शतकाच्या अखेरीला केरळ किनाऱ्यावर उतरलेले पोर्तुगीज स्थानिक राजकारणात भाग घ्यायला लागले होते. हसन गंगू बहामनीच्यानंतर निर्माण झालेल्या ५ शाह्यांनी विजयनगर तर गिळलं होतंच पण आता उत्तरेतून प्रभावशाली बनलेल्या मुघल घराण्यातील अकबर हा दक्षिण भारत कब्जात घ्यायच्या महत्त्वाकांक्षेने दक्षिणेत उतरला होता. त्याला तर दक्षिणेतील मुसलमानीच राज्यच काय, पण हिंदू राज्यही जिंकायची होती.

या काळात मैसूरशिवाय विजयनगरच्या अंतानंतर लहानमोठे पाळेगारही आता स्वतंत्रपणे स्वत:ला राजे म्हणवून घ्यायला लागले होते. त्यात इक्केरीचा शिवाप्पा नायक, मदुरेचा नायक, नागमंगलमचा चिन्नैय्या, पेरीयापट्टणचा मुदलियार, असे अनेक

होते..पण हे सारे कमी ताकदीचे नायक काळवेळ पाहून कोणत्यातरी बलवानाला लढाईत सामील होत असत. मैसूरचा कांतीरव नरसराज वोडीयार मात्र स्वबळावर परकियांशी लढत होता आणि विजयही मिळवत होता. त्याचं कारण होतं, त्याचा मुत्सद्दीपणा, राजनीती चातुर्य, शौर्य, कारभार कुशलता आणि तलवारबाजीतील प्राविण्य.. आपल्या पूर्वजांच्या हत्येमागे सर्व खात्यांचा प्रमुख असेले सर्वाधिकारी आणि सैन्याधिकार असलेले दलवाई होते हे लक्षात ठेवून कांतीरव नरसराज वोडीयारने आपल्या २० वर्षांच्या हयातीत या १० वेळा दलवाई बदलले. कुणाही दलवाईला फार काळ सत्ता उपभोगू दिली नाही. आपल्या आधीचा वोडीयार  एक वर्षाच्या अवधीत कशाने मेला, त्याच्या हत्येमागे कोण आहे, याचा शोध लावून वोडीयार कांतीरवने विक्रमराय दलवाई हा अपराधी होता हे कळल्यावर त्याला पदावरून काढून टाकलं आणि त्याच्याकडून सर्व शस्त्रास्त्रंही काढून घेतली. त्या जागी त्याने नंतर थिम्माप्पा नावाच्या माणसाला दलवाई नेमलं.

सारावसुलीसाठी जागोजाग माणसे नेमून त्याचा हिशेब ठेवण्याची व्यवस्थित पद्धत सुरु केली. पैशावर माजलेल्या, महसूल बुडवणाऱ्या जहागिरदारांना ताब्यात ठेवलं.. वृत्तीने श्रद्धाळू असलेल्या या राजाने शैव-वैष्णव-जैन, सर्वच मंदिरं आपल्या राज्यात जागोजाग उभारली. कानडी आणि संस्कृत लेखकांना

उत्तेजन दिलं. चक्रवाढ व्याज, टांकसाळ शास्त्र, जमिनीची मोजणी, असे विषय असलेलं गणितावरचं  आणि आर्थिक विषयावरचं भास्कर नावाच्या व्यक्तीकडून “ बेरे गणित “ नावाचं सुंदर पुस्तक लिहून घेतलं. “ मार्कंडेय रामायण “ आणि ‘’ कांतीरवा नरसराज विजयम् “ ही पुस्तकं प्रसिध्द केली. कलाकारांना उत्तेजन दिलं. याची कारकीर्द “ रामराज्य ‘’ म्हणून ओळखली जाते, ज्या काळात, सर्वत्र भरपूर पाऊस, पीकपाणी, फळफळावळ, परमेश्वर भरपूर पिकवत होता, राज्याच्या चारही दिशांना शांतता नांदत होती, स्त्रियांच रक्षण होत होतं, स्त्रिया संसारात आनंदाने नांदत होत्या, प्रजा रोगराई मुक्त होती. राज्यात समृद्धी आणि सुख नांदत होतं.

३१ जुलै १६५९ यादिवशी, वयाच्या ४५ व्या वर्षी हा राजा वारला. १० राण्या असूनही निपुत्रिक म्हणून वारला. एका राणीला मुलगा झाला, पण तो ५ व्या वर्षी बालवयातच मरण पावला. राजाच्या स्वर्गवासानंतर त्याच्या राण्या सती गेल्या. याच्या निधनामुळे वोडीयार घराण्याच्या बेट्टदा चामराज वोडीयारच्या शाखेचा अंत झाला.

आता सिंहासनासाठी परत वोडीयार घराण्यातील युवकाचा शोध सुरु झाला.

## १३. देवराज वोडीयार – इ. सन १६५९ ते १६७३

कांतीरव नरसराज वोडीयारच्या मृत्यूनंतर त्याला वारस नसल्यामुळे राजा वोडीयारच्या सावत्र भावाचा, मुप्पीन देवराज वोडीयार याचा तिसरा मुलगा देवराज, वयाच्या ३२ व्या वर्षी गादीवर आला. मृत्युपूर्वी ३ दिवस आधी कांतीरवाने त्याला दत्तक घेतलं होतं. कांतीरवाच्या निधनानंतर १३ दिवसांनी, १९ ऑगस्ट १६५९ या दिवशी देवराज सिंहासनावर बसला.. २५ मे १६२७ हा देवराजाचा जन्मदिवस.

राजपद मिळाल्यावर त्याला लगेच राज्याभोवतीच्या नायकांशी सामना करावाच लागला. हंपराजैय्या हा त्याचा दलवाई म्हणजे सेनापती होता. नवीन राजा म्हणजे शेजारच्या राजांना नवीन प्रदेश जिंकायची नवीन संधी. त्याप्रमाणे मदुरा आणि इक्केरी या दोन्ही ठिकाणच्या नायकांनी मैसूर वर हल्ला केला. इक्केरीच्या शिवाप्पानायकवर देवराज वोडीयारने मोठी फौज पाठवली, पण त्यात मैसूरचे सेनापती आणि इतर ६ सरदार पकडले गेले, सामानही लुटलं गेलं. शिवाप्पा नायकाने मग सरळ श्रीरंगपट्टणवरच कूच केलं आणि श्रीरंगपट्टणच्या किल्याला वेढा घातला तेव्हा वोडीयार संकटात सापडला. आदिलशहाच्या रणदुल्लाखानला वोडीयारने मदतीला बोलावलं. शिवाप्पा नायकाच्या फौजेत पैसा वाटून

वोडीयारने शिवाप्पाची फौज निकामी केली, तेव्हा शिवाप्पाला माघार घ्यावी लागली आणि तो त्याच्या राज्यात बिदनूरला जायला निघाला. तेव्हा देवराज वोडीयाराने त्याच्यावर जोराचा हल्ला केला. दरम्यान पहिल्या लढाईत पराभूत झालेला दलवाई हंपीराजैय्याही त्याला सामील झाला. जोरदार मारगिरी झाली. शिवाप्पा नायकला धुळीला मिळवून वोडीयारला जरीपटका, हत्ती-घोडे-खजिना अशी खूप मोठी लूट मिळाली. या लढाईनंतर इक्केरीचे शिवाप्पाचे वंशज आणि मैसूरमध्ये कायमचं वैर राहिलं. या प्रचंड लुटीतून देवराज वोडीयारने कालवे बांधले, घाट बांधले, तलाव बांधले. मंदिरं बांधली. अनेक लोकोपयोगी कामे केली. काही पैसा फौजेत वाटला. या लुटीतून त्याने बांधून काढलेल्या चामुंडेश्वरी देवळाच्या १००० पायऱ्या अजून त्याची साक्ष देतात. शिवाय त्याच मंदिराच्या वाटेवर उभा प्रचंड मोठा ग्रॅनाईटचा नंदी आजही देवराज वोडीयारच्या पराक्रमाची आणि मैसूरच्या वैभवाची साक्ष आहे. शिवाय त्या लुटीतून मिळालेलं जवाहीर वापरून स्वत:साठी रत्नजडित जोडे तयार केले, जे तो राज्याच्या महत्वाच्या सणांना आणि समारंभांना घालत असे. त्याच्या काळात पांथस्थांच्या, यात्रेकरूच्या सोयी, सुविधांसाठी त्याने अनेक सराया, बागा, तलाव बांधले. सावलीचे वृक्ष लावले.

इ. सन १७६५ पर्यंत देवराज वोडीयार यशाच्या आणि भाग्याच्या शिखरावर होता.  इ. सन १६७३ पर्यंत त्याने शांततेने राज्य कारभार केला. सुखसमृद्धीत प्रजाही सुखी होती. राज्याच्या सीमा, पूर्वेला सालेम, पश्चिमेला सक्करेपट्टण, उत्तरेला चिक्कनायकनहळ्ळी आणि दक्षिणेला इरोडे एवढ्या मुलुखापर्यंत पोचल्या होत्या. आपल्या पाळेगारांशी त्याने त्यांच्या स्वभावाशी जुळतं घेऊन संबंध ठेवले होते. अनेक देवस्थानांना त्याने उदारपणे देणग्या दिल्या. तो स्वत: विष्णूभक्त होता. त्याच्या दरबारात त्याच्या वैभवाच सुंदर प्रदर्शन भारत असे. तो स्वत: गळ्यात फुलांच्या माळा, कपाळाला गंध, हातात तालावर घेऊन रेशमी वस्त्रांमध्ये दरबारात येई. त्याच्याभोवती त्याचं मंत्रीमंडळ असे. त्याशिवाय विद्वान, लेखक, कलाकार, चतुरंग सेनेचे अधिकारी असत. अनेक विद्वत्तापूर्ण पुस्तकांची निर्मिती या देवराजा वोडीयारच्या काळात झाली. तो स्वत: तर्कशास्त्र, वेदशस्त्र, आणि राज्य शास्त्राचा अभ्यासक होता. सतराव्या शतकापासून पश्चिम किनाऱ्यावर फ्रेंच आणि पोर्तुगीज आणि पूर्व किनाऱ्यावर इंग्रजही हातपाय पसरायला लागले होते. फ्रेंच राजाचा दूत फाल्कॉम हा व्यापाराच्या करारासाठी वोडीयार देवराजाच्या दरबारी येऊन गेला होता.

मुदजम्मा आणि देवाजाम्मा अशा त्याला दोन राण्या होत्या. या दोघींपासून त्याला संतती झाली नाही. देवराज वोडीयारचा मृत्यू ११ फेब्रुवारी १६७३ रोजी चिकनायकान्हळ्ळीच्या राजप्रासादात झाला. त्याचं शव श्रीरंगपट्टणमध्ये आणण्यात आलं आणि त्याच्या इच्छेनुसार कावेरीच्या तीरावर त्याचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

## १४. चक्रवर्ती चिक्कदेवराज वोडीयार – इ. सन १६७३ ते इ.सन १७०४ .

मैसूरला वैभवाच्या कळसावर नेणारा गादीवर आला चिक्कदेवराज वोडीयार. धोड्ड देवराजाचा हा मुलगा. याच्या आईचं नाव अमृतम्बा. वोडीयार देवराजचा हा पुतण्या. हा राजा वोडीयार घराण्याच्या इतिहासात मोठा नावलौकिक गाजवून गेला..इ. सन १६४५ मध्ये याचा जन्म झाला. २८ फेब्रुवारी, इ. सन १६७३ मध्ये २८ व्या वर्षी हा सिंहासनावर बसला. तोपर्यंत आपल्या काकाबरोबर त्याने अनेक लढायांमध्ये भाग घेतला होता आणि उत्तम लष्करी डावपेचांचं शिक्षण घेतलं होतं. भावी राजा म्हणून त्याच्यावर चांगले संस्कार व्हावेत आणि धर्मशास्त्र, राजनीती, साहित्य, तत्वज्ञान यांचं उत्तम शिक्षण मिळावं म्हणून देवराज वोडीयारने चिक्कदेवराजला श्रीरंगपट्टणपासून दूर हनगल या गावी ठेवलं. तिथे त्याच्या शिक्षणासाठी तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, या पंडितांची व्यवस्था केली. तिथेच विशालाक्ष पंडित यांच्याबरोबर त्याची घनिष्ट मैत्री झाली. देवराज वोडीयारच्या निधनानंतर, राज्याभिषेकासाठी हनगलपासून समारंभपूर्व मिरवणुकीने त्याला श्रीरंगपट्टणला दलवाई कुमारय्याने आणलं.

सत्ता हाती घेतल्याबरोबर त्याने आपल्या मंत्रिमंडळाची स्थापना केली. हनगलच्या विशालाक्ष पंडितला चिक्कदेवराजाने पंतप्रधानपद दिलं. १७८६ मध्ये त्याचा खून झाल्यावर तिरूमल ऐयांगार हा शेवटपर्यंत प्रधानमंत्री राहिला. दुसरं महत्वाचं दलवाईपद कुमारय्याकडेच ठेवलं. हनगलमध्ये असतांना घनिष्ट मैत्री झालेला दुसरा मित्र तिरुमलरैय्या याला कारभारातील सहकारी नेमलं. महाराष्ट्रात शिवाजी, उत्तरेत औरंगजेब आणि दक्षिणेत चिक्कदेवराज असा तो काळ होता.

चिक्कदेवराज राजा झाला तोपर्यंत दक्षिणेतील राजकारणाने खूप वेग घेतला होता. महाराष्ट्रात शिवाजीमहाराजांनी स्वत:ला ६ जून इ. सन १६७४ ला राज्याभिषेक करून घेऊन आपल्या स्वराज्याला राजा मिळवून दिला होता. हे दोघे समकालीन. शिवाजीमहाराजांची उत्तरेत औरंगजेब आणि दक्षिणेत आदिलशहा, कुतुबशहा यांच्याशी त्यांची लढाई चालू होती. दुसरीकडे औरंगजेबाच्या पंजातून सुटण्यासाठी ही दोन्ही राज्ये अस्तित्वासाठी धडपडत होती. इक्केरीप्रमाणेच मदुरेचा चोक्कानाथ नायकही विजयनगरपासून स्वतंत्र झाला होता. या मोठ्या नायकांचं अनुकरण करत लहान लहान पाळेगारही-जमीनदारही स्वतंत्र व्हायला धडपडत होते. चिक्कदेवराज वोडीयारला गादीवर आल्यावर या लहान मोठ्या नायकांना

जिंकायचं काम महत्वाचं होतं. चिक्कदेवराज वोडीयारने, राज्याभिषेक झाल्याबरोबर ५ व्या दिवशी हातात तलवार घेतली आणि मैसूरच्या पूर्वेकडे मोहीम काढली. धुलीकोटे, मुत्तनजट्टी परमट्टीपर्यंत तो ठाणी जिंकत गेला, आणि सालेमवर पोचला. सालेमवरून मदुरेच्या चोक्कनाथवर त्याने स्वारी केली. त्याचा पूर्ण पराभव करून मोठी लूट मिळवली. त्यापुढची कोंगुनाडूपर्यंतची ठाणी जिंकून त्या नायकांकडून खंडणी वसूल केली. मदुरा, मागडी, इक्केरी, सत्यमंगलम् अशी सगळी लहान मोठी ठाणी त्याने हाती घेतली. अशातऱ्हेने वर्षाअखेरीला तो विजयी होऊन परतला. पुढील २ वर्षांमध्ये म्हणजे १६७७ सालापर्यंत चिक्कदेवराज वोडीयारने मैसूरची सीमा मलबारपर्यंत नेऊन पोचवली. मलबारही त्याच्या हाताखाली आलं. मैसूर शांती आणि समृद्धीच्या वैभवात न्हाऊन निघालं होतं.

या काळात राजकीय पटलावर अनेक घडामोडी घडत होत्या. त्यातील एक मोठी घटना म्हणजे, तंजावरच्या नायक आणि मदुरेच्या नायकांच्या भांडणात, विजापूरच्या आदिलशहाने शहाजीपुत्र एकोजीला तंजावरच्या मदतीला फौज घेऊन पाठवलं. एकोजीच्या मदतीने तंजावर नायक चांगमलदास याची स्थापना झाली. पण इ. सन १६७५ मध्ये आदिलशहाचा मृत्यू झाल्यावर एकोजीने तंजावर आपल्या ताब्यात घेतलं आणि कायमचं आपलं

स्थान भक्कम केलं. तेव्हापासून तंजावरला एकोजीच्या भोसले घराण्याची सत्ता सुरु झाली.

राज्याभिषेक झाल्यावर शिवाजीमहाराजांनी दक्षिणेचं राजकारण हाती घेतलं. दक्षिणेची मोहीम आखली आणि विजापूर-गोवळकोंडा भेटीला ते दक्षिणेत आले. त्यामुळे मोठीच खळबळ माजली. एकोजीचा अमात्य मुरब्बी राजकारणपटू रघुनाथपंत एकोजीराजांच्या कारभारावर असंतुष्ट होता. शिवरायांना हे राज्य चालवायला द्यावं अशी त्याची इच्छा होती. शहाजीराजांच्या हाताखाली हा रघुनाथपंत तयार झाला होता, त्याने शिवाजीमहाराजांशी संपर्क साधला. त्यातच शिवाजीमहाराजांनी एकोजीराजांशी पत्रव्यवहार केला. पण महाराजांच्या पत्राची एकोजीराजांनी दाखल घेतली नाही. शिवाजीमहाराज मोठी फौज घेऊन कर्नाटकच्या मोहिमेवर निघाले. तोपर्यंत रघुनाथपंतांनी गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाचे हिंदू मंत्री अक्काणा आणि मादण्णा यांच्याशी संपर्क साधला होता. त्यांना आपल्याकडे वळवून घेतलं होतं. साताऱ्याला रघुनाथपंत शिवाजी महाराजांना भेटला.

१६७६ सालच्या अखेरीला शिवाजीमहाराज मोठी फौज घेऊन निघाले आणि भागानगरला हैद्राबाद- फेब्रुवारीमध्ये पोचले.

कर्नाटक स्वारीमध्ये  कुतुबशहाची मदत घ्यायची आणि मिळालेल्या प्रदेशातील अर्धा भाग शहाला द्यायचा असा करार झाला. त्या वर्षाच्या जुलैत त्यांनी जिंजी जिंकलं. तिथून संताजी घोरपडेच्या हाताखाली फौज देऊन महाराज तंजावरला गेले. एकोजी आणि शिवाजी महाराजांची गाठ तिरुवाडीवर पडली. महाराजांनी एकोजींचा पराभव केला. शहाजींच्या दौलतीतील अर्धा वाटा महाराजांनी वारसा हक्काने एकोजीराजांकडे मागितला होता. तो त्यांनी नाकारला म्हणून महाराजांना तंजावरवर स्वारी करावी लागली होती. महाराजांनी शहाजीराजांच्या ताब्यातील होसकोटे, धोड्ड बल्लापूर, अरणी, शिरे आणि बंगलोर,  हा जहागिरीचा मुलुख आपल्या ताब्यात घेतला. एकोजीरावांनी महाराजांना सामील न होता, आदिलशहाच्या ताबेदारीत राहणं पसंत केलं. मिळवलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावत असतांनाच औरंगजेब स्वराज्यावर स्वारी करण्याचा डाव आखत असल्याची बातमी महाराजांना गुप्तहेरांकडून मिळाली तेव्हा महाराज त्वरेने पुण्याकडे निघाले. शिरे कोप्पळ, गदग, लक्ष्मेश्वर, बंकापुर, बेळगाववरून ते पन्हाळयाला पोचले.

शिवाजीमहाराजांच्या दक्षिणेतील स्वारीमुळे तिथलं राजकारण ढवळून निघालं होतं. महाराजांच्या राजकीय खेळीत मैसूरला हात लागला नाही. महाराज स्वराज्यात परत आल्यावर

चिक्कदेवराजाने १६७७ मध्ये मदुरेकडे आपली नजर वळवली. अंतुर-कुंतूर हे किल्ले जिंकले. मादुरही जिंकलं आणि मग आपली स्वारी तशीच पुढे चालू ठेवून मदगिरी किल्लाही आपल्या अधिकारात घेतला. जवळपास, दक्षिणेतील बराचसा मुलुख त्याच्या हाताखाली आला.

चिक्कदेवराजाच्या या झंजावाती मोहिमेमुळे आणि विजयामुळे इ. सन १६८० पर्यंत मैसूर आता साम्राज्याच्या दिमाखात प्रसिद्धीला आलं. याचवेळी इ. सन १६८० मध्ये शिवाजीमहाराजांचा मृत्यू झाला आणि संभाजीराजे गादीवर आले. आता संभाजी महाराजांना तीन प्रमुख शत्रूंशी लढायचं होतं, उत्तरेत औरंगजेब, जंजिऱ्याचा सिद्दी आणि इंग्रज. शिवाजी महाराजांच्या स्वर्गवासानंतर औरंगजेब महाराष्ट्र गिळायला लगेच औरंगाबादेवर आला. त्याच्यापासून स्वराज्याला वाचवण्याचं मोठं आव्हान संभाजीराजांसमोर होतं. चिक्कदेवराजाच्या पराक्रमाच्या बातम्या संभाजीमहाराजांना मिळाल्या आणि दक्षिणेत त्यांची फौज दक्षिणेत उतरली. मैसूरची फौज त्रिचनापल्लीकडे आहे ही बातमी लागल्यावर दादाजी, जैताजी, आणि निंबाजी हे सेनाधिकारी सरळ श्रीरंगपट्टणच्या मुलुखात उतरले.. होन्नलगिरेवर त्यांनी तळ ठोकला. मैसूरच्या सेनापतीला कुमारैय्या याला ही बातमी मिळताच तो ताबडतोब त्रिचनापाल्लीहून माघारी फिरला. मराठे

आणि कुमारैय्याच्या फौजा एकमेकांना भिडल्या. दोन्ही फौजांमध्ये घनघोर लढाई झाली. मराठी फौजा पूर्ण पराभूत झाल्या. त्यांचं सामान लुटलं गेलं. दादाजी-निंबाजी-जैताजी यांची कत्तल झाली. त्यांची मुंडकी चिक्कदेवाराजाने आपल्या वेशीवर टांगली.

पण पुढील काळात भविष्य बदललं. पहिल्या दारुण पराभवानंतर संभाजीराजांनी परत हिराजी महाडिकच्या हाताखाली परत फौज पाठवली आणि मैसूरची चिंता वाढली कारण यशाची मापं आता मराठ्यांच्या हातात पडू लागली. दक्षिणेत आता संभाजीराजांमुळे राजकारण बदललं. दक्षिण भारतात मैसूर सार्वभौम आणि उत्तर भारत मुघलांच्या पातशाही खाली, अशी जी विभागणी होती ती संभाजी महाराजांच्या खेळीमुळे विस्कटली. इ. सन १६८२ नंतर चिक्कदेवराज वोडीयारला मराठा आणि मुघल फौजांशी लढाया कराव्या लागल्या. मैसूर, गोवळकोंडा, विजापूर, महाराष्ट्र, या साऱ्यांनाच औरंगजेब पुरून उरला होता. इ. सन १६८७ मध्ये शेवटी गोवळकोंडा औरंगजेबाने जिंकलं. तेवढ्यात महाराष्ट्रातही औरंगजेबाच्या फौजा धुमाकूळ घालत होत्या, त्यांना आवरण्यासाठी संभाजीराजांना स्वराज्यात जावं लागलं. चिक्कदेवराज आणि संभाजी यांच्यात समझौता होऊन संभाजीमहाराज निघून गेले.

यानंतरच्या दोन तीन वर्षांमध्ये राजकीय घडामोडी फार जलद घडल्या ज्यामुळे परत दक्षिणेतील राजकारण ढवळून निघालं. तंजावरचे एकोजी राजे स्वर्गवासी झाले आणि त्यांचे पुत्र शहाजी गादीवर आले. १६८९ सालच्या जानेवारीत संभाजी महाराज पकडले गेले आणि मार्चमध्ये त्यांचा अंत झाला. स्वराज्य औरंगजेबाच्या ताब्यात गेलं. संभाजीपुत्र शाहू आणि राणी येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत पडले. रायगड राजधानी मुघलांच्या ताब्यात आली. शिवरायांचे दुसरे पुत्र राजाराममहाराज औरंगाजेबापासून वाचण्यासाठी रायगडावरून पन्हाळयाला पोचले आणि जिंजीच्या आश्रयाला जाण्यासाठी कर्नाटकात आले. वाटेतील प्रवासात इक्केरीच्या छनम्मा राणीने त्यांना बिदनूरमध्ये आश्रय दिला आणि आणि त्यासाठी मुघलांचा विरोध पत्करला. त्यामुळे तिचं महत्व वाढलं.

राजाराममहाराज सुरक्षितपणे जिंजीला पोचले आणि जोवर राष्ट्राला राजा आहे तोवर महाराष्ट्र आपल्याला मिळणार नाही हे सत्य औरंगजेबाला कळलं. जिंजीच्या स्वारीसाठी बादशहाने झुल्फिकारखानला आपल्या मुलाच्या, शहजादा कामबक्षच्या हाताखाली दक्षिणेत पाठवलं. त्यांनी राजाराम महाराजांना पकडण्यासाठी जिंजीला वेढा घातला. त्या नवीन मुघल फौजा दक्षिणेत धुमाकूळ घालू लागल्या. त्रिचनापल्ली, मदुरा संस्थानावर

कब्जा करण्यासाठी लढाया सुरु झाल्या. त्यातच मराठ्यांचा सेनापती संताजी घोरपडे १६९६ मध्ये दक्षिणेत येऊन पराक्रम गाजवू लागला. औरंगजेब म्हातारा होऊ लागला. त्याच्या फौजा महाराष्ट्रातील किल्ले बळकावून घ्यायच्या आणि पाठोपाठ मराठे ते किल्ले ताब्यात घ्यायचे हा खेळ महाराष्ट्रात सुरु झाला. झुल्फिकाराखानाचा वेढा असतांनाही इ. सन १६९८ मध्ये राजाराममहाराज जिंजीहून निसटले आणि सिंहगडावर पोचले. त्यामुळे दक्षिणेतील मुघलांच्या फौजाचं महत्व कमी झालं. त्यांचा दक्षिणेतून मुक्काम हलला. दुसरीकडे इक्केरीची राणी छन्नम्माचाही १६९७ सालामध्ये स्वर्गवास झाला. तिची जागा तिच्या दत्तक पुत्राने घेतली. यामुळे चिक्कदेवराज वोडीयारची ती बाजू जरा सावरली गेली.

संभाजीमहाराजांनी हिसकावून घेतलेला सर्व प्रदेश चिक्कदेवराज वोडीयारने परत मिळवायला सुरुवात केली. या काळापर्यंत चिक्कदेवराजाने “ चक्रवर्ती “ ही उपाधी स्वत: घेतली होती..त्याच्या कारकीर्दीत वोडीयारचे दलवाईसुद्धा बदलत गेले. पहिले दलवाई कुमारैय्या त्याचे सासरेच होते. इ.सन १६८२ मध्ये वृद्धत्वामुळे त्यांनी ते पद सोडलं आणि नवीन दलवाई धोड्डय्या दलवाई झाला. १६९६ मध्ये तोही वारला आणि थिम्माय्या दलवाई झाला. पुढची २ वर्षे म्हणजे १६९६ ते १६९८ मध्ये कळालेचा

मल्लराजैय्या त्या पदावर आला. त्यानंतर वीरराजैय्या, दासराजैय्या, आणि शेवटी चिक्क देवराजाच्या अंतकाळी देवराय दलवाई पदावर होता. इ. सन १६९९ मध्ये चिक्कदेवराज वोडीयारने औरंगजेबाकडे महाराष्ट्रात नगरला आपला वकील कर्णिका लिंगण्णैय्याला पाठवलं आणि बादशाही सलोखा केला. मराठ्यांच्या फौजांचा चिक्कदेवराज वोडीयारने एकदा पराभव केल्यामुळे औरंगजेबही वोडीयारवर खूष होता. चिक्कदेवराजाच्या या स्नेहाचा हात पुढे करण्याने औरंगजेबानेही खूष होऊन चिकदेवराय वोडीयारला राजा जगदेव हा किताब आणि सुवर्ण सिंहासन भेट म्हणून पाठवलं. अनेक बहुमोल भेटी दिल्या.

चिक्कदेवराज वोडीयारने आपल्या कारकीर्दीत आपल्या राज्यात अनेक सुविधा निर्माण केल्या. व्यापाराला चालना दिली. कारागिरांना आश्रय दिला. इ. सन १७८७ मध्ये मराठ्यांकडून त्याने बंगलोर विकत घेतलं आणि विणकऱ्यांना बंगलोरमध्ये नेऊन वसवलं आणि उत्तम रेशमी वस्त्रांची निर्मिती करायला अर्थसाहित्य पुरवलं. बलुतेदारांना प्रोत्साहन दिलं. त्याने आपल्या शेवटच्या काळात कारभाराच्या सुसुत्रतेसाठी १८ खाती निर्माण केली. राज्यभर डाक सेवा सुरु केली. त्यासाठी रस्ते सुंदर केले. सारा वसुली वाढवली..लष्कराची पुनर्बांधणी केली. ते भक्कम केलं. श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यात ४४ जास्त तोफा वाढवल्या. त्याच्या

तटबंदीला आणखी भक्कमपणा आणला. न्यायव्यवस्था, वजन मापं, यात गावागणिक फरक होता, त्यात एकत्रीकरण आणलं. गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारी कामकाजातील दोष काढून टाकले. त्याचं आपल्या जनतेवर बारीक लक्ष होतं. एकाद्या व्यक्तीकडे खूप श्रीमंती दिसली तर तो पैसा त्याने कसा जमवला याचं स्पष्टीकरण त्याला द्यावं लागत असे. या उपक्रमामुळे भ्रष्टाचाराला आळा बसला. शिवाय लायक, हुशार सालस माणसांची भरती केली. रोज सरकारी खजिन्यात २००० रुपयांची भर पडेपर्यंत तो जेवत नसे. हे सरकारी अधिकाऱ्यांना माहीत असल्यामुळे रोजच्या रोज आर्थिक व्यवहार पूर्ण होत असत. या त्याच्या शिस्तीमुळे खजिना पूर्ण भरलेला असे आणि या वोडीयारचा उल्लेख नवकोट नारायण असा केला जात असे. कावेरी नदीला चिक्कदेवराजा नाला आणि देवराजा नाला असे दोन कालवे काढून बरीचशी जमीन ओलेतीखाली आणली आणि सुबत्ता आणली. त्यामुळे धनधान्याची विपुलता आली. राज्याच्या कारभारात शिस्त आणून तो थांबला नाही. राणीवशातही त्याने सुसूत्रता आणली. तिथल्या कारभाराचे २२ विभाग केले. त्यावर विश्वासू कर्मचारी नेमले.

चिक्कदेवराज स्वत: विष्णू भक्त होता. श्रद्धाळू होता. पूजाअर्चा, विष्णूसहस्त्रनामाचा जप यांचं काटेकोर पालन करत

असे. पण त्याचवेळी शैव आणि जैन धर्मालाही राजाकडून तेवढाच आधार होता. त्याच्या काळात संगीत, चित्र, वाद्य, अशा विविध कलांना राजाश्रय मिळाला. मठांना, मंदिरांना, जैन, शैव, वैष्णव अशा नाना धर्मांना त्याने उदारतेने देणग्या दिल्या. त्याच्या दरबारात स्त्रियांचाही यथोचित सन्मान होत असे. त्यात लेखिका, कवयित्री नृत्यांगना असत. त्याही सुशिक्षित होत्या. त्याची स्वत:ची खासगी सचिव होनम्मा स्त्रीच होती. शिवाय ती उत्तम लेखिका म्हणूनही नावाजलेली होती. त्याच्या दरबारी चिक्क उपाध्याय हा विद्वान कवी होता ज्याने कमंडक नीती, शुक सप्तती, दिव्यसुरी चरित, यादवगिरीमहात्म्य, वेंकटगिरीमहात्म्य, श्रीरंगमहात्म्य, चिक्कदेवेंद्र वंशावळी, दशानन चरितं अशा अनेक काव्यरचना केल्या. गीत गोविंदम् या जयदेवाच्या काव्याप्रमाणे गीत गोपालन नावाच्या काव्याची निर्मिती करून घेतली. मेलुकोटेच्या देवाला अर्पण करणारं " चिक्कदेवराज बिनप्पन " ची निर्मिती केली. प्रतिभावंत लेखकांकडून त्याने महाकाव्यं लिहून घेतली, संतचरित्रं लिहून घेतली. शिवाय मैसूर राज्याचं भौगोलिक महात्म्यही लिहून घेतलं. तिरुमलार्य, त्याचा मंत्रीसुद्धा संस्कृत आणि कन्नड भाषेमधला लेखक होता. मल्लरास, मल्लिकार्जुन आणि तिम्मा कवी हे त्याच्या काळातील नावाजलेले कवी होते. हत्ती, घोडे, रत्नं आणि शस्त्रास्त्रं यांचा हा वोडीयार उत्तम जाणकार आणि पारखी होता.

त्याचा दरबारही राज्याच्या वैभवाची साक्ष देणारा होता. अतिसुंदर राजप्रसादात दरबार भरत असे. सोन्याच्या पालखीतून रेशमी वस्त्र नेसलेला, सोन्यामोत्यांनी मढलेला राजस देखणा चिक्कदेवराज वाजंत्रीच्या निनादात दरबारात प्रवेश करत असे, आणि मैसूर साम्राज्याच्या वैभवी अस्तित्वाची मोहोर उमटत असे. चैत्रातील वसंतोत्सव, कृष्णजन्म, दसरा हे सण अतिशय थाटात साजरे होत असत..

चिक्कदेवराज वोडीयारने कळालेच्या अरसू दलवाई घराण्याचीही पुनर्रचना केली. कारण राजा वोडीयारच्या काळापासून या घराण्याच्या शाखाही खूप विस्तारल्या होत्या. या शाखांचं त्याने सुसुत्रीकरण केलं. मुख्य शाखा, उपशाखा अशी अनेक घराणी वाढली होती त्यांचं विभाजन केलं. त्यांना रोटी-बेटी व्यवहाराच्या कडक अटी घालून दिल्या. वोडीयार घराण्याबरोबर याही कळाले घराण्याचा, दलवाई पद त्यांच्या घराण्यात आल्यामुळे खूप उत्कर्ष झाला. राज्याचा कारभार हाती आला. राज्यकारभारातील सैन्य आणि सर्वाधिकार हाती हाती आल्यामुळे महत्व वाढलं.

त्याच्या १० राण्याही सुखात होत्या. देवजम्मा ही पट्टराणी होती. इतर राण्यांमध्ये देवाम्मा आणि धोड्द् दिपाम्मा या दलवाई

कुमारैय्याच्या कन्या, केंपम्मा, चिक्क मुद्दम्मा, गौरम्मा, केंपनंजम्मा, धोड्ड मुदाम्मा, देविराजाम्मा आणि कांतम्मा एवढ्या राण्या होत्या. देवजम्मा राणीला इ. सन १६७२ मध्ये एक पुत्र झाला. तो म्हणजे कांतीरव नरसराज. दुर्दैवाने तो मूक बधीर होता. वोडीयारला तीच एक चिंता होती. मात्र त्याचे मंत्री त्याला आश्वासक साथ देत होते, त्यामुळे आणि परमेश्वरावर गाढ श्रद्धा असल्यामुळे त्याला भविष्यात आपल्या राज्याची याची काळजी नव्हती.

चिक्कदेवराज अत्यंत देखणा होता. रूपाने राजबिंडा, सुडौल अवयवांचा, गोऱ्या रंगाचा, सुंदर होता. शरीराने पीळदार, योद्ध्याची देहयष्टी होती. त्याचा आवाजही सुंदर होता. रणांगणावर तो त्याच्या फौजेचा आधार आणि शत्रूला धाक होता. युद्धसामग्री हाताळण्यात तो प्रवीण होता. विद्वान होता, श्रद्धाळू होता. धर्मशास्त्र पारंगत होता. काव्य-शस्त्र, साहित्याचा उत्तम जाणकार होता..तो स्वत: उत्तम लेखक होता. १६ नोव्हेंबर, १७०४ या दिवशी, वयाच्या साठाव्या वर्षी हा राजनीती निपुण, उत्तम योद्धा, शूर, सुसंस्कृत, प्रजादक्ष राजा, स्वर्गवासी झाला..३२ वर्षे त्याने राजपद भूषवलं साम्राज्य शिखरावर नेलं आणि हा चक्रवर्ती राजा अनंतात विलीन झाला. याच्या काळात हिंदू विजयनगर साम्राज्याचा अंत झाल्यावर दक्षिण भारतातील वैभवपूर्ण हिंदू साम्राज्य म्हणून मैसूरची साम्राज्याची इतिहासात नोंद झाली.

## १५. कांतीरव वोडीयार –

## इ.सन १७०४ ते इ. सन १७१४,

मध्यान्याच्या सूर्यालाही कलण्याचा शाप असतो. राजा वोडीयारपासून वैभवाच्या पर्वतावर आरोहण करणारं मैसूर राज्य चक्रवर्ती चिक्कदेवाराजाच्या काळात शिखरावर जाऊन पोचलं. इ. सन १६१० मध्ये राजा वोडीयारच्या सत्ताग्रहणापासून तेजस्वी होत गेलेला वैभवाचा सूर्य चिक्कदेवराज वोडीयारच्या कारकीर्दीत माथ्यावर आला. आता माथ्यावर पोचलेल्या या साम्राज्याला अवरोहणाच्या मार्गावर पाहिलं पाऊल टाकावं लागणार हे नियतीनेच ठरवलं,

चक्रवर्ती चिक्कदेवराज वोडीयारच्या सुतकाचे १५ दिवस संपल्यावर, ३० नोव्हेंबर १७०४ या दिवशी कांतीरव नरसराज वोडीयार-द्वितीय, वयाच्या ३१ व्या वर्षी सिंहासनावर बसला. चिक्कदेवराजाचा विश्वासू आणि उजवा हात असलेला पंतप्रधान तीरुमालाय्यांगर त्यावेळी पंतप्रधान होता, म्हणून काळजी नव्हती. त्याची आई राजमाता देवजम्मा ह्या कारभार पहात होत्या. स्वत: कांतीरव नरसराज हा बुद्धीमानही होता, पण फक्त मूक बधीर होता. कांतीरव नरसराज वोडीयारच्या कारभाराला सुरवात होताहोताच २

वर्षांमध्ये तिरुमलैय्यांगर मरण पावला. त्यानंतर दलवाईसुद्धा बदलले. कळाले घराण्यातील बसवराजैय्या कांतीरावाकडे १७०८ पर्यंत दलवाई होता. हा त्याचा सासराही होता. बसवराजची मुलगी छलुवाजाम्मा कांतीरवाची पत्नी होती.

या वोडीयारच्या काळात देशातील राजकारणालाही वळण मिळालं होतं. नवीन राजा सिंहासनावर आल्याबरोबर औरंगजेबाच्या फौजांनी मैसूर गिळण्यासाठी मैसूरकडे कूच केलं. पण त्यांच्याशी लढणं आपल्या कुवतीबाहेर आहे हे लक्षात आल्यामुळे वोडीयारने १ कोटी ५० लाख रुपये देऊन युध्द टाळलं. औरंगजेबाचा महाराष्ट्रात इ. सन १७०७ मध्ये मृत्यू झाला आणि सर्व देशाचं राजकारण ढवळून निघालं. नवीन समीकरणं उदयाला आली. तख्त मिळवायला दिल्लीकडे धावणाऱ्या शहजाद्यांना मदत करण्यासाठी अर्काट इथे मुख्य ठाणं केलेल्या झुल्फिकारखानने दिल्लीला जातांना आपला कारभार दाऊदखान याच्याकडे सोपवला आणि तो दिल्लीला गेला. मराठ्यांनी आपला पाठलाग करून दिल्लीला येऊ नये म्हणून झुल्फिकारखानच्या सल्ल्यावरून कैदेत ठेवलेल्या संभाजीपुत्र शाहूराजांना मोकळं करण्यात आलं होतं. त्यानिमित्ताने महाराष्ट्रात राणी ताराबाई आणि शाहू यांच्यात सत्तेच्या हक्कावरून भांडण सुरु झालं. औरंगजेबाच्या मुलांमध्ये सत्ता वर्चस्वासाठी लढाया होऊन

शाहआलम हा औरंगजेबाचा मुलगा बादशहा बनला. त्याचा दख्खनचा सुभेदार म्हणून निजाम उल मुल्क उर्फ चीनकुलीखान नावाचा मुरब्बी राजकारणी दख्खनचा सुभेदार म्हणून इ. सन १७१३ मध्ये महाराष्ट्रात आला. हैद्राबाद हे त्याने वास्तव्याचं ठिकाण केलं. हैद्राबादचा निजाम हे घराणं त्याच्यामुळे सुरु झालं. तोपर्यंत कर्नाटकातील सुभे सांभाळणारे अनेक सरदार स्वत:ला नबाब म्हणवून घ्यायला लागले होते. १८ फेब्रुवारी १७१४ या दिवशी, १० वर्षांच्या कालावधीनंतर कांतीरव वोडीयार मरण पावला.

## १६. कृष्णराज वोडीयार प्रथम. – इ. सन १७१४ – १७३२.

कांतीरव नरसराज वोडीयारचे १३ दिवस झाल्यावर, त्याचा मुलगा कृष्णराज वोडीयार ३ मार्च १७१४ या दिवशी सिंहासनावर बसला. तेव्हा तो १२ वर्षांचा होता. त्यामुळे तो सज्ञान होईपर्यंत राजमाता छालुवाजाम्मा हिनेच कारभार पहिला. आणि मग कृष्णराज कारभार पाहू लागला. हा धोड्ड कृष्णराज या नावानेही ओळखला गेला. याच्या हातात कारभार आला तेव्हा कळाले घराण्यातील वीरराजैय्या आणि छनम्मा यांचा पुत्र देवराजैया याची दलवाई पदावर आणि त्याचा चुलत भाऊ बसवराजपुत्र नंजराजैया याची सर्वाधिकारी म्हणजे पंतप्रधानपदी नेमणूक झाली. या दोघांनी मैसूर साम्राज्याच्या भाळीचा भाग्यलेखच भविष्यात पुसून टाकला पण ती वेळ यायला अजून काही घडायला हवं होतं. या दोघा बंधूंनी हातात अधिकार येताच भ्रष्टाचाराला आणि गैर कारभाराला सुरुवात केली. त्यात अल्पवयीन वोडीयार आणि राजमाता यांना काहीही अधिकार राहिला नाही.

या काळात राजकारणाने सुद्धा वेगळा मार्ग घेतला. दिल्लीकडून नेमला गेलेला निजाम चीनकुलीखान हा दक्षिणेचा

सर्वेसर्वा बनला. महाराष्ट्रात शाहूराजांनी राज्यपद आपल्याकडे घेतलं आणि त्यांचे पेशवे बाजीराव हे समर्थपणे शत्रूला हरवू लागले. कर्नाटकातील राजकीय बलाबलही बदललं. निजाम आल्यावर कर्नाटकाचा दिल्लीकडून कारभार पाहणारा सादतुल्लाखनची ताकद कमी झाली आणि फक्त अर्काट त्याच्या ताब्यात राहिलं. मराठ्यांचे गुत्तीचे मुराराराव घोरपडे पुणे दरबाराकडून राजकारण खेळायला लागले. सावनूर, कडप्पा, कर्नूलचे जे जहागीरदार होते, आणि स्वत:ला नबाब म्हणवून घेत होते, ते आता निजामाच्या हाताखाली आले, आणि शिरे हे कारभाराचं मुख्य केंद्र झालं. यांना टक्कर देत मदुरा आणि तंजावर अस्तित्वासाठी लढत होते.

त्यातच भर पडली होती ती इंग्रज आणि फ्रेंच यांच्या मुरब्बी, एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या राजकारणाची. त्यांचं त्यांच्या देशातील एकमेकांमधील वैर ! ते आता भारतीय राजकीय प्रमुखांना हाताशी धरून खेळवायला आणि खेळायला लागले होते. व्यापार वृद्धी करत असतांनाच, हिंदुस्थान ताब्यात घ्यायची इर्षा त्या दोन्ही फिरंग्यांमध्ये वाढीला लागली होती. सगळ्याच राजकारणाला ऊत आला होता. त्या सर्वांमध्ये त्यातल्या त्यात ताकदवान होतं ते इक्केरीचं संस्थान. त्यांचा नायक सोमशेखर नायक द्वितीय हा मैसूरशी फटकून वागत होता.

कृष्णराज वोडीयारची पहिली ७ / ८ वर्षे शांततेत गेली. पण त्यानंतर मात्र इक्केरीबरोबर त्यांचं भांडण सुरु झालं. बेलूरच्या गादीवर इक्केरीच्या नायकाने वेंकटाद्रीला काढून त्याजागी गोपाल नायकाची नेमणूक केली, तेव्हा वेंकटाद्री मदत मागायला मैसूरकडे गेला. इ. सन १७२६ मध्ये मैसूर विरुध्द निजाम, इक्केरी, सादतुल्लाखान एक झाले आणि त्यांनी मैसूरवर स्वारी केली. मैसूर युध्द हरायला लागलं तेव्हा १ कोटी रुपयांच्या खंडणीवर तडजोड करावी लागली. पाठोपाठ पुढील वर्षी  पुण्याहून बाजीराव आला. पण श्रीरंगपट्टणच्या भक्कम तोफखान्यामुळे त्याला परत फिरावं लागलं. १७२८ मध्ये मागडीच्या केम्पे वीरप्पा गौडा नायकाने स्वारी केली मात्र ती लढाई दलवाई देवराजैयाने जिंकली. केंपे वीरप्पा नायकाला कैद करून श्रीरंगपट्टणच्या तुरुंगात त्याच्या अखेरपर्यंत ठेवण्यात आलं.

या वोडीयारच्या काळात मैसूरचं वैभव आणखीनच बहरलं. साहित्य, काव्य, विद्वत्ता, धर्म यांना प्रोत्साहन मिळालं. खजिना तुडुंब भरून राहिला.धोड्ड कृष्णराज वोडीयार याची पट्टराणी देवजम्मा ही कळालेच्या चिक्क अरसची कन्या होती. याशिवाय त्याला आणखी ८ राण्या होत्या. या राण्यांच्या नावाने त्याने मेलूकोटेला ८ पूल बांधले. पट्टराणी देवजम्माला एकाच पुत्र झाला आणि तो ६ महिन्यांचा होऊन वारला. इतर राण्यांनाही काहीही पुत्र

झाला नाही. धोड्ड कृष्णराज वोडीयार ५ मार्च १७३२ या दिवशी वयाच्या तिसाव्या वर्षी निधन पावला. त्याच्या राण्या सती गेल्या नाहीत.

## १७. पदच्युत चामराज वोडीयार. –

## इ. सन १७३२ – १० जून इ. सन १७३४

धोड्ड कृष्णराज वोडीयार निपुत्रिक वारला आणि परत मुप्पीन देवराज वोडीयार याची वंशवेलही खुरटली. मरणापूर्वी धोड्ड कृष्णराज वोडीयार याने आपल्या राणीला देवजम्माला अंकनहळ्ळीच्या देवराज अरसच्या चामराजाला दत्तक घेऊन गादीवर बसवण्याची सूचना दिली होती, त्याप्रमाणे राणी देवजम्माने सर्वाधिकारी आणि पंतप्रधान बनलेल्या नंजराजैया, दलवाई देवराजैया आणि देवराजैयाचा सख्खा धाकटा भाऊ करचुरी नंजराजैया यांना चामराजाला घेऊन येण्यासाठी पाठवलं. मग दत्तक विधान झालं आणि अशारितीने वयाच्या २८ व्या वर्षी हा चामराज वोडीयार गादीवर आला. याची राजकारणाशी काहीच ओळख नव्हती. पहिले ९ महिने त्याने कारभार सर्वाधिकारी, दलवाई यांनी राजमातेच्या सूचनेप्रमाणे केला. पण नंतर मात्र सर्व अमर्याद सत्ता आणि कारभार अनुभवलेल्या देवराजैया, नंजराजैया या कळाले बंधूंच्या मनात कली शिरला. या नवीन चामराजाला नाममात्र, अधिकार देऊन त्याच्याशी दडपशाहीने वागू लागले.

आपल्या अधिकारात अमर्याद भ्रष्टाचार त्यांनी आजवर केला होता. चामराजाला हे सर्व नव्याने कळायला लागलं तेव्हा त्याने कारभार आपल्या हाती घ्यायला सुरुवात केली. आपल्या मर्जीतील आणि विश्वासातील माणसांना नेमलं आणि जुने देवराजैयाचे लोक काढून टाकले. भ्रष्टाचाराचं मूळ असलेल्या, वारेमाप चालणाऱ्या उधळपट्टीला कात्री लावायला सुरुवात केली. त्यामुळे हे दोन्ही भाऊ बिथरले. आणि तिथूनच कट कारस्थानांना सुरुवात झाली. आपल्या मनाविरुध्ह हा वोडीयार वागतो आहे हे लक्षात यायला लागल्यावर दोघेही, देवराजैया आणि नंजराजैया, देवजम्मा राजमातेकडे गेले. आपली सत्ता कमी करणाऱ्या या राजाविरुध्ह त्यांनी राणीचे कान भरायला सुरुवात केली. ही बातमी कानावर आल्यावर चामराज वोडीयार सावध झाला. त्याने या सर्वाधिकारी आणि दलवाई दोघा बंधूंना काढून टाकायचा निर्णय घेऊन लगेच अंमलात आणला. सर्वाधिकारी, प्रधान मंत्री म्हणून गोपीनाथ पंडिताची नेमणूक केली. आणि दलवाई म्हणून देवैय्याची नेमणूक केली. मोठ्या तडफेने सर्व अधिकाऱ्यांना घेऊन त्याने कारभार आपल्या हाताखाली आणला. आपल्या खर्चावर नियंत्रण आल्यामुळे राजमातही दुखावली गेली. तिघेही एक होऊन चामराजाला पदच्युत करायच्या कारस्थानाला लागले.

साधारण जून १७३४ च्या एके दिवशी दोन्ही बंधूंनी कट्टी गोपलराज अरस याच्या गुलाम हैदरअली खान या सरदाराची भेट घेतली. हा बंगलोरच्या फौजेच्या तुकडीत होता. त्याला पैसे चारून फितवलं आणि चामराज वोडीयारची नोकरी सोडायला लावली. मग त्याला श्रीरंगपट्टणपासून दूर तळ करून राहायला सांगितलं आणि गरज पडली की त्याने मदतीला यायचं ठरवलं. त्याप्रमाणे गुलाम हैदर अली आपले २००० घोडे आणि पायदळ घेऊन निघाला आणि श्रीरंगपट्टणपासून थोड्या लांब अंतरावर येऊन राहिला.

श्रीरंगपट्टणमधल्या फौजेची प्रथा अशी होती की, दर शुक्रवारी राजधानीतील फौज कवायतीसाठी ६ मैलावर जाऊन संचालन करून येत असे. ७ जून १७३४ या दिवशी सत्ताभ्रष्ट झालेल्या देवराजैयाने गुलाम हैदरअली खानाला करार केल्याप्रमाणे मदतीला बोलावलं आणि या शहरातून गेलेल्या फौजेच्या परतीच्या वाटेवर अडवण्यासाठी नेमलं. नंतर स्वत:ची सशस्त्र फौज श्रीरंगपट्टणच्या किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी ठेवली आणि स्वत: तो तिथे उभा राहिला. चामराज वोडीयारच्या, कवायतीसाठी गेलेल्या फौजेची परतीची वाट गुलाम हैदरखान याने अडवली. मग स्वत: देवराजैया राजवाड्यावर चालून गेला. त्याने चामराज वोडीयारला अटक केली, आणि त्याला कब्बाल दुर्गच्या तुरुंगात कुटुंबासह कैदेत

ठेवण्यात आलं. त्याच्याबरोबर त्याचा सर्वाधिकारी मंत्री वीरा शेट्टी, दलवाई देवराजैया यांनाही कैद करून तुरुंगात टाकण्यात आलं. चामराज वोडीयारने मदतीसाठी राजमातेला निरोप  पाठवला पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. कदाचित राजमातेनेही पतीची इच्छा म्हणूनच त्याला गादीवर वोडीयार म्हणून बसवलं असावं, शिवाय त्याच्या स्वतंत्रपणे कारभार करण्याच्या पद्धतीमुळे तिचा कारभारात भाग घेण्याचा अधिकार नाहीसा झाल्यामुळे ह्या पदच्च्युतीच्या कटात ती सामील झाली असेल असा इतिहासकारांचा अंदाज आहे. .या चामराज वोडीयारची कारकीर्द २ वर्षे ३ महिने एवढी झाली. आणि शेवट तुरुंगात झाला.

# १८. कृष्णराज वोडीयार द्वितीय – इ. सन १७३४ ते इ. सन १७६६.

राजमाता देवजम्माच्या अनुमतीने दलवाई देवराजैया परत सत्तेत आला. त्याने तिच्याच संमतीने चिक्कनहळ्ळीच्या शमी अरसचा ६ वर्षांचा मुलगा दत्तक घेतला आणि चिक्क कृष्णराज वोडीयार या नावाने सिंहासनावर बसवलं. या मुलाची निवड कटाच्या आधीच करून ठेवली होती, त्यामुळे १५ जून १७३४ या दिवशी हा समारंभ झाला. १० जूनला पहिला वोडीयार पदच्युत झाल्यावर ५ व्या दिवशी हा समारंभ घडून आला.

परत देवराजैया दलवाई झाला, नंजराजैय्या सर्वाधिकारी झाला, आणि त्यांना आणखी एक सामील झाला तो देवराजैयाचा धाकटा भाऊ करचुरी नंजराजैया. या काळात कर्नाटकातील राजकीय वारेही बदलले होते. मदुरेची राणी मीनाक्षीने विजयरंग चोक्कनाथ हा आपला पती वारल्यावर विजयकुमार नावाचा मुलगा दत्तक घेऊन कारभार हातात घेतला. याच काळात सादतुल्लाखान हा जुना अर्काटचा नबाब मरण पावला आणि त्याचा दोस्त अलीखान हा पुतण्या नबाब बनला. दोस्तअलीने आपला मुलगा सफदरअली आणि जावई चंदासाहेब यांना

मीनाक्षीच्या मदतीने त्रिचनापल्लीवर स्वारी करायला पाठवलं. त्रिचनापल्ली जिंकून द्यायच्या मदतीबद्दल राणीने १ कोटी रुपये चंदासाहेब याला द्यायचं कबूल केलं. त्रिचनापल्ली जिंकल्यावर मात्र चंदासाहेब याने मदुरेच्या राणीला फसवलं आणि तिला अटक केली. आपली झालेली फसवणूक लक्षात आल्यावर राणीने विष पिऊन आत्महत्या केली. आता त्रिचनापल्ली आणि मदुरा ही दोन्ही राज्ये चंदासाहेबाला मिळाली. मैसूरचं राज्य जिंकणं आता चंदासाहेबाचं पुढच लक्ष्य होतं. १७३६ च्या सप्टेंबर मध्ये चंदासाहेबाचे कासीम खान आणि मुराद खान हे दोन्ही भाऊ पाईन घाट ओलांडून कर्नाटकात शिरले. जाळपोळ आणि लुटालूट करत चिन्नापट्टणम् जवळ उतरले. देवराजैया मोठी फौज घेऊन त्यांच्यावर चालून गेला. पहिल्याच दिवशी मोठी लढाई झाली. मैसूरच्या सैन्याने पराक्रमाची शर्थ केली आणि चंदासाहेबाच्या मुघल फौजेला पळवून लावलं. दलवाई देवराजैयाच्या हाती प्रचंड लूट लागली. मुराद खान, कासीम खान, बहादूर खान, सिकंदर खान मारले गेले.

देवराजैया आणि नंजराजैया यांची या विजयाने अमर्याद ताकद वाढली. कृष्णराज वोडीयार हा नाममात्र राजा म्हणून गादीवर होता. याचा परिणाम म्हणजे दलवाई आणि सर्वाधिकारी, यांनी सर्वच कारभार हाती आल्यामुळे प्रचंड भ्रष्टाचार सुरु केला. सर्व

जागांवरची नियुक्ती आपापल्या मर्जी प्रमाणे केली. त्यातही लाच लुचपत वाढली. दोघांनी मिळून प्रचंड माया जमवली. देवराजैयाचा भाऊ करचुरी नंजराजैया आणि प्रधान मंत्री वेंकटपट्टैया हेही मागे राहिले नाहीत. या तिघांची बंधूंची भ्रष्टाचाराची हाव इतक्या थराला गेली की राजघराण्याच्या जमिनी त्यांनी लाटल्या. राजा तशी प्रजा या न्यायाने सरकारी नोकरांनीही मग आपापले हात धुवून घ्यायला सुरुवात केली. मिळून भ्रष्टाचार झिरपत तळागाळापर्यंत पोचला.

या सगळया घटनांना इ. सन १७४० च्या जवळपास प्रचंड वेग आला. पण त्याच काळात सर्वाधिकारी नंजराजैया याला आजारपण आलं आणि आपला शेवट दिसायला लागला. तेव्हा शेवट चांगला व्हावा आणि पापक्षालन व्हावं म्हणून नंजराजैयाने भ्रष्टाचाराने जमवलेली आपली संपत्ती दानधर्मात वाटायला सुरुवात केली. इतकंच नव्हे तर खुद्द कृष्णराज वोडीयारला २ लाख रुपये परत दिले. आपल्या पत्नीच्या उदार निर्वाहासाठी अर्धा लाख रुपये ठेवले. त्याने कृष्णराज वोडीयारला आणखी एक महत्वाचा सल्ला दिला. त्याने सांगितलं की बंगलोरच्या कट्टी गोपालराज अरसच्या हाताखाली महंमद साबास साहिब आणि हैदर अली नावाचे दोन भाऊ चाकरीत आहेत. त्यातील हैदर अलीला ५० घोडे आणि १०० पाईक  ठेवण्याची परवानगी द्यावी. पण त्याच्यावर भरोसा ठेवू नये. तो राज्याला त्रासदायक ठरू शकतो. लवकरच १७३९

मध्ये नंजराजैय्याचं निधन झालं. आता अधिकारी राहिले फक्त दोन ..एक दलवाई देवराजैया आणि त्याचा भाऊ करचुरी नंजराजैय्या जो आता सर्वाधिकारी बनला. नंजराजैयाने लष्करात नाईक असलेल्या हैदरअली या एका सामान्य तरुणाबाद्दलचा दिलेला मोलाचा सल्ला पुढे दलवाई देवराजैया, करचुरी देवराजैया आणि इंग्रज यांना अनुभवायला यायचा होता. याच हैदर अलीने मैसूरच्या राजसत्तेचा प्रवाह वळवला आणि इतिहास निर्माण केला.

इ. सन १७४० मध्ये मराठ्यांच्या फौजा कर्नाटकात उतरल्या. अर्काटची खंडणी वसूल करायला रघुजी भोसले नागपूरचे आणि शाहूराजांचे मानसपुत्र फत्तेसिंग भोसले ४०,००० फौज घेऊन अर्काटवर आले. अर्काटचा नबाब स्वत: या हल्ल्याला तोंड द्यायला उभा राहिला. दमलचेरी घाटात झालेल्या या दोन्ही फौजांमध्ये अर्काटचा नबाब दोस्त अली मारला गेला. मराठ्यांच्या फौजांनी अर्काट यथेच्छ लुटलं. एवढ्यात निजाम उल मुल्कचा मुलगा नासिरजंग आपल्यावर चालून येतोय ही बातमी रघूजी भोसलेला लागली.

अर्काटचा पुढचा नबाब झाला तो दोस्त अलीचा मुलगा सफदर अली. त्याने मराठ्यांशी तडजोड केली. त्यांना जी रक्कम द्यायची ठरली त्यातील अर्धीच रक्कम त्याला उभारता आली.

मराठ्यांच्या फौजेला त्याने वेल्लोरवरून जाऊ दिलं. यानंतर रघुजी भोसले त्रिचनापल्लीच्या चंदासाहेबाकडे खंडणी वसूल करण्यासाठी गेले. पण चंदासाहेबाने त्यांची मागणी सरळ धुडकावून लावली. मराठी फौजा त्रिचनापल्लीच्या किल्ल्याला वेढा घालून बसल्या. एक महिनाभर हा वेढा चालला. चंदासाहेब मराठ्यांच्या अटकेत पडला. गुत्तीचे मुरारराव घोरपडे यांच्याकडे त्रिचनापल्लीची जबाबदारी सोपवून चंदा साहेबाला बरोबर घेऊन मराठी फौजा पुण्याला परतल्या.

इ. सन १७४० मध्ये महाराष्ट्रात घडलेली मोठी आणि महत्वाची घटना म्हणजे पेशवा बाजीरावाचा रावेरला झालेला मृत्यू. त्याच्या जाण्याने स्वराज्याची आणि शाहूराजाची फार मोठी हानी झाली. पुढचा पेशवा कोण नेमावा या प्रश्नावर शाहू महाराजांनी तोडगा काढला आणि बाजीरावाचा पुत्र बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवा झाला. महाराष्ट्राचं राजकारण त्याच्या धोरणाप्रमाणे बदललं. या नंतरची ८ वर्षे कर्नाटकात चंदासाहेबाच्या त्रिचनापल्लीवर कब्जा मिळवण्यात हैदराबादचा निजाम, मैसूरचा देवराजैय्या, आणि मराठ्यांकडून बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या झगडा सुरु झाला. त्यांना मदतीला धावले इंग्रज आणि फ्रेंच. मिळून कर्नाटकातील सारी भूमी ढवळून निघाली.

# सन  १७५० नंतरचं कर्नाटकीय राजकारण.

अठराव्या शतकाच्या मध्यात कर्नाटकातील राज्यव्यवस्थेला एक वेगळंच वळण लागलं होतं. हिंदू साम्राज्याचा पाया घालणारे विजयनगर, पाचही शाह्यांचे वंशज कमजोर झाले होते. त्यांनी नेमलेले अधिकारी संस्थानिक बनून स्वत:च्या अधिकारक्षेत्राचे मालक झाले होते. दुसरीकडे दक्षिण भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर परकीयांनी या समृध्द देशात बस्तान बसवायला सुरूवात केली होती. अरब, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्लीश या परकीयांनी भारतात जम बसवायला सुरुवात केली.   २२ ऑगस्ट इ. स. १४९८ मधे वास्को-द-गामा कालिकतला उतरला. पाठोपाठ इ. स. १५०६ साली पोर्तुगीजांनी गोवा घेतलं. दीव-दमण- वसई, मगलोर, कोचीन, सिलोन, या ठिकाणी आपली वसाहत निर्माण केली. त्यांची भरभराट पाहून डच लोकांनी आपली  कडलूर प्रांतात वसाहत केली. इंग्रजांनी इ. स. १६०७ मधे मछलीपट्टणम्,  इ. स. १६११ साली पेडापल्ली, इ. स. १६१७ मधे कालिकतला आपल्या वखारी उघडल्या. हे सारे परदेशी १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत दक्षिण भारतातील राजकारणात चांगलाच रस घ्यायला लागले होते. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रास्त्रं होती, ती ह्या भूमीवर

लढणाऱ्या राजांना पुरवायला लागले होते. साहसी शूर पुरुष लष्करात चाकरी मिळवून कमवायला लागले होते.

लष्करातही बरेच मोठे बादल झाले होते. ज्याच्या हाती फौज मोठी, त्याची सत्ता मोठी हा नवीन प्रघात सुरू झाला होता. असमर्थ, नाममात्र असलेल्या राजांकडून फौजेच्या खर्चासाठी महसूलाची जमीन तोडून देण्याच्या पध्दतीमुळे सरंजामी वृत्ती वाढीला लागली. सरदारांच्या महत्वाकांक्षा वाढायला लागल्या. वरचढ होण्यासाठी एकमेकांच्यात लढाया सुरू झाल्या. फौजांच्या येण्याजाण्याने सीमेलगतची शेतं नासायला लागली. महसूल गोळा करणं कठीण व्हायला लागलं. त्यामुळे सैनिकांचे पगार तुंबायला लागले. सावकारांकडून कर्ज घेऊन सैनिकांचे पगार भागवले जाऊ लागले. नाहीतर सैनिक राजप्रासादासमोर धरणं आंदोलन करायला लागले. जिथे पगार जास्त मिळेल अशा राजाकडे सैनिक जाऊ लागले. लष्कराची शिस्त, त्यांच्यातला एकोपा, त्यांच्यातील राजा आणि राज्य यांच्याबद्दल वाटणारी इमानदारी मोडायला लागली होती कारण लष्करात एत्ददेशीय हिंदू, मुसलमान, फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्लीश, अशा नाना जातीच्या लोकांचा भरणा झालेलं एक ढिलंढालं गाठोडं झालं होतं. छोटे मोठे जमीनदार आणि देसाई वेळ पडेल त्याप्रमाणे कधी खंडणी देऊन तर कधी लढून आपला निभाव लावत होते.

यातच दक्षिणेतील राजकारणाला गती देणारी आणखी एक घटना दक्षिणेत घडली. दिल्लीहून दक्षिणेत येऊन आपली सत्ता बळकट केलेला हा निजाम उल्मुल्क इ. स. १७४८ मधे हैद्राबादमधे वारला. त्याला पहिल्या बेगमपासून झालेले दोन मुलगे गाजीउद्दीन आणि नासिरजंग, इतर चार रक्षा बायकांपासून झालेले सलाबतजंग, बसालतजंग, निजाम अली आणि मीरमोगल हे चार मुलगे होते. आणि मुलीचा मुलगा - मुझफ्फरजंग हाही त्याचा लाडका नातू होता. आपल्या हयातीत त्याने नासिरजंगाला औरंगाबादची आणि मुझफ्फरजंगला वैयक्तिक हैदराबादची सुभेदारी दिली होती.

निजाम मेल्यावर नासिरजंग आणि मुझफ्फरजंग या मामा भाच्याची सत्तेसाठी चुरस सुरु झाली. निजामाचा थोरला मुलगा गाझिउद्दीन हा कायम दिल्लीत वझीरपदावर राहिला होता आणि नासिरजंग हा कायम निजामाबरोबर वाढला होता. निजाम जिवंत असतांनाही नासिरजंगाने बापाकडून सत्ता हिसकावून घेण्याचा असफल प्रयत्न केला होता. आता निजामाची आपल्या हाती सत्ता घेण्याच्या मागे लागला. मुझफ्फरजंगच्या मदतीला धावला अर्काटच्या नबाबाचा जावई चंदासाहेब. कारण चंदासाहेबाला सासऱ्याची नबाबी हवी होती. या चंदासाहेबाची आणि पाँडेचेरीच्या फ्रेंच गव्हर्नर डुप्लेची खूप मैत्री होती. या दोघांच्या

बायकांची घट्ट मैत्री होती. याही दोघी घरी बसून खूप राजकारण चालवायच्या. डुप्लेही भारतीय राजकारण्यांना खेळवायला बायकोच्या मध्यस्थीची मदत घेई कारण तिला स्थानिक भाषा येत होत्या. त्यामुळे डुप्लेने मुझफ्फरजंगला ४०० युरोपियन सैनिक, १० लाख रुपये आणि लागेल तेवढा दारुगोळा पुरवायचा करार केला. अशारीतीने फ्रेंच उतरल्यावर इंग्रज तरी कसे मागे राहणार ? मुझफ्फरजंगविरुध्द नासिरजंगने इंग्रजांना मदतीला बोलावलं. अशारितीने फ्रेंच आणि इंग्रजांनी विरुध्द पक्षांना सहाय्य करायचं ठरवून आणखीनच वातावरण तापवलं. नासीरजंग मुघलांची दक्षिणेतील राजधानी औरंगाबादला होता.

फ्रेंचांचा गोलंदाज बुसी हा कमालीचा निपुण अधिकारी आपली करामत दाखवायला लागला. नासिरजंग वि. मुझफ्फरखान हा कर्नाटकातला, सर्व राजकारण्यांनी भाग घेतल्यामुळे पहिला संग्राम बनला. या रणांगणात मराठ्यांची मदत मागायला चंदासाहेब गेला पण शाहूराजे त्यावेळी अत्यंत दु:खी मानसिक अवस्थेत होते, कारण त्यांची पत्नी सगुणाबाई खूप आजारी होती, आणि पेशवा नानासाहेब हे कर्नाटकातून निजामाची ताकद कमी कशी होईल ते पाहावे म्हणून राजकारणावर नजर ठेवून होता. पण त्याच काळात १५ डिसेंबर, १७४९ साली शाहूराजांचा कैलासवास झाला,

ताराराणी आणि नवीन वारसांचे घोळ झाले त्यामुळे पेशव्याला या कर्नाटकाच्या रणांगणात शिरता आलं नाही.

फ्रेंचांच्या मदतीने मुझफ्फरजंगने अर्काटच्या महंमदअलीला जिंकलं. खूष झालेल्या मुझफ्फरजंगने चंदासाहेबाला त्याच्या सासऱ्याची हवी असलेली अर्काटची नबाबी दिली, डुप्लेला पाँडेचेरीजवळची ८१ गावांची जहागिरी कायमची तोडून दिली, आणि स्वत:ला दक्षिणेचा सुभेदार म्हणून घोषित केलं. हे सगळं औरंगाबादला असलेल्या नासिरजंगला कळल्यावर तो कर्नाटकाकडे चालून आला. इंग्रजांनी नासिरजंगाची बाजू घेतल्यावर कडाप्पा, कर्नूल, सावनूरचे नबाब, त्याला जाऊन मिळाले. नागपूरचा जानोजी भोसलेसुध्दा नासिरजंगला जाऊन मिळाला. मैसूरच्या राजातर्फे दलवाई देवराजने नासिरजंगाचा पक्ष उचलला. नासिरजंग आणि मुझफ्फरजंग यांच्यात जो संघर्ष सुरु झाला, त्यात कपटकारस्थानांना तोटा नव्हता. त्यातच नासिरजंगाने मुझफ्फरजंगला जिंजीजवळ अटक केली आणि सक्त कैदेत ठेवलं. पण लढाईला सुरुवात होण्याआधीच नासिरजंग दगाबाजीने मेला. कर्नूळच्या नबाबाने नासिरजंगला गोळी मारली. डोकंही कापलं, त्यामुळे सैन्यात दंगल माजली, पण लगेच बुसीने मुझफ्फरजंगच्या नावाने रणभूमीवरच द्वाही फिरवली. या कपटात डुप्लेचा हात असावा. मुझफ्फरजंग लगेच हैद्राबादच्या गादीचा मालक झाला.

मुझफ्फरजंग आपली फौज घेऊन अर्काटहून निघाला तेव्हा त्याच्या पठाण तुकडीत असंतोष माजला. यामागे कारस्थान होतं ते निजामअलीच्या आईचं. निजाम-उल्-मुल्कच्या या रक्षा बायकोला आपला मुलगा निजामअली नबाब बनावा असं वाटत होतं, त्यामुळे  पठाणांना काहीच इनाम मिळालं नाही या विषयावरून तिने पठाणांना भडकवलं आणि मुजफ्फरजंगला मारायचा कट केला. कडाप्पाहून मुझफ्फरजंगचं सैन्य पुढे निघाल्यावर पठाणांनी बुसीचं सामान लुटलं. त्यावरुन लढाई सुरु झाली. कडाप्पाच्या हिंम्मतबहाद्दर पठाणाने आपला हत्ती मुझफ्फरजंगच्या हत्तीला भिडवला आणि त्याला गोळी मारून ठार केलं. त्याबरोबर हिंमतबहाद्दरचं शीर निजामअलीने कापलं. मुझफ्फरही संपला. थोडक्यात ५ डिसेंबर १७५० मधे नासिरजंग, आणि ३ फेब्रु. १७५१ ला मुझफ्फरजंग, दोघेही मेले आणि गादीवर आला तिसराच मुलगा- सलाबतजंग. बुसीने कमकुवत, सलाबतजंगाला गादीवर आणलं. फ्रेंचांतर्फे बुसीच सलाबतजंगचा सर्व कारभार आटोपत होता. मोगलांचं दक्षिणेतलं मुख्य ठाणं औरंगाबाद. म्हणून बुसी सलाबतजंगाला घेऊन औरंगाबादेत येऊन कारभार करायला लागला. जून १७५२ मधे चंदासाहेबही मारला गेला. हे तिघं मेल्यामुळे आता हकदार होता तो दिल्लीत राहणारा

थोरला मुलगा गाजिउद्दीन, निजाम उल्मुल्कचा उरलेला औरस मुलगा.

हे सगळं वर्तमान दिल्लीला पोचल्यावर तो बादशहाचं आज्ञेचं फर्मान घेऊन दक्षिणेकडे बापाची सुभेदारी घ्यायला निघाला. त्याला हैदराबादेत आणायचं राजकारण नानासाहेब पेशव्याने केलं. नानासाहेब पेशव्यांना सलाबतजंगाची कुवत नाही हे माहीत होतं, आणि फ्रेंच बुसीचाही जोर कमी करायचा होता. गाजीउद्दीन मे महिन्यात दिल्लीहून निघाला, सप्टेंबरमधे औरंगाबादेत आला तेव्हा नानासाहेब पेशवा त्याला भेटायला गेला. त्या मुक्कामात निजामअलीच्या आईने गाजीउद्दीनला घरी जेवायला बोलावून केलेल्या विषप्रयोगाने तोही १७५२ च्या ऑक्टोबर १६ ला मृत्यू पावला. या बाईने आपल्या मुलाच्या मार्गातले दोन काटे बाजूला केले. मिळून गुंतागुंतीच्या कटकारस्थानांनी भरलेल्या या सत्ता स्पर्धेत आता सलाबत, निजामअली आणि मीरमोगल हे सावत्र बंधूच फक्त जिवंत राहिले. एकूण, त्रिचनापल्लीवर विजय मिळवण्यासाठी सर्व दक्षिण भारत ढवळून निघाला.

## मराठा दरबारातील घडामोडी. -

इकडे महाराष्ट्रात शाहूराजे सन १७४९ मधे वारल्यावर साताऱ्यातील नवीन वारस, ताराराणीचे पेच यासारखे पेचप्रसंग कमी झाल्यावर पेशवा नानासाहेबांनी आपलं लक्ष कर्नाटकाकडे वळवलं, आणि पहिली स्वारी इ. स.१७५३ मधे समृध्द अशा श्रीरंगपट्टणवर केली. बाजीरावाने आपल्या कारकीर्दीत दिल्लीवर नजर ठेवून माळव्यामधे आपले पाय रोवण्यासाठी उत्तरेकडे आपली दृष्टी वळवली होती, तर नानासाहेब पेशव्याने दक्षिणेकडे आपला चेहरा वळवला. बाजीरावांच्या काळात लढायांमधे झालेलं कर्ज फेडणं, कर्नाटकातील नबाबांनी बळकावलेल्या शहाजीराजांच्या जागिरी मोकळ्या करून घेणं आणि खजिना भरणं हे उद्देश या मागे होते. इ. स.१७३७ मधे दमलचेरीच्या लढाईत मिळालेल्या विजयाने मराठ्यांचा कर्नाटकातला दबदबा वाढला होता. शाहूराजांच्या अंतानंतर ताराराणीने पेशव्यांविरुध्द केलेल्या लढाईत रामराजा हा हुकमाचा एक्का पेशव्याने आपल्या हाती ठेऊन सांगोल्याच्या लढाईत ताराराणींच्या दाभाडे वगैरे सहाय्यकांना निष्प्रभ केलं आणि पेशव्याने कर्नाटकाचा मामला आपल्या हाती घेतला होता. दुसरीकडे भालकीला निजामाला

हरवून त्याने २५ नोव्हेंबर १७५२ मधे सलाबतजंगाकडून भालकीचा तह करून घेतला. या निजामाबरोबरच्या लढाईत बुसीचा चेला मुझफ्फरखान गोलंदाजाचा प्रताप पेशव्याने अनुभवला आणि त्याला आपल्या चाकरीत घेण्याची शर्थ केली आणि मुझफ्फरखान चाकरीत आला. त्याच्याकडून पेशव्याने आपला तोफखाना भक्कम करून घेतलं.

एकूण, देशी आणि परदेशी राजकारण्यांचा हा शह-काटशहाचा खेळ जोरात रंगला होता. कबड्डीसारखा एकमेकांचे पाय ओढण्याचा खेळ या मातीत खेळला जाऊ लागला. मलबारचे नायर, तेलंगणातले तेलंगी, कृष्णेच्या दक्षिण तीरावरच्या कर्नाटकातले मैसूरचा राजा वोडियार, गुत्ती संस्थानचे मुरारराव घोरपडे, बिदनूरच्या शिवप्पा नायकाचे वारस, कृष्णेच्या उत्तर तीरावरचे मराठे, हे हिंदू आणि हैद्राबादचा मुसलमान निजाम, परदेशातून आलेले फ्रेंच, इंग्लिश, पोर्तुगीज आणि डच, यांचा सामना जोरात रंगला. त्यात सामील झाले आपली छोटीशी फौज घेऊन त्यांच्या मदतीला जाऊन आपला स्वार्थ साधणारे बारीक सारीक पाळेगार-देसाई.कुणाचे दोर कुणाच्या हाती यांच्या मसलती, खलबतखान्यात रचल्या जाऊ लागल्या. त्या मसलतींचा मतलबी आविष्कार रणभूमीवर दिसायला लागला. घोड्यांच्या टापांचे आवाज, उडणारी धूळ, लष्कराच्या आरोळया, फस्त होणारी पिकं,

विव्हळणारे सैनिक, नागवली जाणारी रयत, हा सगळा परिपाक लोभी, सत्तातुरांचा होता.  मति गुंग करणारे कट रचले जात होते, आणि सत्तातुरांची पारडी खालीवर जात होती, खजिने भरले जात होते आणि लुटले जाऊन रिकामेही होत होते.

भारताच्या दक्षिणेला, या साऱ्या राजकारणाच्या पटावरील मोहरे, वजिर, राजे, प्यादी यांची बेरीज आणि वजाबाकी होत असतांना, एक बारीकसं प्यादं मैसूरच्या फौजेत मागच्या रांगेतल्या कोपऱ्यात उभं होतं. कुणाचंही त्याच्याकडे लक्ष नव्हतं. पण ते बेरकी प्यादं मात्र उघड्या डोळयांनी आणि तल्लख मनानं हे सगळं बारकाईने टिपत होतं. हळूहळू, मैसूरच्या भूमीवर हालचाल करायला लागलं होतं.

# मैसूर राजसत्तेला शह – हैदर नाईक


त्या नाईक शिपायाचं नाव होतं हैदर अली. धूमकेतूसारखा अचानक तो दक्षिण भारताच्या राजकारणात उगवला. इ. स.१७६१ मधे मैसूरची सत्ता बळकावून राज्य करायला लागला आणि झपाटल्यासारखा लढाया, छापे, कारस्थानं करून, २० वर्ष कारभार करून इ. स. १७८२ मधे परलोकी निघून गेला. याच्या काळात मैसूरच्या सीमा रेषा लांबवर पसरल्या. हैदरच्या ऐन विशीच्या काळात म्हणजे १७४० च्या सुमाराला त्रिचनापल्ली स्वारीमुळे मैसूरचा खजिना रिता होता. लष्करी शिस्त वर उल्लेख केल्याप्रमाणे मोडकळीला आलेली होती. आणि चाणाक्ष आणि चतुर अशा या नायकाने आपल्या हुशारीवर एक गोष्ट पक्की जाणली होती की ज्याच्या हाती उत्तम फौज तोच सर्वाधिकारी.

कृष्णराज वोडियार आणि राजमाता देवजम्मा यांच्या हातून सर्व सत्ता काढून घेणाऱ्या सर्वाधिकारी करचुरी नंजराजैया आणि दलवाई देवराजैया यांचा कुटील डाव चाणाक्ष बुद्धीच्या हैदरने ओळखला. त्यांना ठकास ठक बनण्यासाठी जो कठोरपणा, कावेबाजपणा, हिकमती चाणाक्ष पणा, संकटातून मार्ग काढण्याचा सावधपणा लागतो, तो सर्व हैदरमधे पुरेपूर होता. युद्धात सर्व गुन्हे

माफ असतात त्याप्रमाणे श्रेष्ठत्वाला चढण्याच्या सर्व पायऱ्या त्याने निगरगट्टपणे वापरल्या. त्या दोघांच्या हातून त्याने सत्तेचा डाव हिसकावून घेतला.. लष्करी डावपेचात आणि युद्धकलेत तो निष्णात तर होताच. अशा या हैदरअलीने मैसूरच्या राजकारणात इतिहास निर्माण केला. ....

# नबाब बहादूर हैदर अली.






## हैदरअली – जन्मभूमी ते कर्मभूमी.
## बुध्दीकोटे ते बंगलुरु.

हैदरअलीचा जन्म इ स. १७२१ सालच्या सुमारास कधीतरी झाला. त्याच्या जन्माची निश्चित तारीख माहीत नाही. हैदरच्या पूर्वजांबद्दलही इतिहासकारांमधे मतभेद आहेत. इंग्लीश इतिहासकार बाऊरिंगने लिहिलंय की हैदरचा पूर्वज याह्या हा बगदादहून आला, आणि इतर इतिहासकार आणखी वेगळं

सांगतात. वासुदेवशास्त्री खरे सांगतात, त्याप्रमाणे हैदरचा पणजा महंमद बहलोल हा फकीर होता. तो हिंडत हिंडत गुलबर्ग्याला अळंद गावात पोचला. त्याचे मुलगे महंमद अली, आणि महंमद वली. हे दोघे नोकरीच्या शोधात शिऱ्याच्या नबाबाकडे गेले. या नबाबाने त्यांना जमाबंदीच्या वसुलाचं काम दिलं. महंमद अलीचा मुलगा फत्तेमहंमद. महंमदअली वारल्यावर काकाने आपल्या पुतण्याला आणि भावजयीला हाकलून दिलं. तेव्हा फत्ते आणि त्याची आई यांची अवस्था फार वाईट झाली. लष्करातल्या एक कानडी प्याद्याला या दोघांची दया आली, आणि त्याने या दोन्ही मायलेकरांना आसरा दिला. हयवदन राव यांनी मैसूरच्या इतिहासावरच्या पुस्तकात, अरबस्तानातून अशराफसाहिब हा हैदरचा पूर्वज १६-१७ व्या शतकात कधीतरी आदिलशहाच्या पदरी राहिला असा उल्लेख केला आहे.. थोडक्यात म्हणजे हैदरच्या पूर्वजांचा इतिहास आणि जन्मतारीख नीट कळलेली नाही. हा जो अशरफसाहिब होता त्याच्या वंशात पुढे महंमद अली झाला. त्याला ३ मुलगे होते. थोरला फत्ते महंमद - हा शिरे नबाबाकडे चाकरीला राहिला. आपल्या हुशारी ५०० घोडदळ आणि ६५० पायदळाचा मुख्य अधिकारी होता. दुसरा गुलाम हैदर जो मदगिरी किल्ल्याच्या मल्लराजैया या किल्लेदाराच्या हाताखाली कामाला

लागला. आणि तिसरा गुलामअलि जो दोड्बाळापूरच्या (दोड् म्हणजे मोठा ) अब्बास कुलीखानकडे नोकरीला गेला.

फत्ते महंमदला आपल्या तिसऱ्या बायकोपासून दोन मुलगे झाले. मोठा शहाबाज आणि धाकटा हैदर. हैदरचा जन्म बुध्दीकोटेचाच. फत्ते गुम्मनहळ्ळीला स्थिरावला तिथे त्याला छोटीशी जहागिरीही मिळाली. हैदरच्या जन्माची एक कथा अशी आहे की जेव्हा हैदर जन्मला तेव्हा ज्योतिषांनी भविष्यवाणी केली की हा खूप मोठा राजा होईल, तुमच्या कुळाला उजळून टाकेल पण याच्या बापाला मात्र हा खाऊन टाकेल. ह्याचा बाप लगेच मरेल. त्यामुळे घाबरलेल्या नातेवाईकांनी आणि फत्तेह्च्या बायकोने नवजात मुलाला मारून टाकायचं ठरवलं. फत्तेउल्लाहने सर्वांना अडवलं आणि म्हटलं की जन्म-मृत्यू कोणाचाही हातात नाही जे व्हायचं असेल तेच होईल. त्यामुळे हैदर जगला. पण हैदर ३ वर्षांचा असतांना फत्तेह चितळदुर्गच्या लढाईत मारला गेला. त्यावेळी ९००० रुपयांचं कर्जही होतं. फत्तेउल्लाह् वारल्यावर दोड बाळापूरचा किल्लेदार अब्बास कुलीखान याने दुष्टपणाने फत्तेची सारी संपत्ती, बायकोचे दागिने, जहागिरी सगळं जप्त केलं आणि फत्तेचं कुटुंब अक्षरश: रस्त्यावर आलं. इतकंच नाही तर या दोन लहानग्या मुलांना किल्लेदाराने कैदेतही टाकलं. मुलांच्या सुटकेसाठी पैसा उकळायलाही त्याने कमी केलं नाही. मैसूरच्या

राजाच्या कानावर कुलीखानचा हा दुष्टावा गेला तेव्हा त्याने शिऱ्याच्या नबाबातर्फे मध्यस्थी करायला लावून या दोन्ही मुलांची सुटका केली. गुलाम हैदर या काकाने मात्र दोघा मुलांना आणि आपल्या भावजयीला आपल्याकडे आणून ठेवलं आणि त्यांचा सांभाळ केला. दोन्ही मुलांना लष्करी शिक्षण दिलं. शहाबाज वयात आल्यावर त्याचं लग्न करून दिलं. अर्काटच्या नबाबाचा भाऊ अब्दुल वहाब हा गुलाम हैदरच्या ओळखीचा होता. हा चित्तूरचा जहागिरदार होता. त्याच्याकडे शहाबाजला चाकरीला पाठवलं. शहाबाज नाईक पदावर लागला आणि हैदरला नुसतंच कामाला ठेवलं. पण थोड्याच दिवसांनी गुलाम हैदरने दोन्ही मुलांना आपल्याजवळ बोलावून घेतलं. नंजराजैया या दिवाणाची ओळख करून दिली. शहाबाजला ३५० घोडदळाचं मुख्य बनवलं. या गुलाम हैदरच्या मृत्यूनंतर शहाबाज काकांचं पथक सांभाळायला लागला. ही घटना १७३८ च्या जवळपासची म्हणजे हैदर तेव्हा १६-१७ वर्षांचा होता. यावेळी मैसूरची सर्व सत्ता दलवाई देवराजैया आणि सर्वाधिकारी नंदराजैया या दोन बंधूंच्या हाती होती. हैदर यावेळी राजवाड्यात चाललेल्या या घटनांचा डोळस मनाने धडे घेत होता. १७३४ सालानंतर हैदरचा सतत दलवाई बंधूंचा संपर्क येत राहिला पण तो या दोघांना चांगलाच ओळखायला लागला. पुढच्या राजकारणात हैदरला याचा खूप उपयोग झाला. दलवाई

देवराजैया, देवराजैयाचा धाकटा सख्खा भाऊ कराचुरी नंदराजैया यांच्याशी हैदरचा सतत संघर्ष होत राहिला. तिघे राजकारण खेळत राहिले आणि हैदरने या दोघांना मागे टाकून आपल्या हाती सत्ता घेतली या दृष्टीने मैसूर दरबारातील या तीन शक्तींशी ओळख होणं जरुरीचं आहे.

मैसूर दरबारात या घडामोडी घडत असतांना हैदरच्या व्यक्तिगत आयुष्यातही महत्त्वाच्या घटना घडत होत्या. हैदर वयात आल्यावर शहाबाजने हैदरचं लग्न शिऱ्याच्या सैद शहाच्या मुलीशी लावून दिलं. घराणं चांगलं होतं. सैद अभ्यासू, विद्वान म्हणून प्रसिध्द होता. हैदरची ही बायको बाळंतपणानंतर जलोदराने आजारी पडली आणि जन्मभर अंथरुणाला खिळून राहिली इतकी अपंग झाली. तिला एक मुलगी झाली. हैदरने या पत्नीला खूप प्रेमाने सांभाळलं. तिला घरात खूप मान होता. या प्रसंगामुळे हैदरला दुसरं लग्न करणं भाग होतं. ते दुसरं लग्न गुर्रमकोंड्याचा जहागिरदार मीर रेझाच्या बहिणीशी झाला. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने आपले अनौरस अनेक मुलगे आपल्याजवळ पाळले होते. त्यातला एक मीर रेझा होता. मीर रेझाच्या बहिणीशी लग्न झाल्यावर तीन वर्ष हैदरला मूल झालं नाही. तेव्हा, टिपू मस्तान नावाचा एक अवलिया होता, त्याची कबर अर्काटला होती. हैदरच्या पत्नीने आणि हैदरने त्या कबरीची सेवा केली. तेव्हा त्याला पुत्र झाला.

हैदर अलीने त्या अवलीयाचाच नाव आपल्या पुत्राला ठेवलं. तोच पुढे इतिहास घडवून गेलेला टिपू सुलतान. याचा जन्म २० नोव्हेंबर १७५० मध्ये झाला.

या लष्करी चाकरीत हैदरच्या गुणांना खूप वाव मिळाला. इ. स. १७४५ सालची गोष्ट. एकदा सर्वाधिकारी नंजराजैया देवनहळ्ळीला निघालेले असतांना वाटेत बंगलोरला आले. तिथे त्यांनी लष्करातल्या मुलांची स्पर्धा घेतली. त्यात निशाणबाजीत हैदरने नंदराजैयाचं लक्ष वेधून घेतलं इतकी उत्कृष्ट निशाणबाजी हैदरने केली. सन १७४६ सालामध्ये मैसूरच्या फौजा देवनहळ्ळीच्या वेढ्यात हैदरने परत आपलं लढाईतील नैपुण्य दाखवून नंजराजैयाचं लक्ष वेधून घेतलं.

## देवनहळ्ळी – इ. सन १७४६.

## हैदरअलीचा उदय ...

रंगा गौडा नावाच्या दोड् बाळापूरच्या मुख्याने देवेनहळ्ळी किल्ल्याचा दांडगाईने कब्जा केला. त्याला साथ दिली ती मराठे आणि मोंगलांनी. या गौडाचा बंदोबस्त करण्यासाठी देवराजैया स्वारीवर निघाला. बंगलोरला त्याला शहाबाज आपलं पथक घेऊन भेटला. त्यावेळी शहाबाज हा कट्टी गोपाळराव अरसच्या हाताखाली पथक घेऊन काम करत होता. त्याच्याबरोबर नवशिका हैदरही होता. हैदर त्याकाळात उनाडक्या करण्यासाठीच सेनेत भरती झाला होता. भावाच्या हाताखाली लष्कर या क्षेत्राशी ओळख करुन घेत होता. हा वेढा ९ महिने चालला. यात शहाबाजला शत्रूने कैद केलं. त्यातून हैदरने आपल्या भावाची अत्यंत चतुराईने सुटका केली. ते पाहून करचुरी नंजराजैया अगदी त्याच्यावर खूष झाला. हैदरचंही पाणी त्याने ओळखलं आणि खूष होऊन देवेनहळ्ळीच्या एका दरवाजाच्या सरनोबत पदाची जबाबदारी हैदरवर सोपवली. ५० घोडेस्वार आणि २०० पायदळ त्याच्या हाती सोपवलं. आता आजा, बाप, मामा यांच्यासारखाच हैदरही नाईक झाला आणि मैसूरचा सर्वेसर्वा झाल्यावरही

आयुष्यभर त्याच हैदरनाईक या नावाने ओळखला गेला. करचुरी नंजराजैयाचा तो अत्यंत लाडका शिपाई बनला. हैदर मैसूर फौजेत बराकी वेंकटरावच्या हाताखाली होता. इ. स. १७५१ मधे त्रिचनापल्ली जिंकण्यावरून चंदासाहेब आणि महंमद अली यांच्या स्पर्धेत मैसूरकडून नंजराजैया लढाईत उतरला. त्यालाही त्रिचनापल्ली या हिंदू राज्यावर कब्जा हवाच होता. नंदराजैयाने महंमदअलीशी करार केला. त्रिचनापल्लीचा इतिहास मोठा आणि राजकीय आणि भौगोलिक महत्वही मोठंच होतं. तेराव्या शतकात दक्षिणेत आलेल्या होयसाळ राजवंशाची ही राजधानी. त्रिशीला या शब्दावरून त्रिचनापल्ली हे नाव पडलं. तीन शीला हा मूळ शब्द. अनेक खडकांनी भरलेल्या या भूभागावर शंकराचं देऊळ वसलं होतं. या पवित्र ( थिरू ) शीलांच्या अस्तित्वावरून या गावाला ओळखलं जाऊ लागलं.

# त्रिचनापल्ली – गुंतागुंतीचं राजकारण

त्रिचनापल्लीचं राजकीय महत्त्व म्हणजे ज्याच्या हाती त्रिचनापल्ली तो दक्षिण भारताचा स्वामी. त्रिचनापल्ली ही या सूत्राची किल्ली होती. त्यामुळे त्रिचनापल्ली आपल्या हाती घेण्यासाठी दक्षिणेतील सर्वच सत्तांची स्पर्धा सुरू होती. इ. स. १७४० मधे मदुरा संस्थानची राणी मिनाक्षी हिला फसवून चंदासाहबाने त्रिचनापल्ली हस्तगत केलं. राणीला कैदेत टाकलं. १७४१ मधे मराठी फौजेने बाबूजी नायकाच्या हाताखाली परत ते जिंकलं. शाहूने मुराराव घोरपडेला मराठ्यांच्या वतीने त्रिचनापल्लीला ठेवलं. आता त्रिचनापल्ली जिंकण्यासाठी महंमदअली हा इंग्रजांच्या मदतीने आणि चंदासाहेब हा फ्रेंचांच्या मदतीने रणभूमीवर उतरला. या सगळ्या राजकारणात गुंतागुंत वाढत गेली. दक्षिणेतल्या राजकारणाला ऊत आला. कोणीही कुणाशीही सहाय्याचे वादे करायला लागले, ते वायदे मोडायला लागला. या झगड्यात सगळीच महत्त्वाकांक्षी माणसं उतरली तेव्हा नंजराजैयाबरोबर हैदर त्रिचनापल्लीला होताच. नंजराजैयाला त्याने पैसा आणि माणसंही पुरवली. त्रिचनापल्लीच्या लढाईनंतर नंजराजैयाने लढाईचा खर्च मागितला. नंजराजैयाने स्वत:

किल्ल्यात जाऊन खर्चाचा हिशेब घ्यावा असा सांगावा महंमदअलीकडून आला तेव्हा त्या कामासाठी किल्ल्यात शिरत असतांना नंजराजैयाला ठार करण्याचा नबाबाचा उद्दिष्ट आहे हे हैदरअलीला लक्षात आलं. म्हणून त्याने करचुरी नंजराजैयाला माघारी यायला सांगितलं. तेवढ्यात महंमदअलीच्या शिपायांनी मैसूरच्या निवडक फौजेवर तोफा डागायला सुरुवात केली. हैदरअलीमुळे केवळ करचुरी नंजराजैयाचा जीव वाचला. तेव्हा हैदरने अर्काटच्या नबाबाला ठार करण्याचा सल्ला नंजराजैयाला दिला. पण ते घडून आलं नाही. या फ्रेंच आणि इंग्लिश लढण्यावर त्यांच्या देशातून युध्द थांबवण्याचा दबाव आला. म्हणून दोघांच्या वाटाघाटी सुरु झाल्या. पण त्या फिसकटल्या आणि परत युद्धाला सुरुवात झाली. त्रिचनापल्ली आणि अर्काटवर कुणाला स्थापायचं यावर या परकीयांच्यात जास्त जुंपली.

या ज्या लढाया झाल्या त्यावर फ्रान्स सरकारकडून बुसीला सतत नाराजीचे खलिते येत होते. पण फ्रेंच सेनापती बुसी थांबायला तयार नव्हता. शेवटी बुसीचा हा आक्रमक स्वभाव न आवडल्यामुळे फ्रेंच सरकारने त्याला फ्रान्सला बोलावून घेतलं आणि गोडार्ड याला गव्हर्नर म्हणून भारतात पाठवलं. इंग्लंडमधूनही मद्रासचा गव्हर्नर सॉंडर्स याला तशाच सक्त सूचना मिळाल्यामुळे दोन्ही देशांच्या इथल्या प्रतिनिधींनी सामोपचाराने

करार केला आणि अर्काटमध्ये महंमदअलीची स्थापना झाली. २१ ऑगस्ट १७५५ या दिवशी महंमद अलीने अर्काटच्या किल्ल्यात नबाब म्हणून रीतसर प्रवेश केला आणि त्यादिवशीपासून इंग्रज आणि महंमद अली यांच्याशी हैदर अलीच्या भविष्यातील लढायांची बीजं रुजली. दुसरीकडे हैदरच्या कामगिरीवर खूष होऊन नंजराजैयाने त्याला बहादूर हा किताब दिला. नवीन फौज उभारण्याची परवानगीही दिली. तेव्हा हैदरने लगेच २००० घोडदळ, ४००० हजार पायदळ, आणि ४००० बंदूकधारी शिपाई फौज उभी केली. त्रिचनापल्लीची लढाई ३ वर्षे चालली पण हाती यश आलं नाही. उलट खर्च मात्र अफाट झाला.

निजाम, अर्काटच्या या लष्करी मोहिमांच्या काळात हैदरने आपली महत्वाकांक्षा फुलवायला सुरुवात केली. नासिरजंगबरोबर हिंडत असतांना त्याने आपल्या नोकरीत ३०० बेरड ठेवले. बेरड ही लुटालुट, चोऱ्या करणारी शूर आणि विश्वासू जमात. कुणाच्याही वस्तीत, घरात, छावणीत शिरायचं आणि ते लुटायचं हाच त्यांचा धंदा. बिलंदर चोर पण इमानी अशी त्यांची ख्याती होती. बायका-मुलं-पुरुष-गावकरी कुणीही त्यांना वर्ज्य नव्हतं. कपडे, दागिने, गुरं ढोरं- कुठलीही वस्तू ते सोडत नसत, अगदी बायकांच्या नाकातली नथसुध्दा..हैदरने या लोकांना कामात घेतल्यावर त्यांनी काहीही लुटावं आणि त्यातला ठरलेला हिस्सा

हैदरला आणून द्यावा. यामुळे हैदरचा खजिना भरायला लागला. स्वत: हैदरही या मुलुखगिरीत लुटालुट करतच होता. नासिरजंग आणि मुझफ्फरजंग यांची झुंज चालू होती तेव्हा, नासिरजंग फौज घेऊन प्रवास करत असतांना ठार झाला. त्यावेळी हैदरच्या बेरडांनी सरळ नासिरजंगच्या खजिन्यापर्यंत मुसंडी मारली आणि मोहरांनी खचाखच भरलेले दोन उंट सरळ पळवून नेले, आणि त्यातला काही वाटा हैदरला दिला. या बेरडांनी ३०० घोडे आणि ५०० बंदुकाही पळवल्या आणि हैदरला दिल्या. याशिवाय हैदरने पळवलेले १५ उंट वेगळेच.

मिळालेल्या मोहरांमधून राहुट्या, तंबू, हत्ती असं दिमाखदार सामान हैदरने खरेदी केलं. त्यानंतर नंजराजैयाला बोलावून आपल्या पलटणींची कवायत त्याला दाखवली. नंजराजैया खूष होऊन गेला. हैदर सुलतान होण्याची स्वप्नं पहात होता. त्याला थाटामाटात रहाणारा मोगल सुलतान व्हायचं होतं. हैदरने वाटेल त्यामार्गाने पैसा मिळवला आणि सर्व पैसा आपली लष्करी ताकद वाढवण्यातच खर्च केला. त्याचं स्वप्नच मोठं होतं. हैदरला या इंग्रज-फ्रेंच लढाईत इंग्रजांचा कावेबाजपणा, युध्दतंत्र, युध्दशिस्त, आणि नवीन शस्त्रं यांची खूप जवळून ओळख झाली. त्याच्या गुणग्राहकतेने इंग्रजांचा कावेबाजपणा उचलला आणि लष्करी शिस्तही. या फौजेत  मराठी फौजेचा सेनापती गुत्तीचा मुराराराव

घोरपडेही होताच. त्यालाही हे परदेशी चांगलेच कळले आणि हैदरही कळला. मुरारराव आणि हैदर दोघेही समानशीलाचे. दोघेही आपली छोटीशी फौज घेऊन जिथे जिथे लढाई असे तिथे तिथे हजर असत. जी लूट मिळेल त्यातून आपला स्वार्थ साधत. त्रिचनापल्लीच्या लढाईनंतर हैदरची प्रतिष्ठा खूपच वाढली. नंजराजैयाच्या मर्जीतला झाल्यामुळे त्याचा मानही वाढला. हैदरची लष्करी ताकदही आता खूप वाढली. त्याच्या पदरची बेरडांचीही संख्या तो वाढवत चालला होता. आता तो मोठा सरदार झाला होता. १५०० घोडदळ, ३००० कवायती फौज, २००० पायदळ, आणि ४ तोफा एवढी त्याची फौज तयार झाली. तो मोठ्या सरदारासारखा रहायला लागला. त्याचा दिवाण होता मराठा ब्राह्मण खंडेराव. खंडेराव चाणाक्ष, शूर, धीट, आणि आर्थिक व्यवहारात फार हुशार होता. मिळालेल्या लुटीचा आणि लहानमोठ्या वस्तूंचाही जमाखर्च कसा मांडायचा, त्यातील पळवाटा कशा बुजवायच्या याचं उत्तम शिक्षण त्याने हैदरला दिलं. हैदर स्वत: निरक्षर होता, पण स्मरणशक्ती इतकी विलक्षण होती. की भले भले त्याच्या तोंडी गणिताने सर्द व्हायचे. त्यामुळे हैदरच्या खजिन्यात अफरातफरीला फारच थोडा वाव होता. हैदर त्याच्यावर खूष होता, आणि खंडेरावही त्याला चांगले धडे देत होता. इ. स. १७५२ पर्यंत हैदर बलवान झाला. नेमबाजी, तलवारबाजीत तो

निपुण होताच. कावेबाजही भरपूर होता.मुरब्बी राजकारणी होता. इ.सन १७५५ हे साल हैदरअलीच्या भविष्य काळासाठी महत्वाचं ठरलं.

## हैदरअली दिंडीगलचा फौजदार – इ. सन १७५५

या काळात श्रीरंगपट्टणचा अंतर्गत कारभार देवराजैया पहात होता आणि बाहेरच्या राज्यांशी राजकीय संबंध करचुरी नंजराजैय्या कृष्णराज वोडीयारमार्फत पहात होता. इ. स. १७५५ मधे श्रीरंगपट्टणाहून मैसूरला जातांना वाटेत नंज राजैया आपली थोडी फौज कमी केली आणि उरलेली फौज हैदरच्या हाताखाली ठेवली. त्याला दिंडीगलचा फौजदार बनवलं. या दिंडीगल परगण्याचं त्या काळात फार महत्वाचं मोक्याचं स्थान होतं. मदुरा आणि कोईम्बत्तूर या दोन्हीकडे जाणारे रस्ते या परगण्यातून जात होते. शिवाय नंजराजैयाने ३ लाख वसुलाचे सत्यमंगल, इरोडे, शंखगिरी हे ३ परगणेही हैदरच्या हवाली केले. दिंडीगल हा डोंगराळ प्रदेश. तिथले पाळेगार नंजराजैयाची सत्ता मानत नव्हते. स्वत:ला स्वतंत्र समजत असत. या पाळेगारांना वठणीवर आणायचं काम नंजराजैयाने हैदरवर सोपवलं. अर्काटच्या स्वारीत हे पाळेगार लढण्यासाठी हैदरबरोबर होतेच. हैदरने परतीच्या प्रवासात या पाळेगारांबरोबर तडजोडीची भाषा सुरु ठेवली. त्यांना अभयवचन दिलं. त्यांच्या समस्या विचारल्या. आणि दिंडीगलला पोचल्यावर मात्र उग्र स्वरूप धारण केलं. हैदरने या पाळेगारांची गावं लुटली. गुरं

पळवली. रयत कापून काढली, आणि हैदरच्या आज्ञेत न वागण्याच्या भयंकर परिणामांची झलक त्यांना दाखवली. त्याच्या या भयंकर दुष्टाव्यामुळे सर्व पाळेगार सुतासारखे सरळ आले. दिंडीगल भागात शांतता झाली. दिंडीगलचा अधिकार हातात आल्यावर हैदरने पुढच्या दोन-तीन वर्षांमधे अम्मी नायक, अप्पी नायक, वगैरे नायकांना शरण आणलं. काहींना मोठमोठे नजराणे पाठवून आपल्याकडे वश करून घेतलं. या नायकांकडून हैदरने दोन लाख रुपये गोळा केले. श्रीरंगपट्टणच्या दरबारातील हकीकती कळाव्यात म्हणून आपला वकील म्हणून हैदरने आपल्या वतीने खंडेरावाला श्रीरंगपट्टणाला ठेवलं होतं. या खंडेरावाने दलवाई बंधूंना पाळेगारांशी झालेल्या लढायांची रसभरीत वर्णन सांगितली, हैदरला कसा मोठा खर्च पडला हेही कळवळून कानावर घातलं. मग हैदरने मग जखमींची मोठी यादी सरकारात खर्च मिळावा म्हणून पाठवली. ती यादी पाहिल्यावर दलवाई देवराजैयाने आपला एक माणूस शहानिशा करायला दिंडीगलला पाठवला, तेव्हा हैदरने आपल्या शिपायांना हळदीची पिवळी फडकी बांधून जखमी करुन ठेवलं होतं. ती संख्या होती ७०० आणि खरे जखमी होते ६७ लोक. सरकारातून या प्रत्येक जखमीला १४ रुपये जखमपट्टी मिळायची. ती हैदरने अशी जमवली. पाहणी करायला आलेल्या अधिकाऱ्याचीही मूठ दाबली आणि प्रकरण निकालात काढलं.

मध्यंतरी सलाबतजंग खंडणीची मागणी करत मैसूरच्या दारात उभा राहिला तेव्हा दलवाई देवराजैया, करचुरी नंजराजैया यांनी ५६ लाख रुपये देण्याचं कबूल केलं पण तेवढा पैसा त्यांना उभारता आला नाही, तेव्हा सलाबतजंगने काही सावकार पैशाची पूर्तता होईपर्यंत आपल्याकडे ओलीस ठेवले. त्यातील काही सावकार पैसे भरून सुटले, काही पळून गेले आणि काही तुरुंगात पडले.

# मैसूर राजघराण्यातील वादळ.

इ. स. १७५५ ते १७५९ पर्यंत मैसूर दरबारात अत्यंत अशुभ ग्रहांनी प्रवेश केला होता की काय असं वाटावं अशा घटना घडल्या. याच काळात मैसूर दरबारात नवं वादळ आकार घ्यायला लागलं होतं. मैसूरची सत्ता जरी नंजराजैया आणि देवराजैयाच्या हातात असली तरी मैसूर गादीचा मालक कृष्णराज वोडियार आता २७ वर्षाचा, मोठा झाला होता आणि राज्याचा कारभार हाती घेऊ पहात होता. आजवर त्याला जी अपमास्पद वागणूक दलवाई बंधू त्याला देत होते, तो जांच त्याला झुगारून द्यायचा होता. पण सत्तेला सोकावलेले देवराजैया बंधू आता निवृत्त होण्याची भाषा बोलतच नव्हते.

१७५५ साल उजाडलं. करचुरी नंजराजैया याची मुलगी लक्ष्मणी ही कृष्णराज वोडियारला दिलेली होती. नंजराजैयाने नुकतीच त्रिचनापल्लीवर स्वारी केली होती आणि त्या मोहिमेचा खर्च ३ कोटी रू. आला होता. राजाच्या मते एवढा खर्च नाहक झाला आणि इतकं करून त्रिचनापल्लीही हाती आली नव्हती. नंजराजैयाला खरं तर त्रिचनापल्लीवर स्वारी करून ती जिंकून तिथे स्वत:च राज्य स्थापायचं होतं. पण ते जमलं नाही. आणि उलट

राजाची नाराजी पण ऐकावी लागली. त्यातून सलाबतजंग आणि बुसी राज्यावर येऊन गेल्यामुळे मैसूरचा खजिनाही रिता झालेला होता. नंदराजैयाचा अति जाचही राजाला आता सहन होईनासा झाला होता. म्हणून कृष्णराज वोडियार आणि त्याची आई देवजम्मा यांनी कट करून करचुरी नंजराजैयाला अटक करायची आणि वेंकटपतीला प्रधानमंत्री करायचं असं कारस्थान रचलं. त्यांची गुप्त खलबतं चालू झाली आहेत ही कुणकुण नंजराजैयाला लागली तेव्हा तो हरदनहळ्ळीला होता. तो सावध झाला आणि नंजनगुडला थांबून माहिती काढायला लागला. आपल्याला अटक करायचं कारस्थान राजमाता आणि राजा करत असल्याचं ऐकून हे सगळं कारस्थान राजाला शिकवणारे सल्लागारही दलवाई बंधूंनी शोधून काढले. त्यांना काढून टाकायचं ठरवल्यावर कृष्णराज वोडियारने आकांडतांडव सुरू केलं. नंजराजैयाने लगेच राजप्रासादाबाहेरचे नेहमीचे सुरक्षा अधिकारी काढून आपली फौज ठेवली. देवराजैयाने राजाला परोपरीने समजावून सामोपचाराने घ्यायला सांगितलं, पण राजा काहीही ऐकायला तयारच नव्हता. उलट पोरकटपणाने दलवाई बंधूंनाच धमक्या देऊ लागला. परिस्थिती हाताबाहेर जाते आहे, राजा नमतं घ्यायला तयार नाही आणि आपल्या हातातून सत्ता जाईल या भीतीने करचुरी नंजराजैयाने, राजाला ठार मारून आपल्या गर्भवती मुलीला

होणाऱ्या बाळाला गादीवर बसवायचं ठरवलं. त्याने हा सगळा बेत आपल्या मुलीला सांगितला आणि राजाला विष देण्याची जबाबदारीही तिच्याचवर सोपवली.

पण मुलीने हे मानलं तर नाहीच पण बापाला हे असं न वागण्याचा सल्ला दिला. त्याचवेळी राजाला म्हणजे आपल्या पतीला बापाचं हे कारस्थान सांगून सावधही केलं. राजाला हे कपटकारस्थान कळल्यावर त्याने ४०० निवडक फौज घेऊन नंजराजैयावर स्वारी करायचं ठरवलं. नंजराजैयानेही जावयाविरूध्द लढण्याची तयारी केली. पण देवराजैयाला हे भांडण आणि लढणं सर्व सहन होईना. म्हणून त्याने नंजराजैयाला निरोप पाठवून सावध केलं आणि चार वडिलकीच्या गोष्टी सांगितल्या. आधीच खजिना रिकामा झालाय, त्यात फौज या लढाईत वापरली तर राज्याचा नाश व्हायला वेळ लागणार नाही हे स्पष्ट केलं. तरी नंजराजैयाने हा सल्ला मानला नाही. त्याने फौज जमवली आणि राजवाड्यासमोर आणली. राजानेही आपली फौज जमवली. राजघराण्यातले नातेवाईक त्याच्या मदतीला उभे राहिले. त्यांनी आपापली फौज राजाच्या मदतीला दिली. नंजराजैयाच्या फौजेशी युध्दाला तोंड फुटलं पण राजाकडे तोफा नव्हत्या, त्यामुळे नंजराजैयाकडील तोफा सुरु झाल्यावर गोंधळ माजला, कापाकापी, मृत्यू आणि रक्तपात यांनी घबराट झाली. राजा राणीमहालात जाऊन लपला,

तेव्हा नंजराजैया प्रासादात शिरला. त्याने राजाला राजवाड्यातील दरबारात आणलं. सर्व लोकांना जमवून दरबार भरवला. राजाच्या सल्लागारांना साखळदंडाने बांधून कैदत टाकलं. इतरांचे कान नाक कापून शिक्षा दिली. कृष्णराज राजा हे सगळं क्रौर्य पाहून थक्क झाला. नंजराजैया मग एवढं कठोर वर्तन करुन दरबारातून निघून गेला.

देवराजैयाला मात्र आपल्या भावाचं हे क्रूरपणाचं वागणं सहन न होऊन, त्याने आपल्या कुटुंबासह आणि लोकांसह राजधानी सोडण्याचा निर्णय घेतला. आपली फौज, घोडदळ आणि बायकामुलांना घेऊन तो भवानी नदीच्या तीरी दिंडीगलमधील सत्यमंगलला जाऊन राहिला. त्याने तिथे पोचल्यावर आपल्या सर्व अधिकाऱ्यांना त्या भागाचा वसूल आपल्याकडे आणून द्यायला सांगितला आणि स्वत:च्या पैशाची सोय करून घेतली. हा सगळा वसूल हैदरच्या खजिन्यात जाणारा होता. पण हैदरचं ऐकायचं की देवराजैयाचं असा प्रश्न तेथील रयतेला पडला. शेवटी देवराजैयाच श्रेष्ठ होता, म्हणून त्यालाच दिला. नंजराजैयाचं हे संतापजनक, क्रूर वर्तन सगळं पेशव्यांच्या वकीलाला जेव्हा कळलं तेव्हा त्यांनी दलवाई बंधूंना या कठोर वागण्याचा जाब विचारला आणि याचे परिणाम पेशवे काय करतील हे माहीत आहे का, असं विचारलं. राजा कृष्णराजनेही घडलेली सारी हकिकत पेशव्यांना कळवली

आणि पेशव्यांकडे मदत मागितली. त्याने पेशव्याला कळवलं की जर पेशवा कर्नाटकात येईल, दलवाई बंधूंना ठार करेल, त्याला गादीवर बसवेल, आणि त्रिचनापल्ली त्याला जिंकून देईल तर तो पेशव्याला अर्धे राज्य आणि रोजचा फौजेचा खर्च ५०,००० रू. पेशव्याला देईल. त्याउलट नंजराजैयाने पेशव्याला कळवलं की जर पेशवा या भानगडीत पडेल तर तो राजाला ठार करून स्वत:लाही संपवेल. दोन्ही निरोप पेशव्यांकडे पोचले.हातातील सत्ता सुटू नये म्हणून मैसूरच्या राजप्रासादात चाललेला हा अमानुष, हीन प्रकार हैदरअली पहात होता आणि दलवाई बंधूंची नियत ओळखायला लागला होता .

# मैसूर आणि मराठे.

इ.स. १७५० मधे शाहूच्या मृत्यूनंतर त्यांचा पेशवा नानासाहेब याची नजर कर्नाटकाकडे वळली. दक्षिणेतली चौथाई वर्षानुवर्षे गोळा केली गेलेली नव्हतीच. शिवाय मराठ्यांचे शहाजीच्या काळापासून हक्काचे असलेले परगणे एकेका नबाबाने गिळंकृत केले होते. त्याच्याकडे लक्ष पुरवणं जरूरीचं होतं, आणि थोरल्या बाजीरावाच्या काळात झालेलं सावकारी कर्ज फेडण्याची जबाबदारी आता नानासाहेब पेशव्यावर असल्यामुळे पैसा गोळा करण्यासाठी पेशवा कर्नाटकाकडे वळवली. निजामाच्या मदतीशिवाय पेशव्याने इ. स. १७५३ पासून स्वतंत्रपणे कर्नाटकाची मोहीम सुरु केली. मराठ्यांच्या स्वाऱ्या ही हैदरच्या आयुष्यातील फार महत्वाची घटना आहे, कारण उत्तरोत्तर हैदर आणि मराठे हा झगडा कायम होत राहिला आणि हैदरच्या कर्तृत्वाला, शौर्याला, रणनीतीला, व्यूहरचनेला, अनेक  धुमारे फुटले. आधी नानासाहेब पेशवा, मग माधवरावराव पेशवा, इंग्रज आणि निजामअली यांच्याबरोबरच्या लढायांमुळे, आणि विजयामुळे त्याची छाप इतिहासावर राहिली. या काळात सत्ताप्रमुख दलवाई बंधूच होते आणि हैदरचा उदय व्हायला लागला होता.

नानासाहेब पेशव्याने पहिली स्वारी इ. स. १७५३ मधे केली. रास्ते-मेहेंदळे-पटवर्धन-पेठे -बाजीपंत- मुरारराव-सखाराम हरि अशी अनेक नवीन सरदारांची नवीन फळी पेशव्यान स्वत:ची

म्हणून तयार केली. कर्नाटकात हिंदुपदपतशाही स्थापन करणं हे त्याचं स्वप्न होतं. त्रिचनापल्लीवर त्याचा डोळा होताच. कर्नाटकातील अर्काट, कडाप्पा, शिरे, कर्नूल आणि सावनूर या पाच नबाबांचा जोर संपवणं हे त्याचं लक्ष्य होतं. त्या नबाबांवर चौथाई लागू करण्यासाठी १७५२ नंतर भालकीचा तह झाल्यावर पेशवा जानेवारीत सरळ कर्नाटकात गेला. आता कर्नाटकाच्या राजकारणात पेशवी शिरला. यावेळी मैसूर, बिदनूर आणि सोंधे या हिंदू राजांशी त्यांचा पहिला संबंध आला. डुप्लेची आणि त्याचा लष्करी उजवा हात - बुसीची ताकद आणखीनच कमी झाली. फ्रेंचाची शक्ती उतरणीला लागली. या सगळ्या बातम्या पेशव्याकडे येत होत्या.

त्यानेही सगळ्यांकडे आपले वकील पाठवले होते. १७५३ सालच्या दसऱ्यानंतर नानासाहेब पेशव्यांच्या फौजा दक्षिणेकडे चालायला लागल्या. श्रीरंगपट्टणाला राजासमोर पेशवा पोचल्याबरोबर कृष्णराज वोडियारने लगेच खंडणी भरून टाकली. परतीच्या वाटेवर धारवाडचा किल्ला मोंगलांच्या ताब्यातून काबीज करून १७५४ च्या पावसाळ्याच्या सुरुवातीला पेशवा पुण्यात पोचला. दिंडीगलमधे असलेल्या हैदरचं या मराठ्यांच्या स्वारीकडे लक्ष होतं.

# नानासाहेब पेशव्यांची दुसरी मैसूर स्वारी-

१७५४ सालचा दसरा झाला. कर्नाटकातील राहिलेली कामं पूर्ण करण्यासाठी पुढची मोहीम परत कर्नाटकात जायचा निश्चित झाला. ती स्वारी विशेष नव्हती. याही वर्षी रास्ते, सरदार पटवर्धनांचे गोपाळराव आणि त्यांचे तरुण बंधू कर्नाटकात छावणीला राहिले होते. याचा फायदा, मराठी फौजेला तो प्रदेश कळायला, तिथल्या रयतेची भाषा कळायला, तिथल्या हवामानाची ओळख व्हायला खूप झाला.

## पेशव्यांची सावनूर लढाई – तिसरी स्वारी इ. सन १७५५.

इ. स. १७५५ मधे दसरा झाल्याबरोबर पेशव्याची तिसरी स्वारी बिदनूरवर झाली. ती मात्र विशेष गाजली. बिदनूरावर जातांना सासवडच्या महादजी पुरंदरे सरदाराने गोलंदाज मुझफ्फरखानच्या फौजेची झडती घेतली, मुझफ्फर हा गोलंदाज फ्रेंच अधिकारी बुसीच्या हाताखाली तोफखाना सांभाळण्यात तयार झाला होता. पेशव्याने भालकीच्या लढाईच्या वेळी बुसीची करामत पाहून त्याच्या या शिष्याला आपल्याकडे चाकरीत ठेवलं होतं. हा गोलंदाज स्वारीत आपली माणसं घेऊन निघाला होता. मुझफ्फरने सरकारी पैसा घेऊन फौजेची संख्या कमी भरली, या कारणावरून दोघांच्यात भांडण होऊन मुझफ्फरखान रुसून नोकरी सोडून श्रीरंगपट्टणाच्या राजाकडे आश्रयाला गेला. तिथे नोकरी स्वीकारल्यावर त्याने इतर नबाबांशी संपर्क साधायला सुरुवात केली. सावनूरकर नबाबाशी त्याने मैत्री केली आणि पेशव्याला विरोध करायला सुरुवात केली. यातून उद्भवलं सावनूरचं प्रकरण आणि लढाई. त्यात सगळं कर्नाटक उतरलं. पेशव्याच्या

मुत्सद्दीपणाचा कस लागला. इ. स. १७५५ मधे झालेल्या सावनूरच्या या लढाईला अनेक राजकारणी रंग होते.

सावनूर हे कर्नाटकात उतरायचं दार, म्हणून महत्वाचं संस्थान. म्हणून सावनूरकर नबाबाला कह्यात आणणं हा पेशव्याचा उद्देश. या नबाबाचं राज्यही खूप मोठं होतं. या नबाबाला जाऊन मिळाला गुत्तीचा मुराराव घोरपडे. कारण त्याला हवं असलेलं सेनापतीपद शाहूराजांनी दिलं नाही म्हणून तोही मराठ्यांवर नाराज होता. त्याच्यासाठी पेशव्यांना खच्ची करण्याची ही नामी संधी होती. शिवाय बाकी कर्नूल, कडाप्पा, शिरे येथले मुसलमान नबाबही भारी फौजेसह सावनूरकराला जाऊन मिळाले. आमचा नोकर मुझफ्फरखानला चाकरीतून काढून आमच्या हाती सुपुर्द करा हा नानासाहेब पेशव्याचा निरोप सावनूरकराने मानला नाही. कारण सावनूरकर नबाबाला आपली शक्ती वाढवायची होती, म्हणून त्यालाही मुझफ्फरखान हवाच होता. यावेळी सलाबतजंग पेशव्यांच्या बाजूने उभा होता.नानासाहेब पेशव्याने चतुराईने शक्ती आणि युक्तीचं राजकारण खेळून आपल्या हुशारीची चुणुक दाखवली. या सर्व नबाबांविरुध्द लढण्यासाठी त्याने नागपूरकर जानोजी भोसले, इंदूरहून मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकरांना उत्तरेतून बोलवून घेतलं. आणि सावनूरकर नबाबाएवढीच आपली फौजसंख्या वाढवली. सलाबतजंग आणि

बुसी मदतीला आल्यावर बुसीशी संधान बांधून त्याला मुराराव घोरपडेला आपल्या बाजूला वळवण्याची कामगिरी सांगितली. मुराररावाला गुत्तीची जहागीर आणि कर्नाटकाचा कारभार कबूल केला. त्यामुळे मुराररावाच्या पाठिंब्याचा जोर कमी झाला आणि सावनूरकर नबाबाची शक्ती थोडी कमी झाली. बुसी आल्यावर, मुझफ्फरखानाचा गोलंदाजी शिक्षणातला गुरूच मुझफ्फरखानाच्या विरुध्द समोर उभा रााहिल्यामुळे पेशव्याची बाजू भक्कम झाली. मुझफ्फरखानाच्या जागी यशवंतराव पानसे यांना नेमून आपल्याला मुझफ्फरखानाची गरज नाही, असा संदेश खानाला दिला, त्यामुळे आता पेशवा सर्वार्थाने सावनूरकर नबाबाशी लढायला समर्थ झाला.

मराठी फौजेने जानेवारी १७५६ मधे सावनूर किल्ल्याला वेढा घातला. दोन महिने वेढा चालला. शुक्रवार, १२ मार्चला हल्ला करुन किल्ला हस्तगत केला. मुझफ्फरखानाच्या ४ चौक्या ताब्यात घेतल्या. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सलाबतजंग आणि बुसी सावनूरला पोचल्यावर बुसीने आपली कमाल दाखवली. पहिले दिवशी ५ तासात ७०० गोळे आणि दुसरे दिवशी ५०० गोळे उडवले. त्याबरोबर किल्ल्याचा तट ढासळून पडला. पेशवे आणि त्यांची फौज थक्क झाली. सावनूरकर नबाब तहाला आला. ११ लाखांची खंडणी मान्य केली. सावनूरचा निम्मा मुलुख ताब्यात

आला. मुझफ्फरखान भेटायला आला. सावनूर मोहीम कमालीची यशस्वी झाली. बाकी ठिकाणच्या खंडण्या घेऊन पेशवा पुण्यात परतला. पेशव्यांच्या माघारे मिळालेला प्रदेश नबाबाने परत देश बळकावू नये म्हणून गोपाळराव पटवर्धन आणि मल्हारराव रास्त्यांना मागील वर्षीप्रमाणेच याही वर्षी कर्नाटकात छावणीला ठेवलं. सावनूरच्या या लढाईमुळे वोडियार राजाला आणि हैदरला मराठे हा काय शत्रू आहे याचा परिचय झाला. हे या लढाईचं मोठं गमक होय !

यानंतरची पेशव्याची कर्नाटकातली मोहीम १७५७ साली झाली.

# मैसूर आणि मराठे -१७५७ -पेशव्यांची स्वारी.

मैसूर दरबारातील नंजराजैया आणि कृष्णराज वोडियार यांच्यातील वादळी भांडणानंतर राजाने पेशव्यांची मदत मागितली होती आणि नंजराजैयाने पेशव्यांना धमकी दिली होती तरी नानासाहेब पेशवा आणि सदाशिवभाऊ, ठरल्याप्रमाणे कर्नाटक स्वारीला निघाले. यावेळी मुराररराव घोरपडे फौजेसह आणि आणि मुझफ्फरखान आपल्या तोफखान्याबरोबर होता. शहाजीराजांची जहागिरीतील म्हणजे होसकोटे, बाळापूर, कोलार ही गावे ताब्यात घेण्याचा त्याचा मनसुबा होता. नानासाहेब पेशवा आणि सदाशिवभाऊ श्रीरंगपट्टणला जाऊन दाखल झाले. पेशवा मोठी फौज घेऊन आला हे कळल्यावर नंजराजैया नरमला आणि खंडणी घेऊन मराठ्यांची फौज घालवण्याचा विचार करायला लागला. पेशव्याने करचुरी नंदराजैयाकडे ३६ लाखांची जबरदस्त खंडणी मागितली. नंजराजैयाने ही मागणी अमान्य केली आणि आकडा कमी करायला सांगितले. खंडणी वसूल होईना तेव्हा पेशव्याने श्रीरंगपट्टणास वेढा घातला आणि तोफांचा मारा चालवला. १७ दिवस तोफा चालवल्या. पण अचानक एक दिवस एक तोफगोळा श्रीरंगपट्टणातील रंगरायाच्या देवळाच्या कळसाला जाऊन भिडला

आणि कळस पडला. हा अपशकुन मानून पेशव्याने मारा थांबवला. एक तोफही फुटली आणि बरेच गोलंदाजही नाहक मेले. तेव्हा दोन्ही पक्षांकडून तडजोडीचे प्रयत्न सुरु झाले. पेशव्याने ३६ लाख खंडणी मागितली होती, ती ४ लाखाने कमी करुन ३२ लाख देण्याचं करचुरी नंजराजैया कबूल केलं. त्यासाठी त्याने नागमंडल, बेलूर, किकेरी, चिन्नरायपट्टण, कडब, होनवळ्ळी, तुरुविकिरे, चिकनायकनहळ्ळी, बाणावर, हरणहळ्ळी, केलुर, हुलिगेदुर्ग, कडूर असे सुपीक परगणे पेशव्याला वसूलासाठी दिले. ५ लाख रोख दिले. परिणामी त्या १४ महालांचं रक्कम वसुलीचं काम पेशव्यावरच येऊन पडलं. पेशव्याने या १४ महालात आपले कमावीसदार नेमले आणि त्यांच्या रक्षणासाठी 6000 HçÀçÌpç þíJçuççÇ. हा व्यवहार आटोपून पेशवा शिरे काबीज करायला गेला. शिरे ताब्यात आल्यावर त्या किल्लेदाराला थोडीशी जहागिर पोटापाण्यासाठी देऊन, पेशवा पुण्याला परतला. अशारितीने पेशव्याने शहाजीराजांच्या ५ जहागिरीतील गावांपैकी शिरे आणि सावनूर ही दोन ठाणी जिंकून आपल्या ताब्यात आणली.

पुण्याला परत येतांना पेशव्याने गोपाळराव पटवर्धन, आनंदराव रास्ते, विसाजी कृष्ण, अमृतराव, मुकुंद श्रीपती, यांना सरदार बळवंतराव मेहेंदळे यांच्या हाताखाली कर्नाटकातील वसूलीच्या कामासाठी ठेवलं. त्या पावसाळ्यात हे तिघे कर्नाटकात

छावणीसाठी राहिले. मराठ्यांची फौज निघून गेली आणि थोडीच फौज छावणीसाठी राहिलेली पाहिल्यावर कडप्पा, कर्नूल, चित्रदुर्ग, हे सगळे नबाब आणि सर्व पाळेगार हे एकत्र आले आणि ही उरलेली मराठयांची फौज पार बुडवण्याचा त्यांनी बेत केला. अर्काटच्या नबाबाने आणि मद्रासच्या इंग्रजांनी त्यांना चिथावलं. पेशवा तुमच्यापेक्षा बलवान होईल असं सांगून पेशव्यांविरूध्द या सर्वांना उठवलं. मुराराराव घोरपडेही त्यांना सामील झाले.

कडप्प्याजवळ मोठं युध्द झालं आणि त्यात कडप्पाचा नबाब मारला गेला. कारण बाकीचे कुणीच नबाब त्याच्या मदतीला मदतीला आले नाहीत. नबाब मेल्यावर त्याचा जावई मीर फैजुल्ला गादीवर आला. कडप्पा आणि कर्नूल जिंकून तिथल्या नबाबांना पेशव्यांच्या फौजांनी उखडून लावलं. नंतर सगळे बिदनूरवर गेले. बिदनूरच्या राणीने पेशव्यांना न विचारताच मुलगा दत्तक घेतला होता. तिला धडा शिकवणं भाग होतं. पण तेवढ्यात मराठ्यांना पुण्याला परतावं लागलं आणि मोहीम अर्धवट राहिली. हे सरदार निघून गेल्यावर मैसूर राज्य आणखीनच संकटात सापडलं. मराठ्यांना मोठा हिस्सा दिल्यामुळे वसूली कमी झाली. आधीच खजिना रिकामा झालेलाच होता. त्यात हे संकट आलं. त्यातच भरीला भर म्हणून फौजेने तुंबलेल्या पगारासाठी राजाच्या दारात धरणं धरलं. केवळ आर्थिक तंग परिस्थितीमुळे दलवाई बंधू आणि

राजा यांच्यामधे समेट झाला. हैदर यावेळी श्रीरंगपट्टणाला आला. त्याने नंजराजैयाला मराठ्यांना सुपीक तालुके दिल्याबद्दल दोष दिला आणि मला का बोलवून घेतलं नाहीस असा जाब विचारला. आता जो वसूल मराठे घेणार आहेत तो आपणच गोळा करू असाही सल्ला त्याने नंजराजैयाला दिला.

मराठ्यांची मोहीम यशस्वी झाली होती.

## हैदरची नायर लोकांशी पालघाट लढाई – १७५८.

इ. स. १७५८ मधे एवढ्यात एक नवीन समस्या हैदरसमोर आली. पालघाटचा राजा त्याच्याकडे मदत मागायला आला. पालघाट हे पश्चिम किनाऱ्यावरचं पर्वतराजींच्या पायथ्याशी वसलेलं एक संपन्न संस्थान. नायर लोक हे इथले रहिवासी. ही अत्यंत शूर, साहसी आणि कडवी जमात. कोचीन, कालिकत, शिकाकोल यांच्यासारखं समकालीन राज्य. पालघाटच्या ह्या राजाची आणि कालिकत आणि कोचीनच्या राजाची लढाई झाली. त्यात नायर लोकांनी कडवी झुंज दिली. पालघाटच्या मदतीसाठी हैदरने आपला मेहूणा मकदुम अली याच्या बरोबर ५ तोफा, ५००० कवायती फौज, आणि २००० घोडदळ एवढी फौज दिली आणि त्याला मलबारला पाठवलं. या दोघांनी पालघाट, कालिकत परगणे हल्ला करून लुटले. ही फौज आलेली पाहून नायर लोकांना हे मुसलमान नको होते. नायरांनी हैदरच्या फौजेशीही कडवी झुंज दिली पण शेवटी नायर लोकांनी खंडणी द्यायचं कबूल केलं. १२ लाख रुपये  खंडणी ठरली. या मधल्या काळात नायर लोकांनी देवराजैयाशी गुप्तपणे संपर्क साधला. मुसलमान माणसाला पैसे

देण्यापेक्षा हिंदू माणसाला पाठवा, आम्ही तुम्हाला त्याच्या हाती १२ लाख पाठवू असा निरोप दिला. तेव्हा देवराजैयाने हैदरला आपल्या फौजा परत बोलवायला सांगितलं. हैदरला त्याचा हुकूम पाळणं आवश्यकच होतं.

त्याने मकदूम अलीला परत बोलावलं. त्यानंतर देवराजाने आपला रजपूत जमादार हरिसिंगला मलबारला पाठवून १२ लाख रुपये आणले. हरिसिंग हा हैदरचा कट्टर प्रतिस्पर्धी. हैदरला आपले १२ लाख रुपये बुडल्याचा मनस्वी संताप आला, आणि त्याने त्याचा वचपा काढायचा निश्चय मनोमन केलाच. देवराज आणि हैदरमधे समझोता होऊन हैदरच्या फौजेचा 3 लाख रुपये खर्च हैदरला मिळाला. मग हैदर दिंडीगलला परतला. आता त्याच्या फौजांना परत काहीतरी काम हवं होतं, ते इंग्रज आणि फ्रेंचांच्या नव्याने सुरु झालेल्या लढाईमुळे मिळालं. फ्रेंच आणि इंग्रजांमधे सरळ सरळ युध्द सुरू झालं. कारण होतं ते त्रिचनापल्लीचा महंमदअली आणि मदुरेचा युसुफखान यांच्यातलं भांडण. पण याच्यात हैदरला फार भाग घेता आला नाही.

## इ. स. १७५८ -५९ .

## हैदर - नंजराजैया – कृष्णराज वोडियार.

मैसूरमधला गोंधळ संपता संपत नव्हता. इ. स. १७५८ सालात मैसूरच्या फौजेने पगार तुंबण्यावरून नंजराजैयाच्या दारात धरणं धरलं. हैदरला ही बातमी कळल्यावर त्याने देवराजैयाची सत्यमंगलला भेट घ्यायचं ठरवलं आणि आपल्या फौजेसह तो निघाला. सत्यमंगलला गेल्यावर देवराजैयाला भेटला आणि आपल्याबरोबर श्रीरंगपट्टणला यायचा आग्रह केला. दोन्ही भावांच्यात समझोता न केल्यास ते राज्याला घातक ठरेल असंही समजावलं. पण तो हलेना. तेव्हा हैदरने तोफाच सुरू केल्या. त्यामुळे नाईलाजाने मग देवराजैयाही निघाला. हरदनहळ्ळीपर्यंत सगळे एकत्र आले पण देवराजैया पुढे येईना, तेव्हा हैदर आणि खंडेराव मैसूरला पोचले. नंजराजैयाला भेडून त्याने कृष्णराज वोडियारची मागायला लावली. त्या दोघांच्या भेटीनंतर राजानेही झालं गेलं विसरून नंजराजैयाला माफ केलं. हैदरने मग देवराजैया आणि नंजराजैया यांची भेट करवून दिली. त्यामुळे त्यांच्यातील दुरावा संपला. यावेळी दरबारी, अधिकारी, सरकारी लोक उपस्थित

होते. मग देवराजैया मैसूरहून श्रीरंगपट्टणास आला. पुढच्या सहाव्या दिवशी देवराजैया जलोदराने मरण पावला.

आता फौजेने धरलेल्या धरणं आंदोलनाचा प्रश्न राहिला होता. तो नंजराजैयाने आतापर्यंत झालेल्या मनस्तापाने आणि भावाच्या मृत्यूने कंटाळून खंडेराव आणि हैदरलाच हाही प्रश्न सोडवायला सांगितला. हैदरने तेही काम झपाट्याने आणि व्यवस्थितपणे हातावेगळं केलं. तो या कामासाठी राजवाड्याच्या देवडीवरच बसायला लागला. फौजेला पगार मिळाला. हैदरने धरणं धरणाऱ्या बंडखोरांना शिक्षा तर केलीच पण त्यांची सर्व संपत्ती जप्त केली. हैदरच्या या मैसूर भेटी त्याने तीन प्रकाराने आपलं वर्चस्व मिळवलं. फौजेच्या दृष्टीने त्यांचा तारणहर्ता हैदरच होता. नंजराजैयाने हैदरमुळेच राजाची माफी मागितली या भावनेने राजाही त्याच्यावर खूष झाला आणि आपले सर्व कठीण प्रश्न सोडवले म्हणून नंजराजैयाही हैदरवर खूष झाला. हैदरचं हे मोठंच फलीत होतं. हैदरशिवाय आपलं चालत नाही अशीं सर्वांचीच समजूत होऊ लागली.

पण हैदरचे डावपेच वेगळेच होते. मैसूरमधील फौज धरणं धरून होती, तेव्हा हैदरने किल्ल्याच्या आणि मैसूरच्या सर्व दरवाज्यांवर आपली स्वत:ची फौज पहाऱ्यासाठी लावली. हैदर

श्रीरंगपट्टणात फौजेची व्यवस्था लावत असतांना त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी हरिसिंग हा त्याचवेळी मलबारहून नायर लोकांकडून १२ लाख खंडणी देवराजैयासाठी घेऊन येत असतांना जोरदार पावसाळ्यामुळे त्याने कोईम्बत्तूर जवळच्या अविनाशी गावात छावणी केली. तिथे त्याला देवराजैया मरण पावल्याची बातमी कळली. त्याचा मोठाच आधार तुटला आणि गाठ आता हैदरशी आहे हे कळल्यावर श्रीरंगपट्टणच्या लष्करात चाकरी करण्यात अर्थ नव्हता. म्हणून तो तंजावरच्या राजाच्या लष्करात नोकरी मिळवण्याची बोलणी करत होता. हैदर श्रीरंगपट्टणात होता आणि इतर शत्रूंच्या फौजाही पावसाळाभर आपापल्या राज्यात होत्या. त्यामुळे हरिसिंग आरामात छावणी करून होता.

त्याची फौजही बेसावध होती. अशावेळी अचानक त्याच्या फौजेवर हल्ला झाला. हा हल्ला होता हैदरचा सरदार मकदूमअलीचा. हैदरने मकदूमची १००० घोडदळ आणि २००० कवायती फौज अशी एक तुकडी दिंडीगल प्रकरण आवरून परतत असतांना हरिसिंगवर पाठवली होती. या मकदूमने हरिसिंगाच्या बेसावध छावणीवर अकस्मात हल्ला केला आणि छावणी उधळून लावली. छावणीत प्रचंड गोंधळ उडाला. कापाकापी सुरू झाली. आराम करणारे हरिसिंगचे सैनिक कापले गेले. मकदूमच्या फौजेचंही नुकसान झालं. माणसंही मेली. मकदूम ३०० घोडे,

१००० बंदूका आणि ३ तोफा लुटून श्रीरंगपट्टणाला आला आणि त्याने त्या हैदरला दिल्या. हैदरने “ मोठ्या मनाने ” १५ घोडे राजाच्या अश्वशाळेसाठी दिले, आणि ३ तोफा सरकारी शस्त्रागारात पाठवल्या. रजपूत जमादार हरिसिंगबरोबरचं हैदरचं शत्रुत्व जुनंच होतं. हरिसिंग हा देवराजैयाचा माणूस आणि हैदर नंजराजैयाच्या पक्षातला. देवराजैया आणि हरिसिंग दोघे हैदरच्या, वाटेल त्या मार्गाने प्रबळ होण्याच्या स्वभावावर सतत टीका करत. नंजराजैयाने हैदरला आवर घालावा या मताचे ते होते. त्यामुळे हैदर आणि हरिसिंगात कडवं शत्रुत्व होतं आणि ते कधीही लपून राहिलेलं नव्हतं. हैदरने सर्व प्रश्न हुशारीने निकाली लावले, फौजेचं धरणं उठवलं आणि राज्याची एवढी मोठी व्यवस्था लावल्यावर राजाने खूष होऊन त्याला बंगलोरचा किल्ला त्याच्या परिवारासाठी इनाम दिला.

## मराठ्यांची स्वारी इ. स. १७५९.

मैसूर दरबारातला घोळ संपतो न संपतो तोच मराठ्यांच्या फौजा कर्नाटकाकडे कूच करून निघाल्या ही बातमी मैसूर दरबारात येऊन धडकली. तिचा प्रतिकार करायला हैदरच एक आता समर्थ शिल्लक आहे याची नंजराजैयाला खात्री पटली. हे साल होतं इ. स. १७५९. दिल्लीला युध्दाचे वारे वहायला लागले. अहमदशहा अब्दाली नावाचं वादळ दिल्लीवर अंधार करून गेलं. निजामाचा उदगीरवर पराभव करून मोकळया झालेल्या फौजा, लगेच दिल्लीच्या बादशहाच्या मदतीच्या विनंतीवरुन सदाशिवभाऊंच्या हाताखाली उत्तरेची वाट चालू लागल्या. आणि पेशव्यांनी परत कर्नाटकाचा मामला हाती घेतला. त्यांनी आपल्या फौजा कर्नाटकात पाठवल्या. गोपाळराव पटवर्धन आणि रास्ते हे दुय्यम सरदारही त्यात होते. मैसूर राजाने कबूल केलेले १४ महाल ताब्यात घ्यायची ही मोहीम होती. १७५७ सालानंतर त्या प्रदेशाकडे लक्ष ध्यायला पेशव्यांना इतर मोहीमांमुळे फुरसत झाली नव्हती, ती आता पेशव्यांनी सुरू केली. रास्ते, पटवर्धन एकेक ठाणं जिंकायला लागले.मराठ्यांशी लढण्याचं काम हैदरवर आलं. नंजराजैयाने त्याला सर्व फौज दिली आणि सेनेचा मुख्य दलवाई केलं. नव्याने

आलेल्या हैदरचा जोर वाढला हे न आवडलेले दरबारातील जुने सरदार त्याला सामील न होता, घरी बसले. त्यांच्याशिवाय मराठ्यांशी झुंजायला हैदर तयार झाला. त्याने श्रीरंगपट्टण आणि बंगलोर यामधल्या वाटेवर  असलेले मदूर आणि मळवडी हे दोन किल्ले भक्कम करून दाणागोटा भरून सज्ज ठेवले. मराठ्यांच्या फौजा कर्नाटकाकडे चालायला लागल्या ही बातमी गुप्तहेरांनी आणल्यावर हैदर लगेच बंगलोरजवळ पोचला. मराठ्यांच्या फौजेने बंगलोरजवळचा चिन्नपट्टण हा किल्ला जिंकला होता, मदूर ते चिन्नपट्टण अंतर १३ मैलांचं आहे. मदूरच्या किल्लेदाराने रात्रीत प्रवास करून चिन्नपट्टण गाठलं. आणि शिड्या लावून किल्ल्यात शिरला. किल्ला लगेच हातात आला.

## सरदार पटवर्धन आणि हैदरअली

## पहिला सामना –

मराठ्यांच्या फौजा घेऊन गोपाळराव पटवर्धन यांनी अहिमंगल, कंकणहळ्ळी वगैरे ठाणी जिंकली. आणि बंगलोरला वेढा घातला. हैदरला हे कळल्याबरोबर तो बंगलोरला आला. तो त्याचा इनामाचा गाव. बंगलोर किल्ल्याच्या पूर्वेच्या तटबंदीवर तोफांचा मारा केला असता तर किल्ल्याच्या तटबंदी कोसळल्या असत्या. एका झटक्यात किल्ला ताब्यात आला असता तर नंजराजैयावर छाप बसली असती असं मुकुंद श्रीपती गोपाळरावांना सांगत होते, पण ते घडलं नाही. तेवढ्यात हैदर पोचला आणि त्याने चित्रदुर्गाच्या जंगलात आश्रय घेतला.

गोपाळराव आणि हैदरची ही पहिली आमने सामने लढाईतील भेट झाली. दोघांनाही एकमेकांचं पाणी अजून कळायचं होतं. दोघांच्यातला मोठा फरक म्हणजे गोपाळराव सरदार होते, लढाई हेच त्यांचं क्षेत्र होतं आणि हैदर लढवय्या सेनापती आणि मुरब्बी राजकारणीही होता. ही पहिली भेट नुसती ओळख होती. एक लढाई होणं म्हणजे दोन सेनापतींच्या मानसिकतेची ताकद. त्यांची शारीरिक ताकद. त्यांची स्वभावातील उणेपण त्याच्या


युध्दशस्त्रांची ताकद. त्यांच्या रणनीतीची ताकद आणि त्यांच्या स्वभावांची गुंफण. यात हैदर स्वतंत्र सेनानी तर गोपाळराव सरदार पुण्याच्या दरबारांच्या आदेशांवर अवलंबून. मराठ्यांची रणनीती म्हणजे गनिमीकावा. मोहिमेवर निघाले की की मराठे फौजेच्या लहान लहान टोळ्यांनी त्या त्या शत्रूच्या प्रदेशात पसरायचे. छोट्या छोट्या वस्त्यांमधे, खेड्यांमधे, शिरून जाळपोळ करून रयतेला धमकावून पैका गोळा करत. त्यामुळे लोक लौकर शरण येत. त्याचं ओझं सेनापतीवर पडे आणि सेनापती शरण येई.आणि हैदरची रणनीती म्हणजे हैदर शत्रूच्या परिसरातलं घोडासुध्दा शिरू शकणार नाही, असं एक जंगल जवळ करीत असे, आणि मग आपला तळ तिथे ठोके. आपला मार्ग मात्र तोफा जातील असा करुन घेई. छावणीभोवती खंदक खणून त्याच्यापुढे तोफांच्या बातेऱ्या बॅटरी बांधे. आणि मग रात्र झाली की छापे घालण्यासाठी बाहेर पडे. गस्त घालायला हिंडणाऱ्या शत्रूच्या टोळयांवर किंवा शत्रूच्या तळावर हल्ला करून वेगाने आपल्या तळावर परत फिरे. अशा शत्रूचा सामना करायला घोडासुध्दा जिथे उपयोगी नाही, तिथे तोफा तरी काय कामाच्या ? त्यामुळे शत्रूचा फडशा पडून शत्रूचं मोठं नुकसान होई. हजारो माणसंही हकनाक मरत. जंगलातून निघतांना अत्यंत गुप्तपणे आपल्या तोफा घेऊन निघे. त्या चोरवाटा, त्याचं गुप्तहेरखातं, आणि सर्व गावांचे रस्ते याची उत्कृष्ट जाण तो ठेवत

असे. त्यामुळे रात्री १२/१४ कोसांची मजल मारून छापा घालून पहाटे पसार होणारा हैदर आता मराठ्यांनाही ओळखीचा झाला.

गोपाळरावांच्याबरोबरच्या झुंजीत, चित्रदुर्गाच्या जंगलाचा आश्रय घेऊन बसलेल्या हैदरला गोपाळराव पटवर्धन त्याला पुरून उरले. हैदरचा हा स्वभाव ओळखून गोपाळराव सावध रहायला लागले आणि त्याची फौज आली की हल्ला करायला लागले. हैदरची फौजही कापली जाऊ लागली. त्यामुळे गोपाळराव बंगलोरचा वेढा उठवून निघून जातील हा भ्रम हैदरला सोडावा लागला. इतक्यात हैदरचा शह चालू असतांना गोपाळराव मागडीला मागे सरकले आणि नवीन चढाईचा बेत करायला लागले. त्याचा फायदा नंजराजैयाने घेतला. त्याने पेशव्यांचे ३२ लाख देणं साफ नाकारलं. तुमचे गोपाळराव आमच्या हैदरला घाबरून मागे सरकले असा कांगावा त्यांनी सुरु केला. हैदर आणि नंजराजैयाला पेशव्यांचं देणं बुडवायचंच होतं. हैदर आणि गोपाळराव पटवर्धन या दोघांच्यात अनेक चकमकी झाल्या. दोघांनी गनिमीकावा हेच शस्त्र वापरलं. त्यामुळे निर्णायक लढाई घडली नाही. दोन महिने सातत्याने लढाया केल्यावर काहीच निष्पन्न होत नसल्याने आणि एकमेकांना जोखल्यावर हैदरकडून तहाचा प्रस्ताव आला. नंजराजैया आणि पेशवे यांच्यात राजकारणी लढाई आणि गोपाळराव पटवर्धन आणि हैदरअलीमधे लष्करी

लढाई यातून दोन्ही पक्ष एकमेकांना तुल्यबल ठरले. बंगलोर मराठ्यांच्या हाती न पडल्याचा फायदा नंजराजैयाने घेतला आणि गोपाळरावांचं तेज ओळखून हैदरने माघार घेतली. ३ महिने मराठ्यांशी लढल्यानंतर कंटाळून हैदरने नंजराजैयाला तह करायला सांगितलं. १४ महालांच्या ऐवजी ३२ लाख नगद रूपये मराठ्यांनी घ्यायचं ठरलं. हैदरने तिथल्या तिथे १६ लाख मराठ्यांना दिले आणि उरलेले १६ लाख सावकारांकडून घेऊन दिले. सावकारांनी सर्व महालांचा वसूल आपापला उगवून घेण्याचं ठरल्यावर मराठ्यांच्या फौजा परत गेल्या. पुण्यात नानासाहेब पेशव्यांना हा तह आवडला नाही. त्यांना १४ महालच आपल्या ताब्यात हवे होते. पण महाल हाती राहिले तरी त्याची सारा वसूली ही मोठी कटकट होती. त्यात कर्नाटकातील रयत मराठ्यांना सारा वसूली करु देतील याची खात्री नव्हतीच. म्हणून नानासाहेब पेशव्यांनी गोपाळरावांच्या तहावर " हैदरने तुमचे स्वरूप नेले ” असा खोचक अभिप्राय दिला पण गोपाळरावांनी तो फेटाळून लावला आणि " हैदरसारखा कावेबाज माणूस तहावर आला हेच माझं मोठं यश ” असं पेशव्यांना कळवलं. या लढायांचं एकच तात्पर्य म्हणजे गोपाळराव आणि हैदरची एकमेकांना ओळख पटली. त्याचा परिणाम भावी लढायांमधे दिसून आला. हे दोन सेनापती हत्तीसारखे पुढील दहा वर्षे झुंजले. श्रीरंगपट्टणाला हैदर परत गेला.

श्रीरंगपट्टणच्या दरबारात, मराठ्यांशी लढून परत आलेल्या हैदरला नंजराजैयाने ' फत्ते बहादूर ' हा किताब आणि सेनेचा दलवाईही केलं. विजय मिळवून गेलेल्या हैदरच्या स्वभावामधे आता बदल झालेला होता. त्याची महत्वाकांक्षा आणखी फुलली. त्याला त्याचं तेज कळलेलं होतं.



# हैदरअली आणि गोपाळराव पटवर्धन यांची पहिली झुंज. बंगलोरची लढाई.

हैदर यशस्वी झाला तरी नंजराजैयाला मात्र हैदरने आपल्याला मानावं असंच वाटत होतं. त्यामुळे त्या दोघांच्यात धुसफुस सुरू झाली. मैसूर राजकारणात आता आणखी एका नाट्याने प्रवेश केला होता. नंजराजैयाने वोडियारचा अपमान केला होता, त्याचा डंख अजूनही राजा आणि राजमाता यांच्या मनात दुखत होता. त्यातच खंडेरावाचं प्रस्थ वाढून त्याच्या राजप्रासादातल्या फेऱ्या वाढल्या होत्या. राजमाता आणि राजाशी संवाद वाढले होते. तेव्हा या दोघांनी नंजराजैयाला कारभारातून काढावं अशी सूचना खंडेरावाला केली. त्याप्रमाणे राजमातेची आज्ञा मानून खंडेरावाने एक छान नाटक रचलं.

## नंजराजैयाचा अस्त. इ. सन १७५७-५८

मराठ्यांच्या नुकत्याच झालेल्या स्वारीमुळे मैसूरचा खजिना रिता झाला होता. त्यामुळे फौजेचा पगारही तुंबला होता. खंडेरावाने या पायावर नाटक रचलं. खंडेरावाने आपल्या विश्वासू लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन फौजेचा पगार तुंबला त्याची मागणी करायची सूचना दिली. लष्करी अधिकाऱ्यांनीही खंडेरावाने पढवलेले संवाद म्हणण्यासाठी हैदरचं घर गाठलं. तेव्हा हैदरने त्यांची समजूत काढत म्हटलं,  माझी फौज मी माझ्या पैशाने चालवतो, पण तुमचा पगार मी कसा देणार ? तुम्ही नंजराजैयाकडेजा.  तो सर्वाधिकारी आहे. तो तुमचं काम करेल. मी माझ्यावतीने नंजराजैयाशी बोलतो. तेव्हा लष्करी अधिकारी ठरवल्याप्रमाणे नंजराजैयाकडे गेले. त्याने पगार देण्याबद्दल असमर्थता दाखवली तेव्हा फौजेने परत धरणं धरण्याची धमकी नंजराजैयाला दिली. नंजराजैयाला मागच्या वेळची " फौजेने धरणं धरणे नावाची घटना आठवली. त्यावेळी फौजेने त्याच्या घरातलं पाणीही बंद केलं होतं. बाहेरून येणारा अन्नपुरवठा बंद केला होता. ते संकट आठवून नंजराजैयाने कारभारातून निवृत्त व्हायचं ठरवलं. त्याचं दुसरं कारण होतं ते म्हणजे त्याच्या विश्वासू लोकांकडून

आपल्याला कारभारातून काढण्याच्या हालचाली राजमाता आणि खंडेरावामधे सुरू झाल्यात हे कळलं होतं. आणि आता तर हैदर स्वत: फौजेला घेऊन त्याच्याकडे आलेला पाहून त्याला आपलं भविष्य स्वच्छ दिसलं. हैदरचं कारस्थान यामागे असेल याची त्याला पुरेपूर खात्री पटली. आपण आता निवृत्त होणार आहोत, असं सागून नंजराजैयाने त्यांना राजाकडे जायला सांगितलं. तेव्हा सर्व अधिकारी राजाकडे गेले आणि राजवाड्याच्या बाहेर धरणं धरून बसले.

कृष्णराज वोडीयारला हे कळल्यावर, खंडेरावाने पढवल्याप्रमाणे राजाने आपला माणूस बाहेर पाठवला आणि लष्कराच्या वतीने बोलायला खंडेरावाला आत पाठवायला सांगितलं. तेव्हा खंडेराव आत गेला आणि राजाशी बोलून बाहेर आला. त्याने फौजेसमोर राजाचं निवेदन जाहीर केलं की सर्व सत्ता राजाच्या हाती राहील, नंजराजैयाची भविष्यातील सोय लावली जाईल आणि फौजेचं देणं नंतर भागवलं जाईल. त्यासाठी हैदरनेही राजाशी प्रामाणिक राहण्याची शपथ घ्यावी. म्हणजे राजाचं समाधान होईल. हैदरने त्याप्रमाणे राजाची आज्ञा मानून आपण स्वामिनिष्ठ राहू अशी शपथ घेतली. मग कृष्णराज वोडियारने आपल्या संपत्तीतील जमिनीचा अर्धा वाटा फौजेच्या पगाराची परतफेड करण्यासाठी खंडेरावाकडे सोपवला. शिवाय हैदर दलवाई

आणि खंडेराव सर्वाधिकारी हेच आता राज्याचे मुख्य कारभारी असं घोषित केलं. हळूहळू कृष्णराज राजानेही परिस्थिती आपल्या काबूत आणली. आपल्या मंत्रीमंडळाच्या सहाय्याने कारभार आपल्या हाती घ्यायला सुरुवात केली. आणि आपणच राज्याचे अधिकारी हे सिध्द कलं.

नंजराजैयायाबरोबर त्याच्या निवृत्तीचा करार राजाने केला. २४ ऑक्टोबरला नंजराजैयाबरोबर कृष्णराज वोडियारने जे करार केले ते असे होते :- कृष्णराज राजाच मैसूरचा कारभार चालवेल. २. नंजराजैया २ लाख, चाळीस हजाराची फौज स्वत:कडे बाळगेल. त्यात ७०० घोडदळ, २००० बंदूकधारी, ५०० जेजाला, १०६ तोफा असतील. 3. मैसूर राज्याला शत्रूबरोबर लढायला जेव्हा मदत लागेल तेव्हा त्याने आपली फौज मदतीला पाठवायची. ४. नंजराजैयाला ४२००० रु. स्वखर्चासाठी मिळतील. त्यासाठी ३ लाख वसूलीचे परगणे त्याला देण्यात येतील. ५. नंजराजैयाने श्रीरंगपट्टणहून दूर जाऊन रहायचं. त्याने त्यासाठी कोन्नूरमधे वास्तव्य करायचं. ( नंजराजैयाचा ' सर्वाधिकारी ' हा किताब तसाच चालू राहिला पण तो नाममात्र राहिला. राजा वोडियार आणि कळाले घराण्यात जो करार झाला होता. त्या कराराप्रमाणे वोडियार घराण्यातील व्यक्ती सिंहासनावर बसतील आणि कळालेचं घराणं सैन्याच्या प्रमुखपदी राहतील. अशातऱ्हेने नंजराजैयाच्या सत्तेची

जून १७५९ ला समाप्ती झाली. सत्ता संपली तरी नंजराजैया श्रीरंगपट्टणाच्या बाहेर पडलाच नाही. उलट नंजनगुडला जवळच जाऊन राहिला आणि निवृत्त झाला तरी बाहेरून कारभारात ढवळाढवळ करत राहिला. तेव्हा हैदरने राजाची आज्ञा देणारं पत्र नंजराजैयाला पाठवलं आणि दूर तुझ्या गावी जाऊन रहा असा हुकूम लिहून पाठवला. तेव्हा नंजराजैया संतापला आणि हैदरला म्हणाला,

" काल आलेला एका गरीब घरातला मुलगा तू ! तुला मीच मोठं केलं. आणि आता माझ्यावरच सूड कसला घेतोस ? मी हा गाव सोडून जात नाही. तुला काय करायचं ते कर. " तेव्हा हैदर फौज घेऊन गेला त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी गेला. नंजराजैयाला वेढा घातला आणि परत बोलणी होऊन नंजराजैया कायमचा कोण्णूरला निघून गेला.

**नंजराजैयाच्या कारकीर्दीची समाप्ती म्हणजे हैदरची आणखी एक पायरी वरची.**

# मैसूरचा कारभार कृष्णराज वोडीयारच्या हाती.

cçÌmçÓj®çç kçÀçjYççj आता कृष्णराज वोडीयारच्या हाती आला आणि त्याचा दिवाण म्हणून खंडेराव कारभार पहायला लागला. ह्याच दरम्यान राजाची पहिली पत्नी म्हणजे नंदराजैयाची मुलगी मरण पावली. तिला दोन मुलगे होते. त्यांची नावं होती नंदराज आणि चामराज. आता हैदरचा प्रभाव दरबारात वाढायला लागला. लष्कर तर त्याच्या लगामी होतंच. दिंडीगल, वणिअंबाडी असे घाटाखालचे ५ लाख वसूलाचे प्रदेशही त्याच्या हाताखाली होते. त्यामुळे ज्याचा वसूल मोठा त्याची ताकद मोठी असं समीकरण झालेलं होतं. आता हैदरने राजाकडे मैसूर वेढ्यावर झालेला खर्चही मागितला. खंडेरावाने खजिन्यात पैसाच नाही असं सांगून हात वर केले मात्र कृष्णराज वोडियारचा हैदरचा त्रास वाचवण्यासाठी  नंजराजैयाच्या ताब्यात असलेले तालुके द्यावेच लागले. पण या घटनेमुळे खंडेराव हैदरच्या लोभीपणाला कंटाळला आणि दोघांच्या संबंधात बिघाड झाला. हैदर अली मिळेल त्या मार्गाने दौलत वाढवत होता हे खंडेरावाला रुचलं नाही.

## हैदरची फ्रेंचांना मदत. इ. स. १७६०

मे-जून १७६० मधे हैदर फ्रेंचांच्या मदतीला पाँडेचेरीला गेला. इंग्रज-फ्रेंच युध्दाला सुरूवात झाली होती. ही लढाई भारतीय राजांच्या बाजू घेऊन सुरू होती. आता नवीन लढा हा चंदासाहेबाचा दुसरा मुलगा रेझासाहेब आणि महंमदअली यांच्यातला होता, त्यात फ्रेंचांच्या मदतीला हैदर गेला. या लढाईला युरोपात सुरू असलेल्या या दोन्ही सत्तांमधल्या युध्दाची दूरगामी किनार होती. फ्रेंच आणि इंग्लिश या  दोघाचं युध्द आता भारतीय पटलावरही सुरू झालं होतं. या लढाईत फ्रेंच अधिकारी लॅलीचा पराभव झाला. इंग्रज आणि लॅलीमधे तह झाला. त्यात हैदरला मध्यस्थ म्हणून त्यागदुर्ग, थिरूवनामल्लइ, शंकरपुरम्, वालेकोंडपुरम्. असे परगणे जहागिरीत मिळाले. शिवाय फौजेच्या खर्चाला दरमहा २ लाख रु. मिळाले. जुलै ६० मधे हैदर मैसूरला परतला. पेशव्यांना द्यायची ३२ लाख रुपये रक्कम अजून फेडली गेली नव्हती म्हणून पेशव्याची फौज विसाजी कृष्णांच्या हाताखाली मुलुखगिरी करत होती. त्यांच्याशी हैदरच्या लहानमोठ्या चकमकी चालू होत्या. हैदरकडे विसाजीपंतांनी ४०

लाख मागितले, शेवटी घासाघीस होऊन १५ लाख ७ दिवसांमधे फेडण्याचं हैदरने कबूल केलं.

# कृष्णराज वोडीयारचा कट - खंडेरावाचा शेवट.

हैदरच्या अनुपस्थितीत श्रीरंगपट्टणात वेगळंच राजकारण शिजत होतं. हैदरच्या अरेरावीला, जाचाला कृष्णराज वोडियार आणि राजमाता कंटाळले होते. हैदरपेक्षा नंजराजैया बरा होता असं दोघांना वाटायला लागलं होतं. राजाला राज्य चालवण्याची कुवत नव्हतीच. हैदरच्या लेखी या दोघांना किंमत नव्हतीच कारण पैसा-संपत्ती या दोन्हीबाजूंनी हैदर वरचढ झालेला होता. मैसूर राज्याचा अर्धा हिस्सा या ना त्या वसूलीमुळे हैदरकडे गेला होता. त्यामुळे हैदर डोईजड झाला होता आणि कृष्णराज वोडियारला जुमानित नव्हता. त्यातच हैदरने राजाच्या आज्ञेविरूध्द फ्रेंचांच्या मदतीला जाऊन राजाचा रोष ओढवून घेतला होता. त्यामुळे राजाच्या मते हैदरला उखडून टाकायची वेळ आली होती. त्याच्या जाचातून सुटण्यासाठी कृष्णराज आणि राजमाताने खंडेरावाला हाताशी धरलं. शेवटी राजाचा हुकूम आणि नाईलाज म्हणून खंडेराव हैदरला सत्तेतून काढण्याच्या तयारीला लागला. योग्य संधीची तो वाट पहात बसला. दरबारातील इतर प्रतिष्ठित वेंकटपती, नरसिंहदास, लालादास, विरण्णा शेट्टी हेही खंडेरावाच्या बाजूने उभे राहिले. श्रीरंगपट्टणातील मराठी सावकार भिकाजीपंत हरी यांच्यामार्फत खंडेरावाने विसाजीपंत आणि गोपाळरावांशी संपर्क साधला.

ऑगस्टमधे ४००० फौज घेऊन त्यांना आपल्या मदतीला बोलावलं. पेशव्यांच्या हुकूमावरून मराठ्यांच्या फौजा तेव्हा कर्नाटकातच छावणीला होत्या. खंडेरावाने त्यांना निश्चित तारीखही कळवली होती. हैदरच्या फौजा तेव्हा फ्रेंचांशी लढण्यात गुंतल्या होत्या. हैदर स्वत: कारीगट्टावर छावणी करून बसला होता. खंडेरावाने ही संधी साधली. दिवस पावसाळ्याचे असल्याने आणि नद्या दुथडी भरुन वाहात असल्यामुळे परकीय हल्ल्याचीही शक्यता नव्हती.

खंडेरावाने ठरल्याप्रमाणे हैदरवर हल्ला केला. मराठ्यांची फौज अजून श्रीरंगपट्टणाला पोचली नव्हती तरी त्यांची वाट खंडेरावाने पाहिलीच नाही. मराठे न पोचण्याचं कारण कळू शकलं नाही. कदाचित पावसापाण्याचे दिवस असल्यामुळे मराठे कुठेतरी अडकले असावेत. अचानक २२ ऑगस्टला श्रीरंगपट्टणचा आसमंत तोफांच्या आवाजांनी दणाणला. खंडेरावाने पूर्वेकडील दार आधी आपल्या ताब्यात घेतलं. आणि मग हैदरच्या छावणीवर तोफा सुरू केल्या. काही फौज सेतूबागलू ( बागलु म्हणजे दार ) म्हणजे नदीच्या पुलावर असलेल्या दरवाज्याने त्याच्यावर हल्ला करायला पाठवली. अचानक झालेला हा हल्ला, ही तोफगोळ्यांची धडाधड आग पाहून हैदर गोंधळला. काय झालं तेच त्याला कळेना. त्याने लगेच आपली माणसं पाठवून ज्या बाजूला गोळे

पडत होते, ती बाजू पाहून यायला सागितलं. त्याच्या लोकांच्या खबरीवरून हे काम खंडेरावाचं असल्याचं त्याला कळलं. या हल्ल्यात हैदरचा फ्रेंच अधिकारी ठार झाला. कितीतरी माणसं दगावली. हे खंडेरावाचं कृत्य आहे हे कळल्यावर हैदर थक्कच झाला. त्याने त्याच्याशी बोलणी करायला लगेच आपला माणूस पाठवला. छावणीत त्याचं कुटुंब, मुलं, माणसंही होती. छावणीत घबराट, पळापळ सुरु झाली. पण आभाळ कोसळलं तरी डगमगेल तो हैदर कसला ? अचानक भयंकर परिस्थिती उद्भवली होती. त्याने परिस्थिती कशी ताब्यात आणायची याचा विचार केला. त्यात संकट म्हणजे खंडेरावाने लढाईची तयारी म्हणून सर्व नौका आपल्या ताब्यात घेतलेल्या होत्या. त्यामुळे नदी पार करून जाणंही हैदरला शक्य नव्हतं. हैदरने खंडेरावाकडे माणूस पाठवला होता तो खंडेरावाचा निरोप घेऊन आला. खंडेरावाने सांगितलं की,

" ही राजघराण्याची इच्छा आहे. मी त्यांचा सेवक म्हणून त्यांच्या आज्ञेचं पालन करतोय. त्यांना तू कारभारात नको आहेस. उद्या मराठी फौजा येतील, त्याच्या आत तू हा देश सोडून निघून जा. तुला आज संध्याकाळपर्यंत मुदत देतो. तुला मी लहानपणापासून बघितलं आहे म्हणूनच हे सांगतोय. हैदरने मग त्याच्या प्रसंगावधानी कल्पनाशक्तीला दाद द्यावी असा मार्ग शोधून काढला. छावणीवर असलेल्या सर्व लोकांना आपले वेताचे मोठे

मोठे हारे गोळा करायला सांगितलं. त्यांचा बोटीसारखा उपयोग करण्यासाठी मग ते एकमेकांना घट्ट बांधले आणि त्यात जमेल तेवढं धन भरलं. आपल्या कुटुंबकबिल्यासकट सर्वांना तळावरच ठेवून २० घोडे आणि निवडक माणसं घेऊन रात्र पडल्यावर हैदर नदी ओलांडून बाहेर पडला आणि त्याने बंगलोरचा रस्ता धरला. वाटेत हरणहळ्ळीला मुक्काम केला. तिथल्या अधिकाऱ्याने त्याला थोडी फौजेची मदत दिली. तिथे एक रात्र काढून वेगाने ६ दिवसांमधे, ऑगस्ट अखेरीला हैदर बंगलोरला पोचला. बंगलोर हे त्याचंच घर होतं. तिथे पोचल्यावर त्याने सर्व सावकारांना बोलावून त्यांच्याकडून कर्ज घेतलं आणि फौज उभी केली. एक तातडीचा खलिता पाँडेचेरीला सैद मकदूमला पाठवून त्याला बोलावून घेतलं. बारामहालातील फौजही बोलावली. शिऱ्याच्या नबाबाचा जावई मीर फैजुल्ला त्याच्याकडे चाकरीला होता, त्यालाही फौज घेऊन यायला सांगितलं. एवढं झाल्यावर तो स्वस्थ झाला आणि पुढच्या योजनेला लागला. आपल्यावर खंडेराव फौज पाठवणार हे तर त्याला स्पष्ट दिसतच होतं. हैदर निघून गेल्यावर खंडेरावाने हैदरची छावणी आपल्या ताब्यात घेतली. फौज, युध्दसामग्री, खजिना, गुरं-घोडे-बंदुका सगळं जप्त केलं. खंडेरावाने मग जाहीरनामा काढला. स्वत:ची आणि वोडियारची सही त्यावर घातली. हैदरला देशद्रोही म्हणून जाहीर केलं आणि जो कोणी हैदरला जिवंत पकडून आणेल

त्याला योग्य ते इनाम दिलं जाईल असं जाहीर केलं. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मग खंडेरावाने हैदरच्या मुलाला, म्हणजे टिपूला नजरकैदेत पण सुखरूपपणे आपल्याजवळं ठेवलं.

त्यानंतर खंडेरावाने हैदरवर जाण्यासाठी मराठ्यांच्या फौजेच्या मदतीला आपली फौज दिली. ४००० घोडदळ, ६००० शिपाई, ४० तोफा घेऊन विसाजीपंत आणि गोपाळराव आपापल्या फौजा घेऊन हैदरवर  चाल करायला बंगलोरला पोचले आणि बंगलोरला वेढा घालून बसले. हैदरने पाँडेचेरीहून फौज बोलावली हे कळल्यावर खंडेरावाने विसाजीपंतांना मीर फैजुल्लाला रोखण्यासठी बारामहालच्या बाजूला पाठवलं. फ्रेंचाशी लढायला गेलेल्या मकदूमअलीला हैदरने ताबडतोब बोलावून घेतलं. मकदूमअलीची फौज बंगलोरला हैदरकडे जाते आहे हे कळल्यावर खंडेरावाने गोपाळराव आणि विसाजीपंत बिनिवाले या दोघांना मकदूमअलीला थोपवायला सांगितलं. त्याप्रमाणे विसाजीपंत कडपनाथाच्या घाटमाथ्यावर फौजेनिशी थांबले आणि गोपाळराव मकदूमशी लढायला तळावर थांबले. मराठी फौजेशी लढत लढत मकदूमअली कसाबसा बंगलोरपासून २४ कोसांवर आला, तेव्हा तो पूर्णपणे थकून गेला होता. मराठी फौजांनी त्याचे अनंत हाल केले होते, सामानही लुटलं होतं. तो पुरता लुटला गेला होता. घाईघाईने पोचण्याच्या निकडीमुळे खूप दगदग झाली होती. त्याची अत्यंत

दयनीय अवस्था झाली होती. मकदूमची ही वाईट अवस्था पाहून मकदूमच्या मदतीला हैदरने मग कडप्पाचा नबाब मीरफैजुल्लाला पाठवलं, तर गोपाळरावांनी त्याचाही पूर्ण धुव्वा उडवला. मराठे काय आहेत याची ओळख हळूहळू हैदरला व्हायला लागली. इकडे विसाजी, फ्रेंचांकडून बोलावणं आलं तर त्यांना सामील व्हायचं आणि इंग्रजांविरूध्द लढायचं ठरवून घाटमाथ्यावर वाट पाहात बसले होते. मकदूमअलीची फौज निघून गेली होती. विसाजीपंतांना अर्काटला जाण्यात रस होता. मराठे फ्रेंचांना मदत करणार ही बातमी इंग्रजांना लागली. तेव्हा त्यांचा माणूस विसाजीपंतांशी बोलणी करायला आला. फ्रेंचांना सामील न झाल्यास इंग्रजांनी विसाजीपंतांना २० लाख रुपये हप्त्याहप्त्याने देण्याचं मान्य केलं. विसाजीपंतांनी ते कबूल केलं आणि पहिला हप्ता घेऊन विसाजीपंत घाईघाईने पुण्याला निघून गेले.

मराठ्यांनी केलेली मकदूमची आणि मीर फैजुल्लाची दैना पाहून हैदरने मराठ्यांचं पाणी ओळखलं आणि आपली चाल बदलली. बंगलोरमधे लढत बसण्यात त्याला रस नव्हता. त्याला गाठायचं होतं श्रीरंगपट्टण. पेशव्यांशी त्याने संपर्क साधून गेल्या काही महिन्यांपासून ज्या वाटाघाटी चालल्या होत्या आणि आणि रकमेवरून १२ प्रांतांचा मुलुख आणि ३ लाख देण्यावरून दोन्ही दरबारांची घासाघीस चालू होती हैदरने समयसूचकतेने तो मुद्दा परत

काढला आणि पेशव्यांनी लगेच त्याला होकार दिला. म्हणून ३ लाख घेऊन गोपाळराव पटवर्धन पुण्याला परत जायला तयार झाले. हैदरने तह कबूल करुन आपल्या छातीवरचं गोपाळरावांचं ओझं दूर केलं आणि मोकळा श्वास घेतला. आता तो आपल्या राज्यातल्या पुढच्या रणनीतीला मोकळा झाला. पेशव्यांची ताबडतोब, अत्यंत त्वरेने पुण्याला पोचण्याची विसाजीपंतांना सूचना होती, आणि ही बातमी गुप्त ठेवण्याचाही निरोप होता, त्यामुळे विसाजीपंतांनी हैदरशी तह केला. आणि मागण्या पदरात पाडून मगच बंगलोर सोडलं. हैदरचे ग्रह फार उच्च होते म्हणूनच त्याला दैवाची साथ मिळाली. कारण पुण्यात दरबाराला हादरवणारी घटना घडली होती.

अचानक मराठी फौजांनी पुण्याला परत जाण्याने खंडेरावाची बाजू लंगडी झाली. मराठी फौजा अचानक जाण्यामागे पुण्यात कारणही तसंच धक्कादायक घडलं होतं. पानिपतावर अहंमदशहा अब्दालीशी लढायला गेलेल्या सदाशीवराव भाऊंच्या अपिमित हानीच्या बातम्या पुण्याला पोचायला लागल्या होत्या. पेशवे स्वत: उत्तरेत भाऊंच्या मदतीला निघाले होते. विसाजीपंत आणि गोपाळरावांनी ही पराभवाची बातमी गुप्त ठेवली होती. त्यामुळे खंडेरावाला पानिपतची हकीकत कळेपर्यंत मराठ्यांच्या वागण्याचं कोडं उलगडलं नव्हतं मराठ्यांच्या फौजा निघून गेल्यावर हैदर

मोकळा झाला आणि त्याने बंगलोर किल्ला इब्राहिम साहेब नावाच्या आपल्या विश्वासू सरदाराकडे देऊन स्वत: गेजलहट्टी खिंडीत जाऊन राहिला. फौजेची एक तुकडी त्याने घाटाखाली सत्यमंगलकडे पाठवली. खंडेरावाने मग आपलं लक्ष हैदरकडे वळवलं आणि गेजलहट्टीजवळ परत मैसूर आणि हैदरमधे लढाई होऊन परत हैदरचा पराभव झाला. हैदरने आता फ्रेंचांच्या मदतीला पाँडेचेरीला जायचं ठरवलं. इंग्रज-फ्रेंचांचं युध्द चालूच होतं. इंग्रजांनी पाँडेचेरीला वेढा घातलेला होताच. हैदरने फ्रेंचांना मदत करायची मग फ्रेंचांनी हैदरला मदत करायची असा करार ठरला. तिकडे मैसूरमधे खंडेराव आणि कृष्णराजाचेही इंग्रजांना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न चालू झाले. फ्रेंचांच्या विरूध्द इंग्रजांना आपली फौज द्यायची आणि इंग्रजांची फौज हैदरविरूध्द घ्यायची ही बोलणी करायला मैसूर दरबारातून एक वकील मद्रासला खलिता घेऊन गेला. पण बोलण्याचं गुऱ्हाळ लांबण्यापलिकडे इंग्रजांकडून खंडेरावाला काहीही मदत आली नाही. या मधल्या काळात हैदरने एक सुंदर कपट नाटक वठवलं. हैदर स्वत:वर ओढवलेल्या या चक्रव्यूहातून मार्ग काढायचा सतत विचार करत होता. आणि त्याला एक जबरदस्त युक्ती सुचली. हैदरच्या अफाट बुद्धीमत्तेची ती कमाल होती.

## हैदरचं नाटक -

१७६१ सालच्या डिसेंबरचा महिना. स्व-रचित नाटकाचा तो एकपात्री यशस्वी प्रयोगच झाला. ते नाटक म्हणजे या अंधारमय संकटकाळात हैदरला आठवला तो नंजराजैया. नंजराजैया निवृत्त होऊन रिकामा बसलेला होता. हैदरच्या नशिबाला भाग्याची ही मोठीच साथ होती. मराठे निघून गेले तरी खंडेराव अजून लढत होता. तोही चाणाक्षच होता. शूर तर होताच. हैदरला समोर आणून लढवण्यात त्याला रस होता, कारण हैदरला त्याच्या लहानपणापासून खंडेराव पहात होता. पण हैदरचे ग्रह फार उच्च स्थानावर असावेत, म्हणूनच फ्रेंचांची एक तुकडी अचानक चाकरीसाठी हैदरला येऊन मिळाली. त्याचं झालं असं की रेजासाहेब विरुध्द महंमद अली म्हणजेच इंग्रज विरुध्द फ्रेंच यांचा सामना संपला. इंग्रजांचा जय झाला. पाँडेचेरी पडलं आणि युध्द संपल्यामुळे फ्रेंचाची रिकामी झालेली लष्करी टोळी कामाच्या शोधात हैदरकडे आली. या अचानक लाभाने हैदरची ताकद प्रचंड वाढली. त्याला नियतीच्या या अनपेक्षित दानाचा परमानंद झाला, पण अजून खंडेरावाच्या सैन्यापुढे हैदरच्या सैन्याची संख्या कमीच होती. त्यावर उपाय म्हणून हैदरने एक विलक्षण खेळी केली त्याला

तोड नाही. एका रात्री हैदर निवडक लोक बरोबर घेऊन अचानक छावणीबाहेर पडला. आणि त्याने सरळ रस्ता धरला तो नंजराजैयाच्या कोण्णूरच्या घराचा. नंजराजैया त्याला पाहून चकितच झाला. हैदरने नंजराजैयाचे पाय धरले. आपण कसे फसलो, खंडेरावाच्या हुशारीला भुललो, त्याने आपल्याला कसं नागवलं, आपली छावणी लुटली, मुलाला नजरकैदेत ठेवलं, आपल्याला कसं नागवलं, या साऱ्या महान संकटांचा पाढा नंजराजैयासमोर वाचला. आणि मग तुम्ही कसे हुशार, तुम्हाला मी ओळखलं नाही, तुम्हाला कसा त्रास दिला, तेही खंडेरावानेच कसं आपलं मन कलुषित केलं होतं, असे सांगून त्याचे अपराधी भरलेले, शरमलेले संवाद म्हणून नंजराजाच्या मदतीची भीक मागितली. डोळ्यातून पाणी काढायचं तेवढं बाकी ठेवलं होतं. नंजराजैयाला त्याचं नाटक पूर्णपणे खरं वाटलं, इतका लाजवाब अभिनय हैदरने केला. करचुरी नंजराजैया  फसला.  दोघांनी बसून विचार केला आणि त्यावर पुढच्या खेळीची आखणी केली. मी अजून मैसूर दरबारचा सर्वाधिकारी आहे असे जाहीरनामे नंजराजैयाने सगळीकडे लावले. त्याने आपली फौज हैदरला दिली. इतकंच नव्हे तर हैदरला दलवाई हा हुद्दाही दिला. नंजराजैय्याने आपल्या नावाने पत्र लिहून मग आपल्या जुन्या सरदारांना मदतीला बोलावलं. खंडेराव कसा दुष्ट आहे, फसवणारा आहे याचा गवगवा

केला. त्यामुळे ते जुने सरदार आपापली फौज घेऊन आले. अशारीतीने हैदरकडे मोठी फौज जमली. नंजराजैयाचाही मनातल्या मनात मैसूरवर जाऊन सत्ता हातात घेण्याचा डाव होताच. त्याला ही अचानक संधी घरबसल्या आली होती नंजराजैयाच्या या वागण्यानंतर त्यावरची कडी हैदरने केली. बिलंदर, चाणाक्ष हैदरने या भेटीचाही कल्पनेपेक्षा जास्त उपयोग करून घेतला. त्याने श्रीरंगपट्टणला पोचायच्या आधी नंजराजैयाच्या शिक्क्याचे काही कोरे कागद आपल्याजवळ ठेवले. त्यावर बनावट सहीने नंजराजैयाच्या नावाने खंडेरावाच्या सैन्यातील अधिकाऱ्यांच्या नावे खोटी पत्रे लिहिली. खंडेरावाच्या फौजेत पत्रं पोचतील याची काळजी घेऊन सर्व अधिकाऱ्यांना उद्देशून पत्रं लिहिली.


यात मजकूर होता..' खंडेरावाला पकडून आमच्या हवाली करावं जो करेल त्याला घसघशीत बक्षीस मिळेल. सर्व तयारी झालेली आहे. खंडेरावाला आणा आणि बक्षीस घेऊन जा ही पत्रं खंडेरावाच्या अधिकाऱ्यांच्या हाती पडली. त्यातील काही पत्रं खंडेरावाला दाखवायला त्याचे अधिकारी खंडेरावाकडे गेले. खंडेरावाने पत्रं वाचली. शिक्का तर खराच होता. नंजराजैया हैदरला मिळाल्याची बातमीही आलेलीच होती. खंडेराव घाबरला. आता हैदर आपली काय अवस्था करेल हे त्याच्या समोर स्वच्छपणे दिसायला लागलं. आजवरच्या शत्रूंची जी अवस्था तीच

आता आपली हे त्याला कळलं. आणि पत्रावरच्या मजकूरावर विश्वास ठेवून एकटाच घोड्यावर बसून पसार झाला. आणि राजधानीत जाऊन राहिला. हैदर थाटात आला. त्याने खंडेरावाची छावणी, खजिना, दौलत सारं जप्त केलं. खंडेरावाची विश्वासातील फौज पळून गेली आणि कावेरीच्या उत्तर तीरावर जाऊन संघटित होऊन राहिली. खंडेरावाची इनाम मिळालेली जमीनही हैदरने जप्त केली. हैदरला आता नंजराजैयाची गरज संपली होती. हैदरने नंदराजैयाच्या फौजेला परत पाठवून दिलं.

हैदरही राजधानीत न जाता छावणीत राहिला. खूप दिवस त्याने काहीही हालचाल केली नाही. रोज सैन्याच्या कवायती घेत राहिला. असे काही दिवस गेले. सगळीकडची बातमी राखत राहिला. अशातच खंडेरावाची फौज कावेरीच्या उत्तर तीरावर परत संघटित झाली होती ही बातमी हैदरला कळली. हैदर विश्रांती घेत आहे हे  समजल्यामुळे सगळेच बेसावध राहिले. हैदरने त्याचा फायदा घेतला. कावेबाज हैदर खंडेरावाच्या त्या फौजेवर अचानक झडप घालून तुटून पडला. मोठी कत्तल झाली. मोठी लूटही मिळाली. ७०० घोडे हैदरने आपल्या तळावर आणले. मग हैदर खंडेरावाची सगळी ठाणी जिंकत चालला. खंडेरावाची सर्व शक्ती संपली. फौजही गेली, दौलतही गेली.  आता राजधानीवर हल्ला करून खंडेरावाला ताब्यात घेण्याच्या योजनेला हैदरने सुरुवात

केली. राजधानीवर हल्ला करण्याआधी हैदरने कृष्णराज वोडियारला निरोप पाठवला. " खंडेराव हा माझा नोकर आहे, त्याला माझ्या स्वाधीन करा. माझं कोटी रुपयांचं सरकारने देणं आहे ते परत करा. मग मी तुमच्या चाकरीत राहीन किंवा परराज्यात कुठेही पोट भरायला निघून जाईन. " कृष्णदेवराय राजाला दुसरा पर्यायच नव्हता. खंडेरावाला हैदरच्या स्वाधीन करणंच भाग होतं. २० जून १७६१. या दिवशी खंडेराव हैदरला शरण आला. कारण वाघ म्हटलं तरी खाणार आणि वाघोबा म्हटलं तरी खाणारच अशीच अवस्था होती. खंडेरावाला तुझ्या हाती देणार नाही म्हटलं असतं तर हैदर श्रीरंगपट्टणावर चालून आला असता आणि राजधानी विस्कटून गेली असती. हैदर बाहेरच्या कोणत्याही राज्यात पोट भरायला जाणार नाही हेहीसुध्दा प्रकाशाएवढं स्वच्छ होतं. कृष्णराज वोडियारने हैदरला राजधानीत घेतलं. हैदरने खंडेरावाला अटक केली. त्याच्यासाठी पोपटाच्या पिंजऱ्यासारखा एक कैदखाना तयार करून घेतला आणि खंडेरावाला त्यात ठेवलं. पोपटासारखीच तुझी अवस्था करीन असं खंडेरावाला सांगून हैदरने त्याला शेवटपर्यंत दूधभातावर कैदेत ठेवलं. राजाही नाममात्रच राहिला. त्याचे सर्व अधिकार हैदरने काढून घेतले. खंडेरावाचा तिथेच कैदेत मृत्यू झाला.

दलवाई देवराजैया दुखण्यात गेला. सर्वाधिकारी असलेला पहिला नंजराजैयाही आजारपणातच वारला होता. मरण्यापूर्वी महाराणीला भेटायला गेलेला असतांना त्याने महाराणीला एक सल्ला दिला होता. बंगलोरला हैदरअली नावाचा एक ५० स्वारांचा नाईक आहे, त्याला जवळ येऊ देऊ नका. महाराणीला आज हा सल्ला आठवला.. आता तर देवराजैय्याचा धाकटा भाऊ करचुरी नंजराजैय्याही हैदरअलीनेच संपवला आणि खंडेरावही हैदराच्या कैदेत पडला. ठकाला ठक भेटले होते. सर्व प्रतिस्पर्ध्यांना आपल्या चलाख, कावेबाज, धूर्त, हिकमती बुद्धीने हैदरअलीने संपवलं होतं. सत्ता मिळवणं हीच राजकारण्याची परीक्षा आणि ती टिकवणं हे प्रगतीपुस्तक. ३ जुलै १७६१ या दिवशी हैदरअलीच्या हातात श्रीरंगपट्टणचा किल्ला आला. आपला मेहुणा  सय्यद मुकद्दमला हैदरअलीने किल्लेदार नेमलं. एक मामुली नाईक आपल्या अफाट राजनीतीच्या चलाखीत सत्ता बळकावून बसला होता. कृष्णराज वोडीयार हात चोळत बसला. मैसूरचा सत्ताप्रवाह आता एका मुसलमानाच्या हातात गेला. सत्तेला एक नवीनच वळण मिळालं. नियतीचीच, हैदर सर्वेसर्वा झाला.




हैदरच्या आयुष्याचा प्रवास....बुध्दिकोटे – पहिली चाकरी देवनहळ्ली – बंगलोरची जागिर मिळाली – श्रीरंगपट्टण अभ्युदय काळ.

## मराठे आणि हिंदुस्थान.

अहमदशहा अब्दाली इ. स. १७५७ साली दिल्लीवर आला होता त्याने दिल्लीबरोबरच मथुरा, अमृतसर लुटून तो दोन महिन्यांनी निघून गेला होता.. राघोबादादा अटकेपार जाऊन अब्दालीला परतवून आले. अब्दालीमुळे दिल्लीच्या बादशहाला तारणहार म्हणून आठवले ते फक्त मराठेच. त्यामुळे उत्तरेतील अहमदशहा अब्दालीची स्वारी, नजिबखान नावाचा दिल्लीला संपवायला निघालेला नवीन खलनायक, दिल्लीचं प्रकरण, पानिपत या सर्व घोंघावत्या राजकीय वादळात पुणे दरबार पार वहावत गेला. शिंदे, होळकर, राघोबादादा सगळे उत्तरेत गेले. या उत्तरतील लढाईमधे दत्ताजी शिंदेंची बुरारी घाटावरच्या लढाईत आहुती पडली. अशा अनंत गुंतागुंतीच्या लढायांमधे १७६० साल उजाडलं. अब्दाली परत हिंदुस्थान लुटायला सीमेवर आला होता. दोन्हीकडच्या फौजांचा तळ पानिपतावर नोव्हेंबरमधे पडला. इ. स. १७६१ च्या १४ जानेवारीला घडलं पानिपताचं दु:खद सत्य. ' दो मोती गलत, दसबीस अश्रफियाँ, रुपयोंकी तो गिनती नहीं ' सदाशिवभाऊंच्या मदतीला भेलशाला पोचलेल्या नानासाहेब पेशव्यांना सावकारी भाषेत लिहिलेला हा सांकेतिक निरोप भेलसे इथे मिळाला. आणि हाहा:कार माजला. दो मोती म्हणजे

विश्वासराव आणि सदाशिवभाऊ, दसबीस अश्रफियाँ म्हणज जनकोजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे, मस्तानी पुत्र समशेर बहाद्दर, असे काही सरदार, आणि रुपये म्हणजे बायका, मुलं, पुरुष, असे ५००० लोक आपल्याकडचे आणि तेवढेच अब्दाला कडचे.

१४ जानेवारीतल्या पानिपतानंतर, मन:स्वास्थ्य हरपलेल्या नानासाहेब पेशव्यांचाही ६ महिन्यात, जून २३ ला, पुण्यात पर्वतीवर कैलासवास झाला. पुणे दरबारचं राजकारणच बदललं. संकटाच्या आवर्तात सापडलेल्या मराठ्यांना परत स्थिरस्थावर व्हायला वेळ लागला. पेशवेपदावर माधवराव पेशवे आले तेव्हा अवघे सोळा वर्षाचे होते. पेशवेपदाचा काटेरी मुगुट मस्तकावर होताच कारण पेशवेपदाला आव्हान देणारी व्यक्ती घरातच होती. राघोबादादांची पेशवेपद भोगण्याची सुप्त आस लपून न राहिल्यामुळे, माधवरावांना हा निखारा स्वत:लाच सांभाळावा लागला. सरदारीत स्थिरावलेले प्रतिष्ठित दरबारीही सोळा वर्षाच्या मुलाला काय कळतंय ह्याच भ्रमात होते. या साऱ्यांवर माधवरावांना वचक बसवायचा होता. पानिपतनंतरच्या पराभवानंतर आर्थिक घडीही लावायची होती. मैसूरमधे हैदरअली, आणि पुण्यात माधवराव पेशवे ही नवीन जोडी सन १७६१ मधे राजकारणात उतरली.

# कसा होता हैदरअली.-

मैसूरच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. kç=À<Cçjçpçç वोडीयारचीची अवस्था मात्र आगीतून फुफाट्यात अशीच झाली. त्याला स्वत:ची कुवत नव्हतीच. आधी देवराजैया-नंदराजैयाच्या हातातलं बाहुलं, आता तो हैदरच्या हातचं खेळणं झाला एवढंच. दक्षिणेतल्या राजकारणालाही त्यानंतर खूपच वेगळं वळण लागलं. इंग्रज, मराठे, निजाम आणि हैदर यांच्यात बदलत्या आघाड्या, सारखे संघर्ष, माघार, तह, आणि बदलती समीकरणे आणि बदलते रंग, यांचा मोठा धुरळा उडायला लागला. हैदर या प्रत्येकाशी कधी एकटा तर कधी युती करून लढत होता. त्याच्या अंगभूत गुणांमुळे त्याच्या सर्वंकष उत्कर्षाला धुमारे फुटायला लागले आणि एक अजोड राजकारणी म्हणून राजकीय क्षितीजावर चमकणारा तारा म्हणून त्याचा ठसा उमटायला लागला. वयाच्या अवघ्या विशीच्या जवळपास सैन्यात चाकरीला लागलेला नाईक पदावरून वर चढत गेलेला हैदर चाळिसाव्या वर्षापर्यंत मैसूरचा सर्वेसर्वा झाला.

मध्यम उंचीचा, रापलेल्या वर्णाचा हैदर, शरीराने बळकट होता. खालचा ओठ जाड, डोळे बारीक, नाक मोठं आणि अपुरं

आणि वरच्या बाजूला वळलेलं. असा त्याचा चेहरा होता. मुसलमान असूनही त्याने कल्ले आणि दाढी राखली नव्हती.

हैदर म्हणजे उर्जेचा एक प्रचंड स्रोत होता. कित्येक तास तो न थकता कामात व्यग्र असे. एकही क्षण वाया जाऊ देत नसे. महत्वाकांक्षी तर होताच होता. सतत कोणत्या ना कोणत्या मुलुखगिरीत तो दंग असायचा. त्याला थकवा ही गोष्ट माहीतच नव्हती. प्रत्येक मोहीमेवर तो स्वत: हजर असे. कर्तबगार मुत्सद्दी होता. गनिमीकावा, धूर्तपणा, धाडस, प्रसंगावधान, कृतघ्नपणा, कुटील कारस्थान, कपटनीती, कावेबाजपणा, कठोर शिक्षा, दरारा, अष्टावधानी, ह्या सर्व गुणांचा युध्दाच्या वेळी योग्य असेल तसा वापर करून विजय जिंकून आणत असे. तलवारबाजीत तो पारंगत होता, नेमबाजीत अव्वल होता. कोणत्याही कठीण संकटात थंड डोक्याने विचार करून मार्ग काढणारा होता. तो उपजत योध्दा होता. सैनिकांना सतत प्रोत्साहन देणारा होता. सेनेला पगार कमी देत असे, तरी सतत मुलुखगिरीत व्यग्र असलेल्या हैदरबरोबर सेना खूष असे, कारण त्यांना भरपूर लूट मिळे. चांगलं काम करणाऱ्या शिपायाला लगेच बक्षीस मिळे आणि कुणी जर बदमाषी केली तर कठोर शिक्षाही भोगावी लागत असे. घोडदळावर तो जास्त निर्भर होता, आणि त्यांच्याकडून तो जास्तीत जास्त काम करून घेत असे. योध्दा म्हणून तो अशा नानाविध उत्तम गुणांनी संपन्न होता. यशाची

शिडी चढतांना स्त्री-संतती-संपत्ती-सत्ता हे भल्याभल्या राजकारण्यांना घसरवणारे चार मार्ग हैदरपासून चार हात लांबच होते. भावनेच्या भरात तो कधीही वाहवला गेला नाही.

शत्रू अंगावर आला की त्याचे हाल करण्यासाठी आणि त्याला परतवून लावण्यासाठी तो स्वत:च्या प्रदेशाची होळी करण्यासही मागेपुढे पाहात नसे. अशावेळी तो त्याच्या रयतेचं भलं पहात नसे, रयत मग गाव सोडून निघून जात असे. शत्रूचे हाल करण्यासाठी विहिरींमधे निवडुंग घालून विष घालून त्या पिण्यालायक न करतांना त्याची प्रजाही होरपळली जात असे. पण शत्रूला पळवून लावणे हा एकच ध्यास त्याच्यासमोर असे. तो सगळा प्रदेश जाळून ओसाड करून टाकत असे. हैदर स्वत: पूर्णपणे निरक्षर होता, पण राज्याच्या अर्थखात्याच्या जमाखर्चाचे सर्व आकडे त्याच्या डोक्यात असत. त्याची आकडेमोड तो इतक्या चटकन करत असे की तो निरक्षर आहे यावर कुणाचाही विश्वास बसला नसता. त्याला त्याच्या देशातल्या सर्व भाषा उत्तमपणे अवगत होत्या. त्याला फ्रेंच आणि इंग्लीश भाषाही कळत असे. त्याची तीव्र स्मरणशक्ती थक्क करणारी होती. एकदा पाहिलेली माणसं तो कधीही विसरत नसे. माणसं लक्षात ठेवण्याची त्याची ही बौध्दिक शक्तीही विलक्षण होती. त्याची स्मरणशक्ती एवढी तीव्र होती की एकदा त्याने त्याच्या खिदमतगाराला त्याच्या पागेमधे ११ वर्षांपूर्वी ठेवलेल खोगीर

आणायला सांगितलं. हैदरने त्याला ११ वर्षांपूर्वी, पिवळ्या कापडात गुंडाळून ठेवलेलं, मराठा सैनिक वापरतात ते खोगीर, असं वर्णन सागितलं आणि खिदमतगाराला ते मिळालं. सकाळी हैदरच्या मुखमार्जनाच्या वेळी राज्यातले सर्व अधिकारी आणि राज्यातले गुप्तहेर त्याच्याभोवती गोळा झालेले असत. एकाच वेळी तो, भेटायला आलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या प्रश्नांना तिथल्या तिथे उत्तर देत असे. त्याच वेळी तो बाहेरून आलेल्या पत्रांवर लेखनिकाला उत्तर देत असे, तर दुसरीकडे दुसऱ्याच्या अडचणीला मार्ग सुचवत असे, तिसऱ्या माणसाला महत्वाच्या दस्तऐवजाचा मजकूर सांगतांना प्रत्येक शब्द तोलून मापून वापरत असे. शत्रूच्या हालचाली सांगायला आलेल्या लष्करी अधिकाऱ्यांनाही तेव्हाच विविध सूचना देत असे. क्षणभरही त्याचं मन विविध प्रश्नची उकल करत असतांना विचलित होत नसे. गुप्तहेर राज्यातल्या बातम्या देत असतांना तो लगेच सामान्य आणि विशेष असा त्यांचा निवाडा करून टाकत असे. आणि सामान्य बातम्या ऐकतांना गप्प राहात असे पण त्या ओघात जर त्याला एखादी बातमी विशेष वाटली तर लगेच तो सावध होऊन त्या बातमीवर आपलं लक्ष केंद्रित करून त्याचा सखोल परामर्ष घेत असे. अशावेळी इतर जमलेल्या अधिकाऱ्यांना गप्प करत असे. राज्याचे सर्व व्यवहार त्याच्या नजरेखालून रोजच्या रोज जात असत. तीक्ष्ण बुध्दीचं त्याला

वरदान होतं. सरकारी कागदांवर सर्व मजकूर लिहून झाल्यावर त्याची स्वत:ची सही असे. त्यासाठी तो दोनदा ' ह ' शब्द अरेबिक भाषेत लिहित असे. सर्वसाधारणपणे त्याकाळी राजाच्या अंगठीतल्या शिक्क्याचा वापर होत असे, आणि ती अंगठी राजा कधीही काढत नसे. पण हैदर सही करत असे.

अघळपघळ बोलणारी माणसं त्याला आवडत नसत. पण सतत राजधानीच्या बाहेर असलेल्या हैदरला राज्यकारभारासाठी आपल्या अधिकाऱ्यांवर विसंबून राहावं लागत असे. खंडेरावाच्या अनुभवामुळे ब्राह्मणांच्या बाबतीत त्याचा विश्वास डळमळीत झाला होता, पण ब्राह्मणांच्या हुशारीचीही त्याला जाणीव असल्यामुळे तो आपल्या कामात त्यांचीही मदत घेत असे. त्याच्याकडे शेकडो मराठी ब्राह्मण कामाला होते. गनिमी कावा शिकण्यासाठी मराठी लोकांची फौजेत मोठी भरती होती. फ्रेंचांशी त्याची गाढ मैत्री होती. आणि इंग्रजांचा कावेबाजपणा त्याने अभ्यासाने आत्मसात केला होता. अर्काटचा नबाब महंमदअलीशी मात्र त्याचं अगदी वैर होतं. तो लबाड आहे असं त्याचं म्हणणं होतं. इंग्रजांशी लढतांना तो गनिमीकाव्याचा उपयोग करत असे आणि मराठ्यांशी लढतांना तोफांचा वापर करीत असे. या दोन्ही शत्रूंकडून त्याने त्यांच्या विद्या आत्मसात केल्या होत्या. कोणताही निर्णय घेतांना भावनेच्या भरात तो कधीही वाहात जात नसे. अत्यंत थंड

डोक्याने तो निर्णय घेऊन पाऊल टाके. हैदरच्या राजवाड्याच्या बाहेर मोठं पटांगण होतं. राजवाड्याच्या दोन्ही बाजूंनी लष्करी आणि सरकारी कामकाजांच्या इमारती होत्या. तिथे लोकांची सतत वर्दळ चालत असे. कर्मचाऱ्यांचीही  ये जा चालत असे. हैदर आपल्या सज्जातून त्यावर लक्ष ठेवत असे. तो कठोर झाला तर शिक्षा देतांना फटक्यांचा मार देऊन गुन्हेगाराला झोडपून काढतांना त्याला सर्वांनीच पाहिलेलं होतं. त्या भव्य पटांगणात २०० चाबूकधारी कायम उभे असत. हैदरची चाबकांच्या फटक्यांची शिक्षा कुणाला ना कुणाला रोजच खावी लागे. आणि गंमत म्हणजे फटके खाल्लेले हे लोक, अंगावर वळ घेऊनच आपआपल्या कामाला लागायचे. जवळजवळ रोजच हा प्रसंग दरबारात घडत असे. त्यातून त्याचा मुलगा टिपूही सुटत नसे. खाजगीत जर हा फटक्यांचा मारा चालू असेल, तर त्याच्याबरोबर अत्यंत शेलक्या शिव्यांचाही मार चालू असे. अगदी जिवलग माणसालाही अर्वाच्य शिव्या घालायला तो मागेपुढे पहात नसे. हैदरबद्दल लोकांच्या मनात कायम भीती असे. कारण त्याचे गुप्तहेर सगळीकडे पसरलेले असत. त्यामुळे कुणीही मोकळेपणाने बोलत नसे. पण आपल्या जनतेच्या धार्मिक बाबतीत मात्र तो उदार होता. त्यांच्या धार्मिक भावनांचा तो आदर करत असे. प्रजेला केव्हाही भेटायची मुभा होती. त्यामुळे रयतेवर त्याचा धाकही होता, दराराही होता, आणि

रयतेचं त्याच्यावर  प्रेमही होतं. ख्रिश्चन लोकांशी त्याची चांगली मैत्री होती. त्याच्या आज्ञेत राहिलं, त्याच्याशी प्रतारणा केली नाही की झालं. त्याच्या विजयानंतर सर्व धर्मांच्या प्रार्थनास्थळांमधून तो घंटानाद करवत असे.

वोडियार घराण्याला निर्माल्यवत् केल्यावर जेव्हा हैदर मैसूरचा सत्ताधीश झाला तेव्हा त्याने आपल्या कारभाराची नीट व्यवस्था लावली. आपली सारी ठाणी, परगणे, दौलत, यांच्या व्यवस्थेसाठी आपलं मंत्रीमंडळ स्थापन केलं. राज्याचा खजिना भरायचे त्याचे मार्गही त्यानेच विधीनिषेध नसलेले असेच ठरवले. राज्याचे सेनाधिकारी, किल्लेदार, मंत्री हे सर्व त्याच्या नात्यातलेच होते. सख्खे भाऊ, बायकोचे भाऊ, बहिणींचे नवरे, मेहुणे, चुलत भाऊ, अशानांच महत्वाच्या जागी नेमलं होतं जे त्याच्या विश्वासातले होते. मीर महंमद सादिकला त्याने अर्थमंत्री केलं होतं. शामय्या नावाच्या विश्वासू अधिकाऱ्याला त्याने पोलिसखातं दिलं. त्याला गुन्हेगारी रोखण्याचे अधिकार तर दिलेच, पण श्रीमंतांना शोधून त्यांच्याकडून मनाला येईल ती खंडणी उकळण्याचेही अधिकार दिले. पैसा उकळण्यासाठी चाबकाने बदडून काढण्याचे स्वैर अधिकार शामय्याला होते. वसूली अधिकाऱ्यांनी अफरातफरीने आणि लबाडीने गोळा केलेली संपत्ती त्यांच्याकडून हिरावून घ्यायला कोणताही लबाडीचा मार्ग त्याच्यासाठी खुला होता.

सावकारांकडून दडपशाहीने खंडणी उकळण्याचंही त्याला स्वातंत्र्य होतं. जो दुसऱ्याला लुटणार त्याला हैदर लुटणार हाच खाक्या होता.

आपल्या लष्करातल्या सैनिकांनाही त्याने पैसा गोळा करण्यासाठी सोडलं नाही. लष्कराला एक वर्षाचा पगार न देता १० महिन्यांचा पगार देई. त्याला ' दसमाही ' नाव होतं. प्रत्येक सैनिकाला जो पगार दिला जाई त्याला पट्टी म्हणत. हैदरच्या फौजेत, हिंदू-मुसलमान दोन्ही धर्माचे लोक होते. मुसलमानांचं चांद्र वर्ष असलं तरी हिंदू लोकांसारखा अधिक मास पाळला जात नाही. त्यामुळे त्या तेराव्या महिन्याचा पगार देण्यात गोंधळ व्हायला लागला. मग फौजेने त्याला धोंड्या महिना असं नाव ठेवलं. पण या काळात पगार न झाल्यामुळे फौज नाराज असे. म्हणून हैदरने सरकारी खजिन्यावर बोजा न होऊ देता, मार्ग शोधला. दोन्ही धर्माच्या शिपायांची नाराजी काढायला दर पंधरा दिवसांनी पगार द्यायला सुरुवात केली. त्यामुळे फौज खूष झाली. पण नंतर नंतर हा पगार २० दिवसांनीही दिला जायचा आणि आता मागचा हिशेब संपला असं घोषित करुन टाकलं जायचं. त्यात शेवटी हैदरचाच फायदा व्हायचा. हैदर घोडेस्वाराला महिन्याचा पगार न देता २० दिवसांचा देई. त्याला बीसमासी म्हणत. उरलेला एक तृतीयांश पगार वर्षादोन वर्षांनंतर कपडे, फेटे, वगैरे वस्तू देऊन भागवला

जाई. त्यानंतरची घोडेस्वारांची कमाई म्हणजे मुलुखगिरीला गेल्यावर लुटालुटीच्या मार्गाने ज्याने त्याने आपली कमाई करावी, असाच त्यांना आदेश असे. हैदर लष्करी वातावरणात वाढला. ते जीवन त्याच्या आयुष्याचं एक अविभाज्य अंग होतं. लष्करी पेशा हा त्याचा अत्यंत आवडता, जीवाभावाचा पेशा होता. लष्करी जीवनाचे दोन महत्वाचे अवयव म्हणजे शिपाई आणि घोडा. ह्या दोन शाखांच्या जीवावर सरदाराचं यश अपयश अवगत असतं हे चाणाक्ष हैदरने कधीच ओळखलं होतं. सत्ता हवी तर उत्कृष्ट लष्करी बळ हवं आणि लष्कर उत्कृष्ट ठेवायचं तर उत्तम घोडे आणि उत्तम सैनिक ही त्याची बलस्थानं आहेत हे कळल्यामुळे हैदरने सैनिकांना सतत संतुष्टच ठेवलं. त्यांच्यात तो सतत मिळून मिसळून असे. आपल्या जेवणात त्यांना सहभागी करून घेत असे. त्यांच्या सुखदु:खाची काळजी घेई. धाडसी, नेमबाज, शूर शिपायाला हेरून, लगेच बढती देऊन त्याचा आत्मविश्वास वाढवी आणि त्याला जवळ करे, त्याचवेळी त्याच्याकडून जास्तीत जास्त काम करून घेऊन फायदा करून घेई. यामुळे त्याच्या चाकरीत यायला सारे जवान खूप खूष असत. आपोआप त्याचं लष्करी बळ वाढत असे. आणि यशाचा मार्ग नेहमीच त्याच्यासाठी खुला होत असे. सैन्याला कायम तो संतुष्ट ठेवी आणि त्यांच्याकडून भरपूर कष्टही करून घेई. एखाद्या मोहिमेवर फौज पाठवली की त्यांना रसद, शस्त्रं, शिबंदी

वेळच्या वेळी पोचते की नाही याकडे तो जातीने लक्ष घाली आणि फौजेची काळजी घेई. त्यामुळे फौजेलाही मोठाच हुरुप येई आणि आपला धनी आपल्या पाठीशी उभा आहे याचं मानसिक बळ असे. त्यावरून त्यांच्या शौर्यालाही उधाण येई.

त्याच्या लष्करात त्याने तीन प्रकारच्या तुकड्या तयार केल्या होत्या. पहिली तुकडी कवायती फौजेची. यात २० ते ३० वयोगटातले तरुण असत. या तुकडीला त्याने उत्तम दर्जाचं हिरवं जॅकेट गणवेशासाठी दिलं होतं. दुसरी शाखा होती ती ३० ते ४० वयोगटातील तरुणांची. यांना साध्या दर्जाचं हिरवं जॅकेट तो घालायला लावी. आणि तिसरी तुकडी होती ती ५० ते ६० वयोगटातील पुरुषांची. यांना काळी लोकरी जॅकेट घालायला लावी. सर्वांना काळा फेटा बंधनकारक होता. कोणत्याही तरुणाने साहस धाडस दाखवलं की हैदर त्याच्यावर खूष होऊन बक्षीस देई. फौजेच्या शारीरिक देखभालीसाठी फौजेत वैद्य असत. लढाईच्या वेळी शिपाई जखमी झाला की हे वैद्य त्यांच्या जखमा शिवणं, त्यावर मलमपट्टी करणं ही कामं करत असत. शिपायाला या जखमांसाठी सरकारी खजिन्यातून भत्ता म्हणून पैसे मिळत. हैदरने स्वत:साठी मात्र एक फ्रेंच डॉक्टर ठेवलेला होता. लष्करात वेगवेगळ्या प्रकारची फौज असे. हुजरातीची फौज म्हणजे घोडदळ, पायदळ आणि तोफा गोलंदाज. शिवाय एकांडे शिलेदार, बेरड,

जेजाला चालवणारे हेही असत. या एकांड्या शिलेदारांना गणवेष नसे. ते लढाईपुरते फौजेत सामील होत असत. त्यांच्याकडे त्यांचे स्वत:चे भाले किंवा बंदुका असत. जेजाला हे एक प्रकारचं रॉकेट होतं. लोखंडापासून बनवलेली एक लांब नळी असे. तिचं वजन साधारणपणे ६ ते १२ पौंडापर्यंत असे आणि लांबी ८ ते १० फूट असे. यात दारू भरलेली असे. ती जोरात दूरवर फेकली की मैलभर लांब जाऊन पडत असे. शत्रूच्या घोडदळावर यांचा लांबून मारा केला जाई. अवचित येऊन पडणाऱ्या या शस्त्राने धोडदळ जखमी होई. पायदळाकडे छोटी पिस्तुलं, बंदुका, धनुष्यबाण सर्व शस्त्रं असत. झाडामागे लपून बसून हे शिपाई शत्रूवर हल्ला करत असत. ते उत्तम निशाणेबाज असत. हैदरच्या फौजेत दर ७ शिपायांवर एक पहारेकरी आणि हवालदार असे. १५ पहारेकऱ्यांच्या अधिकाऱ्याला रिसालदार म्हणत. हैदरच्या उद्योगी स्वभावाची आणि शिपाईगिरीची एक कथा प्रचलित आहे. एकदा हैदर घोड्यावरून रपेटीला जात असतांना एका आंधळ्या भिकाऱ्याने त्याच्याकडे भीक मागितली. हैदर थांबला आणि नोकरी करशील का असं त्या भिकाऱ्याला त्याने विचारलं. तेव्हा तो भिकारी कबूल झाला. हैदरने लगेच आपल्या लष्करी अधिकाऱ्याला त्या भिकाऱ्याला घेऊन जाऊन शस्त्रागारातल्या लोहाराकडे काम द्यायला सांगितलं. लोहाराचा भाता हलवायचं काम त्या

आंधळ्याला मिळालं. बदल्यात वर्षाला दोन सुती कपडे आणि रोजचा एक रुपया त्या आंधळ्याला मिळायला लागला. जेव्हा तोफांची परेड निघायची तेव्हा त्या आंधळ्याला तोफगाडीवर बसवून ठेवलं जायचं. हैदर या आपल्या हुशारीवर इतका खूष झाला की राज्यातले सगळे आंधळे शोधून त्याने सैन्यात कामाला लावले. मात्र हैदरच्या या अति उत्साहाचा त्याच्या अधिकाऱ्यांना त्रास व्हायला लागला कारण त्या आंधळ्याना सांभाळणं एक अवघड काम होऊन बसलं.

घोडदळ हे सैन्याचं फार महत्त्वाचं अंग. या सैनिकाला जाड दुलईचं जॅकेट गणवेषासाठी असे. त्यामुळे शत्रूच्या तलवारीचा घाव शरीरात शिरत नसे. डोक्याला लोखंडी शिरस्राण असे. अंगातल्या चिलखताला आतल्या बाजूने किनखाबाचं कापड लावलेलं असे. या पथकाकडे बंदुका असत. पिस्तुलं असत. कमरेला खंजीर असे. हुजरातीच्या घोडदळाला गणवेश असत. घोड्यालाही लाल रंगाचे कपडे चढवलेले असत. तिसरं होतं तोफखान्याचं दळ. तोफाचं अनन्यसाधारण महत्व हैदरने ओळखलं. वेगवेगळ्या वजनाच्या तोफांचा संग्रह केला. सुरुवातीला एका पारशाला मुंबईला पाठवून उत्तम तोफा विकत आणवल्या होत्या. गोलंदाजांना शिकवण्यासाठी फ्रेंच अधिकारी नेमले. तोफा वाहून नेण्यासाठी बैलगाड्यांचा वापर केला जाणं ही सर्वसामान्य प्रथा होती. हैदरच्या

काळापर्यंत युध्दामधे हत्तींचा वापर करणं जवळजवळ बंद झालं होतं. पण हैदरने कर्नाटकाच्या जंगलात विपुल संख्याने जन्मणाऱ्या हत्तींचा कल्पकतेने वापर करून घेतला. डोंगरांवर चढतांना जड तोफा वाहून नेणाऱ्या बैलांना धाप लागे. ते श्वास घेण्यासाठी थांबत तेव्हा हत्ती बैलगाडी उतारावरून घसरत खाली न येण्याची काळजी घेत. बैलगाड्यांच्या मागे उभं राहून गाड्या अडवून धरत. आणि डोंगर उतारावरून खाली उतरणाऱ्या बैलांना आवरण्यासाठीही हत्तींची योजना त्याने केलेली होती. हत्तींच्या सोंडेला बैलगाडीचे दोरखंड बांधलेले असत.. ते दोरखंड हत्ती आवरून धरत आणि जड वजन भरलेल्या बैलगाड्या घसरत जाऊ नयेत याची काळजी घेत.

राज्याची आणखी एक महत्वाची शाखा म्हणजे किल्ले. हैदरचं आपल्या सर्व किल्ल्यांकडे बारीक लक्ष होतं. त्यांची डागडुजी, त्यांचं संवर्धन, त्यात ठेवलेली शिबंदी यावर तो वाटेल तेवढा पैसा खर्च करत असे. त्यांची जरासुध्दा हेळसांड होऊ देत नसे. ज्या किल्लेदाराला नेमायचं तो सर्व प्रकारची शस्त्रं चालवण्यात निष्णात आहे ना याची तो स्वत: पारख करत असे. प्रत्येक किल्ल्यात भरपूर धान्यसाठा आणि शस्त्रसाठा ठेवत असे. प्रत्येक किल्ला भरपूर शिबंदीने सज्ज असे. पश्चिम किनारा जिंकल्यावर त्यावर बांधलेली उत्तम बंदरं ही हैदरच्या द्रष्टेपणाची

साक्ष होती. हैदरने फ्रेंचांच्या मदतीने पश्चिम किनाऱ्यावर होनावर वगैरे उत्तम बंदरं बांधली. बोटीतून येणारा माल उतरवण्यासाठी उत्तम धक्के बांधले. आपलं नाविक दल उभारलं. देशी-परदेशी मालाच्या आयात-निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी शहर ते बंदर यामधे उत्तम दळणवळण ठेवलं. त्यासाठी रस्ते बांधले. पोर्तुगीज लोकांकडून जहाजं बांधून घेतली. समुद्रकिनारपट्टीच्या सर्व परकीयांशी त्याने सलोख्याचे संबंध ठेवले. त्याचवेळी त्यांना डोईजडही होऊ दिलं नाही. फ्रेंचांकडून येणाऱ्या युध्दसामग्रीसाठी ही बंदरं वापरली जात आणि परकीयांच्यावर अंकुश ठेवण्यंही काम ही बंदरं करीत असत. त्याचं आरमार सुसज्ज होतं.

१७५१ साली त्रिचनापल्लीच्या स्वारीत हैदर नंजराजैया बरोबर एक लहान सरदार म्हणून आपलं घोडदळाचं पथक घेऊन सामील झाला होता. शिवाय त्याने स्वत: उभारलेली फौजही त्याच्या बरोबर होती. त्यावेळी हैदरला फ्रेंचांचा सहवास जवळून घडला. नंजराजैया का हरला, आपल्या फौजेत काय दोष आहेत हे त्याने चाणाक्षपणे हेरलं. त्यावेळी त्याने युरोपियनांच्या यशाची गुरुकिल्ली त्यांच्या शिस्तीने वागणाऱ्या फौजेत, त्यांच्या युध्दसामग्रीमधे, त्यांच्या रणनीतीमधे, डावपेचांमधे आणि कूट राजनीतीमधे आहे हे त्याने ओळखलं. त्या मुक्कामात आपला तळ फ्रेंचांच्या तळाजवळ आणून ठेवला.. तेव्हा फ्रेंच अधिकाऱ्याने

आणि नंजराजैयाने त्याच्या ह्या अगोचरपणाबद्दल नापसंती दाखवली तेव्हा, मला तुमच्याकडून फौजेचं शिक्षण घ्यायचंय म्हणून त्यांच्या गळयातच पडला. इतका तो युरोपियनांच्या फौज चालवण्यावर प्रभावित झाला होता. फ्रेंच आणि इंग्रजांचा युध्दातला कावेबाजपणा, युध्दनीती, वेगवेगळी शस्त्रं, यांचा बारकाईने अभ्यास करुन ते त्याने आत्मसातही केले. आणि आपल्या फौजेला पुढे हीच शिस्त पाळायला लावली. आपल्या लष्करात सैन्याला कवायत शिकवायला आणि ती रोजच्या रोज पाळायला शिकवण्यासाठी त्याने आपल्या फौजेत युरोपियन अधिकारी नेमले. फौजेला कडक शिस्तीचं आणि अपार मेहनतीचं शिस्तीचं शिक्षण दिलं.

हैदरची फौज मोहिमेवर निघायची असेल, तर पहाटे ३ वाजता नगारा वाजे. बाजार, तंबू गोळा करून  इतर सामान घेऊन जाणारे बिनीचे लोक पुढील मुक्कामासाठी सामान गोळा करून पुढच्या मुक्कामाला पोचायला बाहेर पडत. पहाटे ४ वाजता परत दुसऱ्यांदा नगारा वाजे. त्यावेळी फौज जागी होई. आपापली आन्हिकं आवरून ६ वाजता तयार होई आणि बाहेर पडे. हैदर स्वत: ८ वाजता उठून तयारी करून न्याहारी करून कूच करायला तयार होत असे. हैदरला युध्दात वापरलं जाणारं प्रत्येक शस्त्र उत्तम रीतीने हाताळता येत होतं. निशाणबाजीत तर तो निपुण होताच. यामुळे

इंग्रजांशी लढणारा तो एकमेव भारतीय होता, आणि फ्रेंचांच्या मदतीने तो इंग्रजांनाही डोईजड झाला. मराठ्यांच्या गनिमीकाव्याचं त्याने महत्त्व जाणलं होतं, आणि म्हणूनच अनेक मराठी सरदार त्याने आपल्या फौजेत नेमले. त्यांचा उपयोग त्याने इंग्रजांच्या विरूध्द भरपूर केला आणि इंग्रजांची दाणादाण उडवली. भारतीय शत्रूंशी इंग्रजी युध्दसामग्रीने लढला. अचानक प्रकट होण्यात आणि आपल्या रणनीतीबद्दल गुप्तता राखण्यात त्याचा हात धरणारं दुसरं कुणीही त्याकाळी नव्हतं. त्यामुळेच इंग्रजही त्याला वचकून होते आणि मराठा फौजेने त्याला मायावी म्हटलं ते उगीच नाही.

हैदरने सत्तेत आल्यावर सरंजामशाही मोडण्याकडे जास्त लक्ष दिलं. आजवरच्या अनुभवाने मनसबदारीतले दुर्गुण त्याने हेरले होते. सरदार सरकारी खजिन्यातून पैसा काढतात पण फौजेला मात्र खूप कमी मोबदला मिळतो, आणि सरदार गब्बर होतो हे तो अनुभवातून शकला होता. आणि हे सरदार लढाईच्या वेळी कसून काम करण्यात कुचराई करतात हे त्याने पाहिलं होतं. म्हणून राज्याचं बलस्थान म्हणजे उत्तम सैन्य आणि ते उत्तम ठेवायचं तर लष्कर हे एकाधिकाराखाली आलं पाहिजे म्हणून त्याने प्रयत्न सुरू केले. मैसूरला देशाच्या राजकारणात वरचं स्थान द्यायचं असेल तर मैसूरचा दरारा वाढला पाहिजे आणि दरारा वाढवायचा तर फौज उत्तम हवी हे समीकरण त्याने लागू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न

केले. मैसूरपासून कन्याकुमारीपर्यंत पूर्व पश्चिम किनाऱ्यापर्यंत आपली सीमा वाढवणं हेच त्याचं स्वप्न आणि ध्येय होतं. त्याचं दुसरं प्रेम म्हणजे अश्वप्रेम. त्याच्यासाठी घोडा हा नुसता एक प्राणी नव्हता तर निसर्गाचं ते एक अद्भुत लेणं होतं. घोडा म्हणजे लष्कराला लागणारं एक नुसतं वाहन नव्हतं तर तो एक विश्वासाचा साथीदार होता. त्याचं घोड्यावर निरतिशय प्रेम होतं. हैदरला घोड्यांबद्दल अफाट माहिती होती. तो स्वत: घोड्याची पारख करत असे. त्यांची किंमत ठरवीत असे. अश्वपरीक्षेत त्याचा हात धरणारं कुणीही नव्हतं. हिऱ्यामोत्यांच्या मोलानं हैदर घोड्यांना जपे आणि आणि आपली अश्वशाळा उत्कृष्ट घोड्यांनी संपन्न करीत असे. ६००० रुपयांपासून १४००० रुपयांपर्यंतचे घोडे त्याच्या जवळ होते. तो स्वत: त्यांचं खाणंपणं व्यवस्थित आहे ना याची काळजी घेई. त्यांच्या खुराकासाठी लागणारा हरभरा, गवत, लोणी, बदाम याची जराही काटकसर करीत नसे. घोड्यांसाठी बांधण्याची पागासुध्दा कशी हवी त्यावर त्याचं लक्ष असे. राज्यात आलेला प्रत्येक घोडा तो आधी पाहणार आणि मग इतरांसाठी मोकळा करणार असा त्याचा दंडक होता, त्यामुळे सर्व उत्कृष्ट घोडे त्याच्या पागेत जमा झाल्यावर इतर सरदारांच्या वाट्याला दुय्यम प्रतीचे घोडे शिल्लक राहात. यामुळे अश्वव्यापारीही आधी हैदरकडेच जात. इराक, बगदाद, अरेबिया, गुजराथहून तो उत्तम पैदाशीचे घोडे

आणवत असे. त्याच्या राज्यात म्हणजे मैसूरमधे आल्यावर जर एकाद्या अश्व व्यापाराचा घोडा दगावला तर त्या व्यापाऱ्याने आपल्या दगावलेल्या घोड्याची आयाळ आणि शेपूट दाखवल्यावर त्याला त्या घोड्याच्या मूळ किंमतीची अर्धी किंमत हैदर व्यापाऱ्याला देत असे. इतका तो अश्वप्रेमी आणि न्याय्य वर्तन करणारा होता. हैदर घोड्यांच्या व्यापाऱ्यांनाही संतुष्ट करत असे. खूप घोडे खरेदी केल्यावर या व्यापाऱ्यांना तो तांदूळाची पोती, बकऱ्या, लोणी वगैरे सामान त्यांच्या मुक्कामावर पाठवून मेजवानी करायला सांगत असे. त्यांना तो आपला पाहुणा समजत असे. त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवत असे.

त्याचा जनानखाना खूप मोठा होता. त्याला एखादी आकर्षक स्त्री आवडली की हैदर तिला आपल्या जनानखान्यात आणत असे, पण त्याचं हे वैषयिक, शृंगारिक जीवन त्याच्या कर्तव्यांच्या आड कधीच येत नसे. त्याच्या स्त्रियांना राजकारणात भाग घ्यायची परवानगी नव्हतीच. फातिमा हे त्याच्या एका बिबीचं नाव. तिचा मुलगा टिपू. टिपूला त्याने उत्तम शिक्षण दिलं. युरोपियन शिक्षक ठेवून उत्तम रीतीरिवाज शिकवले. त्याचा दुसरा मुलगा करीम. हैदरला मुलीही होत्या. सावनूरचा नबाब, जो कायम त्याला घाबरून राहिला, त्याच्याशी हैदरने आपली मुलगी नबाबाच्या मुलाला, आणि नबाबाची मुलगी आपल्या करीम मुलाला करून

घेऊन नातेसंबंध जोडले. हा लग्नसमारंभ श्रीरंगपट्टणात मोठ्या धडाक्यात साजरा झाला. पण या लग्नातही हैदर व्यवहार विसरला नाही. नबाबाची खंडणी हैदरने अर्ध्यावर केली आणि २००० फौज हैदरच्या मदतीला कायम ठेवण्याचा करार झाला. चित्रदुर्ग राज्य जिंकल्यावर चित्रदुर्गाचा नबाब त्याला शरण आला, पण त्याचवेळी नबाबाची सुंदर बहीण हैदरला आवडली. त्याने तिच्याशी निकाह लावला आणि आपल्या जनानखान्याचं बक्षीपद दिलं. बक्षीपद हे त्याकाळी फार मोठं जबाबदारीचं पद मानलं जात असे. हैदर साधारणपणे संध्याकाळ मद्य पिण्यात किंवा उत्तम शास्त्रीय नृत्य बघण्यात किंवा मित्रांच्याबरोबर गप्पांमधे घालवी. या मित्रांबरोबर त्याच्या अगदी मनमोकळ्या गप्पा होत असत. मित्रांशी बोलतांना शिवीगाळ करायलाही तो मागेपुढे पहात नसे. तो त्यांच्यातलाच एक होऊन मनमोकळेपणाने वागे. नवख्या माणसाबरोबर सुरुवातीला तो जरा औपचारिकपणे वागे, पण एकदा त्याला तो माणूस कळला की अगदी मोकळा होऊन त्याच्याशी बोलत असे. माणसाची उत्तम पारख करण्याचं वरदान त्याच्यापाशी होतं.

मैसूरचा मुख्य  झाल्यावरही हैदरने स्वत:साठी काही निर्बंध घालून घेतले होते. त्याने राजघराण्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवले. त्यांच्या सिंहासनावर तो कधीही बसला नाही. तो स्वत:ला कायम

राजप्रतिनिधीच समजला. सर्वाधिकारी या नावाने त्याने खंडेरावाला अटक केल्यावर कारभार हाती घेतला पण कृष्णराजाला संपवणं त्याने कधीही केलं नाही. मैसूरचा तो दलवाई झाला, दिवाण झाला, सर्वाधिकारी झाला, सर्वसत्ताधीश झाला पण त्याने स्वत:ला राजा म्हणवून घेतलं नाही. सरकारी आदेश निघत त्यावर राजाचाच शिक्का त्याने चालू ठेवला. कृष्णराज राजा असेपर्यंत त्याने राजघराण्याशी आदराचेच संबंध ठेवले. आधी परवानगी घेतल्याशिवाय राजप्रासादात तो कधीही गेला नाही. पण त्यानंतर आलेल्या राजाच्या बाबतीत मात्र या नव्या राजाला कारभार करणं जमणार नाही, त्याची तेवढी कुवत नाही असंच त्याचं मत होतं. आपल्याला घालवण्यामागे राजाचंच कारस्थान आहे हे माहीत असल्यावरही आणि खंडेरावाला अटक केल्यावरही त्याने राजाची भेट मागून घेतली आणि मगच राजप्रासादात भेटायला गेला होता. मैसूर हे वोडियारांचं राज्य आणि आपलं राज्य बिदनूर असं तो सगळ्यांना सांगे. कदाचित बालपणात शिऱ्याच्या नबाबाने हैदर कुटुंबाला जो त्रास दिला होता, तेव्हा मैसूर राजाने त्यांचं कर्ज फेडून जी सुटका केली होती, त्याचं ऋण तो विसरला नसावा. त्याच्या मनावर तो आदर राहिला असावा.

हिंदू आणि मुसलमान, ख्रिश्चन अशा मिश्र प्रजेशी हैदरने अत्यंत तोलून मापून आणि न्याय्य वर्तन ठेवलं होतं. हिंदू आणि मुसलमान दोन्ही धर्माचे शिपाई त्याच्या सेनेत होते, त्यांनाही त्यांच्या त्यांच्या गुणाप्रमाणेच तो वागवी. त्यात भेदभाव नसे. त्याच्या या समभावाबद्दल एक किस्सा सांगितला जातो. श्रीरंगपट्टणात पीरझादा नावाचाएक मोठा संत होता. त्याचा शिष्यगण मोठा होता. एक वर्षी रंगराय देवाची उत्सवात मोठी मिरवणूक निघाली. ती मिरवणूक पीरझादाच्या घरावरून जात असतांना त्याच्या शिष्यांनी संतापून अचानक मिरवणूकीवर हल्ला करून रथ, मिरवणूक उधळून लावली. लोकांनाही चोप दिला. त्या सर्व हिंदूंनी हैदरकडे तक्रार केली. तेव्हा हैदरने त्यांना सरळ आदेश दिला की तुम्ही का मार खाल्लात ? त्यांनाही चोपा. दुसरे दिवशी परत मिरवणूक त्या रस्त्याने जात असतांना परत पीरझादाचे शिष्य बाहेर आले आणि त्यांच्यावर हल्ला करून गेले, तेव्हा तयारीने आलेल्या त्या मिरवणूकीतल्या लोकांनीही त्यांना चोपलं. या प्रतिहल्ल्याने संतापलेला पीरजादा हैदरच्या भेटीला गेला आणि हिंदूंनी केलेल्या हल्ल्याची तक्रार करायला लागल्यावर हैदरने त्यांच्या या वागण्याचं कारण पीरलाच विचारलं, तेव्हा आमच्या मशिदीवरून हिंदूंनी वाजत गाजत मिरवणूक केल्याचं सांगितलं आणि मैसूरमधे मुसमानांचं राज्य असल्यामुळे हिंदूंचं वागणं मी

खपवून घेणार नाही असं हैदरला सांगितल्यावर हैदरने लगेच पीरला प्रतिप्रश्न केला.. तुम्हाला कुणी सांगितलं की हे राज्य मुसलमानांचं आहे ? त्यावर संतापलेल्या पीरजादाने मैसूर सोडून जाण्याची धमकी हैदरला दिली तेव्हा हैदरनेही तुम्हाला जिथे जायचं असेल तिथे खुशाल जा असं सांगितल्यावर पीरजादा आणि त्याचे शिष्य मद्रासला निघून गेले. पीरजादा तिथेच मरण पावला.

हैदरची सुप्त इच्छा मोगल सम्राटासारखं होण्याची, रहाण्याची होती. मोगलांचा थाटमाट त्याला फार आकर्षित करीत असे. युध्दाला निघतांना हैदरच्या अंगावर जरीबुट्याचे पांढरे रेशमाचे कपडे असत. पिवळ्या रंगाचा चोळणा म्हणजे विजार असे. पायात पिवळ्या रंगांचे मखमली बूट असत. कमरेभोवती पांढरा शेला गुंडाळलेला असे. अंगावर जडजवाहीर घालायची त्याला फारशी आवड नव्हती, त्यामुळे फारसे मणिहार त्याच्या अंगावर नसत. मात्र त्याचे तंबू ऐश्वर्याने मढलेले असत. सोन्यामोत्यांनी नटवलेले असत. मैसूरचा सुलतान झाल्यावर तो कधीकधी विशेष प्रसंगी वैभवपूर्ण शोभायात्रा काढत असे. ती मैलोन् मैल लांब असे. त्याच्या शक्तीचं प्रदर्शन, वैभवाचा डामडौल आणि सामर्थ्याचं दर्शन घडवणारी असे. कवायती फौज, घोडदळ, पायदळ, पीलखाना म्हणजे हत्ती, उंट यांचं प्रदर्शन त्यावेळी जनतेला घडत असे. मिरवणूक सुरू झाली की मिरवणूकीच्या अग्रस्थानी

युरोपियनांची कवायत फौज येई. त्यांचे सुंदर लाल गणवेश लक्षवेधक असत. त्यावर अनेक बिल्ले लटकत असत. हातात बंदुका असत. ते पुढे गेले की मागून येत सजवलेल्या उंटांवर बसलेले ५०० स्वार. मग येत सुंदर झूली, दागिन्यांनी सजवलेले मढवलेले हत्ती. पाठोपाठ येई दोन पलटणींची घोडदळाची भव्य मिरवणूक. त्या घोड्यांच्या अंगावर शहामृगांच्या पिसांच्या झूली असत. घोड्यांवर चकाकते गणवेश घातलेल्या या हबशी सैनिकांच्या हातात लांब भाले असत. मग यायची कवायती फौज. शिस्तीत चालतांना या सुंदर गणवेशधारी फौजेच्या हातातही भाले असत. त्या भाल्यांच्या टोकांशी घुंगरू खुखुळत असत. नंतरची सरदारांची देखणी भव्य थाटामाटाची रांग. नेत्रदीपक वैभव यावेळी पहायला मिळे. शेवटी यायचा हैदर. तो दागिन्यांनी मढलेल्या हत्तीवर बसलेला असे. त्याची भव्य अंबारीही सुंदर असे. हा हत्ती बिदनूरच्या जंगलातून आणलेला होता. त्यानंतर हत्तींची रांगच असे. त्यातले 5 हत्ती भव्य सोनेरी निशाण घेतलेले असत. या भव्य मिरवणूकीच्या वेळी दोन्ही किनाऱ्याने पांढराशुभ्र पोशाख घातले सैनिक चालत असत. त्यांच्या हातात चांदीने मढवलेले आणि त्यांच्या टोकाला लाल पताका, यांनी नटवलेले लांब भाले असत. मोगल बादशहासारखी ही भव्य मिरवणूक असे. स्वत: साधेपणाने राहणाऱ्या हैदरला डोळे दिपवणारं वैभव भोगणं आणि त्याचं

प्रदर्शन करणं मनस्वी आवडे. ही त्याची आसक्ती होती. असा हा हैदर अली मैसूरच्या राजकारणात आला आणि साऱ्या दक्षिणेचं समरांगण करून गेला.

इंग्रज आणि त्यांची साथ मिळालेला अर्काटचं नबाब महंमद अली हे कडवे प्रतिस्पर्धी आणि कर्नाटक सीमेवरचे माधवराव पेशव्यांचे मराठे. नवीन मोहरे, नवीन प्यादी, नवीन चालींचा खेळ.


## इ. स. १७६१. हैदरच्या हालचाली.

श्रीरंगपट्टणचा कारभार हातात आल्यावर हैदरने त्याच्या देखरेखीसाठी आपला मेहुणा मकदुमअलीला तिथे ठेवून तो लगोलग बंगलोरला आला. आता मैसूरचा तोच सर्वाधिकारी होता, दलवाई होता, आणि प्रधानमंत्री होता. कृष्णराज वोडीयारच्या हातातला सत्तेचा डाव हैदर अलीने उपटला होता.त्याने बंगलोरला येण्याचं कारणही तसंच घडलं होतं. निजामअलीचा भाऊ बसालतजंग हा आदोनीच्या कारभाराचा प्रमुख होता. पानिपतावर मराठ्यांचा दारूण पराभव झालेला ऐकल्यावर मराठे आता संपले या आशेने त्याने मराठ्यांच्या मुलखाचा ताबा घ्यायचा विचार केला. आणि तो मुलुखगिरीसाठी बाहेर पडला. आधी तो शिरेकडे वळला आणि मग होस्कोटेला गेला. होस्कोटे बंगलोरला लागून आहे. केवळ १८ मैलांचं त्यात अंतर आहे. त्यामुळे बसालतजंग आपल्याही राज्यावर चालून येईल ह्या भीतीने हैदरने बंगलोर गाठलं. पण झालंच उलटं. होस्कोटेच्या लोकांनी एवढा जोरात प्रतिकार केला की बसालतजंगाला हैदरलाच आपल्या मदतीला बोलवावंस वाटलं. ह्याचा फायदा हैदरने उचलायचं ठरवलं. आजोबा, बाप, मोठा भाऊ यांच्या नाईक पदामुळे हैदरला लोक

हैदरनाईकच म्हणत आणि समजतही. हा हैदरच्या मनात सल होता. लोकांनी आपल्याला सुलतान, किंवा नबाब म्हणून ओळखावं अशी त्याची सुप्त इच्छा होती. आपल्याला कोणताही किताब नाही, जहागिरदार म्हणूनही कुणी नावाजत नाही. ही परिस्थिती बदलण्याचे त्याचे प्रयत्न होते. पण हा किताब देण्याचा अधिकार दिल्लीहून आलेल्या पहिल्या निजामाचा होता, आणि त्याच्या पश्चात आता निजामअलीच होता. हैदरला निजामअलीकडे याचना करायला जायचं नव्हतं. त्याने एक डाव टाकला. त्याने एक खलिता बसालतजंगला पाठवला आणि त्यात लिहिलं," मी निजामअलीला ओळखत नाही, आणि मानतही नाही. माझ्या दृष्टीने तूही निजामाचाच मुलगा आहेस, आणि तुलाच मी हैदराबादचा निजाम समजतो. दक्षिणेच्या सहा सुभ्यांचा तूच सुभेदार आहेस. तर मी तुला ३ लाख रुपये नजराणा पाठवतो. तू मला शिऱ्याचा सुभेदार अशी पदवी दे. असं केलंस तर तुला मीच होस्कोटे मिळवून देतो. बसालतजंग भुलला. हैदरला शिऱ्याचाच नबाब होण्यामागेही मोठं कारण होतं. ते म्हणजे शिरे इथे मराठ्यांनी दक्षिणेच्या संरक्षणासाठी लागणारं युध्दसाहित्य ठेवलं होतं. बसालतजंगला शिरे हैदरला देणं म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यासारखं होतं. त्याचं काहीच जात नव्हतं. परत निजामअलीला हैदर मानत नाही हा हैदरचा प्रश्न होता. त्यामुळे

बसालतजंगाने शिरे ठाणं हैदरला देऊन टाकलं आणि हैदर स्वत:ला शिऱ्याचा नबाब म्हणवून घ्यायला लागला. मग दोघे मिळून शिरे घ्यायला मोठी फौज घेऊन आले. शिरे लगेच हाती आलं कारण जी काही शिबंदी होती, तिचं या मोठ्या शत्रूसमोर काहीही चालण्यासारखं नव्हतं. हैदरने बसालतजंगाला होस्कोटेही, स्वत:च जाऊन, जिंकून, मिळवून दिलं. एवढं झाल्यावर बसालतजंग आदोनीला परत गेला.

# बिदनूर – हैदरनगर स्वारी.




हैदरअली मग इतर प्रदेश जिंकायच्या मागे लागला. त्याने बाळापूर, चिक बाळापूर, प्रदेश जिंकला. या सीमेलगत मुराररराव घोरपड्यांचं संस्थान होतं. मुराररावांना हैदरचा त्रास व्हायला लागला. त्या दोघांची लढाई झाली. मुराररराव घोरपड्यांचा पराभव झाला. मुराररावांकडून खंडणी घेऊन हैदर चित्रदुर्गावर गेला. चित्रदुर्गकरांनी हैदरने मागितलेली खंडणी दिली नाही, तेव्हा त्या दोघांमधेही जोरदार लढाई झाली. हैदर जिंकला. त्याने खंडणी तर

घेतलीच परत वर दंडही घेतला. चित्रदुर्ग एक भक्कम किल्ला होता. सात डोंगरांच्या समुहात हा फत्तरातून बनलेला किल्ला विसावलेला होता. वेदवती नदीच्या बेटावर हे सात डोंगर होते. या किल्ल्याला १९ बाहेरचे दरवाजे होते, ३५ गुप्त मार्ग होते. २०० टेहळणी चौक्या होत्या. पाणी, अन्न, दारूगोळा साठवून ठेवण्यासाठी खूप कोठ्या होत्या. त्यामुळे किल्ला कितीही दिवस लढवता येण्यासारखा होता. किल्ल्यावरून तिरंदाजी करता येण्यासाठी या प्रचंड मोठ्या किल्ल्याला खूप जागा होत्या. दावणगिरीजवळचा गावातल्या तिमण्णा नायक हा या चित्रदुर्गाचा संस्थापक. विजयनगरच्या काळात हा इथला सुभेदार होता. आणि ते राज्य संपल्यावर चित्रदुर्गाचा मुख्य झाला. हैदरच्या काळात मडकरी नायक पाचवा, गादीवर होता. या भक्कम किल्ल्यावर हैदरचा डोळा होताच. हैदरचा चित्रदुर्गाला मुक्काम झाला. त्यात एक नवीनच राजकारण उदयाला आलं. ते म्हणजे चित्रदुर्गचा राजा मडकरी नायक हैदरला म्हणाला की,

" बिदनूरचा राजकुमार माझ्याकडे आलायं आणि तो स्वत:ला चिन्न बसवप्पा म्हणवतो. माझ्याकडे मदत मागायला आलाय. मी मेलोच नाही, पहिलवानाने मला मारलंच नाही. मी ५ वर्षे लपून राहिलो आणि आता माझी मीच सुटका करून घेतली आहे. मी खिडकीतून पळून गेलो आणि आता तुमच्याकडे आश्रय मागायला

आलोय. ” हे सगळं सविस्तर वर्णन राजाने कथन केल्यावर हैदरच्या डोक्यात वेगाने चक्रं फिरली. त्याने त्या मुलाला भेटायला बोलावलं. त्याच्याशी बोलतांना हा तोतया आहे हे चाणाक्ष हैदरच्या लगेच लक्षात आलं. हैदरला बिदनूरवर जायला निमित्त मिळालं.

## हैदर नगर-राजधानी.

हैदरच्या आयुष्यात बिदनूर हे एक मोठंच पर्व घडलं. बिदनूर घाटमाथ्यावरचं गाव. निसर्गवैभवानं संपन्न असलेलं शहर. त्याकाळचं सर्वात श्रीमंत वैभवसंपन्न संस्थान. सध्या शिमोगा जिल्ह्यात येतं शिमोग्यापासून ८४ मैलांवर हे गाव आहे. बिदनुरला हैदरने जिंकण्याचं मुख्य कारण म्हणजे या राज्याकडे पश्चिम घाट, मलबार आणि केरळ किनारपट्टी, आणि तुंगभद्रेच्या काठचा थोडा भाग एवढा मोठा प्रदेश होता. इथे वर्षातले ९ महिने पाऊस असतो. हे गाव घाटमाथ्यावर असल्यामुळे कायम पाऊस आणि सर्द हवा असे. त्यामुळे जंगलांनी मढलेला हा प्रदेश होता. भारताच्या पश्चिमेकडच्या दाट डोंगररांगा, त्यातील माणूस हरवेल अशी दाट जंगलं, अनेक धबधबे, अशा नैसर्गिक सुरक्षित ठिकाणी होतं बिदनूर हे राज्य. इथे सत्ता होती ती केलाडी घराण्याची. या घराण्याची स्थापना केली ती चौडा आणि भद्रा गौडा या बंधूंनी. एका लिंगायत शेतकरी दांपत्याचे हे मुलगे. शेतीवरच या कुटुंबाची गुजराण होत होती. केलाडी तालुक्यातील हाळ्ळु गावात ते रहात.

भद्रा आणि चौडा मोठे झाल्यावर तेही शेतीच करत. त्यांनी दोन मजूर कामाला ठेवले. एक दिवस या मजुरांना शेतात एक

विलक्षण दृष्य दिसलं. एक गाय एका वारुळावर आपल्या दुधाचा अभिषेक करत होती.त्यांनी हे घरी येऊन आपल्या मालकाला हे सांगितलं, तेव्हा त्यांनी ते वारूळ खोदलं आणि तिथे शिवलिंग निघालं. काही दिवसांनी त्या मजूरांना एक तलवार सापडली आणि परत काही दिवसांनी एक मोहरांचा हंडा सापडला. गौडा बंधूनी शेतात रात्री येऊन ते पाहिलं आणि त्यावर माती घालून परत झाकून टाकला. दुसरे दिवशी चौडा घरात सांगायला लागला की काल रात्री माझ्या स्वप्नात देवी आली आणि तिने नरबळी देऊन मगच मोहरांना हात लावायला सांगितलं. तेव्हा ते दोन मजूर नरबळी होण्यासाठी आपला जीव द्यायला तयार झाले आणि आपला हा त्याग कायम स्मरला जावा अशी अट घातली. गौडा बंधूंनी ते मान्य केलं आणि त्या रात्री अंधार पडल्यावर  आधी शेतात मिळालेल्या तलवारीनेच शेतातच त्यांना मारलं, पुरलं आणि हंडा उचलला. ही दौलत हाती लागल्यावर त्यांनी त्यातून सैनिक तयार केले, त्या ताकदीवर शेजारपाजारच्या गावांना लुटायला लागले. तेव्हा विजयनगरच्या राजाकडे आजूबाजूच्या गावकऱ्यांनी तक्रार केली. विजयनगरच्या राजाने त्यांना पकडून कैदेत टाकलं. त्याच सुमारास बलीहळ्ळु गावाच्या पाळेगाराने दंगा आरंभला. तेव्हा कैदेत पडलेल्या गौडा बंधूंनी राजाला निरोप पाठवला की आम्ही त्या पाळेगाराचा समाचार घेऊ शकतो. आम्हाला मोकळं करा. जगलो

वाचलो तर आमचं गाव आम्हाला परत द्या. तेव्हा राजाने हे कबूल केलं आणि त्यांची कैदेतून सुटका करुन त्यांना त्या मोहिमेवर पाठवलं. गौडा बंधू पाळेगाराचा बीमोड करून परतले. तेव्हा राजाने त्यांना पाळेगाराने ताब्यात घेतलेली गावं तर दिलीच पण त्यांना त्यांचं स्वत:चं गावही इनाम दिलं. तेव्हापासून या भावांचं केलाडी घराणं सत्तेत आलं. त्यांच्यातला एकजण एकदा शिकारीला गेलेला असतांना त्याला एक ससा एका शिकारी कुत्र्याच्या मागे लागलेला दिसला. तेव्हा गौडा बंधूंनी तीच जागा साफ करून आपली राजधानी तिथे हलवली. ते गाव होतं इक्केरी. मग गौडा बंधूंनी त्या दोन मजूरांचं स्मारक म्हणून त्या गावच्या वेशीवर दोन स्तंभ उभारले. विजयनगर साम्राज्याचा अस्त झाल्यावर हे नायक स्वतंत्र झाले.

विजयनगर काळापासूनचं हे अत्यंत महत्वाचं ठिकाण. शिवप्पा नायक हा या केलाडी घराण्यातला नावाजलेला नायक. इथला शिवप्पा नायक आधी इक्केरीला होता, पण सुरक्षेच्या दृष्टीने बिदनूर जास्त भक्कम होतं, म्हणून तो बिदनूरला हलला. शिवाजीमहारांजांचा यांच्याशी स्नेह होता. संभाजीराजांना आणि शाहूराजांनाही  या घराण्यातल्या राजांनी मदत केली होती. इ. स. १७५५ मधे त्या घराण्यातील बसवप्पा नायक मेल्यावर त्याचा १७ वर्षांचा मुलगा चिन्नबसवप्पा गादीवर आला आणि त्याची आई

वीरम्मा कारभार पाहू लागली. राणी वीरम्माजी शूर होती. हुशार होती. मर्दानी पोशाख घालून कारभार पहात असे. धर्मनिष्ठ होती. खरंखोटं माहीत नाही पण अफवा अशी होती की या राणीचे तिच्या निंबय्या नावाच्या प्रधानाशी अनैतिक संबंध होते. ते उघडपणे चालत असत. जनतेला हे आवडत नसलं तरी ते काही बोलू शकत नव्हते. एकदा चिन्नबसवप्पा या तिच्या संबंधांबद्दल तिला घालून पाडून बोलला तेव्हा ती राणी चिडली आणि आपल्या पहिलवानामार्फत तिने त्याचा खून करवला. हा जेठ राजपुत्राला आंघोळीच्या आधी मालिश करायला न्हाणीघरात घेऊन गेला आणि मालिश करता करता बसवप्पाची मान मुरगळून टाकली. राणी आणि निंबय्याने दुसरा मुलगा दत्तक घेतला. त्याचं नाव सोमेश्वर. या चिन्नबसवप्पाचा तोतया हे निमित्त बिदनूरवर आक्रमण करायला हैदरला पुरेसं होतं. हैदरने स्वारीसाठी एक नाटक केलं. नायक घारण्यातला एक मुलगा त्याच्या दरबारात आपला हक्क सांगत आला आहे, त्या मुलाचा " हक्क मिळवून देण्याचं पवित्र कार्य " करण्यासाठी आपण बिदनूरवर स्वारी करणार असे सांगायला लागला आणि हैदर बिदनूरला निघाला. घनदाट झाडीतून, पर्वतरांगांमधून रस्ता सापडणं आणि बिदनूरला पोचणंच कर्मकठीण होतं. पण हार मानेल तो हैदर कुठला? नायक लोकांनी आपल्या राज्याची सुरक्षाही अतिशय बंदोबस्ताने ठेवली होती.

जागोजागच्या चौक्यांवर अतिशय जागरूकपणे तपासणी करत असत. वळणवाटा, डोंगरकपारी, सगळंच कठीण होतं. ५००० फौज बिदनूरला पोचणाऱ्या सर्व वाटांवर रक्षणासाठी सर्व नाक्यांवर ठेवलेली होती.

आणि मग १७६२ च्या डिसेंबरमधे चित्रदुर्गचा मडकरी नायक आणि हैदर मोठी फौज घेऊन बिदनूरवर निघाले. हैदरने आपल्या फौजेचे चार भाग केले. या चारही शाखांना वाटेतल्या जंगलांमधून १०/१५ मैलांच्या अंतराने एकमेकांच्या संपर्कात राहून चालायला सांगितलं. हैदरबरोबर राजकुमारही होताच. राणी वीरम्माला हे कळल्याबरोबर तिने हैदरला चार लाख होन देण्याचं आमिष दाखवून परत जायला सांगितलं. पण हैदरने ते ऐकलंच नाही. उलट तो पुढेच आला. हैदरने वाटेतला शिमोग्याचा किल्ला जिंकला. एक लाख होन त्याला तिथे मिळाले. ते घेऊन तो कुमसीला आला. कुमसीला त्याने आणखी एक मोठं काम केलं. त्या गावात राणीने कैद करून ठेवलेला लिंगण्णा नावाचा एक माजी मंत्री होता. हा लिंगप्पा राणीच्या हाताखाली प्रधान मंत्री होता, पण राणीने त्याला पदावरून काढून कैद करून ठेवलं होतं. त्याची हैदरने मोकळीक केली आणि त्याला आपल्याबरोबर वाटाड्या म्हणून घेतलं.हैदरने वाटेत आणखी एक चलाखी केली. ती म्हणजे या त्याच्या बरोबर असलेल्या राजकुमाराला त्याने हत्तीवर बसवलं. बिदनूरच्या

वाटेवर फौज पहायला येणारे नागरिक, त्यांच्या राज्याच्या राजकुमाराला पाहून हैदरच्या फौजेला सर्व तऱ्हेची मदत करू लागले. सगळया वाटेतल्या चौक्यांमधून हैदर विनासायास पुढे जात राहिला. बिदनूरच्या राज्याच्या सुरक्षेसाठी संपूर्ण जंगलात जागोजाग खूप सुरक्षा चौक्या होत्या. त्याही मोडून काढल्या. हैदर आणखी पुढे आला हे ऐकल्यावर राणी वीरम्माने १८ लाख होन देण्याची लालुच दाखवली. पण राजवाड्यात याच्या दहापट धन तुम्हाला मिळेल, आणखी पुढे जा असा सल्ला हैदरबरोबरच्या मंत्री वाटाड्याने  त्याला दिला. तेव्हा हैदरने पुढे सरकणं चालूच ठेवलं. उलट हैदरने राणीलाच निरोप पाठवून शरण यायला सांगितलं शरण आलीस तर श्रीरंगपट्टणमधे तुझ्या राहण्याची व्यवस्था करेन असा निरोप पाठवल्यावर राणीने ते तर नाकारलंच पण त्याच्याशी लढण्याचा निर्णय घेऊन शहराचा तसा बंदोबस्त केला. राणीने सावनूरच्या नबाबाकडे मदत मागितल्यावरून सावनूरकर नबाबाने तिच्या मदतीसाठी २००० घोडदळ आणि ४००० पायदळ एवढी मोठी फौज पाठवली. त्याच्या फौजेतले अरब हे फार शूर असत. हैदरला हे कळल्यावर तो सावनूरकर नबाबावर संतापाने बेभान झाला.

हैदरला यानिमित्ताने बिदनूर संस्थानच्या नैसर्गिक रक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. या घनदाट जंगलातून वाट काढत पुढे

सरकतांना त्याचे आणि त्याच्या सैन्याचे खूप हाल झाले. पदोपदी खळाळत वाहणारं पाणी, दाट जंगलं, कधीकधी मोठे धबधबे यातून दगडधोंड्यातून वाट काढत त्याची फौज चालली होती. मधेच वाट चुकण्याचाही धोका होता. त्यावेळी हैदरबरोबर असलेल्या फ्रेंच अधिकाऱ्याने वाट शोधली. हैदरला यावेळी घाटातल्या वळणावळणाच्या रस्त्यांची सुंदर बांधणी दिसून आली. या नायक मंडळींनी पक्के रस्ते बांधून ठेवले होते आणि त्यांची निगा ठेवली होती. मार्ग शोधत, डोंगर ओलांडत नेहमीच्या स्वभावाप्रमाणे हैदर अचानक, अनपेक्षितपणे वेगळ्याच मार्गाने बिदनूर गावात येऊन कोसळला. त्याची फौजही वेगवेगळ्या मार्गाने गावात पोचली. जंगलात असलेल्या चौक्यांवरचे जखमी शिपाई आधीच गावात पोचलेले असल्यामुळे गावातील रयत गाव सोडून पळून गेली होती. राणी, निंबय्या, आणि तिच्या फौजेने एक महिन्यापर्यंत लढा दिला. पण शेवटी आपली हार पाहिल्यावर राणीने सर्व वाड्याला आग लावायचं ठरवलं. आपले सर्व सोन्याचे दागिने जाळून टाकले. जडजवाहीर फोडून टाकलं. रत्नं, माणकं, पाचूचे हार मोडून फोडून टाकले. आणि राणी शरण आली. हैदरने मग सर्व रिकाम्या घरांना कुलूपं लावली. फौजेतल्या कुणालाही लुटालूट करू दिली नाही. राजवाड्यात खणती लावली. प्रचंड मोठा खजिना त्याच्या हाती पडला. सर्व घरांमधलाही संपत्ती त्याने गोळा केली. सगळ्याची

त्याने नोंद करून ठेवली. १ कोटी, २० लाख रुपयांचा माल हैदरला इथे मिळाला. बिदनूरची सीमारेषा पार पश्चिम किनाऱ्यापर्यंत पोचलेली होती. ते सगळं राज्य हैदरला मिळालं. अलोट संपत्तीही मिळाली. मग त्याने राणी वीरम्मा, निंबय्या, सोमेश्वर, आणि तो तोतया यांना अटकेत ठेवलं.

बिदनूरची भक्कम सुरक्षित जागा पाहून हैदरच्या मनात हेच गाव राजधानीचं करावं असं वाटायला लागलं. ९० हजार घरं असलेल्या गावांना त्या काळात नगर ही संज्ञा असे. हैदरने बिदनूरचं नाव हैदरनगर असं केलं. नंतर पुढचे सहा महिने त्याने तिथेच बिदनूरमधे मुक्काम केला. तोपर्यंत पावसाळा आला. पण या मुक्कामात त्याला खूप संकटं आली. त्या गावच्या पावसाळी, सर्द हवेमुळे आणि जंगलांमुळे तिथे तो हिंवतापामुळे ( मलेरियाने ) आजारी पडायला लागला. त्याने अंथरूणच धरलं. हिंवतापाने थंडीने हुडहुडी भरून ताप चढणं त्याला कधी माहीत नव्हतं. त्यामुळे तो अंथरूणालाच खिळला. त्यातच आणखी एका वेगळ्याच संकटात तो अडकला. पलंगावर कायम पडून राहण्याच्या हैदरच्या या काळात बिदनूरमधल्या दुखावलेल्या लोकांनी हैदरविरूध्द कटकारस्थानाला सुरुवात केली. त्यात मुख्य होते राजकुमार, लिंगाप्पा आणि राणी. बिदनूर हाती आल्यावर हैदरने लिंगप्पाला खड्यासारखं बाजूला सारलं. हैदरने आपल्याला

कारभारात घेतलं नाही म्हणून लिंगप्पा, आपण मदत केल्यावरून पस्तावला होता. आता तो हैदरला बिदनूरमधून काढायच्या भावनेने झपाटला. दुसरीकडे राजकुमाराला या काळात राणीने हळूहळू आपल्याकडे वळवलं. राजकुमारही हैदरचं उच्चाटन करण्याच्या कटात सामील झाला. त्यातच हैदरचे स्वत:चेच अधिकारी सामील झाले होते.

कट सिध्द झाला. हैदर रोज रात्री आपल्या कारभाऱ्यांबरोबर सल्ला मसलतीला आणि पुढच्या आखणीसाठी राजवाड्यात जागा असतो हे सर्वांना माहीत होतं. अशा वेळी राजवाडा स्फोटकांनी उडवायचा बेत सिध्द झाला. राजवाड्यातील सुरक्षा सांभाळणाऱ्या फौजेशी लढण्यासाठी, एका रात्री गुपचुप काही फौज जवळ आणून ठेवायची आणि त्या फौजेने हैदरची फौज कापून काढायची असा बेत झाला. या राजवाड्यातून एक गुप्त रस्ता राजवाड्याच्या बाहेरील एका देवळात उघडतो, हे फक्त राणी, निंबय्या आणि मोजक्याच लोकांना माहीत होतं. तिथे फौज थांबवायचं ठरलं. सगळा बेत यशस्वी होण्यासारखाच होता. त्या योजनेप्रमाणे लिंगप्पा फौजेची एक तुकडी घेऊन अंधाऱ्या रात्री निघणार होता. पण त्याच्या दुर्दैवाने आणि हैदरच्या बलवत्तर नशिबामुळे ही योजना हैदरच्या एका विश्वासू माणसाला कळली आणि त्याने ती हैदरला सांगितली. हैदर हादरलाच पण अत्यंत

हुशारीने आणि धीरोदात्तपणे, हुशारीने त्याने यातून मार्ग काढला. हैदरने लगेच एक समिती तयार केली. हातपाय गाळणारा तो माणूस नव्हताच. त्याने ताबडतोब आपल्या अधिकाऱ्यांना ह्या कटाची पूर्ण माहिती गोळा करायचा हुकूम दिला. त्यातच आपलेच अधिकारी यात सामील आहेत हे कळल्यावर तो सावध झाला. आपणही गुप्तपणे माहिती गोळा करायला लागला. कारभाऱ्यांनी सर्व चौकशी करून त्याला माहिती दिली की,

' तुमच्या जीवाला काहीही धोका नाही आहे. ही सगळी अफवा आहे. ”

हैदरचा अधिकारी गोळा केलेली बातमी त्याच्यासमोर वाचायला लागला. तेव्हा हैदरने एक नाटक केलं.  तो थंडीने कुडकुडत बिछान्यावर पडून राहिला. गुंगीत असल्याचं नाटक केलं. आपल्या अधिकाऱ्यांनाही आपल्याजवळ बसवून ठेवलं. आणि तापाचं नाटक करत पडून राहिला. यातून त्याला कारस्थानाचं खरं रूप दिसलं. अधिकाऱ्याने सगळी माहिती वाचत असतांना काही माहिती गाळली आहे हे चाणाक्ष हैदरच्या लगेच लक्षात आलं. तरीही त्याने आपला चेहरा निर्विकारच ठेवला. सगळी माहिती वाचून झाल्यावर तो अचानक उठला आणि दिवाणखान्यात आला. त्याने ताबडतोब दरबार भरवला आणि त्यात कारभाऱ्याला

समोर बोलावून जाब विचारला. त्यचं पाप त्यांच्याच पदरी बांधलं. आणि मग कडक शिक्षा सुनावल्या. कटात सामील झालेल्या अधिकाऱ्यांना आपल्या दिवाणखान्यासमोर तिथल्या तिथे फाशीवर लटकवलं. त्यानंतर शत्रू सावध होण्याआधीच मोठीच धरपकड केली. इतर जे ३०० गुन्हेगार होते, त्यांना अचानक पकडून गावातल्या १० चौकाचौकात फाशीवर लटकवलं. राणी आणि राजकुमार दोघांना मधुगिरी किल्ल्यात बंदिवासात नेऊन ठेवलं. तेव्हापासून बिदनूरमधे कधीही कोणत्याही कारस्थानांचा जन्म झाला नाही. त्यानिमित्ताने जगाला हैदरचा दहशतवादी चेहरा पाहायला मिळाला. अशातऱ्हेने कारस्थानाचा सोक्षमोक्ष केल्यावर हैदरने तिथे आपल्या कुटुंबासाठी राजवाडा बांधायला सुरुवात केली. बिदनूरमधे टांकसाळही चालू केली. समुद्रकिनाऱ्यावर होनावरला जहाजं बांधण्याचा कारखाना सुरू केला. नंतर मात्र हैदरला बिदनूरमधे राहण्यातले दोष दिसायला लागले. जगाशी संपर्कात रहायचं, स्वाऱ्या मोहिमा आखायच्या तर हा प्रदेश दळणवळणाला अत्यंत अवघड आहे हे लक्षात आलं. तिथली सर्दट पावसाळी हवा, मलेरियासारखे आजारही त्याला सोसवेनात. शेवटी परत तो श्रीरंगपट्टणालाच आला आणि स्थिरावला. त्याला बिदनूरपेक्षा श्रीरंगपट्टणच राहायला योग्य असं वाटायला लागलं.

हैदरच्या आयुष्यात घडलेल्या या बिदनूर स्वारीनंतर बिदनूरही संपलं. त्याचं वैभव, ती राणी, ते नायक घराणं हे सगळं कुणाचा शाप लागावा तसं काळाच्या उदरात गडप झालं. राणी बिदनूरहून मधुगिरी किल्ल्यात बंदिवासात राहिली. पुढे माधवराव पेशव्यांनी तिची आणि राजपुत्राची सुटका केली. राणी पुण्याच्या वाटेवर असतांनाच मरण पावली. राजपुत्र पुण्यात पोचल्यावर मरण पावला.

## राज्यविस्तार – बेलूर – कूर्ग.

बिदनूर ताब्यात घेतल्यावर परत हैदर त्याच्या राज्यविस्ताराला लागला. घाटाखालचं मराठ्यांच्या ताब्यातलं सोंधे संस्थान होतं ते ताब्यात घेतलं. मराठ्यांची बरीचशी ठाणी हैदरने जिंकून घेतली. आता त्याचं स्वप्न होतं, मैसूर राज्याच्या सीमा कन्याकुमारीपर्यंत नेणं,पश्चिमेचा सागरी किनारा गोव्यापासून खाली त्रावणकोरपर्यंत नेणं आणि पूर्वेला समुद्रापर्यंत नेणं. यात अनेक शत्रूही होते. पण हैदरची सुप्त इच्छा इंग्रज-फ्रेंच-डच लोकांना कायमचं घालवून देणं हीसुध्दा होती. तूर्तास तरी स्वत: सर्वश्रेष्ठ होईपर्यंत या परकियांच्या ज्ञानाचा युध्दसामग्रीचा फायदा करून घेणंच त्याला श्रेयस्कर होतं. हैदरने मग आपली नजर मैसूरच्या दक्षिणेला वळवली. तिथे सीमेलगत होतं बेलूर संस्थान. माधवराव पेशवे १७६६ सालच्या कर्नाटक मोहिमेवरून परत गेल्यावर हैदरने बिदनूरच्या दक्षिणच्या बालम आणि कूर्गकडे नजर वळवली. बालम म्हणजेच बेलूर. विजयनगर साम्राज्याच्या काळापासून इथे पाळेगारांचं राज्य चालत होतं. बिदनूरच्या राणीबरोबर त्यांचे चांगले संबंध होते. वेंकटाद्री नायक हा हैदरच्या काळात बेलूरचा राजा होता. हैदर आपल्यावर स्वारी करणार हे कळल्याबरोबर वेंकटाद्री आपली संपत्ती, कुटुंबकबिला घेऊन बेलूर सोडून कूर्गच्या

चिकवीरप्पाच्या आश्रयाला गेला. तिथे जातांना त्याने बेलूरच्या किल्ल्याच्या रक्षणासाठी फौज ठेवून भक्कम बंदोबस्त केला. कूर्गला गेल्यावर त्याच्या मदतीने वेंकटाद्रीने आपली फौज वाढवली आणि हैदरशी लढण्यासाठी तो तयार झाला. आणि अर्कलगडजवळ दोन्ही फौजांची गाठ पडली. दोन्ही फौजांची घनघोर लढाई झाली. त्यात हैदरच्या फौजेची हार दिसायला लागली. पण डगमगेल तो हैदर कुठला. त्याने नवीन डावपेंच आखले. काही निवडक शूर साहसी सैन्य घेऊन हैदर घनदाट जंगलामधून वाट काढत वेंकटाद्रीच्या फौजेच्या मागच्या बाजूला उगवला आणि मागच्या बाजून बेसावध फौजेवर त्याने जोरदार हल्ला चढवला. या अचानक हल्ल्याने घाबरलेली फौज पळू लागली. वेंकटाद्रीही पळू लागला. हैदरच्या मुलाने, टिपू सुलतानने वेंकटाद्रीची बायकामुलं ताब्यात घेतली. तेव्हा वेंकटाद्री तहावर आला. ५० उंटांवर मावेल एवढा पैसा त्याने हैदरला दिला. वेंकटाद्री मरण पावला आणि त्याचा मुलगा कृष्णप्पा गादीवर आला. हैदरने पाठोपाठ त्याच्यावरही नजर फिरवली. १७७२ मधे बेलूरचं राज्य, राजा संपल्यामुळे आणि मैसूरला जोडल्यामुळे संपलं.

हैदरकडे बिदनूर आलं तेव्हा सागरी किनारा, होनावर, वगैरे बंदरंही आली होती. पण मैसूरहून समुद्रपट्टीला जायचं तर

कूर्गसारखा प्रदेश हाती असणं हैदरच्या महत्वाकांक्षी स्वप्नासाठी जरूरीचं होतं. कारण कूर्गच्या पश्चिमेला असणारा सागरी किनारा, तिथून येणारा माल, फ्रेंचांकडून येणारी युध्दसामग्री आणायला कूर्गमधून जवळच्या रस्त्याने आणता येण्यासारखं होतं. हैदरच्या डोळ्यात आता कूर्गचा चिकवीरप्पा सलायला लागला. कूर्गसारखा साधनसामग्रीने संपन्न देश जिंकण्यासाठी हैदर निमित्त शोधायला लागला. हैदरने आधी त्याला विनाअट शरण यायला सांगितलं. पण वीरप्पाने स्पष्ट नकार दिला. हैदरने मग कूर्गवरच्या स्वारीची तयारी सुरू केली. त्याच्या ताब्यातील बंदरांवरच्या कोळ्यांना किनाऱ्याच्या बाजूने धान्य, सामग्रीची रसद पुरवायला सांगितली. आणि स्वत: भूभागावरून कूर्गला चिमटीत घ्यायला निघाला. त्याच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे तो अचानक कूर्गवर कोसळला. कूर्गच्या उत्तरेला फझलऊल्ला खानला हल्ला करायला नेमलं. कूर्गच्या फौजेबरोबर फझल उल्लाच्या अनेक चकमकी झाल्या आणि त्यात त्याची सपशेल हार झाली. हैदरने फझलला मग जरा दमाने घ्यायला सांगितलं. हैदरला शत्रूवर क्रूरपणे तुटूनही पडता येत होतं आणि आपलं नुकसान व्हायला लागलं की माघारही घेता येत होती. तो कधीही भावनेच्या भरात लढाईचे निर्णय घेत नसे हा त्याचा लढाई जिंकण्यातला मोठा गुण होता. त्याने कूर्गबरोबर तह केला आणि उच्चनगी प्रदेश ३ लाखाला

विकत घेतला. त्यातील काही रक्कम त्याने लगेच भरली आणि उरलेली नंतर द्यायचं आश्वासन दिलं. कूर्गचा राजा या लढाईच्या पाठोपाठ लगेच इ. स. १७६६ मधे मरण पावला. त्याच्यानंतर त्याचे दोन मुलगे मुद्रराज आणि मुदैया हे एकत्रपणे राज्य सांभाळायला लागले. सत्तेत आल्याबरोबर त्यांनी लगेच हैदरकडे उरलेल्या रकमेचा तगादा लावला. पण हैदर टाळाटाळ करायला लागला. तेव्हा या राजांचा धाकटा भाऊ लिंगराजने पैशाच्या वसूलीसाठी परत फझलउल्लावर हल्ला केला. त्याचा पूर्ण पराभव केला आणि त्याचा सगळा तळ ताब्यात घेतला. लिंगराजाला तोफा, खजिना, घोडे, तलवारी अशी बरीच लूट मिळाली. हैदरने कूर्ग जिंकायचा नाद सोडला आणि तो तहाला तयार झाला. हैदर आणि कूर्गच्या राजांमधे बोलणी होऊन सर्व नदी ही दोन्ही देशांची सीमा ठरली. हैदरच्या मनातला कूर्गचे राज्य जोडण्याचा बेत तात्पुरता तसाच राहिला. हैदर कूर्गवर चढाई करत असतांना शिरे, होस्कोटे, दोड्बाळापूर, चिकबाळापूर या संस्थानातले पाळेगार बंडावा करायला लागले तेव्हा त्या लोकांची बंडं मोडून टाकण्याचं काम हैदरला करावं लागलं. त्याने मग मीर रेजाला त्या कामगिरीवर पाठवून दिलं. आणि बंडावा शमवला.

## पुणे दरबार – १७६१.

इ. स. १७६१ मधे हैदर जेव्हा मैसूरचा सर्वाधिकारी झाला तेव्हा आणि मराठ्यांची ठाणी जिंकत चालला होता, तेव्हा पुणे दरबार संकटाच्या आवर्तनात फरफटत होतं. नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू झाला होता. पेशवेपदी माधवरावांची स्थापना झाली होती. १६ वर्षांचा अननुभवी पेशवा राज्य काय सांभाळणार या कल्पनेत आपल्या वकुबाची भरपूर जाणीव असलेले शिंदे होळकरांसारखे सरदार स्वत:च्याच मस्तीत होते. राज्याचा खजिना रिकामा झाला होता. मोठ्या मनुष्यहानीमुळे घरादारात दु:खाचं सावट होतं. अशा परिस्थितीत माधवराव गादीवर आले. स्वराज्याची सर्व दृष्टीने ताकद संपलेली होती. राज्याला परत उभारी द्यायची होती. त्यासाठी आपली माणसं तयार करायची होती. राघोबादादा नावाच्या निखाऱ्याला वारा घालून विंझणाऱ्यांवर वचक ठेवायचा होता. महसूल गोळा करायचा होता. कर्नाटकातून दरसाल येणारा ४०/५० लाख महसूल बुडतोय हे माधवराव पेशव्यांना कळत होतं. शिवरायांच्या काळापासून स्वराज्यात असलेलं, नंतर नानासाहेब पेशव्यांनी मैसूरच्या ताब्यातून मिळवलेलं  शिरे ठाणं हैदरने जिंकून

घेतलंय हेही दिसत होतं. पण कर्नाटकाकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसत झाली नव्हती.

नानासाहेबांचा कैलासवास झाल्यावर लगेच २० जुलै या दिवशी माधवरावांना पेशवेपदाची वस्त्रं मिळाली.

पेशवेपदाची वस्त्रं सातारला जाऊन आणण्याच्या पाठोपाठ मराठ्यांची कमकुवत झालेली परिस्थिती पाहून नानासाहेब पेशव्यांच्या काळात त्यांना द्यावा लागलेला ६० लाखांचा मुलूख जिंकून घ्यायला निजाम हैदराबादहून मोठी फौज घेऊन महाराष्ट्रात उतरला. त्याला आपला वकुब दाखवून देण्याचा प्रसंग माधवरावांवर लगेच आला. माधवरावांची आता कसोटी लागणार होती. माधवरावांचे पाय ओढायला त्यांच्या घरातच अस्तनीतला निखारा फुलायला लागला होता. त्याला, म्हणजे राघोबादादांना साथ होती सखारामबापूंची, पुरंदरे, होळकरांचा दिवाण गंगोबातात्या चंद्रचूड, चिंतो विठ्ठल रायरीकर, तुकोजी होळकर, मानाजी शिंदे, दमाजी गायकवाड आणि सदाशीव रामचंद्र वगैरेंची. आणि माधवरावांच्या मागे उभे राहिले ते त्रिंबकराव पेठे, पटवर्धन, रास्ते, नाना फडणीस. निजामाने मोठी फौज जमवून स्वराज्यावर चाल केली. माधवराव आणि राघोबादादा, दोघेही निजामाला विरोध करण्यासाठी त्याच्यावर चालून गेले. मोठी रणधुमाळी

उठली. माधवरावाच्या पक्षातले सरदार प्राणपणास लावून लढत होते, आणि राघोबादांचे कैवारी दादांच्या मागे अंगचोरपणा करत लढत होते. कारण दादांचे गुप्त मतलब वेगळे होते. निजामाला हरवणं शक्य असूनही दादांनी त्याच्याशी गुप्तपणे बोलणी केली आणि अचानक निजामाशी सलूख झाल्याचं जाहीर केलं. उरळी कांचनला हा तह झाला. माधवरावांचं काहीही चाललं नाही. दादांनी मात्र पुतण्या आपल्या वरचढ होऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली. पेशवाई मिळवण्यासाठी दादांनी निजामाशी सलूख केल्याची चर्चा दरबारात चोरट्या, दबक्या आवाजात सुरू झाली. दादांच्या मागे उभे असलेले समर्थक देशस्थ होते, त्यावरून पुणे दरबारात नवीनच देशस्थ-कोकणस्थ वाद सुरू झाला. पुतण्या-काकावरुन आधीच दोन तट घराघरात निर्माण झाले, त्यात ही आणखी भर पडली. दरबारचं वातावरण नासायला लागलं. माधवराव पेशव्यांना स्वत:चा समर्थन देणारा पक्ष बनवण्याची निकड भासायला लागली. शिंदे पानिपतावर वीरगतीला मिळाले. एक महादजी शिंदे जिवंत राहिले. मल्हारराव होळकर लढाई सोडून निघून आल्याने माधवरावांचा त्यांच्यावर विश्वास राहिला नाही. पटवर्धन घराणं असंच पेशव्यांच्या बाजूने खंदे समर्थन देणारं शूरांचं घराणं होतं. दक्षिण सीमेवर कुणीतरी समर्थ हवं होतं.

## पटवर्धनांची मिरजेत स्थापना.

## इ. स. १७६१.

निजामाबरोबर उरळीकांचनचा तह झाल्यावर दादा आणि माधवराव ताबडतोब उरळीवरूनच कर्नाटकाच्या मोहिमेवर गेले. हैदरच्या गेल्या वर्षभरातल्या चळवळीला आवर घालणं जरूरीचं झालं होतं. पण वाटेत माधवरावांशी झालेल्या वादातून रुसून चिकोडीवरून दादा पुण्यात परतले. आणि माधवराव पुढे गेले. कर्नाटकात जातांना माधवरावांचे खंदे समर्थक गोविंदपंत हरि पटवर्धनांची मिरजेच्या किल्ल्यात स्थापना करून आपली बाजू माधवरावांनी भक्कम केली ती राघोबादादा आणि सखारामबापूंना अतिशय झोंबली. पटवर्धन घराण्यातले पुरूष अतिशय शूर. गोविंदपंत महत्वाकांक्षी, त्यांचे बंधू त्र्यंबकपंत, रामचंद्रपंत, सगळेच बाजीरावांच्या फौजेतले अनुभवी वीर. आणि पुतणे परशुरामदाजी, त्र्यंबकपंतांचे नीलकंठ, कोन्हेरेराव, रामचंद्रपंतांचे परशुरामभाऊ, हेही शूर. गोविंदपंतांचे पुत्र गोपाळराव परक्रमी लढवय्ये, आणि माधवरावांचे खंदे समर्थक. या पराक्रमी घराण्याची मिरजेला स्थापना झाली ती पुढे हैदरशी आणि इंग्रजांशी लढतांना सार्थ ठरली. पावसाळा सुरू होण्यापूर्वी माधवरावांनी तुंगभद्रेच्या

अलिकडचा सगळा प्रदेश परत आपल्या ताब्यात घेतला आणि ते १७६२ च्या जूनमधे ३ महिन्यांनी पुण्याला परतले. हैदरवर अंकुश ठेवण्याची तयारी पेशव्यांनी सुरू केली तेव्हा हैदरशी सामना करायला मराठ्यांकडून त्याच्यासारखा शूर पुरुष गोपाळराव पटवर्धनांच्या रूपाने उभा राहिला. इ. स.१७६१ मधे कर्नाटकात हैदर प्रभावी होऊ लागला. उत्तरेत जसे होळकर, शिंदे आणि पवार होते, तसे स्वराज्याच्या दक्षिण सीमा सांभाळायला पेशव्यांना कुणीतरी त्यांचे खंदे समर्थक असणं जरूरीचं होतं. कारण दक्षिणेत हैदर, निजाम आणि इंग्रज असे बलवान प्रतिस्पर्धी तयार झाले होते. पटवर्धन घराण्याची मिरजेत स्थापना झाली.

कोतवड्याचे हरभट पटवर्धन गणपतीपुळ्याच्या गणेशाचे भक्त. त्या देवतेच्या तपश्चर्येने सिध्दी प्राप्त करून हरभट पटवर्धन हे शाहूराजांच्या काळात देशावर आले. कोल्हापूरजवळ कापशीत विसावले. इचलकरंजीच्या नारोपंत घोरपड्यांच्या आश्रयाने राहिले. हे संताजींचे मानसपुत्र. इचलकरंजी संस्थानचे संस्थापक. नारोपंत ताराराणींच्या पदरी सचिवपदावर होते. नारोपंतांच्या चिरंजीवांचा आणि पेशवे बाळाजीपंत विश्वनाथांच्या अनुबाई या कन्येचा विवाह हरभटबाबांच्या मध्यस्थीने झाला. हरभटांचे सात मुलगे होते. बाळाजी विश्वनाथ आणि बाजीरावांच्या हाताखाली लष्करी शिक्षण घेऊन लढण्यासाठी तयार होऊ लागले. इ.स.

१७६१ मधे माधवराव पेशव्यांनी ८००० फौज आणि २५ लाखांचा सरंजाम देऊन या पटवर्धन घराण्याची स्थापना मिरजेच्या किल्ल्यात केली. गोविंद हरि, त्र्यंबक हरि, आणि रामचंद्र हरि यांच्या नावाने सनद झाली. त्यामुळे इ. स.१७६१ पासून कर्नाटकाच्या सर्व स्वाऱ्यांमधे पटवर्धनांची फौज आघाडीवर असायची. जरीपटक्याचा मान पटवर्धनना मिळाला. कर्नाटकातील जहागीरदारांशी खंडणी ठरवण्याचं कामही गोपाळराव पटवर्धनांवर होतं.. ते पेशव्यांच्या वतीने करारही  करत असत. हैदर आणि गोपाळरावांच्या पुढील दशकभर लढाया झाल्या.

## हैदर आणि माधवराव पेशवे -

आपल्यासमोर अनुभव नसलेला १६ वर्षांचा मुलगा टिकणार नाही याची कर्नाटकात समर्थ झालेल्या हैदरची खात्री होती. त्यामुळे आता कृष्णेच्या तीरापर्यंत पोचायची त्याची महत्वाकांक्षा आकार घ्यायला लागली. आधीच त्याने कावेरी ते तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख आणि तिथला वसूल हडपला होता. हैदरला आता आणखी पुढे जायचं होतं. हैदरने आता धारवाड, बेळगाव, विजापूरपर्यंत मजल मारली.. धारवाड जिल्हा हा काही भाग पटवर्धनांचा, काही भाग पेशव्यांचा आणि काही भाग सावनूरकर नबाबाच्या मालकीने बनलेला होता. हैदरने सावनूरकर नबाबाला आपल्याकडे वळवून घ्यायचा खूप प्रयत्न केला पण नबाब हैदरला चांगलाच ओळखून होता म्हणून बधला नव्हता. हैदर शिरे, बिदनूर जिंकून आणखी श्रीमंत झाला होता, तोपर्यंत १७६३ साल उजाडलं. सावनूर जिंकणं हे त्याचं पुढील उद्दिष्ट होतं.या वर्षीच्या एप्रिलमधे हैदर बिदनूरहून ५००० फौज घेऊन निघाला. मीरफैझुल्लाला त्याने पुढे पाठवलं. मीरफैझुल्ला हा कडाप्पाचा नबाब शूर आणि लढवय्या होता, म्हणून हैदरने त्याला आपल्या नोकरीत घेतला होता. मीरने रट्टेहळ्ळी, हावेरी, देवगिरी अशी सगळी ठाणी जिंकून घेतली. मीर

मग सावनूरवर गेला. सावनूर हे तुंगभद्रा आणि मलप्रभा नद्यांच्या चिमटीतलं मोठं संस्थान. पेशव्यांना मैसुरला जाण्याच्या मार्गावर असलेलं. महत्त्वाचं प्रवेशद्वार. सुपीक प्रदेश असल्यामुळे वसूल मोठा होता. त्यामुळे या संस्थानाच्या मालकीसाठी पेशवे आणि हैदर दोघेही धडपडत होते. हैदर सावनूरवर चालून येणार हे कळल्यावर अब्दुल हकीम खान या सावनूरकर नबाबाने मुराराव घोरपडे, नरगुंदकर भावे, नागपूरकर भोसले या लोकांना मदतीला बोलावलं. सगळे मिळून मीरवर गेले. त्याला वेढा घालून बसले. तेव्हा मीरने आपण फारच भ्यालो आहोत असं नाटक सुरू केलं.

मीर दरवेळी मराठ्यांना घाबरल्याचं नाटक करायला लागला. त्यांनी त्याला धमकवण्याचे जेवढे प्रकार केले त्यात सातत्याने मीर फैझुल्ला घाबरल्याचं नाटक करत होता. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. मराठे बेसावध राहिले. ते फुशारले आहेत हे पाहून मीरने हैदरला गुपचुप निरोप पाठवला. हैदर आपली फौज घेऊन त्वरेने तिथे पोचला आणि डोंगराच्या आडोशाने लांब लपून राहिला. हैदर पोचल्याची बातमी आल्याबरोबर मीरने अचानक बाहेर येऊन घोरपडे, भावे, भोसल्यांवर छापा घातला. मराठे गोंधळले पण भानावर येऊन लढायला लागले. तोपर्यंत दुपार झाली. तुंबळ युध्द सुरू झालं आणी तेवढ्यात हैदर तोफा घेऊन अचानक डोंगराआडून बाहेर आला आणि दुसऱ्या बाजूने

लढायला लागला. त्याने मराठी फौजेला चिमटीत घेतलं. मराठ्यांची पळापळ झाली. खूप माणसं मारली गेली. काही जीव वाचवून पळून गेली. मोठ्या कष्टाने आपला जीव वाचवून सावनूरकर नबाब घरी परतला. हैदर पाठोपाठ तिथेही आलाच. त्याने सावनूरही जिंकलं. नबाबाकडून सारा प्रदेश बळकावला. नबाबासाठी त्याचा वाडा आणि थोडा प्रदेश मात्र ठेवला. नबाबाने हैदरचं मांडलिकत्व कबूल केलं. तिथून हैदर जो उठला तो बंकापूरावर गेला. हा पटवर्धनांच्या जहागिरीतला परगणा. आता हैदरचा बंकापूर किल्ल्याला वेढा पडला. पटवर्धनाचे किल्लेदार गोविंदराव सखदेव महिनाभर हैदरशी तुटपुंज्या फौजेच्या साथीने लढले. पण त्यांची शक्ती कमी पडत चालली. आणि बंकापूरही पडलं. हैदरने जिंकलं. त्याला तो किल्ला फार आवडला.

हैदरने बंकापूरला मुक्काम केला. त्याने सावनूरकर नबाबाला भेटीला बोलावलं. पण नबाब फार घाबरला. हैदरसारखा माणूस आपल्या जीवाला नक्की दगाबाजी करणार हे त्याला माहीत होतं, म्हणून नबाब भेटीला जाणं टाळत होता. शिरहट्टी आणि हरपनहळ्ळीच्या नबाबांनी त्याला धीर दिला. शेवटी सावनूरकर नबाब हैदरला भेटायला गेला, तेव्हा आता रात्र पार झाली, उद्या भेटायला या असं सांगून हैदरने नबाबाला परत पाठवलं. दुसरे दिवशी हैदरने नबाबाच्या दोन भावांना भेटीला बोलावलं. तेव्हा हे

दोन्ही भाऊ ५० हत्यारबंद पठाण माणसं घेऊन हैदरला भेटायला गेले. तेव्हा हैदरच्या सल्लागारांनी त्याला सांगितलं की हे पठाण फार खुनशी असतात. यांनीच नासिरजंगाला आणि मुझफ्फरखानाला दग्याने मारलं होतं, तेव्हा त्यांच्यापासून सावध रहा. तेव्हा हैदरने दोघांना माणसं न घेता भेटीला बोलावलं. त्यामुळे हैदरला दगा करायचाय याची नबाबाला खात्रीच पटली. त्यातच आणखी एक घटना नबाबाचा संशय बळावण्यासारखीच घडली. नबाब बंकापूराला असतांना सावनूरमधे राहणारे हैदरचे लोक नबाबाच्या वाड्यावर चालून गेले आणि अगदी जनानखान्यापर्यंत पोचले. तेव्हा शिरहट्टीचा नबाब त्यांच्या मदतीला धावला त्याने हैदरचे २०० लोक कापून काढले. आणि हैदरच्या गारद्यांना घालवून दिलं. यामुळे नबाब फारच घाबरला. हैदरचे मध्यस्थही हैदरला गारद्यांच्या या कृत्याबद्दल दोष देऊ लागले. शेवटी हैदरने गारद्यांना मागे बोलावून त्यांना दरबारात आणलं आणि दोनचार गारद्यांचे आपल्या आज्ञेचं पालन केलं नाही म्हणून हात तोडले. मसलत बिघडायला लागली म्हणून हैदरने जराशी माघार घेतली. मग दोन्ही पक्ष शांत झाले. सावनूरकर नबाबाने हैदरला हावेरी, देवगिरी, गावं दिली, १ लाख, ३० हजार होन देऊन त्याचं मांडलिकत्व नबाबाने कबूल केलं. हैदरला बंकापूर किल्ला फार आवडला म्हणून त्या किल्ल्याची डागडुजी करून शिबंदी ठेवून

त्याने किल्ला सांभाळायला ५००० लोक ठेवून दिले. मीरफैझुल्लाला तिथे ठेवलं आणि स्वत: बिदनूरला निघून गेला. हैदर निघून गेल्यावर मीरने मोठ्या फौजेनिशी धारवाड किल्ल्याला वेढा घातला. धारवाडची शिबंदी अगदी कमी होती. त्यावेळी गोपाळराव पटवर्धनांचे चुलत बंधू मेघश्यामबापू धारवाड किल्ल्याच्या रक्षणासाठी होते. त्यांनी किल्ला रक्षायची शिकस्त केली. २ महिने किल्ल्यातल्या लोकांनी झुंज दिली पण शेवटी किल्ला सोडायला लागला. किल्ल्यावर आलेला हल्ला पाहून जगले वाचले ते सर्व पळायला लागले. मेघश्यामबापूही पळायला लागले, पण मधेच त्याचं घोडं नाठाळपणे अडलं. त्यामुळे मीरच्या शिपायांनी त्यांना अटक केली. आणि मीरने त्यांना आणि विसाजी नारायण या दोघांना बिदनूरला पाठवून दिलं. श्रीरंगपट्टणचा हैदर, मराठ्यांचा प्रदेश जिंकत तुंगभद्रेच्या दक्षिण तीरापर्यंत पोचला. त्याला अडवायला कुणीही बलवान तिथे मराठ्यांकडून उपस्थित नव्हतं. आता मराठ्यांचे कृष्णेच्या तीरापर्यंतचे परगणे जिंकायचं स्वप्न हैदरला पडायला लागलं. आणि ते सहजसाध्य असेल याची त्याला खात्री होती कारण अजून त्याची खरी ओळख मराठी फौजांशी आणि सरदारांशी झाली . पेशव्यांशी तर नाहीच नाही.

## पुण्याला राघोबादादांच्या हाती कारभार-

उरळीकांचनच्या लढाईनंतर राघोबादादांना स्पष्ट कळून चुकलं की हा आपला तरुण पुतण्या आपल्या ओंजळीने पाणी पिणारा नव्हे. तो स्वतंत्र बुध्दीचा आहे. तेव्हा सखारामबापू आणि दादांनी कारभारातून बाहेर पडायचं ठरवलं. आपण बाहेर राहिलो की माधवराव आपल्याला कारभार घेण्याचा आग्रह करतील अशी सखारामबापूंना आशा होती. पण तसं घडलं नाही. मग दादासाहेबांनी नवीन भांडण उकरून काढलं. दादांनी राज्याची वाटणी मागितली. माधवराव पेशवे म्हणाले की राज्य शिवरायांचं, वाटणी देणारा मी कोण ? तेवढ्यात दादांना कैद होणार अशी अफवा उठली आणि दादा घाबरून पुण्याबाहेर पडले. घोडप नदीवर पारनेरास जाऊन राहिले. माधवरावही फौज घेऊन निघाले. त्यातून घडलं घोडपेवरचं युध्द. माधवरावांचा तळ आळेगावावर होता. ७ नोव्हेंबर १७६२ ला ही लढाई झाली. त्यात माधवरावांचा पराभव होऊन सर्व कारभार दादांच्या हाती आला. माधवरावांची फौज हरली आणि माधवराव राघोबांच्या कैदेत अडकले. २०० राऊत बरोबर घेऊन माधवरावांनी चतुराईने दादांच्या गोटात जाऊन शरणागती पत्करली. दादांचे जोडे डोईवर ठेवून आर्जवे केली.

दादांसमोर हार पत्करल्यामुळे राघोबादादांना चिथावणारे माधवरावांचे शत्रू होते ते फशी पडले. कारण राघोबादादा लगेच विरघळले. माधवरावांनी आपल्या आईला पत्र लिहून आपल्या दूरदृष्टीची चुणूक दाखवली. त्यांनी पत्रात लिहिलं,

" फौजेत फितूर घडवला गेला म्हणून हरलो. इकडील प्रसंग विपरीत झाला म्हणून मातुश्रींनी उदास होऊ नये. काळ सदैव सारखा असतो असे नाही. ”

देशाचा कारभार हाती आल्याबरोबर दादांनी लगेच मिरजेच्या पटवर्धनांवर स्वारी केली. पटवर्धनांनी किल्ला लढवण्याचा निर्णय घेतला. त्या घराण्यात सगळेच आवेशी. मिरजेचे प्रमुख गोविंदपंत, त्यांचे पुत्र गोपाळराव, पुतणे पुरुषोत्तम दाजी, कुरुंदवाड शाखेचे त्र्यंबकपंत, त्यांचे पुत्र नीलकंठ, तासगाव शाखेचे मुख्य परशुरामभाऊ, सगळेच शूर. त्यांच्या स्वभावाला साजेसाच तो निर्णय होता. पटवर्धन आवेशाने लढले. कुणाचीही मदत मिळाली नाही. दादासाहेब सखारामबापूंच्या विचाराने चालणारे. सखारामबापू पटवर्धनांचे द्वेषी कारण त्यांच्यामुळे पेशव्यांची बाजू ताकदवान होत होती, त्यामुळे ते पटवर्धनांच्या मुळावर उठलेले. गोविंदपंतांनी निजामाचं सहाय्य घेण्यासाठी गोपाळरावांना त्याच्या भेटीला पाठवलं. निजामाने गोपाळरावांना नुसतं झुलवत ठेवलं.

काहीही मदत दिली नाही. शेवटी महिनाभर किल्ला लढवून पटवर्धन शरण आले. माधवराव त्या लढाईत उपस्थित होते. पण त्यांना काहीही अधिकार नव्हता. दादासाहेबांचं आपल्या सरदारांना दुखवणं असहायपणे पाहात बसले. मिरज ताब्यात घेऊन मराठी फौजा कर्नाटकात निघणार तोच निजामाने परत पुणे दरबाराविरुध्द शस्त्र उपसलं. यावेळी जानोजी भोसले मुख्य कारण होते.

## राक्षसभुवन लढाई – मराठ्यांचा विजय – निजामाची हार. – इ सन १७६३.

जानोजी भोसले आणि निजाम या दोघांचा कट ठरला की सातारला जाऊन छत्रपतींकडून जानोजींनी कारभार घ्यावा. जो काही लाभ होईल त्यातली वाटणी निजामाचे ६०टक्के आणि जानोजी भोसल्यांचे ४० टक्के अशा प्रमाणात व्हावी. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याने सल्ला दिला की मराठ्यांच्या फौजा पुण्यात नाहीत तोवर हल्ला करावा. त्यानुसार निजाम आणि जानोजी एक झाले. ते कळल्यावर मराठ्यांच्या सगळ्या फौजा उत्तरेकडे सरकल्या. माधवरावांनी मल्हाररावांना गनिमी काव्याने लढण्याच्या मार्गदर्शनासाठी मुद्दामहून बोलावून घेतलं. निजाम आणि नागपूरकरांविरूध्द मोठ्या लढाया झाल्या पण श्रावण शुध्द प्रतिपदा, १० ऑगस्ट १७६३ रोजी गोदावरीकाठी राक्षसभुवनला मोठी लढाई होऊन निजाम पराभूत होऊन फजित पावला, त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर ठार झाला. त्याचं शीरच मराठ्यांनी कापलं.

निजामाची मदत घेण्यासाठी गेलेल्या गोपाळरावांना परत आणण्याविषयी मध्यस्थातर्फे प्रयत्न चालू होते. गोपाळराव परत आले. त्यांचा झगडा सखारामबापू आणि त्यामुळे दादांशी चालला

होता. माधवरावांविषयी पटवर्धन घराण्याला विशेष ममता होतीच. राघोबादादांनी आपल्या पुतण्याच्या हाती परत कारभार दिला. राघोबादादांनी मग गोपाळराव पटवर्धनांची गंगातीरी भेट घेऊन विश्वास दिला. " निरपराध तुम्हांस नाहक गांजिले. तुम्ही गेलांत हे अंतर तुमच्याकडे नाही, आणि गेला आहांत हे आपले चित्ती किमपि नाही. तुम्ही एकनिष्ठ आहात. पूर्वीपेक्षा विशेष कृपा तुमच्यावर आहे " असं ममतेने त्यांच्याशी बोलले. पण दादांचं बोलणं म्हणजे अळवावरचं पाणी, हे साऱ्या दरबारी राजकारण्यांना माहीत होतं. मिरजेची सनद पुन:श्च पटवर्धनांना मिळाली. इ. स. १७६३ च्या दसऱ्याला पटवर्धनांनी मिरजेच्या किल्ल्यात परत प्रवेश केला.

एकंदरीत, इ. स. १७६१, २० जुलैला पेशवेपद हाती आल्यापासून आधी निजामाविरुध्द लढाई, त्यात निजाम पराभव करण्यासारखा असूनही दादांच्या वागण्याने ५ जानेवारी १७६२ ला उरळीकांचनचा तह, त्याच साली नोव्हेंबरच्या ७ तारखेला घोडनदीचा राघोबादादा आणि माधवराव पेशव्यांचा, काका-पुतण्यातला संग्राम, त्यात माधवरावांचा पराभव होऊन दादांचा कारभार,पाठोपाठ मिरजेची लढाई, आणि शेवटी राक्षसभुवनची लढाई, आणि त्यात १०ऑगस्ट १७६३ ला निजामाची हार एवढा काळ माधवराव पेशवे घरगुती भांडणांमधे अडकून पडले. याचा

मोठा फायदा हैदरने उठवला. त्याचा पहिला मोठा शत्रू म्हणजे मराठेच होते. या मराठ्यांच्या राजकारणाचा विचार लक्षात घेणं अतिशय महत्वाचं आहे कारण माधवरावांच्या हाती सत्ता आल्यावर पुढील १० वर्ष सातत्याने हैदरशी मराठ्यांचा संग्राम झाला आणि त्यात अनेकदा हैदरला पळून जाण्याची वेळ मराठी सरदारांनी आणली. याच काळात मोठा बदल निजामाच्या वारसांमधेही झाला. निजामअलीने सलाबतजंगाला सरदारी देऊन बाजूला करून, वर्षभरापूर्वी कारभार आपल्या हाती घेतला होता. त्या सलाबतजंगाला निजामअलीने गळफास लावून ठार केलं. आता निजामअलीच दक्षिणेचा सर्वेसर्वा झाला. आणि निजामाचा उरलेला चौथा मुलगा मीरमोगल हा निजामअलीला घाबरून पळून गेला.

## करचुरी नंजराजैय्याला कैद -

मैसूर राज्यातही हैदरचाही मोठा शत्रू नंजराजैया ह्याचीही कारकीर्द अचानक समाप्त झाली. नंजराजैया हा मराठ्यांच्या आणि निजामाच्या संपर्कात असल्याची बातमी हैदरच्या हेरखात्याने दिली. हैदरला उखडून सत्तापालट करण्यासाठी नंजराजैयाने यांची मदत मागितली आहे हे कळल्यावर हैदरने एक नाटक केलं. नंजराजैयाच्या सल्ला मसलतीची आपल्याला अतिशय गरज आहे, म्हणून त्याने श्रीरंगपट्टणाला यावं असा निरोप त्याने नंजराजैयाला पाठवला. नंजराजैयाने फारसं मनावर न घेता त्याकडे दुर्लक्ष केलं, तेव्हा हैदरने परत परत निरोप पाठवले. नंजराजैयाला आता त्याचा अपमान करणं शक्य नव्हतं. त्याचं कारण त्याला चांगलंच माहीत होतं. त्याला स्वेच्छेने वा निरेच्छेने जाणं भागच होतं. म्हणून त्याने हैदरला, माझी फौज घेऊन येईन, ती सतत माझ्याजवळ बाळगीन अशी अट घातली. हैदरने कुराणावर हात ठेवून ते मान्य केलं. हैदरचा हा निरोप घेऊन त्याचे खास मित्र खाकीशाह आणि गालिब महंमदखान स्वत: गेले. त्यावर निश्चिंत होऊन नंजराजैया श्रीरंगपट्टणाला आला. तो आल्याबरोबर हैदरने त्याची फौज पकडली. नंजराजैयाची जहागीर जप्त केली आणि

त्याला राजकैदी म्हणून घोषित करून किमान गरजा भागवण्यापुरत्या सोयी देऊन कैद केलं. एकदंरीत इ. स. १७६५ पर्यंत तीन नवे नायक कर्नाटक भूमीवर संघर्षाला तयार झाले. महाराष्ट्रात माधवराव पेशवे, हैदराबादेत निजामअली आणि कर्नाटकात हैदरअली.  तिघांचे शत्रू समान. ते म्हणजे इंग्रज. तेही तिघांना खेळवत होते.

# पेशव्यांची कर्नाटक स्वारी- इ. सन १७६४.

इ. स. १७६४ साल उजाडलं. दरबारातले सर्व प्रतिस्पर्धी पेशव्यांनी ठिकाणी लावले. मग त्यांनी कर्नाटकाकडे नजर वळवली. वर्षारंभीच जानेवारीमधे पेशवे हैदरच्या मोहीमेवर निघाले. बिदनूर जिंकून हैदर तिथेच आहे हे पेशव्यांच्या गुप्तहेरांनी पेशव्यांना कळवलं. म्हणून पेशवे बिदनूरावर निघाले. हैदर कधीही दगा देऊ शकतो, याची पूर्ण जाण असलेल्या पेशव्यांनी त्याची समुद्री वाटही बंद करुन टाकण्यासाठी रुद्राजी धुळुपांना वसई-विजयदुर्गाचं आरमार घेऊन जायला सांगितलं, त्याप्रमाणे धुळुपांनी होनावर बंदरही जिंकून समुद्रकिनारा आपल्या ताब्यात घेतला. रुद्राजींना सोंधेकर, मलबारचे नायर, आणि बिदनूरकरही सामील झाले. आता लष्करी आणि नाविक बाजू बंद करुन पेशव्यांनी हैदरला चिमटीत अडकवलं. एवढा बंदोबस्त केल्यावर हैदरशी लढायला गोपाळराव पटवर्धनांना पुढे पाठवून पेशवे स्वत: निघाले. कर्नाटकातील खंडणी घ्यायची बोलणी गोपाळराव करत असत. ती सखारामबापू आणि पेशव्यांना पसंत पडली तर वसूलीचं काम गोपाळराव पटवर्धन करत असत. श्रीमंत पेशव्यांचा मनसब असा होता की बिदनूर आणि सोंधे तूर्तास हैदरजवळच ठेवायचं आणि

३०/४० लाख खंडणी घेऊन दसऱ्याच्या नंतर, हे परगणे घ्यावेत. पावसाळ्यात छावणीसाठी सरदार ठेवले म्हणजे मिळवलेली ठाणी हैदर घेणार नाही याचीही व्यवस्था पेशव्यांनी करुन ठेवली. हैदरकडे ३०,०००पायदळ, १०/१२ हजार घोडेस्वार, ४० तोफा आहेत हेही माधवरावांनी आपल्या आईला, गोपिकाबाईंना पत्रातून कळवलं होतं. माधवराव पेशवे स्वारीचा सविस्तर वृत्तांत सातत्याने आपल्या आईला कळवत असत. हैदर आणि मीर एकत्र होऊन येणार ही बातमी त्यांच्या हेरांनी आणून दिली. पेशव्यांनी ४० हजार फौज जमवली होती. वाटेतील सर्व ठाणी परत जिंकत माधवरावांनी एप्रिलमधे, चैत्र शु. १४ ला सावनूर गाठलं. या नबाबाचा आणि पेशव्यांचा स्नेह होता, एवढंच काय, माधवराव पेशव्यांचा जन्मही याच गावातला होता. नानासाहेब पेशवे दक्षिणेच्या मोहिमेवर असतांना गोपिकाबाईही समवेत होत्या. तेव्हा माधवरावांचा तिथे जन्म झाला होता. अशा नबाबाने पेशव्यांचा सन्मान केला, त्यांना मेजवानी दिली, आणि त्यांना हत्तीही भेट दिला पण तो हत्ती इतका रोड होता की पेशव्यांनीच नबाबाला आपला एक थोराड हत्ती भेट दिला इतकी नबाबाची अवस्था वाईट झाली होती. आपण हैदरला घाबरतो हेही त्याने पेशव्यांना सांगितलं. या आधीच सावनूरचा नबाब घाबरून हैदरला शरण गेला होता, तो पेशव्यांच्या येण्याने निर्धास्त झाला.

हैदरचाच नायनाट केला की आपोआप सगळी ठाणी हाती येतील असा माधवराव पेशव्यांचा  विचार होता. त्यासाठी त्यांनी आखलेली रणनीती अशी होती, की हैदरला झाडीत लपून बसायची सवय होती. तो खुल्या मैदानात कधीही लढायला येत नसे. गेल्या दोन वर्षांमधे झालेल्या घरातल्या लढायांमुळे आणि पानिपतामुळे खजिना रिता झाला होता. म्हणून पैशाची आत्यंतिक निकड होती. म्हणून तुंगभद्रा पार करायची, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी वगैरे ठाणी जिंकायची, खंडणी गोळा करायची, हैदरच्या पिछाडीचा प्रदेश जाळून ओसाड करायचा आणि दूर जायचं. आपण दूर गेलो की हैदर बाहेर येईल, तेव्हा त्याला ताबडतोब गाठावं. त्याचा समूळ नाश करावा, किंवा खंडणी घ्यावी. जसं जमेल तसं करायचं त्यावेळी ठरवायचं.

या लढाईवर इंग्रजांचंही बारीक लक्ष होतं. मराठ्यांची शक्ती क्षीण होणं त्यांना हवंच होतं. हैदर हाच आता कर्नाटकाचा सर्वाधिकारी आहे हेही त्यांनी ओळखलं आणि हैदरशी मैत्री वाढवण्याचा विचार करून त्याला सलोख्याची पत्रं लिहिली. हैदरला बंदुकांची गरज होती, म्हणन इंग्रजांनी त्याला ३००० बंदूका दिल्या दुसरीकडे अर्काटच्या नबाबाला आपल्या समुद्री भागात दोन लढाऊ जहाजं बांधायला परवानगी दिली आणि मराठ्यांच्या आरमारावर  वचक ठेवला.तिकडे बिदनूरात बसलेल्या हैदरला,

युध्द अटळ आहे याची जाणीव झाली. त्याने आपल्या मुलखाचा बंदोबस्त केला. श्रीरंगपट्टणचा बंदोबस्त आपला सरदार मकदूम अलीवर सोपवला. आपल्या सरदारांना बोलावून मसलत केली की उघड्यावर लढण्यापेक्षा डोंगरांच्या, जंगलांच्या आश्रयाने लढावं, बंकापूर आणि धारवाड राखावं. मराठे पावसाळा आला की निघून जातील मग सगळी ठाणी परत जिंकून घ्यायची. पेशवा सावनूरात आलेला कळल्याबरोबर हैदर मार्चमधे बिदनूरहून निघाला. सावनूरच्या दक्षिणेला ३६ मैलांवर रट्टेहळ्ळीच्या जवळ छावणीला राहिला. मीर फैजुल्लाला हनगलला ठेवलं. सावनूर-रट्टेहळ्ळी अंतर सुमारे ५० मैल होतं. हैदर २०,००० घोडदळ, २५,५०० कवायती फौज, २०,००० प्यादी आणि तोफा घेऊन रट्टेहळीला जंगलात पोचला आणि तेथे तळ देऊन राहिला. त्याने उत्तम तोफाही श्रीरंगपट्टणाहून आणवल्या. नेहमीप्रमाणे त्याने, घोडाही शिरणार नाही अशा दाट जंगलात खंदक खणला. त्यावर बातेऱ्या (बॅटरी) बांधून तोफा चढवल्या. जंगलाच्या तीन बाजू बंद आणि एक बाजू उघडी ठेवली.

सावनूरच्या दक्षिणेला ५०/६० मैलांवर रट्टेहळ्ळी. तिथे मीर फौज घेऊन बसलेला, आणि हैदर बंकापूरावर आलेला हे पाहून भ्यालेल्या कोकरागत नबाबाची स्थिती झाली. हैदर जवळ आला आहे, हे पाहिल्यावर सावनूरकर नबाबाने पेशव्यांना गळ घातली

की तुम्ही इथून गेलात की हैदर येईल आणि तुम्हांला सामील झाल्याबद्दल माझा गळा आवळेल. तेव्हा माझ्या रक्षणाची सोय लावा. नबाबाच्या या काकळुतीनंतर पेशव्यांनी महिपतराव चिटणीस, महिपतराव काकडे आणि गोपाळरावांना ५ हजार फौजेनिशी सावनूरकर नबाबाच्या संरक्षणासाठी ठेवून पेशवे तुंगभद्रा ओलांडून सावनूरच्या पूर्वेला असलेल्या हरपनहळ्ळीवर गेले. तिथून दक्षिणेला चित्रदुर्गावर जायचं त्यांनी ठरवलं होतं. गोपाळराव जवळपासच्या ठाण्यांची खंडणी घेत सावनूरच्या जवळपासच हिंडत राहिले. आपण दूर गेलो हे कळलं की हैदर जंगलाबाहेर येईल आणि आपण त्याला गाठू अशी रणनीती ठरवून पेशवे हरपनहळ्ळी, चित्रदुर्गाच्या जवळपासच्या भागात गेले. हैदर आला की त्वरेने निरोप पाठवण्याची गोपाळरावांना आज्ञा देऊन ते पुढे गेले. ऐन वैशाखाचा महिना म्हणजे मे महिना सुरू झाला. पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे गोपाळराव रोज तलाव्यासाठी म्हणजे गस्तीसाठी बंकापूरच्या जवळपासच्या भागात जाऊ लागले. गोपाळराव आणि हैदर या दोन मदमस्त हत्तींची झुंज सुरु झाली. हैदर स्वत: झाडीत शिरून बसला. मीरची फौज बाहेर यायची आणि मराठ्यांच्या छावणीवर हल्ला करून पसार व्हायची. मराठेही सतत गस्तीवर असायचे. त्यामुळे त्यांचं फारसं नुकसान व्हायचं नाही. दोघांचेही पाय रिकीबीतच अडकले होते. हैदरला उघड्या माळावर

लढायला आणण्याची रणनीती गोपाळराव आखत होते, आणि गोपाळरावांना अचानक गाठण्याचे डावपेच हैदर आखत होता. छोट्या छोट्या चकमकी चालूच होत्या.. पण दोघांना एकमेकांवर कुरघोडी करणं जमत नव्हतं. हैदरला आणखी एक चिंता सतावत होती. ती म्हणजे आपण सतत जंगलात राहिलो तर पेशवे आपली सगळी ठाणी परत जिंकून घेतील, त्यामुळे मराठ्यांशी सरळ सरळ आपल्याला फायद्याच्या ठरतील अशा मोक्याच्या ठिकाणी मराठ्यांना आणून त्यांच्याशी झुंजायचं असा त्याने बेत ठरवला.


त्यातच हैदरला बातमी लागली की पेशवे चित्रदुर्गाकडे गेले आहेत म्हणजे सावनूरपासून लांब गेले. मग हैदर आरामात जरा बाहेर येऊन जवळपास हिंडायला लागला. रट्टेहळ्ळीच्या जंगलातून बाहेर आला २५,००० पायदळ आणि १२,००० घोडदळ घेऊन जंगलातून बाहेर आला आणि हरिहरवर खंडणी घ्यायला गेला. हैदर बाहेर पडला हे कळल्याबरोबर पेशवे झपाट्याने रट्टेहळ्ळीला यायला निघाले. गोपाळराव थोडी फौज घेऊन शिरहट्टीवर गेले होते, पेशव्यांनी गोपाळरावांनाही शिरहट्टीहून बोलावून घेतलं. हैदरला उघड्यावर खेचून आणायची कामगिरी त्यांनी गोपाळरावांवर टाकली.

## रट्टेहळ्ळीची लढाई. ३ मे १७६४-पटवर्धनांचा पराक्रम

हैदरच्या दोन गुप्तहेरांनी मराठ्यांची फौज पाहिल्याची खबर आणली. हैदर हरिहरावरून परत येत होता तेव्हा त्याला शिरहट्टीवरून परतणाऱ्या गोपाळरावांची फौज दिसली. त्यांची लहान फौज पाहून हैदरने त्यांना रट्टेहळ्ळीपर्यंत खेचत नेण्याची योजना केली. हैदरने त्यांच्यावर तोफा चालू केल्या तेव्हा मराठी फौज मागे सरकली. तोपर्यंत विंचुरकरांची फौज गोपाळरावांना येऊन मिळाली. हैदरने त्यांना मागे रेटायला सुरुवात केली. मराठेही घाबरे होऊन मागे सरकायला लागले. या छोट्या फौजेला लढाईत गुंतवत रट्टेहळ्ळीला ओढायची आणि मग मीरच्या मदतीने या छोट्या फौजेचा धुव्वा उडवायचा हैदरने विचार केला. पण मराठे हे गनिमीकाव्यातले गुरू आहेत हे त्याला अजून कळायचं होतं. मराठी फौजेनेच आपल्याला बाहेर काढलं हे त्याला माहीत नव्हतं. हैदरला झाडी सोडून उघड्यावर आलेला पाहिल्याबरोबर गोपाळरावांनी पेशव्यांना ताबडतोब त्यांना येऊन मिळण्याचा निरोप पाठवला. त्याप्रमाणे तुंगभद्रा न ओलांडलेले पशवे परत फिरले आणि रट्टेहळ्ळीच्या दिशेने चालायला लागले. खरं तर ते चित्रदुर्गावर गेलेच नव्हते. वाटेतूनच परत फिरले होते. मराठ्यांच्या, सगळ्यांच्या फौजा रट्टेहळ्ळीवर जमायला लागल्या.

## रट्टेहळीची लढाई –

माधवराव पेशवे आणि हैदरअलीच्या या संग्रामात दोन्ही पक्षांना एकमेकांना अजमावता आलं. पेशवे वयाने लहान असले तरी कर्तृत्वात फार मोठे आहेत याची ओळख हैदरला झाली.



मराठ्यांच्या गनिमीकाव्याची पहिली झलक यावेळी हैदरला झाली. गोळागोळी केली की गोपाळराव, विंचूरकरांच्या फौजांनी घाबरल्यासारखं करून मागे हटायचं म्हणजे हैदर आणखीन पुढे येई. असं करत करत पिछेहाट करत करत गोपाळराव आणि विंचूरकर हैदरला पुढे पुढे मोकळ्यावर ओढायला लागले. हैदर रट्टेहळ्ळीपासून त्याच्या छावणीपासून ३ कोस बाहेर आलेला पाहून गोपाळराव खुषीत आले. त्यांना तेच हवं होतं. मीरपासून हैदर दूर आला होता. लढता लढता आपण फार पुढे आलो आहोत आणि मराठ्यांच्या गनिमीकाव्याच्या जाळ्यात अडकत चाललो आहोत, हे त्याला कळलंही नाही. हैदर खूप पुढे आल्यावर त्याला अचानक घोडेस्वारांचा उसळता सागर नजरेला पडला. आत्ता आत्ता लहान दिसणारी फौज एवढी मोठी कशी झाली तेच त्याला कळेना. तो चक्रावला. हजारोंनी दिसणारी फौज अचानक ६०,००० झाली. आणि हैदरच्या डोळ्यांसमोर भर उन्हातही अंधार झाला. आपण मराठ्यांच्या जाळ्यात पुरते अडकलो याची जाणीव झाली. त्याला पेशव्याचं निशाण वाऱ्यावर फडफडतांना दिसायला लागलं. घोडेस्वार, पायदळ, हत्ती आणि शौर्याने पेटलेली मराठ्यांची सेना यात तो पूर्णपणे घेरला गेला. पण तोही डगमगणारा नव्हताच. मीर हैदरला येऊन मिळाला आणि हैदर झुंजीला तयार झाला.

३ मे १७६४.

वैशाख शुध्द द्वितीया. वैशाखातलं रणरणतं ऊन. नद्या कोरड्या झालेल्या. गोळागोळीनेही वातावरणात आणखीनच आगीची भर आणि उष्णतेची भर. दोन्ही प्रतिस्पर्धी उघड्यावर आले. दोन्ही फौजांमधे धमासान लढाई सुरु झाली. आता सोक्षमोक्ष करुन टाकायला दोन्ही पक्ष उतावीळ झाले होते. मराठ्यांनी जोरदार उठाव केला. गोपाळरावांनी तोफा सुरु केल्या. हैदरची माणसं पत्त्यासारखी कोसळायला लागली. उजवीकडे पटवर्धनांची ८००० फौज, डावीकडे नारोशंकरांची फौज, त्यांच्या मागे विठ्ठल शिवदेव विंचूरकरांची फौज आणि पुढ्यात साक्षात माधवराव पेशवे...हुजरातीची फौज. तोफाही सुरू झाल्या. हैदरला आपल्या गोटापर्यंत जाणंही अशक्य झालं. त्याच्या फौजेत गोळे जाऊन पडायला लागले. तोफांच्या बरोबर जेजाला, बाण यांचाही मारा सुरू झाला. पटवर्धनांच्या फौजेत ऐन पंचविशीतले परशुरामभाऊही लढत होते. हैदरच्या तोफांनी त्यांच्या मांडीखाली गोळा लागल्याने ती घोडी मेली. भाऊंनी दुसरा घोडा घेतला, तेव्हा पुढच्या तोफेच्या गोळ्याने भाऊंचा दुसराही घोडा मेला. भाऊंनी तिसरा घोडा घेतला पण तो आणि भाऊ दोघेही जिवंत राहिले. हुजरातीचे १०० घोडे मेले, २०० शिपाई जखमी झाले आणि ४०/५० माणूस ठार झालं तर हैदरकडचं १५० माणसं ठार, ५/६ शे

जखमी, आणि १२५ घोडेस्वार ठार झाले. हैदर घाबरला. त्याची मस्ती जिरली. हैदरच्या फौजेस मराठी लष्कराची दहशत बसली. मराठ्यांच्या गनिमीकाव्याचा पुरता साक्षात्कार झाला. इतक्यात संध्याकाळ झाली. पाणी आणि अन्नाशिवाय लढणारी फौज अजून थकली नव्हती, आणि हैदरवर जोरदार मारा करतच होती. अचानक निसर्गच हैदरच्या मदतीला आला. त्या उघड्या माळावर अचानक धुळीचं वादळ उठलं आणि काहीही दिसेनासं झालं. पेशव्यांनी आपल्या घोडदळाला हैदरवर चालून जायला सांगितलं. जेजाला, बाण, तोफा सगळं एकदम चालू झालं. स्वत: माधवराव पेशवे घोड्यावर बसून चालून गेले. पण धुळीमुळे काहीही दिसेना तेव्हा पेशव्यांनी तोफा थांबवायला सांगितलं. आणि त्या संधीचा फायदा घेऊन हैदर त्याच्या गोटाकडे पळून गेला.

दुपारी सुरू झालेलं हे युध्द ६ तासांनी सूर्यास्ताला संपलं. गोपाळरावांचा जोश मात्र अजून संपलेला नव्हता. रात्रभर तिथेच मुक्कामाला राहून हैदरला कोंडून ठेवण्याची त्यांची खुमखुमी, त्यांची आर्जवं मात्र पेशव्यांनी मंजूर केली नाही. कारण गोपाळरांवांच्या अंगात जोश असला तरी फौज दमलेली होती. लष्कराला पाणी प्यायचं होतं, जेवायचं होतं आणि विश्रांती हवी होती. रात्री फौज आपापल्या राहुटीत विसावली. मराठ्यांचा गनिमीकावा म्हणजे काय असतो याचा पाठ त्यादिवशी

रट्टेहळ्ळीला हैदरला मिळाला. माधवराव पेशव्यांनी हैदरला दुसरे दिवशी खलिता पाठवला. त्यात लिहिलं होतं,

" आम्ही आपलं नाव ऐकून होतो. आम्ही आपल्या शौर्याच्या कथा खूप ऐकल्या होत्या. म्हणून आपणांशी लढण्यासाठी आलो होतो. आमच्या वडिलांनी शूर लोकांशी मैत्री करण्याचा सल्ला दिला होता. आमचीही तीच इच्छा होती. आपणाबद्दल ऐकलेले सर्व खरे आहे की नाही याची खात्री नव्हती. म्हणून प्रत्यक्ष गाठ घ्यायला आलो. माझी इच्छा आहे की आपण आमच्या डेऱ्यात यावं. तसे न झाल्यास आम्ही समजू की नबाबसाहेब खरे शिपाई नाहीतच. त्यांच्याबद्दल जे ऐकलं ते सत्यापासून खूप दूर आहे. आपण उद्या न याल तर त्याच्या पुढच्या दिवशी आम्हीच आपणाला भेटायला येऊ आणि आपणाला भेटायला किती उत्सुक आहोत हे दाखवून देऊ. ”

ही चिठ्ठी हैदरकडे मध्यरात्री पोचली, तेव्हा हैदरने चिठ्ठीतला मजकूर हसण्यावारी नेला. पण गुप्तहेरांनी त्याला बातमी दिली की पेशव्यांची आपणाशी गाठ घ्यायचा निश्चय केलाच आहे, आणि त्यांनी आपल्या सर्व सरदारांकडून तशी इमानदारीची शपथ घेतली आहे. हैदरने मग निर्णय घेतला आणि मध्यरात्री गुपचुप आवाज न

करता तळ सोडला. सकाळी ७ वाजता तो अनवडीच्या किल्ल्यात जाऊन थांबला. मराठ्यांच्या नावाने हैदर इतका हादरला होता.

रट्टेहळ्ळीच्या युध्दानंतर दुसरे दिवशी सकाळी मराठ्यांनी परत हैदरचा पाठलाग सुरू केला. रट्टेहळ्ळीच्या पलिकडे मसूर गाव आहे. तिथे जायला एक खिंड आहे. त्याला मसुरची बारी म्हणतात. हा रस्ता अतिशय खडतर. त्यात अरुंद रस्ता आहे. त्यात घनदाट जंगल ! हैदरने रट्टेहळ्ळीची छावणी मध्यरात्री गुपचुप सोडली आणि तो मसूरच्या बारीत पोचला. बारीच्या पलिकडे अनवडी गाव आहे. हैदरला लागणारी रसद, म्हणजे वैरण, चारा, दाणा, तिथून येत होतं. पेशव्यांनी ती बारी बंद करून टाकली. त्याामुळे हैदरच्या फौजेचा दाणागोटा बंद झाला. विसाजीपंतांनी या मसूरच्या बारीत जाऊन दाणा वैरण न्यायला आलेली हैदरची तट्टे, उंट आणि सामान पकडलं आणि आपल्या छावणीत नेलं. हैदर मसूरच्या जंगलात शिरला हे कळल्यावर दुसरे दिवशी सखारामबापू, आबा पुरंदरे, विसाजी नारायण हे सर्व सरदार आपापली पथकं घेऊन हैदरची छावणी दिसते का ते पहायला जवळच्या उंच टेकडीवर पोचले. हैदरची टोळी त्यांच्या मागावर होती. तिने अचानक या सरदारांवर हल्ला केला. पण थोडी गोळागोळी होऊन सगळे सुखरूप परत आले. हैदर मसूरवरून पुढे जवळच्या मायनहळ्ळीला चार दिवस विश्रांतीसाठी जाऊन राहिला.

पेशव्यांच्याही छावणीत खलबतं सुरू झाली. ज्येष्ठ महिना संपत आला होता. छावणी करायची की नाही याचा विचार पेशव्यांनी सुरू केला. छावणी करण्याचे फायदे बरेच होते. एकतर हैदरवर दहशत बसणार होती. नाहीतर पेशवे आणि फौजा परत गेल्यावर हैदरने आतापर्यंत पेशव्यांनी मिळवलेलं यश धुवून टाकलं असतं. पेशवेच राहणार म्हटल्यावर सर्व सरदारांवरही धाक राहणार होता. म्हणून पेशव्यांनी छावणी करायचं ठरवलं. सावनूरपासून दहा कोसांवर गोपाळरावांनी रहायचं आणि त्यांच्यापासून दहा कोसांवर पेशव्यांची छावणी आणि पेशव्यांच्या छावणीच्या अवतीभोवती दहा कोसांच्या अंतराने इतरांनी तळ ठेवायचं असा निर्णय झाला.

मराठी लष्कर छावणीला रहाणार हे हैदरच्या गुप्त हेरांनी हैदरला सांगितल्यावर हैदरने आपल्या सर्व सरदारांना बोलावलं आणि त्यांचा विचार घेतला. सर्व सरदारांचं मत पडलं की हैदरसमोर कुणीही टिकणार नाही. लढाई चालू ठेवावी. तेव्हा हैदरने तोच निर्णय ठरवला. आणि तो सावनूर काहीही झालं तरी घ्यायचंच या निर्णयाला आला. कर्नाटकातील स्वारी आणि हैदरवर दहशत ही पेशव्यांची राजकारणातील गरज होती. विशीतला मुलगा, आपलं पाणी जगाने ओळखावं हे धोरण त्यामागे होतं. हैदरसारख्या वाघाला आणि पुण्यातल्या मुरलेल्या राजकारण्यांना आणि सरदारांना वचक बसावा म्हणून केलेली ही खेळी होती. पेशवे


माधरावांना स्वत:ला आपलं स्थान स्थिर करण्यासाठी हैदरवर विजय मिळवणं, कर्नाटकातला वसूल पूर्ववत सुरू करून खजिना भरणंही आवश्यक होतं. त्यामुळे पेशव्यांनी धारवाडजवळ छावणी करायची असं ठरवलं. पेशवे राहिले की सारे सरदार राहणार हे ओघानेच आलं. फौजही राहणार. हैदरची खोड मोडणं हाच उद्देश यामागे होता. कर्नाटकातील जहागीरदारांनाही पेशवेही काही कमी नाहीत हे दाखवून देणं माधवरावांना आवश्यक होतं.

सावनूरकर नबाबाला अभय देण्यासाठी पेशव्यांनी १००० गारद्यांची फौज सावनूरला ठेवली. सावनूरकर नबाबाला ५०००० रुपये देऊन लष्करभरती करायला सांगितलं. पटवर्धनांच्या फौजेला नबाबाजवळ ठेवलं. गोपाळराव असले की माधवरावांना काळजी नव्हती. हैदरने गोपाळरावांची ताकद ओळखली होती. हा सव्वाशेर आपलं काही चालू देणार नाही याचा अंदाज हैदरला नक्कीच आला होता. गोपाळरावांच्या अंगात वीरश्री संचारली की ते घोड्यावरून खाली उतरून लढायला लागत, इतके बेभान होत. सावनूरकर नबाबाचीही चिंता मिटली. पटवर्धनांनी सावनूरपासून दहा कोसांवर रहायचं आणि पटवर्धनांपासून दहा दहा कोसांवर विंचूरकर, भोसले, नारोशंकर यांच्या फौजा ठेवल्या. रास्ते सरदार खरं तर पेशव्यांचे सख्खे मामाच, पण ते आतून हैदरला मिलाफी आहेत अशी पेशव्यांची भावना होती, शिवाय घोडपच्या लढाईत

ते दादासाहेबांनाही सामील होते. माधवरावांना सोडून त्यांनी विरूध्द पक्ष घेतला होता. त्यामुळे रास्तेमामांवर त्यांचा भरवसा कमी होता. सावनूरवर गोपाळराव पटवर्धनांची नेमणूक होण्यासही राजकारणच होतं. त्र्यंबकराव पेठे आणि पटवर्धनांमुळे माधवरावांचा पक्ष बलवान झाला होता. हे दरबारातील दादांच्या पक्षाला सलत होतं. माधवरावांची शक्ती कमी करणं म्हणजेच राघोबादादांचा पक्ष मजबूत करणं हे दादांच्या पक्षातील लोकांचं लक्ष्य होतं. माधवराव जेव्हा सावनूरच्या रक्षणाला कोणाला पाठवावं याचा विचार करायला लागले, म्हणून सखारामबापूंनीच पटवर्धनांचं नाव सुचवलं. गोपाळरावांनी सावनूरवर रहाणं नाकारलं असतं तर पटवर्धन लोक तुमचं ऐकत नाहीत अशी बदनामी करता आली असती, गोपाळरावांनी जबाबदारी पत्करली आणि हैदरशी लढतांना मारले गेले तर ठीकच, निदानपक्षी त्यांची ताकद तरी कमी होईल, आणि जगले वाचले तर आपण योग्यच सल्ला दिला याचं श्रेयही मिळेल अशा दुहेरी हेतूंनी सखारामबापूंनी गोपाळरावांचं नाव सुचवलं. गोपाळरावही कच्च्या गुरुचे चेले नव्हते. सखारामबापूंचा कुटील हेतू त्यांच्या लगेच लक्षात आला आणि त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. बापूंना तोंडघशी पाडायला हे चांगलं निमित्त होतं आणि हैदरवर जरब ठेवण्यातही त्यांना यश येणार होतं. गोपाळरावांची फौज नवलगुंदच्या जवळपासच्या भागातील कामं

करण्यासाठी गेलेली होती. ती येईपर्यंत नबाबाची फौज मदतीला घेऊन गोपाळरावांनी नबाबाचं रक्षण करायचं आणि १५ दिवसांनंतर पेशव्यांनी त्यांना मदत पाठवायची असा बेत गोपाळराव आणि माधवरावांच्यात झाला. त्याप्रमाणे फक्त १२०० स्वार घेऊन गोपाळराव आणि त्यांचे बंधू सावनूरावर मुक्कामाला आले. गोपाळरावांना नबाबाने प्रत्येक शिपायाचा रोजचा ४ आणे खर्च द्यायचंही कबूल केलं. शिवाय नबाबानेही घाबरून सावनूरला राहाण्याचं कबूल केलं नाही. तो पेशव्यांच्याबरोबर रहायला गेला.

# बंकापूर झुंज :- पटवर्धन आणि हैदर.



हैदरच्या ताब्यात अजून बंकापूर, धारवाड किल्ले होते. त्यामुळे या दोन भागांच्या जवळपास लष्कर ठेवून पेशवे स्वत: मुदगलची खंडणी घ्यायला गेले. हैदरच्या गुप्तहेरांनी ही बातमी आणली. हैदर निराश झाला. पण मराठ्यांना स्वस्थ बसू द्यायचं नाही असा त्यानेही निश्चय केला. म्हणून तो स्वत: बंकापूरावर आला आणि लालमिया नावाचा त्याचा सरदार होता, त्याला मराठ्यांवर घिरट्या घालत त्यांना छळत राहण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे लालमियाने सावनूर आणि बंकापूर यांच्या दरम्यान एक चौकी बांधून तिथे मुक्काम केला.

सावनूरमधे आल्या आल्या नीलकंठ पटवर्धनाने एक लहान टोळी घेतली आणि सरळ लालमियाच्या तळावर अचानक हल्ला केला. त्याचे ३०० स्वार आणि गारदी कापून काढले आणि त्याची घोडीही पळवून आणली. पुढच्या वेळी लालमियाची टोळी आली तेव्हा त्याचे घोडे हिसकावून घेत त्याला पळवून लावलं. पटवर्धनांची फौज रोज बंकापूरापर्यंत जाऊन तलावा करुन येई या त्यांच्या गस्त घालण्यामुळे हैदरच्या फौजेला पायबंद बसला. त्यांच्या गुरांना अन्न मिळेना, रोज लुटलं जाण्याचंही नुकसान व्हायला लागलं.हे हैदरला कळलं. त्यामुळे गोपाळरावांना समूळ नष्ट करण्याची योजना हैदरने आखली. ते साधायचं तर दगाबाजी करणं आलंच. या वेळी तो अनवडीला होता. त्याने १५००० गार्दी,

६००० स्वार आणि तोफा घेतल्या आणि २ दिवस रात्रभर जंगलातली वाट तुडवत हनगलला पोचला. हे अंतर सुमारे ४० मैल आहे. तिथे हैदर ४ दिवस राहिला. तिथून तिन्हीसांजेला निघाला आणि मध्यरात्री बंकापूरला पोचला. हे अंतर १३ मैल आहे. तिथे लालमियाच्या छावणीत थोडी विश्रांती घेऊन सावनूर आणि बंकापूरच्या मध्यावर एक ओढा आहे तिथल्या जंगलात हैदर दबा धरून बसला. तिथे त्याने आपल्या फौजेच्या २ टोळया केल्या. त्यातील १००/१५० लोकांना सावनूरच्या वाटेवर उभं केलं. आपल्या १०० लोकांना पाहून त्यांच्यावर हल्ला करायला पटवर्धनांची फौज आली की दबा धरून बसलेली हैदरची फौज पुढे येणार आणि त्या सर्वांना कापून काढणार. असा त्याचा बेत होता.

गोपाळरावांना हैदरच्या या कपटाचा सुगावा बातमी काढणाऱ्यांकडून मिळाला. त्यांनीही काटशह योजला. त्यांनी आपल्या काही स्वारांना रोजच्याप्रमाणे तिथे पाठवलं आणि सक्त ताकीद दिली की काही झालं तरी त्या स्वारांनी ओढा ओलांडायचा नाही. उलट हैदरच्या लष्कराला दिसेल असं जागा न सोडता उभं रहायचं आणि ओढा न उतरता जमलं तर त्याच फौजेला सावनूरकडे आणावं. त्याप्रमाणे पटवर्धनांची फौज ओढ्याजवळ गेली पण पुढे जाऊन ओढा उतरेना. दोन्ही बाजूंनी एकमेकांना आपल्या बाजूला खेचण्याचे प्रयत्न चालू ठेवले. पण हैदरचा कट

निष्फळ झाला.दोन दिवस रात्रभर जंगलातून चालत आलेला हैदर आधीच न जेवता दबा धरून ओढ्यावर बसून राहिला, पण निराश होऊन परत गेला. त्यादिवशी गोपाळरावांवर तो इतका संतापला की या हिसक्याने त्या रात्री तो कुणाशी बोलला नाही की जेवलाही नाही. आता पेशव्यांना धडा शिकवण्याचा एकच मार्ग म्हणजे सावनूरावर हल्ला करुन ते जिंकून घेणं.

दुसऱ्या बाजूला गोपाळरावांचीही पंचाईत झाली होती. १५ दिवसांनी पेशवे फौज पाठवून गोपाळरावांना मोकळं करणार होते ते न होता गोपाळराव अडकले. सावनूरचे लोक त्यांना जाऊच देईनात. तेव्हा राजवाड्याच्या सदरेवर बसून गोपाळरावांनी सर्वांना धीर दिला आणि पेशव्यांची फौज येईपर्यंत तुमच्या बरोबर मीही राहीन असं सांगितलं. तेव्हा त्या लोकांना जरा धीर आला. हे पेशव्यांना कळल्यावर त्यांनी सर्व सरदारांना सावनूरला बोलावलं. ही हकीकत कळल्यावर हैदरचा काहीच उपाय चालेना, आणि तो माघारी परत अनवडीला जाऊन राहिला.

हैदरने मग आपला वकील ऑगस्टमधे पेशव्याकडे बोलणी करायला पाठवला पण तह काही झालाच नाही. तह होत नाही हे पाहिल्यावर पेशव्यांनी धारवाडास वेढा घातला. सावनूरला चिंचूरकर, रास्ते यांना ठेवून गोपाळरावांना धारवाडला बोलावून

घेतलं. धारवाडला हैदर येणार याची पेशव्यांना खात्री होती, कारण आता तो किल्ला हैदरला वाचवायलाच हवा होता. गोपाळरावांनी १५००० फौजेसह गस्त सुरू केली. तलाव्यास गेल्यावर एक दोन दिवस ते रानातच मुक्काम करत असत. त्यांनी दगाबाज हैदरवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवली. पण हैदरने त्यामुळे आपली चाल बदलली. धारवाड, सावनूर नाही तर दुसरीकडे कुठे, याचा विचार करून त्याने हावेरी निवडलं. हावेरी मराठ्यांचं ठाणं होतं तिथे मराठ्यांची शिबंदी होती.

## हावेरीवर हल्ला -

आता हावेरीला लक्ष्य केल्यावर हैदरने नवीन कपट केलं. सावनूर किंवा धारवाड- मराठ्यांची कुठची तरी फौज त्याला कमी करायची होती. वेढा सैल करायचा होता. मग त्याने आपल्या गुप्तहेरांना हावेरीला पाठवलं. तिथे रखवालीला असलेल्या शिपायांना शिंदी - दारू स्वस्तात वाटली. हवी तेवढी दारू पाजली. पहाऱ्यावरची माणसं दारू पिऊन झिंगून पडली. तेव्हा मीरच्या हाताखाली, ४००० घोडदळ, ७/८ हजार गारदी, १६ तोफा घेऊन पहाटे हावेरीला पोहचून छापा घातला आणि किल्ला बळकावला. पहारेकऱ्यांच्या मुसक्या आवळल्या. दारू उतरल्यावर शिपायांना काय झालं ते लक्षात आलं. सूर्योदय होता होता हावेरीवरून ही बातमी द्यायला राऊत धावत सावनूरला आले आणि विंचूरकरांच्या कानावर ही बातमी घातली. विंचूरकरांना हा हल्ला कळल्याबरोबर ते हावेरीला धावले. हावेरी हे वर्धेच्या काठावरचं सावनूरहून २०/२२ मैलांवरचं ठाणं.

तो भाद्रपद महिना होता. त्यातून पितृपंधरवडा. लष्करातल्या लोकांनी तिथेच पितरांच्या श्राध्दासाठी त्यादिवशी जेवणं घालायचं ठरवलं होतं. लष्करातही सणवार,सोयर-सुतक, सर्व चालतच असे.

त्यामुळे थोड्याच लोकांना घेऊन विंचूरकर, भोसले निघाले. दोन्हीकडून लढाईला तोंड फुटलं. मराठी फौजांना विजय दिसत होता, पण तेवढ्यात वर्धा नदीला पूर आला. मराठी फौज अडचणीत सापडली. मागे वर्धा नदीचं घोंघावणारं पाणी आणि पुढ्यात शत्रू. अशा परिस्थितीत लढाई सुरू झाली. आधीच त्यादिवशी एकादशी होती. फौजेतल्या अनेकांना उपवास होता. सकाळी उपाशी पोटी, स्नान न करताच1१० कोसांची दौड करून लढायला आलेली मराठ्यांची फौज संध्याकाळी थकून थांबली. मीरही थांबला. या लढाईत आघाडीवर असलेले विंचूरकर होते ७० वर्षांचे अजूनही अंगात रग असलेले तरूण. नदीला पाणी फार म्हणून त्यादिवशी रात्री विंचूरकरांनी हावेरीतच मुक्काम केला. हावेरी परत ताब्यात आली.

# हावेरीची लढाई. १७६४.




धारवाडचा विजय. ६ नोव्हेंबर १७६४.

पेशवे धारवाडवर होते. धारवाड घेतल्याशिवाय हलायचं नाही असा पेशव्यांनी निश्चयच केला होता. गोपाळराव पटवर्धन आणि विंचूरकर हैदरला धारवाडला जाण्यापासून रोखण्याच्या कामावर होते. त्यामुळे हैदरला धारवाडला जाता येईना. धारवाड किल्ला

जबरदस्त भक्कम होता. दुहेरी कोट होते. परत दोन खंदक होते. पेशव्यांनी त्यांच्या छावणीपासून किल्ल्याच्या बुरुजापर्यंत सुरुंग खणला. त्यात दारूचे बुधले ठेवले आणि बत्ती दिली. एकाच धडाक्यात किल्ल्याचे दोन बुरुज उडले. पेशवे तिसराही बुरुज उडवणार होते, पण तेवढ्यात किल्ल्याच्या आतील लोकांकडून निरोप आला की गोपाळरावांच्या उपस्थितीत किल्ला देतो. हल्ला थांबवा. तेव्हा लढाई थांबली. गोपाळराव ५० स्वारांसह त्वरेने तिथे पोचले. करार झाले आणि धारवाड किल्ल्यावर मराठ्याचं निशाण लागलं. कार्तिक शु. १२ ला, ६ नोव्हेंबरमधे किल्ला हातात आला. नारो त्र्यंबक एकबोटे याने मोठा पराक्रम गाजवला, त्यावर खूष होऊन पेशव्यांनी त्याला पालखीचा मान दिला. ( पालखीचा मान मिळाला की त्याचे भोये, मशालजी,त्या मशालींना लागणारं तेल, वगैरे सर्व गोष्टी सरकारातून मिळत. आणि पालखीतून जाणं हा गौरव असे. )

पेशवे धारवाडहून लगेच सावनूरला जाणार होते, पण आधी हैदरवर जायचं ठरलं. म्हणून ते हनगलच्या रोखाने चालू लागले. हैदर तेव्हा जडे अनवडीला होता. जडे आणि अनवडी ही जवळजवळची दोन गावं. हैदर तिथे बंदोबस्ताने राहिला होता. त्याच्या तीन बाजूंनी दाट जंगल होतं. लष्कराभोवती त्याने भिंतच बांधून टाकली. लष्कराच्या पुढे एक ओढा होता. अशा रीतीने

हैदरने चारी बाजूंनी बंदोबस्त केला. हैदर जंगलात दबा धरून बसला होता हे कळल्यावर पेशवे फौज घेऊन जडे अनवडीला आले. १६ नोव्हेंबरला बाळा नदीच्या पलिकडे एक कोसावर त्यांनी आपला तळ ठोकला. नदीच्या दुसऱ्या बाजूला एक कोसावर हैदर होता. रात्रीच्या वेळी नदीच्या पलिकडे जाऊन मराठ्यांवर हल्ला करण्याची झुंज त्याने चालूच ठेवली होती. पण मोठ्या लढाईला तोंड फुटत नव्हतं.

जडे अनवडीची लढाई. १ डिसेंबर १७६४

पेशव्यांनी मग आपली व्यूहरचना केली.


पेशव्यांनी दोन दिवस झाडीत लपलेल्या हैदरच्या फौजेवर तोफा चालवल्या त्या जाळपोळीने हैदरची फौज हैराण झाली. तेव्हा हैदर झाडीच्या बाहेर आला. जोरदार लढाई झाली. पूर्वेला पटवर्धनांची फौज, पश्चिमेला रास्ते, नारो शंकर, भोसले यांच्या फौजा होत्या. जवळच एक टेकडी होती. पेशव्यांनी त्या टेकडीवर तोफा नेल्या. हैदरने इस्माईलखान नावाच्या आपल्या सरदाराला आणि एका पोर्तुगीज अधिकाऱ्याला तोफा हिसकावण्यासाठी पाठवलं, पण मराठी फौजेने त्या दोघांना आणि त्यांच्या लोकांना कापून काढलं आणि तोफा वाचवल्या. त्यानंतर मात्र हैदरच्या छावणीवर तोफगोळे बरसू लागले. दारू उत्तम म्हणून गोळे लांबवर जाऊन पडू लागले. आत जाऊन लपलेल्या हैदरच्या फौजेला आत राहाणं कठीण झालं. तेव्हा हैदर चिमटीत सापडला. हैदरचं खूप नुकसान झालं. तेव्हा मराठ्यांच्या तोफाच हिसकावून घ्याव्यात म्हणून हैदरने आपल्या तोफा घेतल्या आणि तो झाडीबाहेर येऊन आगीचा वर्षाव करायला लागला. जंगलातून बाहेर येऊन हल्ला सुरू करेपर्यंत हैदर कुणाला दिसलाच नाही. एकाएकी मारा सुरू

झाल्यावरच मराठी लष्कराला हैदर बाहेर आल्याचं कळलं. त्याच्या तोफांच्या माऱ्याने मराठी फौज विस्कळीत झाली. पेशव्यांचे गारदीही शत्रूशी झुंजायला लागले. मुरारवार घोरपड्यांच्या अंगात वीरश्री संचारली. ते एकटेच झुंजत राहिले. हे कळल्यावर टेकडीच्या पायथ्याशी असलेले पेशवे फौजेसह धावत तिथे पोचले. शत्रूच्या व्यूहात शिरले. गारद्यांची कत्तल सुरू केली. पेशव्यांचे सैनिक आत झाडीत शिरले पण घोडेही आत जाणं कठीण होतं. श्रीमंत पेशवे यांनी निशाणाचा हत्ती पुढे घातला. स्वत: घोड्यावर बसले. हैदरच्या सैनिकांनी गोलाकार बुरुज बनवून शत्रूशी लढाणं चालू ठेवलं होतं. पण पेशव्यांचा हत्ती आल्याबरोबर शत्रूची गोलाकार रचना मोडली. हैदरची फौज पळू लागली. विस्कळीत झाली. त्याबरोबर मराठी फौज त्यांच्यावर तुटून पडली. भयंकर कापाकापी झाली. पण दाट झाडीमुळे मराठ्यांची सगळी फौज आत जाईना. ज्यांना जमलं ते आत शिरले. या लढाईत मराठ्यांची फौज इतकी क्रूरपणे वागली की त्यांनी हैदरच्या मेलेल्या शिपायांच्या शवांवरून हत्ती चालवला आणि अग्नीने अनेक पार्थिव देह पेटवले. आजवरच्या युध्दांमधे मराठ्यांनी एवढं क्रूरपणे वागणं कधीही घडलं नव्हतं, पण हैदरवर दहशत बसवण्यासाठी त्यांनी हे कृत्य केलं.

पेशव्यांनी त्याच्या छावणी बाहेरची, बिदनूरच्या वाटेवरील झाडं आधीच कापून खाली पाडून वाट बंद करून ठेवली होती. पळायच्या वाटा अवघड करून ठेवल्यामुळे हैदरच्या फौजेला पळून जाणंही मुष्किल झालं. हैदरने आपल्याला कुणी ओळखू नये म्हणून आपले नेहमीचे कपडे बदलले आणि तो जीव वाचवण्यासाठी पळून जायचा विचार करायला लागला. हैदर मग थोडी फौज घेऊन बिदनूरला कसाबसा पळून गेला. हैदरचा मोठा नाश झाला. ३००० बंदूका, छावणीचं सामान, ५००/६०० तोफा, ७०० घोडे, उंट, भरपूर लूट पेशव्यांच्या हाती आली. त्याची ५००/६०० माणसंही पकडून आणली, 1/२ हजार फौज कापली गेली. मराठ्यांकडील मात्र ३०/४० माणूस मेलं. आणि तेवढीच घोडी. पेशव्यांचा दरारा निर्माण होणं ही मोठी घटना घडली. पुढच्या स्वाऱ्यांमधे पेशवे असतील तिथे हैदर कधीही शिरला नाही. हैदरला आजपर्यंत एवढा बलवान प्रतिस्पर्धी कधी भेटला नव्हता. तो पेशव्यांच्या रूपाने समोर आला. मराठ्यांचा पराक्रम, गनिमीकावा, लढण्यातला चिवटपणा सगळं या स्वारीत अनुभवायला मिळालं.

पण हैदर नशिबवानही खूप होता. पेशव्यांनी बिदनूरवर जाऊन हैदरचा समूळ नाश करायचं ठरवलेलं असतांना ऐनवेळी दादासाहेबांनी तिथे येऊन हैदरला वाचवलं. पेशवे या स्वारीत गुंतलेले असतांना दादासाहेब नाशिकला बसून परत माधवरावांच्या

विरुध्द उचापती करण्यात दंग होते. पेशवे कर्नाटकात निघाले तेव्हा त्यांच्या विश्वासातल्या त्र्यंबकमामा पेठे - चिमाजीआपांच्या पत्नीचे भाऊ, म्हणजे सदाशीवभाऊंचे मामा. म्हणून दरबारात ते त्र्यंबकमामा या नावानेच ओळखले जात. गोविंद शिवराम खाजगीवाले या दोघांना त्यांनी दादासाहेबांच्याजवळ ठेवून दादांच्या वर्तनावर, उद्योगाची खडान् खडा माहिती घेत होते. दादासाहेबांनी फौज जमवायला सुरुवात केली आहे ही बातमी पेशव्यांना कळली. माधवरावांच्या विश्वासू लोकांकडून या बातम्या यायला लागल्या, तेव्हा त्यांनी राघोबादादांना आपल्याजवळ कर्नाटकात बोलावून घेतलं. दादांनी खूप अटी घालून माधवरावांकडे येण्याचं कबूल केलं. आणि सर्वाधिकार त्यांना देण्याचंही मान्य केलं. तेव्हा दादासाहेब कर्नाटकात पोचले. हरपनहळ्ळीवर पेशवे आणि दादासाहेबांच्या भेटी झाल्या. तोपर्यंत तहाची बोलणी वकीलांबरोबर सुरू झालेली होती.




जडे-अनवटी-सावनूर युद्ध

## मराठे-हैदर-अनंतपुराचा तह. ३० मार्च १७६५.

शेवटी ३० मार्च १७६५ या दिवशी अनंतपूरला हैदर आणि पेशवे यांच्यात तह झाला. म्हणून या तहाला अनंतपूरचा तह म्हणतात. दादासाहेबांमुळे बिदनूरचं राज्य हैदरकडेच राहिलं. शिऱ्याचा सुभाही पेशव्यांच्या हातून गेला. सावनूर आणि गुत्ती ही दोन संस्थाने मात्र मराठ्यांना मिळाली. ३० लाख रुपये देण्याचं हैदरने कबूल केलं. बंकापूर आणि बसवापट्टण या दोन ठाण्यांबद्दल मात्र एकमत होईना. पेशव्यांना हे दोन्ही परगणे हवे होते आणि हैदरला हे दोन्ही परगणे सोडायचे नव्हते. शेवटी सखारामबापू बोकीलांनी तोडगा काढला. बंकापूर हे भक्कम किल्ला असलेलं स्थळ आणि बसवापट्टण हे बिदनूरच्या वाटेवरचं महत्वाचं ठिकाण. बंकापूर हे पटवर्धनांना दिलेलं जहागिरीतलं गाव होतं. बंकापूर पेशव्यांकडे आणि बसवापट्टण हैदरकडे अशी वाटणी झाली आणि तिढा सुटला. पेशव्यांनी नाईलाजाने ते कबूल केलं. या तहात पटवर्धनांच्या मेघश्यामबापूंचीही सुटका झाली ही मोठ्या आनंदाची गोष्ट पटवर्धनांसाठी होती.

माधवरावांना तह पूर्ण करायची घाई होती कारण इंग्रजांनी कोकण किनारपट्टीवर कुरापती काढण्यास सुरूवात केली होती,

निजामही स्वराज्याला झोंबायला लागला होता. त्यामुळे पुण्याला परतण्याची पेशव्यांना घाई झाली होती. हैदरवर दहशत बसवण्याचं काम मात्र फत्ते झालं होतं. पेशव्याचंही स्थान भक्कम झालं होतं. दादासाहेबांची बाजू लंगडी झाली होती.  या तहाचा दूरगामी परिणाम म्हणजे हैदर कायम राहिला, इंग्रजांची सत्ता वाढण्यास मदत झाली.

## कृष्णराज वोडीयारचा मृत्यू –
## २५ एप्रिल इ. सन १७६६

१७६६ साल उजाडलं. या वर्षी कृष्णराज वोडीयार निधन पावला. करचुरी नंजराजैयाची कन्या ही त्याची प्रथम पत्नी. १७४६ साली हिच्याशी वोडीयारचा विवाह झाला. बिलूगुलीची देवजम्मा ही द्वितीय पत्नी आणि बेट्टदकोटेच्या कट्टी गोपलराज अरसुची लक्ष्मणीअम्मांनी ही तिसरी पत्नी होती. कृष्णराज वोडीयार याला दोन राण्यांपासून दोन पुत्र झाले. पहिला नंजराज आणि दुसरा बेट्टद चामराज. त्याला दोन मुलीही झाल्या. त्यांची नावं होती दिपजम्मा आणि देवजम्मा. दुसऱ्या राणीला मुलगा झाला पण बालवयातच मरण पावला. तिसऱ्या राणीला छनम्मा ही एकच मुलगी होती. या राजाचं सर्व आयुष्य वादळी घडामोडी पाहण्यात गेलं. मुळात ६ व्या वर्षी तो केवळ राजयोग भाळी लिहिला होता म्हणून सिंहासनावर बसवला गेला. पण त्यानंतर कायम दलवाई देवराजैया आणि सर्वाधिकारी नंजराजैया यांच्या मुठीत राहिला. या दोघांच्या तावडीतून सुटला तो केवळ हैदरअली नावाच्या एका आणखी एका महापाताळयंत्री, मुरब्बी, सर्वश्रेष्ठ राजकारण्याच्या राजकीय नाट्यपूर्ण खेळीमुळे. आणि परत आपलं स्वातंत्र्य गमावून बसला.

त्या कचाट्यातून सुटण्याचे त्याचे प्रयत्न अयशस्वी झाले. केवळ एक नाममात्र वोडीयार म्हणून तो जगत राहिला. आपलं आयुष्य दानधर्म आणि साहित्य, कला यांच्या वृद्धीसाठी खर्च करत राहिला. मरणापूर्वी कृष्णराज वोडीयारने आपली पत्नी लक्ष्मणीअम्माजवळ आपली अखेरची इच्छा बोलून दाखवली. आपलं साम्राज्य एका मुसलमानाच्या हाती गेलंय ते सोडवून घेण्याचे प्रयत्न तिने करावेत असं त्याने सुचवलं. कृष्णराज वोडीयारच्या निधनानंतर त्याची आई, राजमाताही मरण पावली. तिनेही आपलं तेच शल्य आपल्या सुनेजवळ बोलून दाखवलं आणि त्यासाठी धडपड करायला सांगितलं.

## नंजराज – नवीन वोडीयार – इ. सन १७६६

आता परत मैसूरच्या गादीचा वारस ठरवण्यात दरबारातील राजकारण्यांची शक्ती कामाला लागली. कृष्णराज वोडीयारचा अंत झाला तेव्हा हैदरअली मलबार मध्ये नायर लोकांशी लढण्यात व्यस्त होता. मलबारमध्ये हैदर अलीला वोडीयारच्या मृत्यूची बातमी कळवणारी पत्रं गेली आणि पुढील वारसाची निवड करण्याची आज्ञा मागितली. कृष्णराज वोडीयारचे दोन मुलगे, त्यातील मोठा राजपुत्र १८ वर्षांचा होता, म्हणजे आपल्या हातातील सत्तेला धोका होता हे हैदरअलीला स्पष्ट दिसत होतं. त्यामुळे थोरल्या राजपुत्राला डावलून धाकट्या मुलाला गादीवर बसवण्याचा स्पष्ट हुकूम हैदर अलीने गुप्तपणे श्रीरंगपट्टणचा किल्लेदार मकदूम अलीला दिला. आणि देखाव्यासाठी, जो वारस गादीला लायक असेल त्याला वोडीयार करा असं पत्रात लिहिलं. पण प्रत्यक्षात किल्लेदार मकदूमअलीला दरबारी प्रतिष्ठितांची आणि राजमातेची मानसिकता पाहून ज्येष्ठ राजपुत्रालाच वारस म्हणून निवडावं लागलं. हैदर अली मोहिमेवरून परत येईपर्यंत राज्याभिषेक होऊन गेला होता आणि नंजराज हा राजा म्हणून सत्तेत आला.

# मलबारचा तह...११ एप्रिल १७६६.

नवीन वोडीयार सिंहासनावर बसला तरी तोही नाममात्र राजा म्हणूनच जगणार होता. माधवराव पेशवे निघून गेले होते. हैदरने आता आपलं लक्ष मलबारकडे वळवलं. मलबार हाती येणं हे हैदरच्या सार्वभौम होण्याच्या महत्वाकांक्षेला पूरक ठरणारं होतं. कारण गोवा पोर्तुगीजांच्या हाती असल्याने त्या खालचा सर्व पश्चिम किनारा आपाल्या हाती ठेवण्याचं स्वप्न हैदर पहात होता. ह्या किनाऱ्यावर आपलं राज्य असणं म्हणजेच सर्व दक्षिण भारत आपल्या हातात असणं हे त्याला पक्कं ठाऊक होतं. पश्चिम किनाऱ्यावर १५ व्या शतकापासून अनेक परकीयांनी वसाहती स्थापून आपला जम बसवला होता, त्या सर्वांवर राज्य करणं हेच हैदरला हवं होतं. बिदनूरच्या स्वारीप्रमाणेच हैदरच्या मलबार स्वारीला एक कारुण्याची, क्रूरपणाची, साहसाची, आणि सत्तासंघर्षात टोकाला जाऊन लढण्याच्या अतिरेकीपणाची झालर आहे. या मोहिमेची सुरुवात हैदरने केली नाही, पण तो संधीची वाट पहात असतांना त्याच्यासमोर ही संधी चालून आली.

मराठ्यांशी लढाई संपल्यावर मराठ्यांच्या फौजा उत्तरेकडे वळल्या. मग हैदरनेही आपला मोर्चा मलबारकडे वळवला.

झपाटल्यासारखा हैदर स्वाऱ्या, मोहीमा काढत होता आणि खजिना भरत होता. मलबारच्या लढाया पाहाण्यासाठी मलबारचा इतिहास थोडासा जाणून घेणं जरुरीचं आहे. नायर लोकांचा हा प्रदेश. ( नायर म्हणजे नायक. ) आख्यायिका सांगते की एक दांपत्य नेडीयुरुप्पु गावात रहात होतं. त्यांना दोन मुलगे होते. त्याची नावं होती, मणिक्कन् आणि विक्रमन. हे दोन्ही मुलगे चेरियन वंशाच्या राजाच्या पदरी लष्करी अधिकारी होते. या राजाने आपल्या प्रदेशाची वाटणी करतांना या दोन्ही बंधूंना काहीही  भूमी दिली नाही. तेव्हा हे दोन्ही बंधू नाराज झाले पण काही बोलले नाहीत. काही काळानंतर राजालाच आपली चूक कळली आणि त्याने या दोन्ही बंधूंना आपली मोडकी तलवार दिली आणि आपला रोज पूजेत वापरायचा तुटका शंख दिला आणि या तलवारीने तुम्ही मिळवाल तेवढी जमीन तुमची अशी आज्ञा दिली. तेव्हा या दोन्ही शूर पुरूषांनी जवळपासची सारी ठाणी जिंकून स्वत:चं राज्य निर्माण केलं. आपल्या ध्वजावर चित्र काढलं तेही आपल्या राजाची आठवण म्हणून  दोन तलवारी, त्यांच्यामधे एक शंख आणि त्यावर ज्योत. यानंतर या राज्याचा विकास होत गेला. कालिकत हे बंदर त्यांनी उभारल्यावर तर परदेशी जहाजांची तिथे वर्दळच सुरु झाली. दालचिनी, युरोपियन आणि अनेक अरब जहाजं कालिकतला थांबायला लागली, आपले पश्चिम घाटात पिकणारे मिरे,

लवंगा,वेलदोडे, वगैरे मसाले, मलबारमधे बनणारं तलम सुंदर कापड म्हणजेच कॅलिको असा माल घेऊन परतायला लागली. यामुळे मलबारचे नायर लोक सधन झाले. या राजांनी मिळालेल्या महसूलातून मोठी फौज उभारली आणि आणखी राज्यविस्तार केला. मलबार श्रीमंत झाल्यावर सुंदर नगरं निर्माण झाली आणि मलबारमधलं सामाजिक जीवनही ढवळलं गेलं. जहाजं घेऊन व्यापारासाठी येणारे हे अरब किनाऱ्याला लागले की चार सहा महिने मुक्काम करत असत. त्यांनी हिंदू स्त्रियांशी संसार थाटले. त्यातून जी अर्धे हिंदू-अर्धे अरब अशी संतती निर्माण झाली ती मोपला  नावाने ओळखली जाऊ लागली. मोपला हा मूळ महापिल्ला म्हणजे महा आणि पिल्ला या शब्दाचा अपभ्रंश. मलबारचे नायर ही अतिशय शूर जमात. हा मलबार प्रांत विजयनगरच्या देवराय राजाने इ. स. १४२४ मधे जिंकून घेऊन आपल्या राज्याला जोडला. घाटावर असलेलं बिदनूरही या साम्राज्यात सामील झालं.

२७ मार्च इ. स. १४९८. मलबारच्या भविष्याला मोठं स्थित्यंतर आणणारा दिवस. त्यादिवशी दोन अपरिचित जहाजं आणि माणसं कालिकत किनाऱ्याला लागली आणि त्यांनी भारताचा राजकारणाचा राजकीय खेळच बदलून टाकला. त्या जहाजांच्या कप्तानाचं नाव होतं वास्को द गामा. पोर्तुगाल नावाच्या

देशातली ती जहाजं होती आणि तिथल्या गामा गावच्या वास्को नावाच्या तरुणाने किनाऱ्यावर आपलं जहाज नांगरलं होतं. आधीच अरब आपली जहाजं घेऊन येत आणि वस्ती करत. आता नव्या पाहुण्यांची ओळख बंदरावरच्या लोकांना झाली. त्यातून सुरु झाला संघर्ष. कैक वर्षांपासून कालिकतमधे येऊन वसाहत करुन राहिलेल्या अरबांनी या लोकांचा धोका ओळखला आणि त्यांनी विरोध करायला सुरुवात केली. तोपर्यंत पुढच्या शतकात आणखी खलाशी अवतरले. इ. स. १६०४ साली डच लोकांनी ह्या भूमीवर पाय ठेवला. या सगळ्यांनी आपापल्या वखारी घातल्या. त्यावरून त्यांचे एकमेकांशी झगडे सुरु झाले. देशी राजांना आपापल्या शस्त्रांनी मदत करायला सुरुवात केली. आणि स्थानिक राजकारण बिघडायला लागलं. राजलक्ष्मीची  वरमाला कधी याच्या गळयात तर कधी त्याच्या गळयात असे. दक्षिणेतील राजवंश निवडायला लागली. घरोबा बदलायला लागली. इथले भूमीपुत्र आधी अरबांनी बाटवलेले होते, त्यात ख्रिश्चन बाटग्यांची भर पडली. त्यातून समाजव्यवस्थाही उलथीपालथी होऊ लागली. धार्मिक संतुलन बिघडलं. त्याचा परिणाम म्हणजे फौजेतही अनेक धर्म शिरायला लागले. लष्कर म्हणजे अनेक धर्मांचं एक कडबोळं व्हायला लागलं.या पश्चिम किनाऱ्यावर छोटी छोटी अशी अनेक संस्थानं होती. प्रत्येक राजा आपापल्या भूभागाचं संरक्षण करत असतांना

त्यांचा पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्लिश या परकीयांशी सतत संबंध यायचा. हे लोक या स्थानिक राजांना युध्दशस्त्रांची मदत करून राजकारणातही थोडा थोडा भाग घेत असत. हे सर्व राजे विस्कळितपणे तिथे नांदत होते. त्यांना एकत्र ठेवणारा कुणी मोठा सत्ताधीश त्या काळात नव्हता हे हैदरने हेरून ठेवलं होतं. हैदरच्या मनात त्यातील प्रत्येकाशी वेगवेगळं लढून जिंकणंही सोपं होतं. पण तशी संधी, हल्ला करायला कारण त्याला मिळत नव्हतं.

त्यातच होता एक कोन्नूरचा अली राजा. हा अलीराजा सतत परदेशी लोकांशी संघर्ष करत आपलं अस्तित्व टिकवून होता. हैदरने बिदनूर जिंकल्याबरोबर अलीराजाने हैदरचं महत्व ओळखून अभिनंदन करणारा संदेश पाठवला आणि आपला एक वकीलही हैदरकडे पाठवला. त्याला नजराणाही पाठवला. हैदरने ही सुवर्णसंधी सोडली नाही. त्याने अलीराजाशी मैत्री वाढवली. त्याला विश्वासात घेऊन आपल्या होनावरच्या आरमाराचं मुख्य केलं. नवीन बोटी बांधणं, विकत घेणं हेही काम त्याच्यावरच सोपवलं. त्याच्या भावाला, शेख अलीला, सर्व बंदरांच्या देखभालीच्या कामावर नेमलं. हैदरने दाखवलेल्या या विश्वासामुळे अलीराजाला अति जोर चढला. त्याने जवळच्या मालदीववर हल्ला करून ते जिंकून घेतलं. मालदीवच्या सुलतानाला कैद करून त्याला आंधळंही करून टाकून हैदरसमोर आणलं. हैदर खरं तर

मनातून अलीराजाच्या वागण्यावर नाराज झाला. त्याने त्या सुलतानाला आपल्या राजवाड्यात ठेवून जास्तीत जास्त बडदास्त ठेवण्याचा प्रयत्न केला. आणि त्याला शांत केलं. अलीराजाला त्याच्या पदावरून दूर केलं, पण संबंध मात्र तोडले नाहीत.

अलीराजा त्यामुळे आणखीनच शेफारला. त्याने आपल्या जवळपासच्या सर्व जमीनदार, रयत, व्यापारी, यांच्याशी बेतालपणे वागायला सुरुवात केली. कुणाचाही पैसा, जमीन हडपणं हे नेहमीच झालं. मलबारमधले नायर लोक हे खूप शूर म्हणून प्रसिध्द होते. ते कालिकतच्या झामोरिन राजाला आपला नेता मानत होते. मलबारमधले मोपला हे हिंदू-मुस्लीम मिश्र संकर जास्तच लढाऊ बाण्याचे होते. त्यांनी या हिंदू नायरांना त्रास द्यायला सुरुवात केली. मोपला लोकांचा छळ सहनशक्तीला पार करून गेला तेव्हा या नायरांनी गुप्तपणे एक कट केला. मोपलांवर सूड उगवण्यासाठी सर्व नायरांनी आपापल्या गावातल्या मोपलांची एकाच दिवशी कत्तल करायला सुरुवात करायची असं गुप्तपणे ठरलं. कालिकतमधील नायर लोकांनी ठरलेल्या दिवशी अचानकपणे मोपलांवर हल्ला करून त्यांना कापून काढायला सुरुवात केली. एकाच दिवशी मलबार मधले ६००० मोपला कापले गेले. काही पळून गेले. काहींनी प्रतिकार केला आणि मग मेले. काही कोन्नूरला पळून गेले. हा जो हाहा:कार माजला तेव्हा अलीराजाने हैदरला तातडीने

मदतीला बोलावलं. हैदरला हवी ती संधी अशा रीतीने आकस्मिकपणे मिळाली. मलबार जिंकण्याचं कित्येक दिवसांचं त्याचं स्वप्न अशा प्रकारे सत्यात आलं. हैदरने लगेच ३००० घोडदळ, ४००० कवायती फौज, 10,000 पायदळ घेऊन मलबारकडे कूच केलं. मलबारकडे जाण्यापूर्वी त्याने बिदनूरच्या बंडखोरांनी या हिंदू नायरांना सामील होऊ नये म्हणून बिदनूरचा बंदोबस्त केला.

अलीराजाला आरमाराच्या नोकरीतून काढल्यावर हैदरने स्टॅनेट नावाच्या एका इंग्रजाला आरमाराचा मुख्य म्हणून नेमलं होतं. हैदरने त्याला समुद्रमार्गाने आपल्याला समांतर रहायला सांगितलं. आणि हैदर भूमार्गाने मलबारकडे निघाला. बिदनूरनंतर घाटमार्गे कुंदापूरला आला. कुंदापूरला त्याला अलीराजाही येऊन मिळाला. त्यानंतर दोघे नीलेश्वरमला पोचले. नीलेश्वरमहून हैदर आणि अलीराजा कोन्नूरच्या नदीच्या तटावर जाऊन पोचले. तोपर्यंत हैदरचं आरमारही पोचलं. नायरांचा सूड घेण्यासाठी उतावीळ झालेले १२००० मोपलाही हैदरला जाऊन मिळाले.

कोन्नूरला पोचल्यावर हैदरकडे कालिकतच्या राजाने मानाविक्रमाकडे बोलणी आणि मागण्या घेऊन आपला वकील पाठवला. मोपलांना न्याय मिळावा आणि गुन्हेगार नायर लोकांना

शिक्षा व्हावी, शिवाय इ. स. १७५७ पासून न मिळालेली खंडणीही मिळावी असा त्याच्या मागण्या होत्या. शांततेने बोलणी झाल्यास उत्तमच, नाहीतर हल्ला करावा लागेल अशी धमकीही दिली.कालिकतच्या मानाविक्रमाने हैदरशी लढण्याची पूर्ण तयारी केलेलीच होती. हैदरला अलीराजा आणि मोपला लोक मिळाल्याची बातमीही त्याच्याकडे आली. त्याने हैदरला निरोप पाठवून सांगितलं की हैदरचा या घटनेशी दुरान्वयेही बंध नाही. आमचं आम्ही काय करायचं ते बघून घेऊ. त्याने कोन्नूर नदीचं पाणी प्यावं एवढाच त्याचा या देशाशी संबंध…त्याने इथून निघून जावं. नदी ओलांडू नये. हैदरच्या वकिलाने हे उत्तर हैदरला कळवलं. एक ते सव्वा लाख नायर लढा द्यायला तयार आहेत हेही कळवलं. हैदरने या फौजेची पूर्ण माहिती काढलेली असल्याने त्याला या संख्येची भीती नव्हती. कारण या नायरांकडे ना घोडदळ होतं, ना लष्करी शिक्षण, ना शस्त्रं. त्यांच्याकडे फक्त धनुष्यबाण होते. जंगलात लपून बसायचं, बाहेर यायचं , लढून परत आत जायचं एवढीच त्यांची रणनीती होती. हैदरने या माहितीच्या आधारावर आपली रणनीती आखली. आपली हालचाल कळणार नाही अशी त्याने जागा शोधली. आपल्या फौजेला नावांमधून नेता येईल तितकं आतपर्यंत नेलं. ४ तोफाही वाहून नेल्या. आणि मग तो जवळच असलेल्या समुद्राच्या ओहोटीची वाट पाहात राहिला.

समुद्राला ओहोटी आली की नदीच्या पाण्यालाही उतार मिळायचा. तशी संधी मिळाल्याबरोबर हैदरने आपलं घोडदळ नदीपार करून पैलतीरावर नेलं. फौजही नदी तरून गेली. हैदरची फौज नदी पार करेपर्यंत नायर लोकांना दिसलीच नाही. एकदम सुरू झाला तो तोफांचा धडाड धाड आवाज. तोफांचे गोळे जंगलाच्या दिशेने पडायला लागल्यावर नायर फौजेत पळापळ सुरू झाली. त्या पळणाऱ्या लोकांना हैदरच्या घोडदळाने कापून काढायला सुरूवात केली. प्रचंड गोंधळ माजला. काही नायर धनुष्यबाण वापरून हैदरच्या लोकांना जमिनीवर पाडायला लागले. काही पळून गेले. काही जंगलात लपून शत्रूवर हल्ला करू लागले. भयंकर लढाई सुरू झाली. मोपलांनी आपला सूड उगवला. नायरांचं शिरकाण मोठ्या प्रमाणात झालं. पळून जाणाऱ्या फौजेला पाहून आणि मागून येणाऱ्या घोडदळाला पाहून देवळं, शेतं, वाडे ओसाड झाली. गावंच्या गावंही ओसाड झाली. काहींनी इंग्रजांच्या, माहे गावच्या फ्रेंचांच्या किल्ल्यांचा आश्रय घेतला. हैदरचीही फौज मोठ्या प्रमाणात कापली गेली. पण अंतिम विजय हैदरचा झाला. हैदर कालिकतपासून ४२ मैलांवर येऊन पोचला आणि त्याने परत कालिकतच्या राजाशी बोलणी करायला वकील पाठवला. राजा लगेच कबूल झाला. तुमच्या येण्याची वाट पाहात आहोत असा निरोप पाठवला. तेव्हा हैदर त्याला भेटायला निघाला.

त्याच्याबरोबर मोपलाही होतेच, त्यांनी वाटेत लागणाऱ्या नायरांच्या जमीन जुमल्यांची नासधूस केली. त्यांची घरं लुटली. हे पाहून काही नायर लोक जमा झाले आणि त्यांनी हैदरची फौजच कापून काढली. हैदर या बातमीने भयंकर खवळला. त्याने दिसेल त्या नायरला कापून काढायचा हुकूम सोडला. त्यात मोठी कत्तल झाली.

हैदर कालिकतला जात असतांना वाटेत कालिकत राजपुत्राचा किल्ला लागला. तो राजपुत्र पळून त्रावणकोर राजाच्या आश्रयाला गेला होता. नंतर हैदर तेलीचेरीला पोचला. तिथल्या नदीच्या काठावर त्याने तळ ठोकला. हैदरला नदी ओलांडू द्यायची नाही या प्रतिज्ञेने तेलिचेरीचे लोक गावाचं रक्षण करायला गोळा झाले. हैदरने नदी ओलांडलीच आणि त्याच्या घोडदळाने परत मोठ्या प्रमाणावर कत्तल करत गावात रक्ताचे पाट वाहवले. हैदरची फौजही मारली गेली. हैदर कालिकतच्या इंग्रजांच्या किल्ल्यात मुक्कामाला थांबला. राजाला निरोप पाठवल्यावर दोघांची भेट झाली. ११ एप्रिल १७६६ साली या दोघांची भेट होऊन तह झाला.

मानाविक्रमनेच राज्य करायचं हे त्या तहात हैदरने मान्य केलं. हैदरला राजाने खंडणी द्यायची हेही ठरलं. ४ लाख रुपये हैदरला फौज खर्च देणं कबूल केलं. हैदरला राजाने २ हंडे भरून रत्नं आणि

सोनं दिलं. एका हंड्यात रत्नं होती. एका हंड्यात सोनं होतं. शिवात सोन्याच्या दोन तोफाही भेट दिल्या. राजाची भेट संपली. तह झाला आणि राजा राजवाड्यात परत गेला. त्याबरोबर हैदरने आपलं खरं उग्र, कठोर रूप धारण केलं. कालिकतला वेढा घालायचा आपल्या फौजेला त्याने गुप्तपणे हुकूम सोडला. गावाच्या भोवती आपली फौज पसरली आणि राजाला नजरकैदेत ठेवलं. राजवाड्याचा, त्याच्या लोकांचा, ताबा घेतला. इ. स. १७५७ सालापासून कालिकतने मैसूर राज्याचं जे देणं होतं ते फेडायची मागणी केली. राजावर हैदरने दबाव आणला. त्याबरोबर गावात धावपळ सुरू झाली. व्यापारी, दरबारी, सावकार सगळेजण पैसा गोळा करायला लागले. पण तेवढी रक्कम गोळा होईना. तेव्हा राजाने शब्द दिला आणि लवकरात लवकर पैसा पोचवू अशी खात्री दिली. पण हैदरला विश्वास नव्हता. त्याने राजवाड्याला पोचणारी रसद- धान्य, भाजीपाला, दूध सगळं अडकवलं. राजा रोज अन्नदान म्हणून लोकांना जेवायला घालायचा आणि मग स्वत: जेवायचा. लोकांना जेवण मिळेनास झालं आणि राजालाही उपास घडू लागला. हे सगळं होईपर्यंत १० दिवस सरले. २० एप्रिल पर्यंत हैदर कालिकत मधेच बसून होता. आता मात्र हैदरला घरी परतायचे वेध लागले. मान्सून जवळ यायला लागला. त्या आधी त्याला मैसूरला पोचायचं होतं.

याच काळात झामोरीन राजाला त्रावणकोरच्या आणि कोचीनच्या हिंदू राजांकडून, त्याचा धिक्कार करणारी पत्रं येऊन पोचली. त्यांना नायर लोकांची झालेली हत्या, राजाने हैदरशी केलेले करार, आणि राज्य मुसलमान राजाच्या हाती सोपवल्याचं कळलं. त्यांनी, राजाला धर्म भ्रष्ट केल्याचा ठपका ठेवत त्याची मान्यता काढून घेत आहोत असं कळवलं. झामोरीन राजाला वाळीत टाकण्याची धमकीही दिली. याचा राजावर मोठा मानसिक आघात झाला. हैदर आपल्याला ठार करेल ही भीती त्याला छळत होतीच. एकीकडे हैदरने त्याचा छळ मांडला होता, पैसा लुबाडला गेला होता, त्याच्या फौजेला कापून काढलं होतं. त्यातचत्रावणकोर आणि कोचीन राजाकडून मानहानी झाली याचा मानसिक दबाव राजावर आला. मानसिक ताणाने ३ रात्री तो तळमळत राहिला आणि शेवटी आपलं जीवन संपवायचं त्याने ठरवलं. एक दिवस राजाने राजवाड्याचे सर्व दरवाजे लावून घेतले आणि राजवाड्याला आग लावली. राजवाडा जळायला लागला तेव्हा नोकर पळून गेले, काही जळले, आतली मौल्यवान चीजवस्तूही आगीत खाक झाली. सारी प्रजा दुःखी झाली. फार मोठ्या जिवितहानीनंतर हैदरला विजय मिळाला होता, तरीही त्याची आसक्ती संपली नव्हती. राजा मेल्यावरही त्याने सर् सावकार, सरदारांना बोलावून त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. पैसा काढण्यासाठी त्यांचा

अतिशय छळ मांडला. तरीही पैसा मिळाला नाहीच. पण मलबार प्रांत हाताशी आला. मग हैदर माघारी निघाला, वाटेत कोलाटेरीच्या प्रदेशात अलिराजाला व्यवस्थेसाठी ठेवलं. इथल्या राजाला बरेच मुलगे होते. त्यातल्या एकाला आपल्या बरोबर घेतलं. मैसूरला आल्यावर त्याला मुसलमान करुन ऐयाज नाव दिलं. हैदरची मलबार मोहीम संपली. वादळ आता त्रावणकोरकडे जायचं होतं.

# त्रावणकोर- कोईमतूर – इ. सन १७६६.

संपूर्ण पश्चिम किनाऱ्यावरचं एकं संस्थान आता हैदरने जिंकायचं राहिलं होतं. ते म्हणजे त्रावणकोर. आता त्या स्वारीला आणखी एक किनार होती. ती म्हणजे कालिकतचे पळून गेलेले नायर लोक त्रावणकोर राजाच्या आश्रयाला गेले होते. त्या राजाच्या मदतीने नायर लोकांनी परत दंगल सुरू करण्याचा धोका हैदरला जाणवत होता. त्यामुळे त्रावणकोर हातात घेणं अत्यंत जरुरीचं होतं. कालिकतपासून निघतांना हैदरने आपली 3000 फौज कालिकतच्या रक्षणासाठी तिथेच ठेवली. त्रावणकोरच्या वाटेवर असतांना कालिकतपासून ३६ मैलांवर नायर लोकांनी फौज जमवली होती. हैदरची फौज तिथे पोचल्याबरोबर दोन्ही पक्षांमधे लढाई सुरू झाली. या नायर लोकांना हैदरने कोचीनपर्यंत मागे हटवलं. कोचीनच्या राजाने हैदरशी लढण्याच्या भानगडीत न पडता, त्याला खंडणी देऊन समझोता करून घेतला. तोच मार्ग पालघाटच्या राजानेही स्वीकारला आणि हैदरपासून सुटका करून घेतली.

२० एप्रिलला कालिकतहून निघालेला हैदर मग पश्चिम किनाऱ्यावरच्या डोंगर रांगामधून घनदाट जंगलं पार करत

अनामलाईला पोचला. अनामलाईच्या दाट जंगलांमधून वाट काढत असतांना हैदरची अनेक जनावरं, माणसं मेली, पण हैदर थांबला नाही. तिथून त्याने कोइम्बत्तूरची दिशा धरली. हैदर कोईम्बत्तूरला विश्रांतीला थांबला. तोपर्यंत एप्रिल महिन्याची अखेर आली होती. हैदरचा अधिकारी मादण्णा याने स्थाानिक लोकांकडून पैसे उकळायला सुरुवात केली, पण नायर लोकांनी बंडच पुकारलं. हैदरची सत्ता मानायला त्यांनी तेजस्वीपणे नकारच दिला. त्रावणकोरच्या राजाची त्यांना गुप्त मदत होती. हैदर कोईम्बत्तूरला पोचून 3 महिने झाले नसतील तोच हैदरने जिंकलेल्या कालिकत आणि इतर सर्व परगण्यांच्या नायरांनी ऐन पावसाळ्यात परत उठाव केला.


## नायर लोकांचा दंगा -

कालिकतच्या राजाच्या भावानेच हे घडवून आणलं होतं. त्याने २०,००० फौज उभारली होती. कालिकतमधे हैदरने जी फौज ठेवली होती, त्यावर नायर लोकांनी हल्ला करून त्यांची कत्तल केली होती. कालिकतही ताब्यात घेतलं. पुडीअंगडीमधील हैदरच्या फौजेवरही हल्ला केला होता. आणि ती कापून काढली. हैदरच्या फौजेला जाऊन मिळण्यासाठी ५ फ्रेंच सैनिक जात असतांना त्यांनाही या नायर लोकांनी ठार केलं. कालिकत आणि पोन्नाणी गावं नायर लोकांच्या हाती पडली ही बातमी हैदरकडे पोचल्यावर त्याने अलीराजाला त्यांच्या बंदोबस्तासाठी पाठवलं आणि काही झालं तरी कालिकत जिंकून घे असं त्याला बजावलं. अलीराजाला मन्नारकतच्या मुक्कामावर ही बातमी कळल्याबरोबर तो उतावीळपणाने लगेच निघाला. अलीराजाकडे घोडदळ नाही ही बातमी नायर लोकांना कळली. त्यांना आनंदच झाला. त्यावेळी ऐन पावसाळा सुरू झाला होता. नद्या पाण्याने दुथडी भरून वाहायला लागल्या होत्या. तरीही अलीराजा एवढ्या पावसात बंदोबस्तासाठी निघालाय हे कळल्यावर नायर लोक त्याच्या वाटेवर उभे राहिले. पुडीअंगडीला दोन नद्यांच्या संगमावर

नायरांनी अलीराजाला यावं लागेल असा डाव टाकला. अलीराजा त्याप्रमाणे त्यांच्या पाठलागामागे जाऊन नायरांच्या जाळ्यात अडकला. तिथे त्याच्यावर नायरांनी त्वेषाने हल्ला केला. अलीराजा फसला. दुथडी भरून नद्या वाहात असल्यामुळे आणि नायर दबा धरून बसल्यामुळे त्याला ना पार होता आलं, ना मागे जाता आलं. कारण मुसळधार पावसामुळे झाडं आडवी होऊन मागचा रस्ताही बंद झाला होता. अलीराजाने आपण अडकल्याची बातमी हैदरकडे पोचवली. पूर्ण तयारी न करता निघण्याच्या अलीराजाच्या उतावीळपणाचा हा फटका होता. बातमी कळल्यावर, हैदरने पावसाचा जोर थोडा कमी झाल्यावर मैसूरहून मदतीसाठी आणखी फौज मागवली. ती आल्यावर १२ तोफा, ५ हजार फौज, १००० घोडदळ घेऊन स्वत: पावसापाण्यातून, चमकणाऱ्या वीजांच्या माऱ्यातून, कधी उन्हातान्हातून कडेकपारी पार करत, मांजेरी गावाला पोचला आणि तिथे त्याने मुक्काम केला.

पुडीअंगडी आणि निलांबुरच्या मध्यावर मांजेरी हा गाव आहे. असफखान नावाचा सरदार कालिकतवर येतो आहे हे कळल्यावर नायर लोक आवेशाने त्याच्याशी लढायला आले. अलीराजाने रात्र पडल्यावर त्या जागेला वेढा न घालता सैन्य मागे तळावर नेलं. रात्री नायर फौजही गावाच्या आश्रयाला गेली. २ महिने गेले आणि

अचानक हे गायब झालेले लोक अचानक उगवले आणि त्यांनी असफखानचं मुंडकं कापून काढलं.




असफखानला नायरांनी ठार केलं ही बातमी हैदरपर्यंत पोचली. त्याने मग बराकी श्रीनिवास रावला नायरांचा नाश करण्यासाठी पाठवलं. बराकी श्रीनिवासरावने कालिकत परत जिंकून घेतलं. हैदर परत आला हे नायर फौजेला कळल्यावर त्यांनी हैदरशी लढायचं ठरवलं. इकडे बंडखोरांनी पुडीअंगाडीला एका बाजूला गाव आणि एका बाजूला मोठा सुळक्याचा डोंगर यामधे दबा धरून ते त्याच्याशी लढायला तयार झाले. आपल्यापुढे त्यांनी

खंदक खणून जागा सुरक्षित करुन ठेवली. त्यांच्याकडे आता तोफाही होत्या. शरण येण्यापेक्षा मरण त्यांनी स्वीकारलंय हे कळल्यावर हैदरने त्यांच्यावर हल्ला करायचं ठरवलं. पहिली आपली ४००० शूर सैनिकांची तुकडी पोर्तुगीज अधिकाऱ्याच्या हाताखाली पाठवली. ते खंदकापर्यंत गेले आणि शत्रूसमोर आल्यामुळे, नायर बंडखोरांनी त्यांना पाहून तोफा चालू केल्या आणि हैदरची फौज पराभूत झाली. हैदरला हे कळल्यावर तो भयंकर संतापला. त्याने त्या क्षणी त्या पोर्तुगीज अधिकाऱ्याला नोकरीवरून काढून टाकलं. त्याने मग आपल्या फ्रेंच अधिकाऱ्याला बोलावून त्याच्या हाताखाली उरलेली फौज दिली आणि नायर फौजेवर पाठवलं. पाठोपाठ हैदर स्वत: आपली निवडक फौज घेऊन नायरांवर हल्ला करायला गेला. हैदरच्या मार्गदर्शनाखाली ह्या फौजेने सरळ खंदकात उड्या मारून, तट पार करून अडथळे पार करत नायर फौजेसमोर जाऊन उभे राहिले. ह्या अचानक हल्ल्याने चकित झालेली फौज हैदरच्या सेनेने सरळ कापून काढली. नायर लोकांना प्रतिहल्ला करायला फुरसतच मिळाली नाही. हैदरच्या या हल्ल्याने गावच्या गाव परागंदा झालं. माणसं, गुरंढोरं, घरंदारं, सगळं ओसाड झालं. जो सापडेल त्याला हैदरने कापून काढलं. कैद्यांना तिथल्या तिथे फाशी दिलं, काहींचा शिरच्छेद केला. तरीही जे उरले त्यांना सगळ्यांना मैसूरच्या ओसाड

गावात पाठवून दिलं. तिथेही त्यांचे भुकेने हाल झाले. हैदरचा एवढा क्रूरपणा पाहिल्यावर मोपलांचे आणि अलीराजाचे डोळे उघडले. त्यांना हैदर काय आहे हे सत्य जाणवलं. आपल्याला त्यांच्याबरोबरच राहायचं आहे, हे लक्षात आलं. शेवटी नायर लोकांशिवाय त्याचं चालणार नाही, एवढं शत्रुत्व घेणं त्यांना परवडणार नाही हे कळून चुकलं. आता हैदर परत जाईल तर बरं असं त्यांना झालं. लढायांनी ते थकले. आणि आतापर्यंत झालेल्या नरसंहारांनी थिजले.

हैदरला त्यांनी कोईम्बत्तूरला जायला सांगितलं. हैदरनेही ते कबूल केलं. तो गेल्यावर नायर रयत परत आपल्या आपल्या घरी परतले. हैदरने परत जातांना पालघाटला एक मजबूत किल्ला बांधण्याचा हुकूम पालघाट राजाला सोडला. तिथे एक सुभेदार नेमला आणि हैदर मैसूरला परत गेला. पिढ्यान पिढ्या एकाच मातीत वाढलेल्या मोपला आणि नायर लोकांनी एकमेकांच्या भांडणातून काय कमावलं तर नरसंहार, आपल्या वतनाची होळी, दौलतीची होळी, कालिकतचा राजा मानाविक्रम राजाचा मृत्यू आणि सत्तानाश. पुढे ब्रिटिशांनी हाच एकमेकांच्या भांडणाचा फायदा उचलला आणि पारतंत्र्याची आपल्याला हातकडी घातली.

## पेशवे-निजाम भेट-तह. ५ फेब्रुवारी १७६६.

१७६६ हे साल पेशव्यांनी निजामाशी तह करण्यात गेलं. जानोजी भोसल्यांना वठणीवर आणण्याचं काम पेशवे माधवरावांना करायचं होतं. जानोजी भोसले स्वत:ला नागपूरचे सर्वेसर्वा समजणारे आणि पेशव्यांपुढे न नमणाऱ्या स्वभावाचे होते. शिवाय अंत:स्थपणे दादांना आणि निजामाला आपल्याकडे वळवून पेशव्यांना त्रास देण्यांच्या त्यांच्या कुरापती चालू असत. म्हणून पेशव्यांनी कर्नाटकातून आल्याबरोबर वऱ्हाडवर स्वारी करून जानोजी भोसल्यांना आपल्यापुढे झुकवायचं काम हाती घेतलं. त्याला व्यवस्थितपणे हरवून गुडघे टेकायला लावले. परत येतांना पेशव्यांनी एक नवीन खेळी केली. पेशव्याला गिळायला हैदर, निजाम, भोसले, दादासाहेब, त्यांचे दरबारी समर्थक यांचा वेढा पडला

असतांना माधवरांनी आपल्याविरूध्द एक विळखा कमी करण्यासाठी गुप्तपणे निजामाशी तह केला. हे काम इतक्या गुप्तपणे झालं की दादासाहेबांनाही ते कळलं नाही, आणि इंग्रजांना, हैदरलाही कळलं नाही. हैदरला तोंड द्यायचं तर निजामासारखा शत्रू दक्षिणेत त्यांना नको होता. म्हणून पेशवे माधवरावांनी निजामाशी

मैत्री केली. पेशव्यांची ही गुप्त खेळी इंग्रजांना, चिंतेत टाकणारी आणि धाक दाखवणारी होती.

शेरजंग नावाचा एक हुशार सरदार निजामाकडे होता. त्याचं मूळ नाव हैदर यारखान. त्याने सलाबतजंगाचा पक्ष घेतला. तेव्हा त्याला आपल्या जीवाची भीती वाटली आणि निजामअलीपासून स्वत:ला वाचवायला शेरजंग पुण्यात येऊन राहिला. तेव्हा त्याची दरबारी मंडळींशी चांगली मैत्री झाली होती. राक्षसभुवनावर निजामाचा पराभव झाल्यावर शेरजंगवरचा राग सोडून निजामाने त्याला परत आपल्या नोकरीत घेतलं. या शेरजंगने निजाम आणि पेशव्यांची मनं जुळवायचं मोठं काम केलं. दोघांच्यातली तेढ शेरजंगने कमी केली आणि याचा नतिजा म्हणजे निजाम आणि पेशव्यांची गुप्त भेट घडून आली. एकमेकांशी वैर असू नये. तुमचं राज्य तुम्ही सांभाळावं, आमचं राज्य आम्ही राखावं, कोणी कुणाला दुखवू नये, आणि एकमेकांवर आाक्रमणही करू नये, अशा कलमांनी हा तह झाला. उमरखेडजवळ, दहा कोसांवर कुरुमखेडावर दोघांच्या सन १७६६, ४ फेब्रुवारीला भेटी झाल्या. शिष्टाचाराप्रमाणे जवाहीर, हत्तीघोडे, वस्त्रे देणं घेणं झालं. मग सगळ्यांना ही बातमी कळली. राघोबादादासाहेबांनाही ही बातमी आणि आपल्या पुतण्याचा वकुबही कळला.

हा तह मद्रासच्या इंग्रजांना भयंकर बोचला. यापुढे हैदर-इंग्रज-नबाब-यांचं गुंतागुतीचं राजकारण वाढायला लागलं. एकमेकांना शह देणं, दुसऱ्याच क्षणी त्यांच्याशीच संधी करून तिसऱ्याला शह देणं यांनी दक्षिणेतलं राजकारण रंग बदलत राहिलं. एकीकडे हैदर-मराठ्यांचा संग्राम, पुढे हैदर आणि इंग्रजांचा सामना, त्यानंतर हैदर,मराठे, निजाम यांचं एकत्र येऊन इंग्रजांविरूध्द शस्त्र धरणं अशा राजकारणाने दक्षिण भारत सतत युध्दात रक्ताने रंगत राहिला.

# पेशव्यांची तिसरी स्वारी. इ. स. १७६७.

या काळात इकडे पुण्याच्या दरबारात माधवराव हैदरवर परत स्वारी करण्याची मसलत आखण्यात मग्न होते. निजामाकडूनही पेशव्यांकडे प्रस्ताव आला. इंग्रज, तुम्ही आणि आम्ही मिळून हैदरला संपवू आणि त्याचा प्रदेश तिघांच्यात वाटून घेऊ असा प्रस्ताव घेऊन निजामाने आपल्या वकिलाला पेशव्यांकडे पाठवलं. पण पेशवे या चलाखीला फसले नाहीत. आता हैदर संपणार, मग आपणावर हे संकट येणार, हा दुष्ट डाव इंग्रज खेळत आहेत हे त्यांच्या लगेच लक्षात आलं. पण निजामाला त्यांनी लगेच दुखवलं नाही. कारण घरातला त्यांचाच आप्त, दादासाहेब निखाऱ्यासारखा धुमसत बसला होता, त्याला निजामाने लगेच फुलवलं असतं.

हैदरने मराठी मुलखात धुडगुस घालून तिथला सगळा ऐवज पळवला होता. आपण येतो आहोत एवढी आवई घालण्यानेसुध्दा हैदरवर वचक बसेल अशी पेशवे माधवरावांना खात्री होती. म्हणून इ.स. १७६७ च्या जानेवारीत पेशवे कर्नाटकाची वाट चालायला लागले. सुरापूरचा बेरड संस्थानिक खंडणी देत नव्हता, पेशव्यांना जुमानत नव्हता, त्याच्यावर जरब बसवून आणि खंडणी वसूल करून पेशवे तुंगभद्रेच्या रोखाने निघाले. ते आधी सोलापुरावर गेले.

सावकार बाबूजी नाईकांनी सोलापूरचा किल्ला दाबून ठेवला होता, तो त्यांच्याकडून काढून घेतला. जानेवारी अखेरीपर्यंत त्यांनी बरीचशी ठाणी मिळवली. नतर देवदुर्गला मुक्काम केला. त्या मुक्कामात त्यांनी आपल्या सर्व सरदारांच्या फौजेची गणती घेतली. फौजेची संख्या कमी ठेवून सरकारातून पैसा काढणाऱ्यांच्यावर त्यांनी शिक्षा करायला सुरुवात केली. स्वत:चे खिजमतगार पाठवून चोरबातम्या काढून चौकशा सुरू केल्या. त्यामुळे लष्करात मोठीच दहशत निर्माण झाली. लष्काराला शिस्त आणायचं मोठं काम या मोहिमेत पेशव्यांनी केलं. पुण्याच्या दरबारात काय आणि फौजेत काय, लहान- मोठे सगळेच जण माधवराव पेशव्यांना चळाचळा कापायला लागले होते.


पंचमहाल, आदोनी, बल्लारी, कर्नूल, कनकगिरी, चित्रदुर्ग, देवदुर्ग, रायदुर्ग अशी सर्व ठाणी, आणि खंडण्या पेशव्यांनी वसूल केल्या. रायचूर प्रांतात केरूर नावाचं एक लहान संस्थान आहे. ते घेण्यासाठी बसालतजंगाची धडपड चालू होती. त्या गावकऱ्यांनी पेशव्यांना मदतीची विनंती केली. तेव्हा पेशव्यांनी गोपाळरावांना केरूरमधे शांतता स्थापायला पाठवलं. गोपाळराव पटवर्धनांनी बसालतजंग आणि मुरारराव घोरपडे यांना वेढा उठवून जायला सांगितलं. त्या दोघांनी चलाखी करून गोपाळरावांशी बोलणी चालू ठेवली आणि अचानक केरूरवर छापा घातला. तेव्हा तो

हल्ला गावकऱ्यांनी मारून काढला. हे गोपाळरावांच्या कानावर गेल्याबरोबर त्यांनी बसालतजंगाची कहीकबाड गोळा करणारी माणसं, बैल, गाड्या, सामान सगळं छापा टाकून हिरावून घेतलं. तेव्हा दोघे ताळयावर आले आणि सलूख करून निघून गेले.

सर्व ठाणी हाताखाली घेतल्यावर १२ फेब्रुवारीला १७६७ या दिवशी पेशव्यांनी आपला मोहरा शिऱ्याकडे वळवला. शिऱ्याला हैदरचा मेहूणा मीर रेझा सुभेदारी करत होता. हा किल्ला भक्कम म्हणून गणला जात होता. पेशव्यांनी या किल्ल्याला वेढाच घालून टाकला. १० दिवसांमधे किल्ला जिंकला. मीर रेझा शरण आला तेव्हा त्याला आपल्या चाकरीत घेतलं. गुर्रमकोंडा किल्ला आणि परगणा जागीर देऊन त्याने २००० फौज बाळगायची आणि पेशव्यांच्या मदतीला जायचं असा करार करून घेतला. शिरे जिंकल्यावर पेशव्यांचा दबाव आणखीनच वाढला.

या नंतर पेशवे मधुगिरी किल्ल्यावर चाल करुन गेले. मधुगिरी किल्ला हा तीन बाजूंनी सरळ कडा असलेला, चाल करून जायला अवघड किल्ला होता. त्याच्या एकाच बाजूला एक पाऊलवाट फक्त होती. शत्रू आला की वरचे लोक तेल ओतून ती वाट निसरडी करून टाकत असत. त्यामुळे कोणत्याही बाजूंनी किल्ला सर करणं सोपं नव्हतं. तो अवघड किल्ला पेशव्यांनी एक दिवसातच

जिंकला. त्या किल्ल्यावर बिदनूरची राणी आणि राजपुत्र हैदरने कैदेत ठेवले होते, त्यांना पेशव्यांनी सोडवलं आणि पुण्याला पाठवून दिलं. पेशव्यांनी या किल्ल्याखाली मुक्काम केला. तेव्हा मीर रेझा, जो शिऱ्यापासून पेशव्यांच्या लष्करात बरोबर होता, त्याचा गोट लुटला गेला. पेशव्यांनी अतिशय उग्र रूप धारण केलं. माहिती काढवली, लोकांचे कान नाक कापून कठोर शिक्षा केली आणि त्याचं चोरीला गेलेलं सगळं सामान मिळवून दिलं.



***मधुगिरी किल्ला.***

कर्नाटकात आल्यापासून दोन महिन्यात पेशव्यांनी जवळजवळ सर्व ठाणी परत मिळवली. ३० लाख उत्पन्नाचा मुलुख हैदरच्या तावडीतून सोडवून वसूल गोळा करायला सुरूवात केली आणि आपला मोर्चा आता सरळ श्रीरंगपट्टणाकडे वळवला. हैदर या वेळी पेशव्यांशी लढायला आलाच नाही. तो श्रीरंगपट्टणात बंदोबस्ताने राहिला होता. पेशवे श्रीरंगपट्टणाकडे निघाले ही बातमी गुप्तहेरांनी आणल्याबरोबर हैदरने राजधानीपासून दूर दूर अनेक कोसांपर्यंत तळी फोडली, विहिरींमधे निवडुंग टाकून पाणी नासवलं. सगळ्या रयतेला दूर हाकलून पीक पाणी जाळून टाकलं आणि पेशव्यांवा मार्ग दुष्कर करून टाकला. पण मराठी फौजा या नेहमी शत्रूच्या देशात एकमेकांना समांतर असे विखरून लहान लहान टोळयांनी मजली करत असत. त्यामुळे खूप पाणी, खूप अन्न अशा गरजा त्यांच्या नसल्यामुळे त्यांचे हाल कमी होत.पेशवेही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी वाटेतल्या नद्यांचं पाणी उकरून आपल्या घोड्यांना पाजलं. मार्गात लागणाऱ्या घरांची शाकारलेली छपरं खाली ओढली आणि चारा म्हणून गुरांना खाऊ घातली. अन्न शिजवायला त्याच घरांची लाकडं जळणासाठी वापरली. पेशव्यांबरोबर एक अशा लोकांची टोळी होती, जी जमिनीत पुरलेलं धान्य हुडकण्यात तरबेज होते. या लोकांच्या हाती एक लांब गज असे. त्याने हे लोक जमिनीत खड्डा करत असत. मग

त्याचा वास घेत असत आणि धान्य आहे हे सांगत. मग पुरलेलं धान्य भरपूर मिळत असे. त्यामुळे पेशव्यांची फौज श्रीरंगपट्टणाची वाट चालतच राहिले. हैदरला आता यांना कसं थोपवावं हीच काळजी लागून राहिली. त्यातूनच निजामही पेशव्यांना मिळण्यासाठी निघालाय ही बातमी त्याच्यापर्यंत पोचली. शिवाय इंग्रजांच्या हैदरविरूध्दच्या हालचालीही वेग घेत होत्या. त्या गुप्तहेरांतर्फे हैदरपर्यंत पोचत होत्या. हैदरला मार्ग काढणं अत्यावश्यक झालं.

हैदरने आपला वकील गोपाळराव पटवर्धनांकडे पाठवला. त्यात, तुमचे सगळे मुद्दे कबूल करतो. २८ लाख खंडणी देतो. पण माझी एक गोष्ट ऐकावी. माझा सगळा मुलुख मला परत करावा. मी आपल्याकडे चाकरीत राहीन. ती नोकरी म्हणजे जर तुम्ही इंग्रज आणि महंमदअली यांच्यावर स्वारी केलीत तर मी तुमच्या कुमकेस येईन. तुम्हाला त्या लढाईत सर्वतोपरी सहाय्य करीन. " पेशव्यांनी त्याचा डाव पूर्णपणे ओळखला. हैदरकडे जशा इंग्रजांच्या स्वारीच्या बातम्या येत होत्या, तशाच त्या पेशव्यांच्याही गुप्तहेरांनाही कळत होत्या. म्हणून हैदरचा डाव पेशव्यांनी हाणून पाडला. इंग्रज आणि मराठ्यांची लढाई सुरू झाली की दोघेही एकमेकांविरूध्द लढून कमकुवत होतील अशी हैदरला आशा होती. मराठे शक्तीहीन झाले की त्यांचा मुलूख बळकावायचा. पण

पेशव्यांनी त्याच्यावर कडी केली. निजामाशी आधीच गतसाली त्यांनी दोस्तीचा हात पुढे केलेला होता. आता इंग्रज आणि निजामाला मिळून आपण बंगलोर घ्यायला जाणार आहोत असा पुकारा केला. तेव्हा शेराला सव्वा शेर भेटल्यामुळे हैदर सुतासारखा सरळ आला.

## पेशवे – हैदर तह -

पेशवे आणि हैदर, दोघांनाही आता तहाशिवाय पर्याय नव्हता. हैदरने लगेच आपला वकील आपाजीराम आणि करिमखान यांना तहासाठी पेशव्यांकडे पाठवलं. तुमचे सगळे मुद्दे कबूल आहेत असा निरोप दिला. गोपाळराव पटवर्धनांच्या मध्यस्थीने तह झाला.

१..नानासाहेब पेशव्यांच्या काळात जेवढा मुलुख मराठ्यांकडे होता, तेवढा सर्व हैदरने परत करावा.

२.. हैदरने ३३ लाख रुपये खंडणी द्यावी. निम्मे रोख, निम्मे हप्त्यांनी द्यायचं ठरलं.

३.. मराठ्यांच्या मांडलिकांना हैदरने त्रास देऊ नये. म्हणजे सावनूर, गुत्ती वगैरे ठिकाणं.

४.. हैदरला कोलार हवं होतं, कारण त्याच्या बापाची तिथे कबर होती. खंडणी पूर्णपणे हाती आली की त्याला कोलार द्यायचं ठरलं.

५..निजामाला मध्यस्थीचे १४ लाख कबूल केले.

माधवराव पेशव्यांनी निजामाला निरोप पाठवून सांगितलं की स्वारी न करताच हैदर तुम्हाला १४ लाख देतोय, तर आता हैदरवर

स्वारी करू नका. पेशव्यांनी चतुराईने नबाबाची खंडणीही हैदरच्याच गळयात बांधली, ती वसूल होणं कठीण हे नबाबाच्या लक्षात आलं, त्यामुळे निजामाला हा निरोप अजिबात आवडला नाही. कारण निजाम यात स्वत:च फसला. तो इंग्रजांना मिळून हैदरला लुबाडणार होता, ते बारगळलं. मराठेही फसले नाहीत.

एवढा तह झाल्यावर पेशवे ज्येष्ठात परत पुण्याकडे फिरले. आपल्यालाही काही लाभ होईल या इच्छेने निजाम पेशव्यांना मिळणार होता. त्याला मराठ्यांना मिळालेल्या सर्व प्रकारात म्हणजे लूट, खंडणी यातला अर्धा भाग हवा होता. अर्थातच पेशव्यांनी त्याला वाटाणाच्या अक्षता लावल्या. काहीही न करता नुसता फायदा निजामाला हवा होता, ते पेशव्यांनी चालू दिलं नाही. पेशवे परतले. पण छावणीसाठी गोपाळराव आणि रास्ते सरदारांना ठेवलं. यंदाच्या साली पावसाळयात ते स्वत: छावणीला राहिले नाहीत. त्याला कारणही तसंच होतं. दादासाहेबांनी परत आपली नखं बाहेर काढली होती. त्यांना ठिकाणी लावण्यात माधवराव पेशव्यांची दोन वर्ष गेली. पण दादासाहेबांना अटकेत ठेवण्याचा शेवट या गृहकलहातून निकाली लागला.

हैदरने पेशव्यांसमोर एवढं नमतं घेण्याचं कारण म्हणजे मद्रासकर इंग्रजांनी हैदरवर आक्रमण करण्याची तयारी चालवली

आहे अशा बातम्या हैदरचे गुप्तहेर त्याला पोचवायला लावले. या युध्दाला हैदर आणि इंग्रजांचे पहिले युध्द असं ओळखलं जातं. इंग्रजांचा एव्हांना भारतीय राजकारणातला हस्तक्षेप चगलाच वाढला होता. इ. स. १७५७ मधे बंगालमधे क्लाईव्हने दिवाणी मिळवलेली होती. १४ जानेवारी १७६१ ला ज्या दिवशी पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला, त्याच्या दुसरे दिवशी म्हणजे १५ जानेवारीला बिहारमधील पाटणापासून ५ मैलांवर इंग्रज आणि दिल्लीचा राजपुत्र शहाआलम यांच्या झगड्यात इंग्रजांचा विजय झाला आणि दक्षिणेतही इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात लढाई होऊन १६ जानेवारीला इंग्रजांचाच जय झाला. मिळून जानेवारी १४-१५-१६ या तीन दिवसांमधे हिंदुस्थानातल्या सत्तापालटात प्रचंड क्रांती झाली आणि इंग्रज हेच निर्णायक सत्ताधीश ठरतील याची चिन्हं दिसायला लागली.

# हैदर इंग्रज लढाई.

दक्षिणेत मद्रासचे इंग्रजही राजकारण खेळतच होते. त्यांचे शत्रू होते हैदर, निजाम आणि मराठे. त्यांना मराठ्यांकडून साष्टी बेट ( ६६ गावांचं ठाणं ते साष्टी.) हवं होतं, पण चिमाजीआपांनी कष्टाने मिळवलेलं साष्टी बेट सोडायला पेशवे बिलकूल तयार नव्हते. मद्रासच्या इंग्रजांना काहीही झालं तरी बंगाल ते मद्रासपर्यंतचा समुद्रकिनारा हवा होता. या दोन्हीमधे असलेला कटक प्रांत त्यांना अडचणीचा ठरत होता. तो निजामाच्या ताब्यात होता. म्हणून त्यांनी निजामाकडे शिकाकोल, गुंटुर, राजमहेंद्री, वेल्लूर, मुर्तझानगर, मुस्ताफानगर असे ५ परगणे मागितले. पण निजामाने नकार दिला. इंग्रजांचं सारं लक्ष बलवान मराठ्यांची ताकद कमी करण्याकडे होतं. म्हणून त्या दृष्टीने त्यांनी डावपेंच आखायला सुरुवात केली. पेशवे पुण्याला परत गेल्यावर हैदरला आणि इंग्रजांना मराठ्यांची हिंमत, ताकद आणि कणखर नायक म्हणून पेशव्यांचा वकूब लक्षात आला होताच. मराठ्यांची प्रचंड वाढलेली ताकद कमी करणं हेच या दोघांचं यापुढचं ध्येय होतं. तेवढ्यात इंग्रजांना हवी तशी संधी मिळाली. हैदरकडून मैत्रीचा सलूख करण्याचं पत्र आलं. त्याला कारणही तसंच होतं. निजाम

आणि माधवराव पेशव्यांनी मैत्रीचा हात पुढे केला होता. दोघे एकमेकांना समक्ष भेटले. पेशव्यांनी आपला १५ लाखांचा मुलूख निजामाला भेटही दिला होता. या दोघांच्या मैत्रीचा मतलब कावेबाज हैदरच्या लक्षात लगेच आला. निजाम आणि पेशवे आपल्याला संपवण्यासाठीच एक झाले आहेत याची कल्पना आल्यावर त्याने तो डाव उलटवण्यासाठी जून १७६६ मधे मद्रासच्या इंग्रजांना खलिता लिहिला.

“ माझ्याकडे आणि तुमच्याकडे मोठी फौज आहे. आपण दोघे एक झालो तर निजाम आणि मराठे काहीही करू शकणार नाहीत. ” जुलैमधे लगेच हैदर आणि इंग्रजांची दोघांच्याही ठिकाणांपासून मध्यावर भेटही झाली. दोघांच्यात मैत्रीचा करारही झाला. या कराराप्रमाणे एकमेकांचे हितसंबंध राखायचे असं ठरलं. पण त्यातलं १२ वं कलम हैदरला नको होतं..कारण त्या कलमात त्रावणकोर राजा आणि अर्काटच्या नबाबाला हैदरने हात लावायचा नाही असं विधान होतं. त्यांच्या प्रदेशावर हल्ला करायचा नाही हे हैदरला कबूल करावं लागणार होतं. हैदरचा आणि अर्काटच्या नबाबाचा ३६ चा आकडा होता. हा नबाब फार लबाड विश्वासघातकी आहे असं हैदरचं मत होतं. पण हा नबाब इंग्रजांचा अंकित होता. त्यामुळे इंग्रज त्या कलमावर अडून बसले. इंग्रज आपल्याला स्वार्थापुरतंच बोलावत आहेत हे हैदरला कळून

चुकलं. म्हणून त्या तहात पुढे काहीच प्रगती झाली नाही. मद्रासकरांना त्यांच्या लंडनच्या कौन्सिलचं पत्र आलं. निजाम आणि हैदरमधे निजामच बरा असं त्याचं मत त्यांनी लिहून पाठवलं. म्हणून निजामाशी इंग्रजांनी दोस्तीचा हात पुढे केला. पण निजाम त्याचे ५ परगणे द्यायला तयार नव्हता. कंपनीच्या संचालकांनी मद्रासच्या अधिकाऱ्यांना हेही कळवलं की, मराठे आणि हैदर यांच्यात जेवढ्या लढाया होतील, आणि दोघांचीही ताकद कमी होईल, तेवढ्या आपल्या फायद्याच्या आहेत. लढाईत मराठ्यांचा एक शिपाई ठार होणं हे आपल्याला एक शत्रू कमी होण्यासारखंच आहे. पण त्यासाठी आपण स्वत:ला लढाईत गुंतवून घेऊ नये. पण तुम्ही तर हैदरचंच लक्ष स्वत:कडे वळवून घेत आहात, जे आपल्याला परवडणार नाही. कर्नल स्मिथला आदेश आला की त्याने निजामाला हैदरशी लढण्यापासून परावृत्त करावं. दुसरीकडे मराठ्यांनी इंग्रजांचा समझोत्याचा प्रस्ताव स्वीकारला तर उत्तमच आहे. पण नाहीतर निजामाला समजवावे की आम्ही तुमच्या दिमतीला जास्त फौज देऊन मराठ्यांचा पाडाव करण्याचा कसोशीने प्रयत्न करू. स्मिथला हेही बजावण्यात आलं होतं की त्याने हा विषय अगदी हळूवारपणे, निजामाला न दुखवता हाताळावा. निजामाला जर आपल्या बोलण्याचा अविश्वास वाटायला लागला तर त्याला भरपूर आश्वासनं देऊन त्याचा विश्वास

संपादावा. आपल्याकडे इंग्रज दुर्लक्ष करतात असं निजामाला वाटता कामा नये. मराठ्यांची शक्ती खच्ची करण्यासाठी निजामाला लागेल तेवढी मदत दिली जावी. कारण मागील पेशवे-हैदर लढाईतून इंग्रजांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे हैदर पूर्णपणे चिरडला गेला नाही. मराठे आणखीनच प्रभावी आणि आक्रमक झाले. निजाम हा मैत्री ठेवायच्या भरवंशाचा नाही.

इकडे हे डावपेंच चालू ठेवून शेवटी इंग्रजांनी राजमहेंद्री परगणा बळजबरीने घेतला. त्यांनी निमित्त उकरलं ते क्लाईव्हला दिल्लीच्या शहाआलमने ते परगणे दिले आहेत या दाखल्यावर. त्या बदल्यात निजामाकडे २ पलटणी आणि ६ तोफा ठेवायच्या, आणि निजामाला जेव्हा मदत लागेल तेव्हा त्याच्या मदतीला जायचं असा इंग्रज आणि निजाम यांच्यात करार झाला. इंग्रजांची ही दडपशाही निजामाला आवडली नाही. पण इंग्रजांशी लढण्याची ताकद नव्हती. म्हणून निजामाने मराठ्यांची मदत मागितली, तेव्हा इंग्रज घाबरले आणि त्यांनी हैदरची मदत मागितली. पण हैदरला इंग्रजांचा कुटील, नीच, लोभी स्वभाव माहीत होता, म्हणून त्याने स्पष्ट नकार दिला. त्या काळात दक्षिण भारतात आता सर्वोच्च बलवान पदावर होते मराठे, त्याखालोखाल निजाम, नंतर इंग्रज आणि चौथ्या स्थानावर होता हैदर. हैदरचं इंग्रज, मराठे, निजाम यापैकी कुणाशीही सख्य नव्हतं. तो आपला एकांडा शिलेदारच

होता. पण मराठ्यांना मात्र वचकून राहायला लागला होता. मराठे आले की त्यांना भांडण न पत्करता खंडणी देऊन टाकायची, आणि मग गेलेले प्रदेश लुटत बसायचं हीच रणनीती त्याने स्वीकारली होती. इंग्रज आणि निजामाला तो घाबरत नव्हता. हैदरकडून नकार आल्यावर इंग्रजांनी आपली चाल बदलली. त्यांनी परत निजामाशीच बोलणी चालू केली आणि निजामाशी तह केला. पावसाळ्यानंतर निजाम आणि इंग्रजांनी हैदरवर स्वारी करून त्याचा प्रदेश अर्धा अर्धा वाटून घ्यायचं ठरवलं .

इंग्रजांनी आपला लष्करी अधिकारी टॉड याला पेशव्यांकडे १७६७ सालच्या मध्यावर पाठवलं होतं. पण त्याला पेशव्यांच्या दरबारात वाईट वागणूक मिळाली असं त्याने लिहून पाठवलं. मग पेशव्यांनीही आपला वकील इंग्रजांकडे पाठवून खूप वर्षांपासून अर्काटच्या नबाबाकडील राहिलेली चौथाई त्यांनी इंग्रजांकडे मागितली. निजामाशी मैत्रीचा करार पेशव्यांच्या संमतीशिवाय का केलात असा जाबही विचारला. तेव्हा इंग्रजांनी आपली आणि निजामाची मैत्री ही मराठयांशी भांडण्याकरता नसून आपापसातल्या समान शत्रूसाठी असल्याचं वकिलाला सांगितलं. आता मराठ्यांची ताकद एवढी वाढली होती की एकीकडे इंग्रज आणि अर्काटचा नबाब आणि दुसरीकडे हैदर आणि निजाम मराठ्यांची मदत मागायला पेशव्यांच्या दरबारात खेटे घालत होते.

माधवराव कर्नाटकात चौथाई मागायला परत मोहीम काढतील असा इंग्रजांचा अंदाज होता. ते कुणाकडे झुकतात यावरही इंग्रजांचं बारीक लक्ष होतं. इंग्रजांनी मद्रासकरांना अशाही सूचना देऊन ठेवल्या होत्या की, माधवरावांना त्यांच्यातल्या गृहकलहात जास्तीत जास्त गुंतवून ठेवणं आवश्यक आहे. मराठ्यांना लढाईत हरवणं सोपं नाही, पण त्यांना त्यांच्यातच एकमेकांविरूध्द झुंजवून त्यांची ताकद कमी करणं सोपं आहे, कारण मराठा सरदार एकमेकांना खाली खेचण्यासाठी फायदा घ्यायला सदैव तत्पर असतात. ह्या मार्गांचा फायदा होत नसेल तर पेशवे माधवरावांशी सलूख करणं जास्त योग्य होईल. "

मद्रासकर इंग्रजांना मराठ्यांपेक्षा हैदरपासून जास्त धोका वाटत होता. म्हणून हैदरशी मैत्री किंवा त्याचा समूळ नाश हेच दोन पर्याय त्यांच्यासमोर होते. त्यांनी क्लाईव्हला तसं पत्रही लिहून आपला विचार कळवला. तेव्हा मुरब्बी क्लाईव्हने त्यांना शहाणपणाच्या काही सूचना दिल्या. त्याने १२ ऑक्टोबर १७६६ ला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो,

“ मराठ्यांची शक्ती त्यांच्या घोडदळात आणि हैदरची शक्ती कवायती फौज, तोफा, आणि इतर युध्दसामग्रीत आहे. पहिल्यापासून आपल्याला नुकसान आहे. ते काही काळ लुटालूट

करतील, काही काळापुरता आपला वसूल कमी होईल, पण दुसऱ्यामुळे आपला समूळ नाश होईल. हैदरच्या समूळ नाशासाठी मराठ्यांशी मैत्री करणं जरुरीचं आहे.” म्हणून मराठ्यांना बिदनूर घेऊन द्यायचं, मैसूरच्या राजाला गादीवर बसवायचं आणि आणि चौथाई मराठ्यांना द्यायची असा बेत इंग्रजांनी आखला. त्याबदल्यात मराठ्यांकडून साष्टी, वसई मागायची असा त्यांचा डाव होता. मराठ्यांच्या घोडदळाची इंग्रजांना गरज होती, कारण त्यांच्याकडे मराठ्यांसारखं घोडदळ नव्हतं. पण झालं उलटंच. पेशव्यांचे डावपेच काही वेगळेच होते हे, पेशव्यांचा वकील अर्काटच्या नबाबाच्या दरबारात आला तेव्हा इंग्रजांच्या लक्षात आलं. पेशव्यांनी अर्काटच्या नबाबाकडे मागणी केली होती की, हैद्राबादच्या नबाबाचं दख्खनमधून समूळ उच्चाटन करायचं आणि दिल्लीच्या शहाआलमची सत्ता तिथे सुरू करायची. इंग्रजांना या खेळीची अपेक्षाच नव्हती. याचा सरळ अर्थ निजाम संपला की मराठे आणखीनच प्रबळ होणार असाच होता आणि इंग्रजांना ते नकोच होतं. त्यांच्या बंगाल आणि पूर्व सागरी वर्चस्वाला त्यामुळे धोका उत्पन्न होणार होता. त्यामुळे मराठ्यांशी सलूख करण्याला बंगाल इंग्रजांकडूनही नापसंती आली.

निजामाशी पेशव्यांनी मैत्रीचा करार केला. इंग्रजांनी राजमहेंद्री बळकावला. त्यामुळे निजाम इंग्रजांवर नाराज झाला आणि त्याने


हैदरशी मैत्रीचा हात पुढे केला. निजामाला इंग्रजांशी मैत्री करण्यात काहीच फायदा नव्हता. मग त्याने पक्ष बदलला. आणि हैदरशी मैत्रीचा हात पुढे केला. माधवरावांनी मिळवलेल्या खंडणीतला काहीच भाग त्याला  मिळाला नव्हता. म्हणून निजामाला हैदरवर मोहीम तर काढायची होती, पण इंग्रजांशी केलेल्या कराराप्रमाणे त्याच्याबरोबर इंग्रजांची फौजही येणार, ते त्याला नको होतं. मद्रासहून कर्नल स्मिथ २ बटालियन्स घेऊन त्याच्या बरोबर होता. स्मिथला बातमी लागली की निजाम आणि हैदर यांच्यात मैत्री होते आहे. म्हणून, लढाईचं प्रयोजन नसल्यामुळे  तो आपली फौज घेऊन मद्रासला परतला.

निजामाने हैदरशी मैत्रीचा करार केला. हैदरने निजामाचं थाटामाटात स्वागत केलं. दोघांची भेट झाली. हैदरने १०१ मोहरा निजामाला नजर दिल्या. ५०,००० रुपये खर्च करून एक भव्य चबुतरा हैदरने तयार केला, त्यावर निजामाला बसवलं. त्याचा सत्कार केला. नजराणे, हत्ती घोडे, ५० हजार रोख देऊन हैदरने निजामाचं भव्य आदरातिथ्य केलं. निजामाचे खंडणीचे पैसे दिले. आणि निजामाने हैदरच्या मुलाला, टिपूला पुढचा कर्नाटकचा नबाब म्हणून मान्यता दिली. हैदरची लढाईची तयारी पूर्ण होईपर्यंत निजाम इंग्रजांशी वाटाघाटी करत बसला. हैदर आणि निजामाने मिळून अर्काटच्या नबाबावर स्वारी करण्याचं ठरवलं. हैदरचं आणि

अर्काटच्या महंमदअली नबाबाचं जमतच नव्हतं. निजामालाही अर्काट

हवंच होतं. पण इंग्रजांच्या रक्षणाखाली अर्काट असल्यामुळे दोघांनी मिळून अर्काटवर स्वारी करायचं ठरवलं

# हैदर आणि इंग्रज पहिले युध्द.- थिरुअनामलाई- ऑगस्ट १७६७ ते २९ मार्च १७६९.




हैदरने मोठी फौज जमवली. इंग्रजांनीही लढाईची जय्यत तयारी केली. मद्रासच्या इंग्रजांतर्फे कर्नल स्मिथ १४ ऑगस्टला दक्षिणेकडे फौज घेऊन निघाला. १० दिवस त्याला हैदरची काहीच बातमी लागत नव्हती. त्याला नंतर कळलं की मद्रासहून येणारी रसद हैदरची फौज वाटेतच पळवत होती. हैदरचा सरदार मकदूम अर्काटचा प्रदेश लुटत होता. २५ ऑक्टोबरला दोन्ही शत्रूंची पहिली चकमक घडली. मकदूम अलीने अचानक येऊन इंग्रजी फौजेवर हल्ला केला. त्यांची चरणीला गेलेली गुरंढोरं पळवून नेली. तोपर्यंत हैदर कावेरीपट्टणाला वेढा घलायला गेला.

दुसरीकडे कर्नल वूड, त्याला मिळालेल्या हुकूमानुसार आपली फौज घेऊन त्रिचनापल्लीहून थिरुअनामलाईला जायला निघाला. वूडला तिथे पोचायला दहा दिवसांचा अवधी लागणार होता, हे जाणून हैदर कावेरीपट्टणला जाऊन थांबला. स्मिथच्या फौजेवर हल्ला करायची त्याची योजना होती. हैदरने सतत इंग्रजी फौजांवर हल्ला करून वाटभर त्यांना लुटत राहून छळलं. इंग्रजी फौजा शृंगारपेटला निघाल्या. हा मार्ग अतिशय चिंचोळा, आणि वळणावळणांचा होता. हैदरने अचानक तिथे प्रकट होऊन इंग्रजी फौजांना कोंडीत पकडलं. चंगमजवळच्या  खिंडीजवळ हैदरने इंग्लिश फौजेवर मोठा हल्ला केला. घनघोर लढाई झाली. त्यानंतर हैदर तेथून निसटला आणि त्याने कावेरीपट्टमला आश्रय घेतला. तिथे त्याने दोन दिवस वेढा घातला. किल्ल्यातील रसद बंद झाल्यामुळे स्मिथ थिरुअनामलाईला जात होता. तेव्हा हैदरने त्याच्या वाटेवर जोरदार हल्ला करून त्याचं सामान दाणागोटा लुटला. थिरुअनमलाईला स्मिथ पोचला तेव्हा त्याला त्याठिकाणी फौजेसाठी दाणागोटा काहीच नसल्याचं लक्षात आलं. आणि ह्या फसवणूकीला कारण होता. अर्काटचा नबाब महंमदअली. त्याने इंग्रजांना त्यांच्या फौजेसाठी सर्व बेगमी करून ठेवण्याची हमी दिली होती. कर्नल स्मिथला फौजेच्या भुकेची सोय करत बसावं लागलं. जवळपासच्या खेड्यांमधून त्याने दाणा गोटा मिळवला. तोपर्यंत

कर्नल वूडची फौज हैदरकडून काहीही त्रास न होता, सुखाने त्याला येऊन मिळाली.

एव्हांना पावसाळा जवळ आला होता. इंग्रज फौज पावसापाण्यातून जातांना हैराण व्हायला लागली. घोडीही थकायला लागली. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पावसाळा सप्टेंबरला सुरू होतो. आपल्या फौजेला अर्काट, वेल्लोर, कुठेही विश्रांतीला रहायला सांगून कर्नल स्मिथ परत स्वारीला तयार झाला. हैदरच्या फौजेने सारा प्रदेश व्यापून त्याची फौज मद्रासच्या जवळ घुटमळायला लागली होती. त्यामुळे मोहीम थांबवणं स्मिथला शक्यच नव्हतं. तो अर्काटजवळपासच्या मुलूखात सरकायला लागला. त्याचवेळी त्याला मोठी रसद मिळाल्यामुळे त्याची तीही चिंता मिटली होती. आता हैदरशी सामना करायला तो मोकळा झाला. त्याचवेळी निजामाला त्याच्या मुलखात शत्रूने हल्ले करायला सुरुवात केली आहे ही बातमी मिळाली. हैदरबरोबर हातमिळवणी करून हवा तसा लुटालुटीचा फायदा ला मिळाला नसल्यामुळे तो बाहेर पडायचा विचार करायला लागला. पण कर्नल स्मिथच्या मोहिमेमुळे तो लढाईत राहिला. २६ सप्टेंबर १७६७ चा दिवस उजाडला. थिरूअनमलाईची भूमी दोन्हीकडच्या फौजांनी व्यापून गेली होती. कर्नल स्मिथच्या फौजेची हैदर-निजामाच्या फौजेशी गाठ पडली. हैदरने आपल्या १६ मोठ्या तोफा स्मिथच्या

डाव्या बगलेशी उभ्या केल्या आणि तोफा सुरू केल्या. स्मिथला कोंडीत पकडण्याचाच हैदरचा डाव होता. कर्नल स्मिथ डावीकडे सरकायला लागला तेव्हा त्याला पाणथळीची जागा दिसली. पलिकडे डोंगर होता. त्या डोंगराच्या मागे आडोशाला हैदर-निजामाच्या फौजा लपल्या होत्या. स्मिथने दलदल पार करून शत्रूला जाऊन भिडायचं ठरवलं. त्याच्या फौजेची एक फळी उत्तरेकडे सरकली. हैदर-निजामाच्या फौजाही समोर आल्या आणि एकमेकांना भिडल्या. त्या डोंगराच्या आडोशाने त्यांची झुंज सुरू झाली. हैदरच्या फौजेने डोंगराच्या माथ्यावर जायचा प्रयत्न चालू केला, पण इंग्रजी अधिकारी कॅप्टन कूकने तो प्रयत्न हाणून पाडला आणि शत्रूच्या फौजेला रोखून धरलं. या काळात कर्नल स्मिथने आपल्या तोफा चढवल्या आणि तो स्थिरावला. हैदरच्याही तोफा या लढाईत नीट लागू झाल्या नाहीत. रणांगणावर मोठाच गोंधळ माजला. इंग्रजांच्या तोफा सुरू झाल्यावर हैदरच्या घोडदळाची पळापळ सुरू झाली. हैदरने आशाच सोडली, आणि तो निजामाकडे गेला. परत फिरावं असा त्याचा सल्ला होता, पण निजामाने साथ दिली नाही. आपण वीरमरण पत्करणार असा त्याने मोठा आव आणून हैदरला सांगितलं. हैदर परत आपल्या फौजेत गेला.

निजामाबरोबर त्याचा जनानाही तिथे फौजेत होता. निजाम स्वत: घोड्यावर होता. शत्रूच्या हल्ल्यातून वाचवण्यासाठी त्याने आपल्यामागे, हत्तीवर बसलेल्या जनानाला हत्ती फिरवून माघारी नेण्याचा हुकूम दिला. तेव्हा हत्तीवर बसलेल्या बेगमेने सांगितले, " हा साम्राज्याचा हत्ती आहे, त्याला परत फिर हा आदेश ऐकण्याची सवय नाही, हा परत फिरणार नाही " परिणाम एकच झाला. निजामाच्या अनेक हत्तींनी आपला प्राण गमावला. युध्दाची धुमश्चक्री इतकी तीव्र होती की निजाम स्वत: आपल्या सरदारांवर, रुक्नौद्दालावर लढाई सोपवून पळून गेला. हैदर एकटा पडला. दोन्ही पक्षांनी रणांगणावरचं मिळेल ते सामान उचललं, आणि अंधार पडायला लागल्यामुळे दोन्हीकडील फौजांनी परतीची वाट धरली. जय विजय कुणाचाच झाला नाही. तळावर पोचल्यावर कर्नल स्मिथने परत आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून रात्री हैदरवर हल्ला करण्याची योजना आखली. त्या कामगिरीवर फिट्झिराल्ड याला नेमलं. त्याचा वाटाड्या हा हैदरचा विश्वासू गुप्तहेर नोकर म्हणून काम करत होता, हे स्मिथला माहीत नव्हतं. त्या " वाटाड्याला " घेऊन फिट्झ्जेराल्ड ताजीतवानी फौज घेऊन निघाला. हैदरच्या गुप्तहेराने या सेनापतीला दलदलीतून, चुकीच्या मार्गाने गोल गोल फिरवून दमवलं. शेवटी फौज परत आपल्या तळावर आली. दुसरे दिवशी सकाळी फिट्झिराल्ड परत आपल्या

फौजेला घेऊन निघाला जरा टेकाड चढल्यावर दूर मैदानात त्याला निजामाच्या फौजांनी पळून जातांना टाकून दिलेली युध्दसामग्री दिसली. ४१ मोठ्या आणि जंगलात लपवलेल्या १५ लहान तोफा त्यांना सापडल्या. फुकटात मिळालेल्या या साहित्याने इंग्रज फौज खूष झाली. पण दुसरे दिवशी कोणतीही चकमक झाली नाही. त्यानंतर जोरात लढाई झाली. या लढाईत इंग्रजांचे १५० लोक मेले आणि जखमी झाले. यानंतर पावसाळयामुळे इंग्रजांनी मोहीम थांबवली. हैदर आणि निजामाची मात्र मोठीच हानी झाली. त्यांची ४००० फौज ठार झाली. निजामाच्या ६४ तोफा इंग्रजांना मिळाल्या. तोफा वाहून नेणाऱ्या गाड्याही हाती आल्या आणि दाणागोटा मिळाला तो वेगळाच. थिरुअनमलाईचा हैदरचा पराभव कळल्यावर टिपू सुलतान आपला इंग्रजांचा मुलूख लुटायचा उद्योग सोडून बापाला भेटायला येऊन पोचला. त्याउलट निजामाला झालेलं हे नुकसान सहन होणारं नव्हतं. त्याचवेळी बंगालच्या इंग्रजांनी निजामाचा पूर्व किनाऱ्यावरचा मुलूख लुटायला फौज पाठवली, त्यामुळे तो हैदरची युती सोडायच्या मन:स्थितीला पोचला. त्यानंतर दोघांचाही महिनाभरासाठी बारामहालमधे मुत्तुर गावाजवळ तळ पडला. दोघांच्यात झालेल्या लढायांबद्दल विचारविनिमय होऊन पुढील मोहिमेची आखणी झाली. हैदरने निजामाचा मोठा सत्कार केला. हैदरने निजामाला मखमलीने आणि

चांदीने मढवलेल्या एक लाख रुपयांच्या मसनदीवर बसवलं. सन्मान केला. निजामाकडील इतर मान्यवरांचेही सन्मान झाले.

या पावसाळ्यात कर्नल स्मिथ आपली काय रणनीती आखतो, याकडे हैदरचं सगळं लक्ष एकवटलं होतं. कर्नल स्मिथने पूर्व किनाऱ्यावरील ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबरच्या पावसाळ्यात आपल्या फौजांच्या छावण्या कांजीवरम्, वंदिवॉश, आणि त्रिचनापल्लीला ठेवल्या होत्या. हैदरने मात्र आपली मुलूखगिरी चालूच ठेवली. इंग्रजांनी हिसकावून घेतलेले त्याचे सगळे परगणे तो जिंकून घेत चालला. हैदरने नोव्हेंबर १७६७ मध्ये इंग्रजांनी हिसकावून घेतलेली थिरूपत्तुर आणि वाणियंबाडी ही दोन ठाणी घेतली. मग अंबुर किल्ल्याला वेढा घातला. किल्लेदार मुखलीसखान हा हैदरला सामील झाला आहे हे अंबुर किल्ल्यावर पाठवलेल्या कर्नल कालव्हर्टच्या लक्षात आल्यावर त्याने किल्लेदाराला कैद केलं. हैदरला मुखलीसखानच्या फितुरीमुळे किल्ला लगेच मिळण्याची खात्रीच होती. पण किल्लेदार आणि त्याचे साथीदार यांच्याकडून शस्त्रं काढून घेतल्यामुळे मुखलीसखानचं काही चाललं नाही. हैदरने मग किल्ल्याची पेठ मारण्यासाठी फौज गोळा केली. कॅप्टन कलवर्टने मद्रासला तातडीचा निरोप पाठवून मदत मागितली. आणि हैदरवर प्रतिहल्ला केला. जोरदार लढाई झाली. कर्नल स्मिथकडून येणारी मदत

मिळेपर्यंत कॅप्टन कलवर्टने किल्ला लढवला. हैदरने आधी तहाचं निशाण दाखवून किल्ल्यात शिरायचा बेत केला, नंतर कलव्हर्टला लाच देण्याचा प्रयत्न केला. पण काहीच मार्ग उपयोगी पडला नाही. तेवढ्यात मद्रासहून  स्मिथची फौज आली आणि कलव्हर्टला जोर आला. हैदरला मग तिथून माघार घ्यावी लागली.

या चकमकींमधे हैदरचं लष्करी नुकसान फार झालं नाही. पण त्याने आपला जिवश्च कंठश्च मित्र खाकीखान शहाला गमावलं. मोठ्या मोठ्या खडकांच्या आड लपून बसलेल्या फौजेवर किल्ल्यावरून तोफा चाललेल्या असतांना खाकीखानावर तोफेचा गोळा पडला आणि त्यात तो गेला. तो गोळा आधी शेजारच्या खडकावर आपटला आणि तिथे उसळी खाऊन उलटा फिरला, आणि खाकीखानच्या अंगावर पडला. हैदरचा अत्यंत जवळचा, विश्वासू, आणि चाणाक्ष असा हा मित्र हैदरला वेळोवेळी अनेक बहुमोल सल्ले देत असे. खाकीशाह हा हैदरच्या कुटुंबाशीही, जनानखान्यातील स्त्रियांशीही अत्यतं मोकळेपणाने वागत असे. त्यांची भरपूर चेष्टामस्करीही करत असे. पण तो सगळ्यांनाच जवळचा वाटे. एकदा हैदरने या चेष्टामस्करीचा क्रूर प्रकार केला. त्याने चेष्टेच्या भरात खाकीशाहच्या बायकोकडे, तुझा नवरा मेला, असा निरोप पाठवला. तेव्हा त्या बाईने विष पिऊन आत्महत्या केली. हैदर हादरला. पण दोघांची मैत्री अतूट राहिली. खाकीशाहने

खाकी नाव धारण केलं. खाकी म्हणजे धूळ. त्याचं आयुष्य म्हणजे धूळीचा राजा असं पडलं. ह्याच खाकीशाहने खोट्या कुराणावर हात ठेवून, खोटी शपथ घेऊन, नंजराजैयाला श्रीरंगपट्टणात बोलावलं आणि कैद केलं होतं. हैदरचा दुसरा जिवलग मित्रही गालिब महंमद खान हा चंगमच्या लढाईत ठार झाला. एका वर्षात दोघेही मेले. हैदरचं हे मोठंच नुकसान होते. हैदरने अंबूरचा वेढा तसाच चालू ठेवून तो स्वत: वणिअंबाडीला सरकला. तिथे सुरक्षित जागा शोधून बसून राहिला. कर्नल स्मिथ तिथे पोचला पण त्याने हैदरवर हल्ला न करता, निजामाची फौज हैदरपासून लांब जाण्याची वाट पहात बसला. तेवढ्यात हैदरला बातमी लागली की मद्रासहून मोठी रसद इंग्रजांसाठी निघाली आहे. हैदरने वणिअंबाडी सोडलं आणि तो कावेरीपट्टणला गेला.

८ डिसेंबरला, कावेरीपट्टणला त्याने मोक्याच्या जागी आपला तळ उभारला. त्याच्या एका बाजूला किल्ला, दुसऱ्या बाजूला अवघड जागा आणि समोर नदीचं पात्र अशा जागेत त्याला बसलेला पाहून इंग्रजी लष्कराला नदीच्या पात्रात समोरून हल्ला करण्याशिवाय गत्यंतरच उरलं नाही. हैदरचं घोडदळ कोरड्या नदीच्या पात्रात उतरलं. आणि युध्दाला सुरूवात झाली. तेवढ्यात इंग्रजांसाठी मोठी रसद येते आहे ही बातमी कळल्याबरोबर हैदर ४००० घोडदळ घेऊन तिथे पोचला. हैदरची ही बातमी कर्नल

स्मिथच्या गुप्तहेरांनी आणल्यावर स्मिथनेही एक तुकडी, रसद घेऊन येणाऱ्या फौजेच्या मदतीला पाठवली. हैदरने छोटी फौज समजून जोरदार हल्ला केला पण त्याच्या अजाणतेपणामुळे स्मिथच्या फौजेच्या मदतीमुळे त्याला जोरदार हिसका बसला. या तुंबळ लढाईत हैदरच्या मांडीखालचा घोडा गोळी लागून मेला. दुसऱ्या गोळीने त्याचा फेटाही पडला. हैदरला आपली हार दिसायला लागली. हैदरने आपली फौज घेऊन माघार घेतली, आणि इंग्रजांची रसद पळवायचं काम मकदूमअलीवर सोडलं. त्यातच त्याला कळलं की निजामाला या मोहीमेत रस राहिला नव्हता, कारण त्याच्या प्रदेशावर कर्नल पीच मोठी फौज घेऊन लुटायला निघाला होता. त्यामुळे आपला मुलूख सांभाळण्यासाठी निजाम हैदरला सोडायच्या तयारीत होता. अशा रीतीने दोघांची युती तुटली. २३ फेब्रुवारी १७६८ या दिवशी इंग्रजांच्या वतीने कर्नल स्मिथशी तहाची बोलणी करून निजाम हैदराबादला परत गेला. निजाम घाटावर होता, हैदर घाटाखाली पायथ्याशी होता. महंमद अलीने निजामचा तोरा उतरवल्यावर निजामाने अर्काटच्या नबाबाशी गुप्तपणे बोली सुरू केली. निजामाने २५/३० लाखांची खंडणी दिली, आणि आपल्या तोफा आणि वस्तभाव घेऊन निजाम निघून गेला. हैदरनेही आपल्या वकिलांना निरोप पाठवला की,

मराठ्यांकडे जा आणि निजामाबरोबर तह करणं नाईलाजाने प्राप्त झालं होतं असं सांगून पेशव्यांच्या मनातील गैरसमज दूर करावा.

हैदर एकटा पडला ते पाहून इंग्रज खूष झाले. आता त्याला एकट्याला संपवणं सोपं आहे असं इंग्रजांना वाटलं. पण हैदरची एकट्याची ताकद किती आहे ती त्यांना कळायची होती. हैदर इंग्रजांबरोबर लढतो आहे हे पाहिल्यावर हैदरचे कट्टर शत्रू नायर लोकांनी परत उठाव केला. मुंबईच्या इंग्रजांनी मलबारवर आपली फौज पाठवली. मलबारला हैदरने आपलं लढाऊ आरमार ठेवलं होतं. त्या बोटींवरच्या नाविकांचं आणि तिथला हैदरचा लष्करी अधिकारी लुफ्त अली बेग यांचं अजिबात जमत नव्हतं. इंग्रजांनी त्याचाच फायदा घेतला आणि आपली फौज तिथे पाठवली. इंग्रजांनी तिथे गेल्यावर आपण मलबारवर हल्ला करणार अशी हूल उठवली. त्याबरोबर लुफ्त अली बेग त्या ठाण्याच्या रक्षणासाठी धावला. तेवढ्यात इंग्रजांनी मंगलोर घेतलं. मंगलोरमधल्या असंतुष्ट बंडखोरांनीही इंग्रजांच्या चिथावणीने त्याचवेळी बंड केलं. निजाम निघून गेल्यावर, पश्चिम किनाऱ्यावरचे आपले प्रदेश सोडवायला टिपूला पुढे पाठवून हैदर स्वत: मंगलोरकडे निघाला. हैदरने आपला विश्वासू सरदार फजल उल खानवर बंगलोरचा किल्ला सोपवला आणि तो मंगलोरला गेला. तोपर्यंत टिपूने पुढे जाऊन परिस्थिती आटोक्यात आणली आणि तो हैदरची वाट

पाहात थांबला. हैदर बंगलोरहून मोठी फौज घेऊन निघाला आणि मंगलोरला पोचला. हैदर तिथे पोचल्याबरोबर इंग्रजांची फौज पळून गेली. आपले ८० युरोपियन आणि १८० देशी असे जखमी शिपाईही तिथेच सोडले. हैदरला त्यांची सर्व भरपूर युध्दसामग्री मिळाली. यातही हैदरबद्दल किरमाणी या लेखकाने हैदरचं चातुर्य लिहून ठेवलंय. तो सांगतो की हैदरने बिदनूरमधले२०,००० शेतकरी गोळा केले. त्यांना खोट्या लाकडी बंदूका दिल्या. गणवेश दिले आणि त्यांना घेऊन तो मंगलोरला गेला. त्याने किल्ल्यासमोर ती फौज इंग्रजांना दिसेल अशी उभी केली आणि टिपूला तोफा सुरु करायला आणि हल्ला करायला सांगितलं. एवढी मोठी फौज घेऊन आलेल्या हैदरला पाहून इंग्रजांनी पळ काढला. ते कसेबसे समुद्र किनाऱ्यावर पोचले. त्यांची गलबतं उभी होती, त्यात बसले आणि मुंबईकडे पसार झाले. त्या पळून जाणाऱ्या इंग्रजांच्या जहाजांवरही हैदरने हल्ला केला आणि त्यांना लुटून हैराण केलं. हैदरच हे करू शकला कारण मद्रासजवळची तो आपली खरी फौज घेऊन आला असता तर इंग्रजांकडून सपशेल हरला असता. सावधपणा आणि युक्ती हे त्याचे मोठे गुण त्याला नेहमीच यश देऊन गेले. हैदर मंगलोरला पोचल्याबरोबर बंडखोर मलबारी सहज शरण आले. केवळ हैदरला बाहेर काढण्यासाठीच हा शह इंग्रजांनी दिला होता. हैदरने मग होनावर बंदरही ताब्यात घेतलं. बसवराज

दुर्गही परत मिळवला. इंग्रजांच्या तोफा, खजिना, आणि नायर लोकांची लूट घेऊन हैदरने ती सुब्रमण्यम घाटाने बंगलोरला पाठवली आणि स्वत: बिदनूरवर पोचला. तिथे गेल्यावर, ज्या ज्या जहागीरदारांनी मलबारला जाणाऱ्या इंग्रजी फौजांना मदत केली होती, त्यांना एकत्र बोलावलं. या लोकांना फाशी, किंवा कैद अशी शिक्षा न करता, त्यांची नावं वाचून दाखवत त्यांच्याकडून त्याने त्या जहागीरदारांवर जरब ठेवण्यासाठी त्यांच्याकडून प्रचंड मोठा दंड वसूल केला.

हैदरला मलबारी लोकांची ही नेहमीची बंडाव्याची कटकट कायमची निस्तरायची होती. ते काम त्याचा धूर्त आणि कावेबाज अधिकारी मादण्णा याने फार हुशारीने केलं. त्याने सर्व जहागीरदारची सभा घेतली आणि त्यांना समजावलं की मलबार हा प्रांत हैदरसाठी नफ्यापेक्षा तोट्याचा जास्त ठरतो आहे. हैदरचा हा खर्च सर्वांनी भरून दिला तर तुमच्या सर्व जमिनी तुम्हाला परत मिळतील आणि तुमच्याच राहतील. तेव्हा सर्वांनी या सूचनेला संमती दिली. त्यानंतर हैदरच्या फौजा आणि लूट सुखरूपपणे पार झालं. हैदरने हाही प्रश्न निकालात काढून टाकला. फक्त अलीराजाला त्रास देऊ नका हे मादण्णाचं म्हणणं लोकांनी मौन पाळून नाराजी दाखवून गेलं. अलीराजाबद्दलचा त्यांच्या मनात आकस त्यांनी सोडला नाही. हैदर मलबारला गेल्यावर इंग्रजांनी

आपली रणनीती परत नव्याने आखली. एकतर गेलेले सगळे सुपीक परगणे परत मिळवायचे आणि दुसरं म्हणजे सरळ बंगलोरवरच मोठा घाव घालायचा असे दोन पर्याय कर्नल स्मिथने मद्रास सरकारसमोर ठेवले. या दोन्हीची सरमिसळ करून इंग्रजांनी दोन्ही बेत अंमलात आणायचं ठरवलं. त्यासाठी फौजेच्या दोन तुकड्या करण्यात आल्या. एक तुकडी कर्नल वूड या अधिकाऱ्याच्या हाताखाली बारामहाल ओलांडून इरोडे-कोइमतूर-दिंडीगलवर गेली. आणि स्मिथ त्याची फौज घेऊन हैदरने जिंकलेले परगणे जिंकायला सुरूवात केली. कर्नल वूडच्या हाताखाली बारामहाल, दिंडीगलपर्यंत इंग्रजी फौजा गेल्या आणि प्रदेश जिंकण्यात यशस्वीही झाल्या. त्यानंतर कर्नल वूड, स्मिथला भेटायला निघाला. स्मिथने तोपर्यंत कृष्णगिरी किल्ला, मैसूर राज्यातलं मूलबागल, होसूर आणि कोलार जिंकून घेतलं होतं. त्या ठिकाणची खंडणीही वसूल करणं चालू होतं. तेवढ्यात मद्रासकरांनी दोन अधिकारी स्मिथकडे पाठवले. खंडणी ठरवण्याचं आणि वसूलीचं काम अर्काटच्या नबाबाचं आहे, आपण फक्त प्रदेश जिंकून द्यायचा आहे असा निरोप त्या दोघा अधिकाऱ्यांनी स्मिथला सांगितला. कर्नल स्मिथला आणि कर्नल वूडला तर आता बंगलोर आणि श्रीरंगपट्टण जिंकायचे वेध लागले होते. बंगलोरला वेढा घालण्याचे त्यांचे बेत हैदरला कळले. कर्नल स्मिथने गुत्तीच्या मुराररराव

घोरपडेची मदत मागितली होती. ज्याला जरूर असेल, जेव्हा जरूर असेल तेव्हा आपली फौज घेऊन तिथे जायचं ही मुराररावाची वर्षानुवर्षाची रीत होती. हैदरनेही आपल्या सुरुवातीच्या काळात असं केलं होतं. आजवर तो फ्रेंच, इंग्लीश, मराठे, निजाम यांच्याशी असेच व्यवहार करत होता. त्यामुळे इंग्रजांना मदत करायला तो लगेच निघाला, आणि स्मिथ त्याची वाट पाहात थांबला. होस्कोटेजवळ मुरारराव आणि इंग्रजी फौजांची गाठ पडली. या अवधीत हैदरने अत्यंत चलाखीने मलबारहून मोठी दौड करत बंगलोर गाठलं. मुराररावाने आपल्या विरुध्द इंग्रजांना मदत केल्याचा हैदरला खूप राग आला होता. म्हणून त्याने पहिल्यांदा मुराररावालाच चेपायचं ठरवलं. इंग्रजांनी मुराररावाला सावध करून हैदरचा तुमच्यावर हल्ला करण्याची शक्यता आहे, तरी आमच्या अगदी जवळ छावणी करा असा निरोप पाठवला, पण अति हिंमत दाखवण्याच्या भरात मुराररावाने तो सल्ला मानला नाही. आणि इंग्रजांपासून एक कोसावर आपली छावणी केली.

## मुरारराव घोरपड्यांच्या तळावर हैदरचा हल्ला- इ. सन १७६६.

इंग्रजांच्या गुप्तहेरांनी आणलेली बातमी खरीच होती. हैदर अचानक एका मध्यरात्री धूमकेतूसारखा उगवला आणि मुराररावाच्या छावणीजवळ पोचला. त्याने मुराररावाच्या छावणीवर अचानक हल्ला केला. त्या अंधारात प्रचंड कापाकापी सुरू झाली. मुराररावाची २००/२५० फौज हैदरने कापून काढली. मुराररावाच्या छावणीवर गोंधळ उडाला. हैदरचे सैनिक मुराररावाच्या तंबूपर्यंत पोचले, पण तिथल्या सैनिकांनी हा हल्ला मारून काढला. आपल्या राहुटीत झोपलेल्या मुराररावापर्यंत ही बातमी पोचली, तेव्हा त्याने चौकशी सुरू केली. हैदरचे स्वार छावणीभर पसरलेली बातमी मुराररावाला मिळाली. अत्यंत हुशारीने, समर्थ सेनानायकाला शोभेल असा हुकूम त्याने आपल्या सरदारांना सोडला. त्याने छावणीत आपल्या फौजेला सक्ती केली की कुणीही आपल्या घोड्यावर बसायचं नाही. अंधारात जो कुणी घोड्यावर दिसेल त्याला गोळी घाला. त्याचा फार मोठा फायदा झाला, तो हा की घोड्यावरची हैदरची माणसं पटापट निवडता आली आणि त्यांना गोळ्या घालता आल्या. हैदरच्या फौजेचा हा

हल्ला मुराररावाने असा परतवून लावला. हैदरची फौज पळून गेली. हैदरला आता इंग्रज बंगलोरवर येणार हे कळून चुकलं होतं. म्हणून त्याने आपला खजिना आणि मुलं-माणसं श्रावणदुर्ग या बळकट किल्ल्यात सुखरूपपणे नेऊन ठेवली. आणि बंगलोरचा किल्ला वाचवायच्या कामाला तो लागला. कर्नल स्मिथ आणि वूड यांना भेटू न देण्याचे त्याने अनेक प्रयत्न केले, पण ते सगळे निष्फळ ठरले, तेव्हा तो वेगाने गुर्रमकोंड्याला मीर रेझाकडे पोचला. त्याचीही फौज त्याने आपल्या हातात घेतली. गुर्रमकोंड्याहून तो कोलार सोडवायला निघाला आणि त्याचवेळी आपला एक वकील मद्रासकरांकडे सलुखासाठी पाठवला. बारामहाल आणि १० लाख देतो असा प्रस्ताव त्याने वकिलाबरोबर पाठवला. पण हा प्रस्ताव मद्रासच्या कौन्सीलने धुडकावला आणि गैरवाजवी प्रचंड मोठी रक्कम तर मागितलीच पण निजामासाठीही खंडणी मागितली. हैदरने याचा योग्यच अर्थ घेतला आणि युध्द सुरू ठेवलं.

कर्नल स्मिथने मूलबागल ठाणं जिंकून तिथे आपली फौज ठेवून तो पुढे बंगलोरच्या दिशेने गेला. पण तेवढ्यात मद्रासकरांनी स्मिथने ठेवलेली फौज काढून तिथे अर्काटच्या नबाबाची फौज पाठवली, आणि आपली फौज परत बोलावली. हैदरला ही बातमी लागल्यावर हैदर मूलबागलवर पोचला आणि सहजपणे त्याने तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला. कर्नल वूडच्या कानावर हे सगळं


प्रकरण आल्यावर तो मूलबागल वाचवायला धावला. त्याने जवळचा रस्ता निवडला. मूलबागल गेलं एवढंच त्याला कळलं होतं. पण हैदरची फौजही तिथे आहे हे त्याला माहीत नव्हतं. कर्नल वूडने पेठ म्हणजे किल्ल्याच्या बाहेरचा भाग ताब्यात घेतला पण बालेकिल्ला जिंकायला त्याला कठीण गेलं. त्याने शिड्या लावून किल्ला जिंकायचा प्रयत्न केला पण आतल्या लोकांनी त्याचा हल्ला परतवून लावला. कर्नल स्मिथने दुसरे दिवशी परत प्रयत्न करायचं ठरवलं, पण दुसरे दिवशी सकाळीच किल्ल्यात लपून बसलेल्या हैदरने आपलं घोडदळ घेऊन स्मिथवर हल्ला केला. हैदर आपल्यावर कोसळलेला पाहून कर्नल स्मिथ कमालीचा हादरला. पण कर्नल वूडच्या नशिबाने त्याच दिवशी कॅप्टन ब्रूक आपल्या फौजेनिशी कर्नल वूडच्या मदतीला येऊन पोचला. त्याने मूलबागल किल्ल्याच्या समोरच्या डोंगरावर आपल्या तोफा चढवल्या आणि तिथून हैदरवर तोफांचा मारा सुरू केला. कर्नाटकातले डोंगर हे एकमेकांवर रचलेल्या खडकांच्या राशीसारखे असतात. त्यामुळे कॅप्टन ब्रूकला तोफा चढवणंही बरंच अवघड गेलं. ते लोक तोफा डागतांना ' स्मिथ ' म्हणजे हाणा असा शब्द उच्चारत होते, त्यामुळे हैदरच्या लोकांना कर्नल स्मिथ आला असं वाटलं आणि ते मागे सरकले. कर्नल वूडला त्यामुळे जरा स्थिरावायला वेळ मिळाला.

हैदरने परत कर्नल वूडवर हल्ला केला. हा संग्राम फार जोरदार झाला. दोन्ही पक्षांचं खूप नुकसान झालं. वूडच्या मदतीला फौज येते आहे हे कळल्यावर हैदर तिथून नाहीसा झाला. इंग्रजांनाही एक गोष्ट निश्चितपणे कळली की, हैदरशी लढणं सोपं नाही. तो कुठूनही कधीही अचानक येतो, कधी अचानक निघून जातो, कधी अचानक हल्ला करतो, कधी मागून करतो, कधी पुढे येऊन वाट अडवतो. मग आपली कायमच दाणादाण उडते. हैदरला मोकळ्या जागेत ओढण्यात कर्नल स्मिथ अपयशी झाला म्हणून नाराज होऊन मद्रासकरांनी त्याला माघारी बोलवून घेतलं. खरं तर हैदरच्या तुलनेत, स्मिथकडे फौजेचं बळ कमीच होतं. हे अपयश खरं तर त्यांच्याच मूर्खपणामुळे, त्यांच्या अपुऱ्या माहितीवर आधारलेल्या निर्णयांमुळे, अर्काटच्या नबाबावरच्या गैरवाजवी विश्वासामुळेच घडलं होतं. त्यानंतर कर्नल वूडच्या हातीच सर्व सूत्र आली.

कर्नल वूड आपली पुढची रणनीती आखत असतांनाच त्याला हैदर होसूरवर आल्याची खबर आली. वूड लगेच निघाला आणि जवळच्या वाटेने जाण्यासाठी बागलूरचा रस्ता त्याने धरला. बागलूरला तेव्हा कर्नल अलेक्झांडर रक्षणासाठी नेमला गेला होता. कर्नल वूडने आपला भारी तोफखाना आणि जड वस्तू कर्नल अलेक्झांडरच्या हवाली करून तो सडी फौज घेऊन निघाला. हैदरच्या गुप्तहेरांनी या सगळ्या बातम्या हैदरला कळवल्याच

होत्या. त्याप्रमाणे हैदरने बागलूर-होसूर रस्त्यावरच्या रानात फौजेसह दबा धरला. वूड निघून गेल्यावर त्याने बागलूरवर हल्ला केला आणि कर्नल वूडचा सगळा सरंजाम, तोफा, दारूगोळा, वस्तभाव लुटून बंगलोरला पाठवून दिला आणि स्वत: होसूरवर गेला. इंग्रजांचं मोठंच नुकसान झालं. हैदर आत वूडवर घसरला. हैदरने त्याच्यावर पुन: पुन: आाक्रमण केलं ते इतकं जोरदार होतं की वूडला सावरायला वेळच मिळाला नाही. त्याचा दारूगोळाही संपला. त्याच्या हाताखालच्या लोकांनाही आपल्या या सरदाराबद्दल विश्वास वाटेना. तेवढ्यात त्याच्या नशिबाने वेंकटगिरीहून कर्नल फिट्झजिराल्ड फौज घेऊन मदतीला पोचला. त्याने हैदरचा हल्ला परतवून लावण्यात यश मिळवलं. त्याचा परिणाम म्हणजे कर्नल वूडलाही मद्रासकरांनी माघारी बोलावलं. आणि कर्नल लँगला त्याच्या जागी पाठवलं. बंगलोर घेण्याचा हा प्रयत्न इंग्रजांकडून चालू असतांना हैदरने आपला सरदार फजल उल खानला श्रीरंगपट्टणाला पाठवून नवीन फौज तयार करायला पाठवलं. फौज तयार झाल्यावर इंग्रजांनी हिसकावून घेतलेली बारीकसारीक ठाणीही जिंकून घ्यायला सांगितलं. त्याप्रमाणे फझल आपल्या कामाला लागला. हैदर मात्र कोईमतूरमधे शिरला आणि त्याने करूर जिंकून घेतलं. तिथून तो इरोडेच्या दिशेने निघाला. वाटेत कॅप्टन निक्सनबरोबर त्याची झटापट झाली. निक्सनचा

पराभव करून हैदरने इरोडे जिंकून घेतलं. एकेक करत घाटाखालचे सगळे परगणे हैदरने आपल्या ताब्यात घेतले. हैदरने तोपर्यंत मद्रासच्या इंग्रजांशी बोलणी चालू केली होती. पण ती फोल ठरली.



**हैदरचा मद्रासला धक्का.**

**हैदर मद्रासवर – २९ मार्च १७६९ –**

**इंग्रजांशी तह.**




यानंतर मात्र हैदरने आपल्या नेहमीच्या अचानक आणि धाडसी स्वभावाला साजेल असा निर्णय घेतला आणि एकदम मद्रासकडे वळायचं ठरवलं..ढिसाळ गुप्तहेरखातं इंग्रजांकडे

असल्यामुळे त्यांना हैदरच्या आक्रमणाची काहीच बातमी नव्हती. हैदर दोन रस्त्यांनी मद्रासवर पोचला. त्याची मुख्य फौज अथुर मार्गाने गेली, आणि हैदर स्वत: पूर्वेकडून मद्रासच्या बाहेर ५ मैलांवर सेंट थॉमस माऊंटवर जाऊन धडकला. १३० मैलांचं अंतर हैदरने साडेतीन दिवसांमधे पार केलं इतक्या मेहनतीने तो मद्रासला पोचला. इंग्रजांना ही बातमी लागल्यावर त्यांचा प्रचंड गोंधळ उडाला. त्यांच्या जवळ स्वत:ची फौजही नव्हतीच. घबराट निर्माण झाली. मद्रासच्या गव्हर्नरने कॅप्टन ब्रूकला बोलणी करण्यासाठी हैदरकडे पाठवलं. हैदरने त्याला सरळ सरळ सांगितलं," भांडणापेक्षा मैत्रीचे फायदे जास्त आहेत. पण अर्काटच्या नबाबाच्या संदर्भात काहीही तडजोड होणार नाही. " अर्काटच्या नबाबाला वगळून बोलणी यशस्वी होणं इंग्रजांना शक्य नव्हतं. त्यामुळे वाटाघाटी फिस्कटल्या.  हैदर मद्रासच्या दारात उभा राहिलेला पाहून गव्हर्नरचं धाबं दणाणलं. गव्हर्नर शरण आला. तहाच्या याचना करायला लागला. हैदरने स्वत:ला हव्या तशा अटी घालून तह करून घेतला. या कराराप्रमाणे, मराठ्यांच्या हल्ल्याच्या वेळी इंग्रजांनी हैदरला लष्करी मदत करायची. एकमेकांच्या शत्रूच्या लढाईच्या वेळी एकमेकांच्या मदतीला यायचा करार झाला. कॅप्टन ब्रूक जेव्हा हैदरकडे तहाचा प्रस्ताव घेऊन भेटायला गेला होता, तेव्हाच त्याने ब्रूकला सुनावलं होतं, की मी स्वत:

मद्रासच्या दारात उभा राहीन, तुमच्या गव्हर्नर आणि कौन्सिलची बोलणी ऐकेन आणि मला हव्या तशा अटी मान्य करून घेईन. २९ मार्च १७६९ या दिवशी तह झाला आणि युध्द संपलं.

ऑगस्ट १७६७ ते ४ एप्रिल १७६९ पर्यंत, दीड दोन वर्षे इंग्रजांबरोबर चाललेल्या या पहिल्या लढाईचा शेवट हैदरच्या म्हणण्याप्रमाणेच झाला. या युध्दानंतर हैदरने एक भलं मोठं चित्र तयार केलं. त्यात मद्रासचा गव्हर्नर आणि कौन्सिल गुडघे टेकून शरणागती व्यक्त करत आहेत, त्यांचा सेनापती कर्नल स्मिथ, एका हातात तहाचा कागद आणि एका हातात तलवारीचे दोन तुकडे घेऊन विनंती करत आहे आणि इंग्रज वकील डुप्रे याचं नाक धरून हैदर मोहरा काढत आहे असं दाखवलं होतं. पण दुसरीकडे हैदर कर्नल स्मिथच्या रणनीतीवर, युध्दचातुर्याने इतका प्रभावित झाला होता की युध्द संपल्यावर त्याने मद्रास गव्हर्नरजवळ स्मिथला भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. ती अर्थातच इंग्रजांनी नाकारली तेव्हा हैदरने चिकाटी न सोडता कर्नल स्मिथचं चित्र मागितलं. ते मात्र मद्रासकरांनी मान्य केलं. आणि त्याच्याकडे स्मिथचं चित्र काढून श्रीरंगपट्टणला पाठवलं. हैदरनंतर टिपूनेही ते चित्र जपून ठेवलं होतं. ( इ. स. १७९९ मधे ब्रिटीशांनी श्रीरंगपट्टण जिंकल्यावर स्मिथचं ते चित्र लिलावात विकलं. नंतर ते जनरल डेव्हीड स्मिथकडे राहिलं. )या युध्दात इंग्रजांची चांगलीच नाचक्की झाली.

इंग्लंडहूनही या अधिकाऱ्यांना दोषी ठरवण्यात आलं. आपला गनिमीकावा आणि इंग्रजांची शस्त्रास्त्र यांचा सुंदर मिलाफ हैदरने वापरला आणि इंग्रजांचा तोरा उतरवला हे या इंग्रजविरूध्द हैदरच्या लढाईचं मोठंच फलित होय. यानंतर हैदर बंगलोरला आला आणि त्याने आपल्या फौजेला विश्रांती दिली.

## हैदरविरुध्द वोडियार राजा राज. इ. स. १७६८.

सन १७६७ च्या दसऱ्यापासून गोपाळराव कर्नाटकात होते. माधवराव पेशव्यांनी एका विशिष्ट राजकीय खेळीने गोपाळराव पटवर्धनांना कर्नाटकात ठेवलं होतं. हैदर इंग्रजांशी लढतांना आपली ठाणी निर्वेधपणे परत मिळवावीत हा तर हेतू होताच, पण हैदर किंवा इंग्रज या दोघांनाही मराठी फौजेची गरज लागली तर आपली फौज तिथे असावी हा मुख्य हेतू होता. मराठ्यांची ठाणीही त्यामुळे निर्धास्त होती. फाल्गुन, चैत्र, वैशाख हे तीन महिने गोपाळरावांनी कर्नाटकातच रहावं आणि बरसातीला मिरजेला परतावं, असा निरोप पेशव्यांनी त्यांना पाठवला. त्याप्रमाणे गोपाळराव कर्नाटकात होते. आणि हैदर इंग्रजांशी लढण्यात गुंतला होता. हैदर इंग्रजांशी गुंतला असतांना १७६७ च्या अखेरीच्या काळात गोपाळराव पटवर्धन एका विलक्षण राजकारणात गुंतले होते. एक वर्षापूर्वी नंजराज नावाचा जो नवा वारस गादीवर आला होता, तो जरा चळवळया स्वाभावाचा होता. हैदरला उलथून पाडून आपण सत्ता हाती घ्यायची त्याची तळमळ, त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. हैदर इंग्रजांशी लढत असतांना त्याने मैसूर दरबारातील हैदरच्या विरोधकांशी गुप्तपणे संपर्क साधून बोलणी केली.

गोपाळराव पटवर्धन तेव्हा कर्नाटकातच खंडणी वसूलीचं काम करायला हिंडत असतांना या राजाने गोपाळरावांशी गुप्तपणे संवाद साधून त्यांना त्याचा कट कळवला. आणि कोण कोण त्याला साथ द्यायला तयार आहेत, हेही सांगितलं. हैदरला उलथवायचं असेल ते राजाला मोठ्या फौजेची गरज होती. त्यामुळे मराठ्यांच्या पाठिंब्याची आणि फौजेची नंजराजाला जरूर होती.

गोपाळरावांना अर्थातच पेशव्यांच्या कानावर ही बातमी घालणं आवश्यक होतं. माधवराव पेशव्यांना हे कळल्यावर त्यांनी त्यावर विचार केला. हे राजकारण या दोघांशिवाय कुणालाही माहीत नव्हतं. गोपाळराव मैसूर सरहद्दीवर जाऊन पोचले होते. २५००० फौज त्यांच्या बरोबर होती. मैसूर दरबारातील काही सरदार राजाच्या मागे आधारासाठी उभे होते, पण पेशव्यांना त्यावर खूप विचार करून राजकीय फायदे तोटे पहावे लागले. त्यांच्याही मनात म्हणून मैसूरच्या गादीवर परत वोडियार घराण्याची स्थापना होऊन हिंदू राज्याची सुरुवात व्हावी अशी इच्छा होती. पण त्यात अडचणी होत्या. निमित्त मैसूरचा राजा हे जरी असलं तरी हैदरविरूध्द लढाच होणार होता तो. त्यासाठी साऱ्या महाराष्ट्रातील फौज कर्नाटकात पाठवावी लागणार होती. दरबारातले हैदरचे मिलाफी, त्याला जाऊन मिळाले असते. त्यामुळे हैदरला सावध करणाऱ्यांकडून बातमी फुटण्याची शक्यता अधिक होती. शिवाय

निजाम, इंग्रजही मराठ्यांना संपवण्यासाठी हैदरला सामील झाले असते. या तीन शक्तींविरूध्द लढणं माधवरावांना अशक्य होतं. सखारामबापू, दादांच्या फंदफितुरीला आणखीनच प्रोत्साहन मिळणार होतं. त्याचवेळी निजाम आणि हैदरकडून इंग्रजांविरूध्द लढायला मदत मागण्यासाठी वकील आलेले होते, त्यामुळे विचार करून राजकारण करावे लागेल, पेशव्यांच्या मनात हे व्हावं असंच होतं, असं उत्तर गोपाळरावांचे पुणे दरबारातले वकील शिवाजी म्हैसकरांना दिलं. पेशव्यांचा पाठिंबा मिळाला नाही. त्यामुळे हैदरची सत्ता संपली नाही. मैसूरमधे राजक्रांती झाली नाही. म्हैसकरांनी ते गोपाळरावांना जानेवारी १७६८ ला हे कळवलं.

## पेशव्यांची चौथी स्वारी. इ. स. १७६९.

जानोजी भोसलेंची माधवराव पेशव्यांसमोर सपशेल शरणागती, पेशव्यांविरूध्द बंडाचा झेंडा उभारणारे दादासाहेब कैदेत, अशी सर्व आपल्या मनासारखी यशस्वी व्यवस्था लावल्यावर पेशवे परत हैदरकडे वळले. पेशवे जानोजीविरूध्द लढत असतांना हैदरने पेशव्यांना राग येईल असे मराठ्यांच्या मांडलिकांकडून खंडण्या गोळा करण्याचे उद्योग सुरूच ठेवले होते. तेव्हा पेशव्यांनी हैदरच्या वकिलाबरोबर निरोप पाठवला की गेल्या ३ वर्षांची ४० लाख रुपये खंडणी द्या. मीर रेझा हा आमचा नोकर आहे, त्याला आमच्या हवाली करा. पण हैदरचा वकील उगीचच बोलणी लांबवत राहिला, तेव्हा हैदरवर परत स्वारी करण्याचं पेशव्यनी ठरवलं. त्याचा समूळ नाश करणे हा एकच आणि अंतिम उद्देश त्यांच्या मनात होता. म्हणून त्यांनी तयारीही जोरात केली. विशेष म्हणजे यावेळी नागपूरचे साबाजी भोसलेही बरोबर होते. ७५००० फौज आणि ५० तोफा घेऊन ७ नोव्हेंबर १७६९ ला पेशवे कर्नाटकात निघाले. नागमंगलपर्यंत पेशवे निर्वेध आले. वाटेतील साऱ्या जहागीरदारांच्या खंडण्या गोळा झाल्या, आणि पेशवे सुरापुरावर आले. हैदर झाडीत लपून बसलाय ही बातमी

त्याच्याकडे आल्यावर त्यांनी हैदरचा प्रदेश लुटायला सुरूवात केली. हैदरने तमाम संस्थानिकांना, यावर्षीची खंडणी मला देऊ नका, पण मराठ्यांविरूध्द लढण्यासाठी मला सामील व्हा असा निरोप पाठवला. पण पेशवे येत आहेत हे कळल्यावर कर्नाटकातले संस्थानिक निर्धास्त झाले होते. पेशवे कर्नाटकात पोचण्यापूर्वीच हैदर श्रीरंगपट्टणातून बाहेर पडला सगळीकडची खंडणी गोळा करायला लागला. हरपनहळ्ळीवरून त्याने सावनूरच्या नबाबाला पत्र लिहून खंडणी ठरवण्यासाठी माणूस पाठवून देण्याविषयी पत्र लिहिलं. सावनूरचा दिवाण खंडेरावाला पाठवण्याची त्याने आज्ञाच केली, आणि खंडेराव न आल्यास बिघाड होण्याची धमकीही त्याच पत्रातून पाठवली. नबाबाची त्रेधा उडाली आणि वजनदार माणूस पाठवतो असा त्याने निरोप दिला. तोपर्यंत हैदरने ३००/४०० गावांमधल्या सुपीक जमिनीची खराबी केलीच होती, त्यामुळे खंडेराव हैदरला जाऊन भेटले. पण गोपाळरावांनी खंडेरावाला इशारा देऊन ठेवला होता की आम्ही जवळच आहोत, म्हणून बोलणी करावीत पण खंडणीची रक्कम मान्य केली तरी न द्यावी. पेशवेही फौज घेऊन येतच आहेत, तरी घाबरू नये. पण खंडेरावांनी हैदरला भेटल्यावर गुपचुपपणे खंडणी दिली आणि पेशव्यांना मात्र आम्ही खंडणी दिली नाही असंच सांगत राहिले. गोपाळरावांना ही अंदरकी बात मात्र खात्रीलायकपणे, नक्की

कळली होती. पेशवे कर्नाटकात उतरेपर्यंत हैदर खंडण्या गोळा करून बिदनूरच्या झाडीत जाऊन राहणार असल्याची बातमी गोपाळरावांना त्यांच्या गुप्तहेरांनी दिली होती, म्हणून पेशव्यांनाही त्या तयारीनेच यायचं होतं.

यावर्षी हैदरचा संपूर्ण नाश करणं महत्वाचं होतं. त्यासाठी बंगलोर ताब्यात घेण्याचा पेशव्यांचा मानस होता. पेशव्यांनी हैदरला शह देण्यासाठी श्रीरंगपट्टणाला जायचा निर्णय घेतला. सहा महिने लढवता येतील एवढी बेगमी हैदरने श्रीरंगपट्टण आणि बंगलोरच्या किल्ल्यात करून ठेवली होती. या दोन ठिकाणी वेढा घालण्याआधी पावसाळा जवळ येण्याआधी पेशव्यांनी लहानसहान सर्व ठाणी जिंकली. पेशवे लांब गेले हे पाहून हैदर धीट झाला. तेव्हा तो तुंगभद्रेच्या काठावर उडगणीला राहिला होता. तेथून सड्या फौजेनिशी बाहेर पडला आणि तारीकेरीवर पोचला. गोपाळरावांना ही बातमी कळल्यावर तेही तारीकेरीवर आले. पेशवे दूर आणि गोपाळराव अजून मागे आहेत हे पाहून हैदर तेवढ्यात शिरेवर गेला. त्याने चित्रदुर्ग घेतलं आणि परत मासूरच्या बारीच्या जंगलात येऊन लपला.

मासूरची बारी म्हणजे रट्टेहळ्ळी ते अनवटीच्या मधला दाट जंगलाचा खडतर मार्ग. एकच घोडं एका वेळी जाईल, अशी वाट.

हैदरला मिळणारी रसद बंद करणं आणि हैदरचे हाल करणं हा मराठ्यांचा उद्योग. या वेळी हैदर आपल्या जागा सारख्या बदलत होता. अचानक कुठून तरी उगवे आणि छापा घालून जाई. गोपाळराव आणि त्यांचे बंधू डोळ्यात तेल घालून छावणीचं रक्षण करत होते, आणि हैदरला गाठायचा प्रयत्न करत होते. दोघेही शौर्याच्या बाबतीत एकमेकांचे प्रतिस्पर्धी. तोडीस तोड. गोपाळराव शूर आणि युध्दपारंगत, पण हैदर कपटी, आणि कावेबाज. स्थानिक जमीनदार हैदरला मराठ्यांच्या सर्व हालचाली कळवत. त्यामुळे गोपाळरावांवर हैदरची चांगलीच पाळत राहिली.

## हैदरचा पटवर्धन तळावर अचानक हल्ला.

## २७-२-१७७०.

हैदर तारीकेरीला सरकला असल्याची बातमी आली तेव्हा गोपाळरावही भद्रावतीला 18 कोसांवर उभे राहिले. आपला मुलुख त्यांनी पाठीशी ठेवला होता. आपला प्रदेश पाठीशी असला की रसद बंद होत नसे, पळून जायची वेळ आली तर जीव वाचवणंही कठीण होत नसे. म्हणून सेनानायक नेहमीच आपल्या प्रदेशाला मागे ठेवत असे. तेच गोपाळरावांनी केलं. त्यामुळे हैदरची पंचाईत व्हायला लागली. इकडे झाडीत राहून समोर गोपाळराव, आणि दूर पेशवे त्याचा मुलूख जिंकत चाललेत. आता गोपाळरावांचा सर्वनाश केल्याशिवाय दुसरा मार्ग नाही हे हैदरला कळून चुकलं. त्याने त्याच्या कपटी स्वभावानुसार रणनीती आखली. आपण श्रीरंगपट्टणला चाललो असा त्याने पुकारा केला. कर्नाटकातील रयत त्याचीच असल्याने तिथल्या लोकांनी हैदर श्रीरंगपट्टणला निघाला अशीच आवई उठवली.

गोपाळराव आणि त्यांचे बंधू सदासावधान तर होतेच, रोज एक ना एक पटवर्धन बंधू २०/२५ मैलांचा तलावा करून येत असत. नीलकंठ आणि परशुरामभाऊ रात्रीच्या छबिन्याला म्हणजे

गस्तीला जात होते, तेव्हा त्यांना रयतेकडून हैदर बाहेर पडल्याचीच बातमी मिळत होती. हैदर निघाला. ६ कोसांवर संकरापट्टण नावाचं गाव होतं, तिथे गेला. म्हणजे पटवर्धनांपासून १८ अधिक ६ म्हणजे २४ कोसांवर पोचला. ३ दिवस त्याने तिथे मुक्काम केला. चौथ्या दिवशी रात्री बाहेर पडला आणि कडूरास पोचला. १२ हजार गारदी, ४ हजार घोडेस्वार, २५ तोफा घेऊन तो कडूराहून निघाला आणि रात्रभर चालून अचानक गोपाळरावांच्या छावणीसमोर येऊन उभा राहिला.

पण गोपाळरावांचं दैव बलवत्तर होतं. हैदरच्या फौजेतला एक स्वार त्याच्याकडून निघाला आणि वेगाने गोपाळरावांच्या छावणीवर मध्यरात्री पोचला. नीलकंठ आणि परशुरामभाऊंना त्याने हैदर तुमच्यावर चालून येत आहे अशी वर्दी दिली. मध्यरात्री पोचलेल्या या स्वारावर, हैदरनेही फजिती करण्यासाठी ही खेळी करण्याची शक्यता असल्याने विश्वास ठेवणंही कठीण होतं, म्हणून दोघांनी त्याच्याकडे थोडं दुर्लक्ष केलं. पण तो परत परत विनवत राहिला. म्हणून मध्यरात्री गाढ झोपलेल्या गोपाळरावांना उठवण्यासाठी या दोन्ही बंधूंनी त्याला परवानगी दिली. तो मग गोपाळरावांकडे गेला. त्यांचाही विश्वास बसणं कठीणच होतं. कारण तो हैदरकडून आलेला माणूस होता. गोपाळरावांनी मग तो खरा कशावरून असं त्याला विचारलं, तेव्हा तो म्हणाला की पूर्वी

नानासाहेबांच्या सैन्यात त्याने चाकरी केली होती. मी त्यांचं मीठ खाल्लंय म्हणून मी इथे तुम्हाला पूर्वकल्पना द्यायला आलो आहे. बातमी खोटी निघाली तर माझे हातपाय तोडा एवढा विश्वास त्याने गोपाळरावांना दिल्यावर गोपाळरावांनी, तळावरील सर्वांना ताबडतोब घोड्यावर स्वार होऊन तयार व्हायला सागितलं. हैदरशी लढायला फौज तयार झाली. २७ फेब्रुवारी १७७०.. अमावास्येची रात्र. पटवर्धनांच्या फौजेत मोठी जाग, गडबड. हैदरच्या अकस्मात छाप्याच्या वर्दीमुळे सबंध छावणी जागी झाली आणि लगबगीने बाजार बुणगे आपापलं सामान आवरायला लागले.छावणीत सगळे तयार होतात न होतात तोच हैदरचे नगारे दूरवरून ऐकू यायला लागले. १२,००० गारदी ४००० धोडदळ घेऊन हैदर जवळ येऊन पोचला. गोपाळरावांनी बुणगे आणि इतरांना बुध्दिहाळला जायची आज्ञा दिली. तळावर एकदम गडबड उडाली. गोपाळरावही हत्तीवर स्वार होऊन आघाडीवर चालले. अंबाऱ्या आणि नौबत हत्तीवर लादली होती, बाकी फौज घोड्यावर जीनही न घालता तशीच लढायला तयार होऊन उभी राहिली. पाठोपाठ सर्व पटवर्धन बंधूही अंधारात आघाडीला जाऊन त्यांच्या फौजेने एक भिंतच निर्माण केली. मराठ्यांच्या तळावर नौबती वाजायला लागल्यामुळे हैदरला, मराठ्यांची फौज कुठे आहे ते लगेच लक्षात आलं. अजून तो दूर होता, पण त्याने तोफांच्या टप्प्यात आल्यावर तोफा चालू

केल्या.  त्याच्या बाणांचा आणि तोफांचा मारा सुरू झाला आणि मराठ्यांच्या फौजेत माणसं जमिनीवर कोसळायला लागली. गोपाळरावांनी सर्व फौजेला ताकीद देऊन हैदरवर कुणीही जायचं नाही, सर्वांनी जागा न सोडता ठासून उभं रहायचं असा हुकूम सोडला. सारे बंधू विलक्षण साहसाने ठासून उभे राहिले. ४/५ घटका तुंबळ युध्द झालं. एक घटका म्हणजे २४ मिनिटं . परशुराम शिंद्यांचा मुलगा गोपाळरावांच्या जवळच घोड्यावर होता. त्याला तोफेचा गोळा लागला आणि त्याचा मेंदू फुटून गोपाळरावांच्या अंगावर रक्त उडालं. गोपाळरावांचे चुलत बंधू महादेवअण्णा जवळच होते. त्यांच्या गुडघ्याला गोळी लागली आणि गुडघा जबर रक्ताळला. त्यांचा घोडाही मेला. परशुराम भाऊंच्या तर तीन घोड्या एका पाठोपाठ मेल्या. परशुराम भाऊंनी घोडा बदलून त्याच्यावर स्वार होऊन लढायला तयार व्हावं तर तो घोडा मरावा. पण भाऊंना मात्र जखम झाली नाही, त्यांचं प्राणरक्षण झालं. पटवर्धन बंधूंच्या शौर्याला आणि परा*माला तोड नव्हती. या लढाईत सर्वजण देहभान विसरून हैदरशी सामना करत असतांनाच  झुंजुमुंजू व्हायला लागलं. अंधूक प्रकाशाचा फायदा घेऊन हैदर मागे फिरला आणि जवळच्या ओढ्यावर जाऊन थांबला. पटवर्धनांच्या या गोटात हैदरचे ५००/६०० गोळे पडले पण माणसं मात्र २५/३० च मारली गेली. जामदारखाना, राहुट्या, बाजार, सगळं लष्करचं


लुटलं जाण्याची भीती होती, पण पटवर्धन बंधूंनी आघाडीला फौजेची भिंत तयार केल्यामुळे छावणी सुखरूप हलली. हैदरही गोटात शिरू शकला नाही. सकाळ झाल्यावर परत हैदरची फौज मराठ्यांच्या तळावर हल्ला करायला आली, पण संध्याकाळपर्यंत पटवर्धन बंधू ठासून उभे राहिले. त्यामुळे तळावरच्या बाजार-बुणग्यांना सुखरूपपणे सामान हलवून बुध्दीहाळला पोचणं सोपं झालं. मात्र महादेवअण्णांना गुडघ्याला जखम झाली होती त्यात त्यांना देवाज्ञा झाली.

हैदरशी सामना म्हणजे मराठ्यांच्या फौजेवर विलक्षण ताण होता. तो कुठून अचानक उगवेल याची खात्री नसे. त्यामुळे सतत सावधान रहावं लागे. रोजच्या रोज दिवसा तलावा आणि रात्री छबिन्याची म्हणजे गस्तीची कष्टप्रद कामं असत. हैदर कायम जंगलात दडलेला आणि मराठी फौजेला मात्र कधी पाणी नाही, तर कधी अन्न नाही, कधी जळणासाठी लाकूडफाटा नाही. कोस कोस अंतर चालत जायचं म्हणून आठ आठ दिवसांच्या भाकरी करून ठेवायच्या आणि सर्वांनी त्याच शिळ्या भाकरी खायच्या. फौज उपाशी राहिली, घोड्यांना चारा मिळाला नाही तर गाव लुटला जाण्याची भीती सरदार म्हणून गोपाळरावांना जबाबदारी असे. शिवाय पेशव्यांकडून हुकूम येईपर्यंत निर्णयही घेता येत नसत. हैदरशी लहानमोठ्या चकमकी चालूच होत्या. तेवढ्यात बातमी

आली की टिपू सुलतानाने आगडीची पेठ मारली. ब्राह्मणांना मारलं, काहींची नाकं छाटली, बायकाही पळवल्या. हैदर आणि त्याच्या मुलामधे हाच फरक होता. हैदरला आवडलेली स्त्री फक्त तो न्यायचा, पण सरसकट बायका पळवणंही केलं नव्हतं. सारा गाव भेदरला. गोपाळराव आगडी गावाच्या संरक्षणासाठी धावले.

यानंतर हैदरने श्रीरंगपट्टण गाठलं. मराठे आता राजधानीवर येतील याची त्याला खात्री होती. त्याचा अंदाज खराही होता. कारण बारीकसारीक ठाणी जिंकत पेशव्यांचा रोख श्रीरंगपट्टणाकडे जाण्याचाच होता. पेशव्यांनी निजगलचा किल्ला घेतला. जवळजवळ १ कोटी रुपयाच्या वसूलाचा प्रदेश पेशव्यांनी हस्तगत केलाच होता, आता फक्त श्रीरंगपट्टण, बंगलोर आणि त्यामुळे हैदर एवढंच बाकी होतं. एवढं नुकसान झालं तरी हैदर तहास येईना याचं पेशवे आणि त्यांचे सारे सरदार यांना आश्चर्य वाटत होतं. कदाचित दादासाहेब हैदरचे मिलाफी असतील अशी शंका पेशव्यांना यायला लागली.  एवढा मिळवलेला मुलूख सोडून टाकणं पेशव्यांना शक्यच नव्हतं. हैदरने पाठोपाठ येऊन सगळा मुलूख घेऊन टाकला असता. म्हणून मुराराव घोरपड्यांनी पेशव्यांना छावणी करावीच लागेल असा सल्ला दिला. छावणी करायची तर मुख्य सरदार कुणाला नेमावं यावरून खूप चर्चा झाली. कर्नाटक म्हणजे गोपाळराव हे समीकरण दृढ होतं. खुद्द गोपाळरावांनाही तीच

अपेक्षा होती. पण पेशव्यांनी त्र्यंबकमामा पेठे यांना कर्नाटकाच्या या छावणी काळातलं मुख्य सूत्रधार नेमलं.



गोपाळराव, रास्ते, शहाजी भोसले, सखाराम हरि, मुराराव, घोरपडे, अशा सर्व सरदारांनी पेठ्यांच्या हाताखाली प्रदेश राखायचा असं ठरलं. कर्नाटकाची सूत्रं आपल्या हाती आली नाहीत म्हणून गोपाळराव दुखावले गेले. पण त्यांची तब्येतही कुरकुरायला लागली. दगदग सोसवत नाही आहे, असं त्यांना वाटायला लागलं. नको ही सरदारी अशा मजकूराची पत्रं ते मिरजेला वडिलांना लिहायला लागले. गोविंदपंतांनी दुखावल्या गेलेल्या आपल्या मुलाची समजूत घालणारी पत्रं लष्करात पाठवली. मिरजेच्या या डोलाऱ्याचा मुख्य आधार गोपाळरावच होते. माधवराव पेशव्यांचा उजवा हात गोपाळरावच होते. वैशाख वद्य ५ ला सूर्यग्रहणाला कृष्णातीरावर मुक्काम करून तिथे पेशव्यांची सुवर्णतुला झाली आणि एक महिन्यांनी ज्येष्ठ ५ ला पेशवे पुण्यात परतले.

पेशवे निघून गेल्यावर पेठे सरदारांनी पुढच्या ४ महिन्यांच्या काळातल्या कामाची वाटणी केली. सर्व सरदारांनी आपापल्या फौजेसह १०/१० कोसांच्या अंतराने राहून, गुरांच्या चारापाण्यांची सोय करून एकमेकांच्या मदतीने रहायचं आणि हैदरचा छापा आला तर एकमेकांच्या मदतीला धावायचं असा बेत केला आणि सगळे नीलगड, पावागड, रायदुर्ग अशा आपापल्या मुक्कामी पांगले. शिरे हे ठाणं भक्कमपणे सांभाळायला हवं होतं. तिथे

असलेला महिमाजी शिंदे याच्याबद्दल सरदारांना भरवसा वाटत नव्हता, तो डावपेचात कमी होता, म्हणून त्याच्या सोबतीला बळवंत प्रभू नावाच्या हुशार, मर्द माणसाला आणि तोफखान्याचा महंमद इसाफ या गारद्यांच्या अंमलदाराला शिऱ्याला पाठवलं. ( हाच पुढे नारायणराव पेशव्यांच्या खुनात सहभागी होता. )

## मराठ्यांची कर्नाटकात छावणी. -१७७०.

मराठी फौजेला आणि सरदारांना सुखाने विश्रांती घेऊ न देण्याचं धोरण पावसाळाभर राबवण्याचं हैदरने ठरवलं. हैदरने काही फौज श्रीरंगपट्टणाला ठेवली. काही मागडीच्या झाडीत ठेवली. काही कोलारला पाठवली. काही बंगलोरला ठेवली. या सगळ्या लहान लहान टोळ्या होत्या. त्याची अर्धी फौज टिपूच्या हाताखाली पेशव्यांच्या ठाण्यांवर गेली होती. टिपू सुलतान नरेगल, सावनूर, अडूर, हरिहर, होस्कोटे अशा गावांवर दंगा करत सतत हिंडत होता, गाव मारत होता, खंडणी जबरदस्तीने उकळत होता. हैदरच्या या टोळ्या म्हणजे साधारणपणे १००० गारदी, ७०० स्वार, आणि २००० पायदळाच्या होत्या. या टोळ्यांजवळ ३ तोफाही दिलेल्या होत्या. या टोळ्यांचा बंदोबस्त मराठी फौजेला करावा लागला.

यातील एक टोळी चिकबाळापूरवर पोचली. किल्ल्यावर तोफा चालू केल्या. या किल्ल्यात जानराव धुळुप होते. त्यांची रोज चकमक घडायला लागली. काही दिवस किल्ला लढवल्यावर किल्लेदार जानराव धुळुपांनी गोपाळरावांना मदतीला बोलावलं. पत्र पोचताच गोपाळराव, मुरारराव, आणि रास्ते यांनी २५ कोसांची

मजल मारून टोळी २/३ मैलांवर दिसू लागताच त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. हैदरच्या टोळीने त्यांच्यावरही बंदूका-तोफा लागू केल्या. गोपाळराव आवेशाने त्या गारद्यांच्या रांगेतच शिरले. रांग मोडून काढली, तोफाही हिसकावून घेतल्या. मुरारराव आणि रास्ते यांनी शत्रूला सरळ ठारच केलं. काही जखमी काही ठार, काही पळून गले. सगळी संख्या १००० च्यावर होती. मग या सर्वही बहाद्दरांनी टोळीची दारू, तोफा, बंदूका, घोडे सगळं आपल्या तळावर नेलं. ही बातमी लागल्यावर उरलेल्याही सर्व टोळ्यांनी पळ काढला. पावसाळ्यात विश्रांती न घेता पेठे मामांनी गुर्रमकोंडा जिंकायचं ठरवलं. त्याचं कारणही तसंच होतं. हा किल्ला मीर रेझाचा. पण हैदरला सोडून तो मागच्या पेशव्यांच्या स्वारीच्या वेळी पेशव्यांच्या चाकरीत आला होता. पेशव्यांनी मीर रेझाला चाकरीत घेऊन आपल्यावतीने लढायला म्हणून हा किल्ला दिला होता. मीरने आता पेशव्यांचा पक्ष सोडला, पण किल्ला मात्र सोडला नव्हता. तो ताब्यात घ्यायला पेठे तिकडे निघाले. गोपाळराव आघाडीला होते. त्यांनी गुर्रमकोंडाजवळची सर्व ठाणी जिंकली. आणि पेठेमामांनी किल्ल्याला वेढा घातला. मीरला हैदरने कैदेत ठेवलं म्हणून मीरचा भाऊ सैदुमियाँ किल्ल्याच्या रक्षणासाठी होता. त्याने शरण न जाता किल्ला लढवण्याचं ठरवलं.

पेठे, रास्ते, घोरपडे, सखाराम हरि, सगळे किल्ल्याला परीघ घालून बसले. २० दिवस वेढा चालला. किल्ला भक्कम होता. भिंती मातीच्या होत्या. भोवती खंदक होता. खंदकात पाणी होतं, पण एक बाजू मात्र कोरडी होती. जागोजाग बुरुजांवर तोफा होत्या. मराठ्यांनी आधी बाहेरचा भाग म्हणजे पेठ जिंकली. खंदकापर्यंत आत शिरले. मग वेढा घातला. त्यांच्या तळापासून खंदकाखालून बुरूजापर्यंत सुरूंग खोदला आणि दारूचे बुधले भरून त्याला बत्ती दिली. धडाम् आवाजाने बुरुज उडाला. बुरुजावर उभी असलेली माणसंही ठार झाली. भिंतीला मोठं भगदाड पडलं, त्यातून मराठी फौज आत शिरली. सैदुमियाँने भिंत रातोरात बांधून काढली, आणि ४ दिवस किल्ला लढवला. मराठे त्या ढासळलेल्या बुरूजावर उभे राहिले आणि शत्रूशी लढायला लागले. आणखी ५ सुरूंग मार्गी लागले होते. मराठ्यांच्या तोफाही सुरू झाल्या होत्या.

पेठेमामांनी गोपाळरावांना श्रीरंगपट्टण ते गुर्रमकोंडाच्या वाटेवर ठेवलं होतं. गोपाळराव ज्या वाटेवर उभे होते, त्या मार्गावर चंद्रोजी जाधव, बाळाजी भीमराव नावाचे मराठा सरदार हैदरतर्फे ४००० फौज घेऊन आले होते. त्यांनी जाळपोळ, लुटालूट सुरू कली, गोपाळराव जिथे होते, तिथून त्यांच्या अंगावर धावले आणि आग्राम गावाजवळ मोठा संग्राम होऊन चंद्रोजी-बाळाजीसुध्दा पाडाव आले. गारदी, शिपाई यांनी शरणागती पत्करली. या

शिपायांच्या डोक्यावरूनच भारे बांधून लूट वाहून आणली. २५०० बंदुका, सर्व तोफा, ३०० घोडे सामान मराठ्यांच्या तळावर आलं. गोपाळरावांना मोठंच यश मिळालं. सखाराम हरि हा धाडसी अवलिया तर हैदरच्या फौजेमागे त्यांना पिटाळत बंगलोरपर्यंत गेला. किल्ल्याला पोचेपर्यंत खूप चौक्या होत्या. तर या शूराने डोईवर गवताचे भारे घेऊन आत प्रवेश मिळवला आणि काही फौजेला मारून आला. किल्ल्याच्या आत मात्र सैदुमियाँची अवस्था वाईट झाली होती. १००० गारदी, २/३ हत्ती, कुटुंबं आणि गुरंढोरं आत होती. गुरांना चारा नाही, लोकांना धान्य संपत आल्याने खायला नाही, असे हाल सुरू झाले होते. माणसं मरत होती. किल्ल्यातले लोक आता गुरं मारून त्याचं मांस शिजवून खायला लागले होते. किल्ल्यातलं पाणीही संपायला लागलं. २ महिने होऊन गेले तरी हैदरकडून फौजेची कुमक, धान्याची रसद येईना. शेवटी सैदुमियाँ शरण आला. ऑक्टोबरमधे गुर्रमकोंडा किल्ल्यावर मराठ्याचं निशाण फडकायला लागलं. सैदुमियाँच्या लोकांना सुरक्षितपणे जाऊ द्यायचं असं ठरलं. २० लाखांचा मुलूख हाती आला.  मराठ्यांचा मोठाच विजय होता हा.

गुर्रमकोंडा.



# पेशव्यांचं आजारपण-गोपाळरावांचा मृत्यू.

इ. स. १७० चा पावसाळा संपला. दसऱ्याच्या सीमोल्लंघनाच्या मुहूर्तावर श्रीरंगपट्टणात हैदर लढाईच्या तयारीला लागला. त्याने इंग्रजांना आपल्या मदतीला बोलावलं, पण पेशव्यांशी वैरभाव पत्करणं त्यांना परवडलं नसतं, हा सूज्ञपणा त्यांना होता. म्हणून हैदरशी करार केला होता, तरी ते हैदरच्या मदतीला आले नाहीत. पेशवे पुण्याहून निघाले आणि हैदर जय्यत तयारीनिशी श्रीरंगपट्टणाहून निघाले. होस्कोटे आणि शिरे मिळवण्याला प्रथम प्राधान्य देण्याचा बेत आहे ही बातमी मराठी तळावर गुप्तहेरांनी आणली. आधी बिदनूराला शह द्यायचा ही रणनीती पेशव्यांनी आखली. .

ज्यादिवशी गुर्रमकोंडा हाती आला त्याच दिवशी, कार्तिक शुध्द १ ला म्हणजे १९ ऑक्टोबरला, पेशवेही कर्नाटकाच्या स्वारीला निघाले होते. या वेळची त्यांची तयारी दांडगीच होती. हैदरला संपवायचं हाच एक ध्यास होता. या वेळी त्यांनी १०,००० फावडी-कुऱ्हाडी तयार करण्याचाही कारखाना घातला होता. झाडं तोडण्याचा व्यावसाय करणारे तेवढेच रानतोडेही चाकरीत ठेवले. त्यांना घेऊन ते कर्नाटकात यायचे होते. हैदर ज्या रानात राहील,

त्या रानांना साफ करण्याचं काम करण्यासाठी त्यांची गरज होती. ४० शेरी तोफा तयार करण्याचाही कारखाना चालीला लावला. १५,००० गारदी- अरब, पठाण, हबशी, रोहिले, पुरभय्ये यांना चाकरीत घेतलं. गोपाळराव पटवर्धन या काळात आपला वसूल गोळा करायला अदोनीला गेले. गोपाळराव आदोनीला गेल्याची बातमी कळल्यावर पेठे मामा रागावले. हैदर बाहेर पडला असतांना गोपाळरावांनी आपला वैयक्तिक वसूल गोळा करण्यासाठी फौज घेऊन आदोनीला जाणं त्यांना बिलकुल पसंत पडलं नाही. त्यांनी गोपाळरावांना पत्र लिहिलं,

" हे पत्र १० पत्रांच्या जागी समजून लगेच उलटे फिरावे. नाहीतर आम्ही थोडे आहोत आणि तुम्ही जवळ नाही आहात हे कळल्यावर हैदर आपली करामत दाखवेल. आपली एखादीच जागा त्याने परत घेतली तरी आपल्याला तोंड दाखवायला जागा राहणार नाही. म्हणून पत्र पावताच दुसरा विचार न करता परत फिरावं. हैदर शिऱ्यावर गेला आणि त्याने ते घेतलं तर आजवर जे केलं ते व्यर्थ होऊन वेडेपणा सर्वांचे नजरेस भरेल. "

इतकी वर्ष हैदरशी शौर्याने झुंजणारे गोपाळराव पटवर्धन असे निघून का गेले ? त्याला फार मोठं कारण होतं, जे त्यांनी आपल्या कुटुंबियांपासून, सरदारांपासून आणि पेशव्यांपासून लपवून ठेवलं

होतं. गोपाळरावांना २ महिन्यांपासून जलोदराचा त्रास सुरू झाला होता. अंगी अशक्तपणा वाढायला लागला होता. दगदग झेपेनाशी झाली होती. चाकरीत खंड पडू नये, कर्तव्य चुकवू नयेत म्हणून ते स्वारीत हजर होते, आणि सोपवलेलं कार्य जबाबदारीने पार पाडत होते. पण आता दुखणं वाढलं होतं. छावणी करण्याने आणि या स्वारीमुळे कर्ज वाढलं होतं, ते फेडायला पैशाची गरज होतीच. तो पैसा उगवून घ्यायला आता नाही गेलं तर कधीच ते शक्य होणार नाही हे त्यांना पुरेपूर कळून चुकलं होतं. म्हणूनच गोपाळराव आपल्या सरदारीचा आर्थिक ताण कमी होण्यासाठी वसुलीला गेले. त्या हिंडण्यात त्यांची प्रकृती आणखीनच बिघडली आणि त्यांनी घरी जायचा निर्णय घेतला. आपल्या जागी आपले बंधू वामन याला बोलावून घेतलं, आणि ते पोचायच्या आतच ते मिरजेच्या रस्त्याला लागले. पेठ्यांना आधीच गोपाळरावांच्या निघून जाण्याचा राग आलेला होता, आता तर ते मिरजेला जात आहेत हे कळल्यावर त्यांनी पेशव्यांनाच रागारागाने पत्र लिहून गोपाळरावांचं चुकार वर्तन कळवलं. ४ बंद भरून मजकूर लिहिला. इकडे पेशवे मोठ्या उमेदीने नोव्हेंबरमधे पुण्याहून निघाले. वाईपर्यंत पोचले. पुण्यास असतांनाच माधवराव पेशव्यांची प्रकृती बिघडत होती. जेजुरीपर्यंत त्यांची तब्येत खूपच बिघडली. मोहिमेत भाग घेणं आपल्याला झेपणार नाही, हे कळल्यावर डिसेंबरमधे ते

पुण्याला परतले. पेशवे परत फिरल्यावर सर्व जबाबदारी त्र्यंबकमामा पेठे यांच्यावरच आली. हैदरशी आता त्यांनाच सामना करायचा होता. पेशव्यांनी मामांना पत्र लिहून, हैदरच्या जिव्हाळयाचा बिदनूर प्रांत आधी मारावा. त्यासाठी गोपाळराव जाणकार आहेत त्यांची मदत घ्यावी, अशा सूचना दिल्या. स्वत:बरोबरची फौज आणि सामान अप्पा बळवंत मेहेंदळे यांच्याबरोबर पाठवून दिलं. मामा पेठ्यांनी परत एक पत्र गोपाळरावांना आदोनीला पोचेल असं लिहिलं ,

" श्रीमंत परत फिरले ही बातमी हैदरला लागली असेल. आपल्याला इंग्रजांची मदत नाही हेही तो जाणतो. आपण सर्वांनी मेहनत एकदिलाने केली तर श्रीमंतांचे मानसीचे श्रम कमी होतील. शरीरी श्रमी आहेतच. इंग्रज आल्यास ठीकच होईल. न आल्यास तमाम मुलूख खांद्यावर भाला टाकून उलथापालथा करू. घाटाखाली उतरून त्याचा प्रांत ताराज करू तर तो कोणीकडे धावेल. " पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आम्ही घरी येत आहोत, हे गोपाळरावांनी मिरजेला कळवल्यावर त्यांचे वडील गोविंदपंत नानाही संतापले. त्र्यंबकमामा पेठ्यांनी दुसरं पत्र गोपाळरावांना पाठवलं. जरीपटक्याबरोबर राहण्याचा मान स्वामींनी तुम्हाला दिलाय. स्वामी आजारपणामुळे परत गेले. तुम्हीही असे घरी जायचे मनात आल्याबरोबर प्रकृतीचे निमित्त

सांगाल तर कसे निभायचे ? स्वामींचा राग तुम्ही जाणताच. चाकरी मात्र गमावून बसाल एवढे लक्षात असू द्यावे.

गोपाळरावांनी उलट उत्तर पाठवलं,

" जगलो वाचलो तर परत येईन " पण गोपाळरावांची अवस्था फक्त गोपाळरावांनाच माहीत होती. त्यांची शक्ती अति क्षीण झाली होती. निजल्या जागेवरून उठून बसायला अर्धा-पाऊणतास लागायला लागला होता. अन्नावरची वासना उडाली होती. फार थोड्या काळाचे आपण सोबती आहोत, हे त्यांना कळून चुकलं होतं आणि म्हणूनच प्राण सोडायला घराकडे पोचायचं होतं. त्याप्रमाणे गोपाळराव कनकगिरीहून निघाले आणि महिन्याभरात मिरजेला पोचले.

गोपाळरावांना पाहिल्याबरोबर त्यांची गंभीर परिस्थिती घरच्यांच्या लगेच लक्षात आली. गोपाळरावांनी आपल्या हातांनी गोदान, दक्षिणादान केलं आणि जेमतेम दोन दिवस होतात न होतात तोच ११ जानेवारी १७७१ ला दुपारी गोपाळरावांचा कैलासवास झाला. पटवर्धन घराण्यातला कर्तापुरूष गेला. डोलाऱ्याचा खांबच कोसळला. सारं घराणं दु:खात बुडलं. मृत्यूसमयी गोपाळरावांचं वय पन्नाशीच्या जवळपास होतं. इकडे पुण्यात पेशव्यांना त्र्यंबकमामा पेठेंचं गोपाळरावांची तक्रार करणारं

पत्र हाती पडलं. पेशव्यांना क्रोध आवरेना. हैदरला संपवायचा ध्यास लागलेल्या पेशव्यांना गोपाळरावांनी घरी परतणं सहन होणं अशक्य होतं. संतापाने त्यांनी हुकूम सोडला की ताबडतोब मिरजेला जा आणि पटवर्धनांचा सरंजाम जप्त करा. पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे २०० स्वार मिरजकडे निघाले. पण वाटेतच त्या स्वारांना गोपाळराव निधन पावल्याची बातमी लागली आणि स्वार परत फिरले. मोठीच नामुष्की टळली होती. पुण्यातही गोाळरावांच्या कैलासवासाची बातमी पोचली. उजवा हात गेल्याची भावना पेशव्यांनी मिरजेला लिहून पाठवली. शनिवारवाड्याचा चौघडा आणि दरबार चार दिवस  बंद ठेवला. पेशव्यांना अतीव दु:ख झालं. पेठ्यांनाही ही बातमी कळली. हैदरवरची मोहीम लंगडी झाली.

मराठ्यांच्या दरबारात तीनच राव झाले.

1. भवानराव प्रतिनिधी 2. मुरारराव घोरपडे. 3. गोपाळराव पटवर्धन. इतर कुणालाही स्वत:ला राव म्हणवून घ्यायची परवानगी नव्हती.

## मेलुकोटे - मोती तलावाची लढाई.

## इ. स. १७७१.

गोपाळराव गेले. हैदरचा एक मोठा शत्रू कमी झाला. पटवर्धन फौजेची सूत्रं आता गोपाळरावांचे धाकटे बंधू  वामनरावांकडे आली. पेठ्यांनी हैदरवरची मोहीम परत चालू केली. मोहिमेची नव्याने आखणी केली. पेशवे पुण्यात बसूनच मोहिमेवर लक्ष ठेवून होते. हैदरला पेशव्यांच्या आजाराची बातमी मिळाल्याबरोबर तहाला येण्याचा विचार हैदरने सोडून टाकला.  अप्पा बळवंत मेहेंदळे फौज घेऊन पेठेमामांना भेटायला कर्नाटकात पोचले. हैदरने दोघांची भेट न व्हावी यासाठी खूप प्रयत्न केले. पण ते असफल होऊन, पुण्याहून आलेली नवीन फौज टुमकुरला पेठेमामांना भेटली. त्यानंतर सर्व फौज बिदनूरला निघाली. बिदनूर हा हैदरचा स्वत:चा प्रांत असं तो मानी. तिथे त्याला दडून बसायला जंगलही भरपूर होतं. आता मात्र हैदरला श्रीरंगपट्टणात स्वस्थ बसवेना कारण मराठी फौजा त्याच्याच परगण्यात चालल्या होत्या. २५००० फौज, ८००० घोडेस्वार, लहानमोठ्या तोफा घेऊन हैदर निघाला.

इकडे मराठ्यांची फौज बेलूर, बाणावर, गर्दनगड ही मार्गातली एकेक ठाणी जिंकत बिदनूरकडे चालायला लागली. बिदनूरकडे

जाण्याची आवई घालून, उलटे फिरण्याचे आणि हैदरला गाठण्याचे डावपेंच मराठा सरदारांनी आखले. हैदरने ताबडतोब आपल्या बिदनूरच्या फौजेला जंगलात लपून बसून मराठे आले की त्यांच्यावर हल्ला करण्याचा हुकूम पाठवला. पण मराठ्यांची फौज तिथे पोचलीच नाही.

हैदरनेच आता त्र्यंबकमामा पेठ्यांशी उघड्या मोकळया जागेत गाठ घेण्याचं ठरवलं. हैदर श्रीरंगपट्टणाच्या बाहेर पडल्याची खबर मराठ्यांच्या तळावर गुप्तहेरांनी आणली आणि पेठ्यांनी सर्व सरदारांशी सल्लामसलत केल्यावर आपली खेळी बदलली. बिदनूराचा मार्ग त्यांनी सोडला. आणि सखाराम हरीला २००० फौज देऊन हैदरचा ठावठिकाणा शोधून, माहिती काढून आणायला पाठवलं. सखाराम हरी म्हणजे साक्षात् झंझावात. अति धाडसी. तो जो आपल्या तळावरून निघाला तो सरळ ३००/४००० शिपायांना घेऊन सरळ हैदरच्या छावणीतच घुसला. छावणीत शिरतांना त्याने आपल्या फौजेच्या भाल्यांना पासोड्या बांधल्या आणि मराठ्यांच मोठी फौज आली आहे असा गलका करून त्याने हैदरची घोडी, उंट, चारा,दाणा, वैरण, ५००/७०० बकऱ्या पळवून आणल्या. तेवढ्यावर ते वादळ थांबलंच नाही. सखाराम तिथून जो निसटला तो, नागमंडलावर पोचला. तेही ठाणं त्याने आरामात यथेच्छ लुटलं. इतक्यात हैदरने पाठवलेली फौज नगारे वाजवत तिथे

पोचली, तेव्हा लगेच पसार झाला आणि उगवला तो थेट बेलुरावर गेला. तिथेही त्याने असाच दंगा केला आणि पेठेमामांना निरोप पाठवून त्यांना मेलुकोट्याला बोलावून घेतलं.

सखाराम हरीचा निरोप आल्याबरोबर पेठेमामा फौज घेऊन निघाले आणि हेब्बूरला पोचले. हैदर फौज, ४५ तोफा, १५००० गारदी, पायदळ घेऊन मेलुकोट्याहून मागडीच्या जंगलात आला. आता दोन्ही शत्रूंमधे फक्त १६ मैलांचं अंतर होतं. हैदरला खरं तर मराठी फौजेवर अचानक हल्ला करायचा होता. पण मामांच्या सावधपणामुळे त्याचा तो बेत फसला. मग हैदरने विलक्षण खेळी केली. तो स्वत: 6 मैल मराठ्यांच्या तळाच्या दिशेने चालून गेला. त्याने आपल्या २००० बैलांच्या शिंगांना पलिते बांधले आणि ते पेटवून त्यांना मराठ्यांच्या छावणीच्या दिशेने पळवलं. हैदरची फौज येते आहे असा त्याचा मराठ्यांना फसवण्याचा डाव होता. त्या बैलांच्या मागे मराठी फौज गेली की त्याला छावणीवर छापा घालून मराठ्यांना यथेच्छ लुटायचं होतं. (शिवाजी महाराजांनी हीच खेळी शाहिस्ताखानाच्या फौजेसाठी केली होती. ) पण हाही हैदरचा बेत फसला कारण मामांना आधीच ही बातमी कळली होती. मामा बातमी चांगली राखत होते. मग हैदर निघाला आणि मागडीच्या रानात लपला. त्याचवेळी मामांनी हेब्बर सोडलं आणि ते तुरुविकिरेला आले. तेव्हा हैदर मेलुकोट्याच्या यदुगिरी

डोंगराच्या आश्रयाला आला. डोंगरांनी वेढलेल्या आणि घनदाट झाडीने झाकलेल्या या पर्वतरांगांमधे हैदरची फौज दूर दूर पसरली. तोफांची रचना वर खाली झाली. हैदरकडे लांब पल्ल्याच्या तोफाही नव्हत्या.

त्र्यंबकराव पेठे फौज घेऊन मेलुकोट्याच्या मार्गाला लागले. मेलुकोटे हा डोंगराळ भाग श्रीरंगपट्टणाहून उत्तरेला १५ मैलांवर आहे. इथल्या डोंगरावर १२०० साली बांधलेलं एक सुंदर प्राचीन मंदिर आहे. मेलुकोटे डोंगररांगांनी दाटलेला भाग आहे. पूर्व आणि दक्षिणेकडून मेलुकोट्याला जायला मार्ग आहे तोही अवघड आणि अरुंद. हैदरला या मार्गाने मराठ्यांच्या फौजा आत शिरतील याची पुसटशीही कल्पना नव्हती. तो पश्चिमेकडील वाटेनेच मराठे येणार हे धरून चालला. पण मराठ्यांच्या गनिमीकाव्याची ओळख त्याला नव्हती, म्हणूनच त्या अवघड मार्गाने फौजा आल्या. एका डोंगरावर त्यांनी आपल्या तोफा चढवल्या आणि तिथून ते हैदरच्या फौजेवर आग ओतू लागले. मराठ्यांना छावणी करायला अत्यंत अडचणीची जागा होती. मोकळी जागाच तिथे नव्हती. अशा प्रदेशात हैदरच्या मागावर मराठे मेलुकोट्याला पोचले. पेठेमामांनी नरसिंगराव धायगुडे, आनंदराव सुपेकर, आणि पटवर्धनांची फौज श्रीरंगपट्टणाच्या मार्गावर हैदरच्या पळून जाण्याच्या मार्गावर ठेवली. स्वत: पूर्वेची बाजू सांभाळायला थांबले. दक्षिण-उत्तरेला

जंगलच होतं. हैदरला पळून जायला जागाच उरणार नाही अशी कडेकोट बंदी पेठ्यांनी केली. मेलुकोट्याच्या अलिकडे मराठ्यांचा तळ पडला.

पण हैदरचे डावपेच यशस्वी झाले होते. मराठी फौजा बिदनूरवर जाऊ नयेत, म्हणूनच त्याने शत्रूला मेलुकोट्याकडे ओढलं होतं. मराठे या अवघड जागी यायला लागले की त्यांच्यावर हल्ला करून सर्व फौज कापून काढायचा त्याचा विचार होता. हा मार्ग खरं तर हैदरसाठीही धोक्याचाच होता. कारण त्या खिंडीशिवाय त्यालाही दुसरा मार्ग नव्हता, आणि मराठ्यांनी ती खिंड अडवली तर तोच संपणार होता. पेठेही हात धुवून त्याच्या मागे लागले होते. एक कणखर धाडसी, अनुभवी सेनानी असाच मामांचा लौकिक होता. ते फौज घेऊन पोचले आणि हैदरच्या अपेक्षेप्रमाणे त्या पश्चिमेच्या खिंडीने आत न येता पूर्वेच्या अत्यंत कठीण मार्गाने आत शिरले. आपण स्वत: पोचण्यापूर्वी मामांनी सखाराम हरी, कृष्णराव बळवंत, भवानजी वाघ अशा काही सरदारांना हैदरवर पाठवलं होतं. या लोकांनी हैदरच्या लष्करावर पिछाडीकडून हल्ला केला. दोन्ही फौजांची झटापट झाली. मराठ्यांनी हैदरचे ३०० घोडे आणि हैदरने मराठ्यांचे ४०/५० घोडे पकडून आपल्या तळावर नेले. या धांदलीत सखाराम हरीच्या डोक्याला जबर जखम झाली. तोपर्यंत मराठी फौजेला घेऊन मामा

पोचले आणि हल्ल्यासाठी वाट पाहात राहिले. हैदरने पश्चिमेकडून पूर्वेकडे अशी चंद्रकोरीसारखी आपल्या फौजेची व्यूह रचना केली होती. डोंगर दऱ्यांमुळे फौजही विखुरलेली होती. शिवाय त्याच्याकडील तोफाही कमी पौंडांच्या होत्या. मराठी फौज पूर्वेकडून आल्यामुळे त्याच्या तोफा चालेनात आणि मराठे तर रोजच सकाळ ते संध्याकाळ त्याच्यावर आग बरसू लागले. अशातच आठ दिवस संपले. आता हैदर बाहेर पडायला अधीर झाला तेव्हा त्याने चिंकुर्ली गावाजवळून श्रीरंगपट्टण गाठायचा विचार चालवला.

१७७१ च्या ६ मार्चला अमावास्येची रात्र होती. दाट अंधार. हैदरला शत्रू भारी झालेला दिसला. आता पळून श्रीरंगपट्टणाला जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. गुपचुप बाहेर पडायला हवं होतं. शत्रू सावध होताच. त्याला चुकवून सगळा लवाजमा बाहेर काढायचा होता. तोफांपासून गाई-गुरं-बकऱ्यांपर्यंत. हैदर रात्र होण्याची वाट पाहात बसला. मध्यरात्र झाली. डोंगरदऱ्यांमधे काळोख घट्ट भरला. मशालींचा उजेड तेवढा जवळपासचा भाग उजळत होता. तलवारी, बंदुका जवळ ठेवून बारगीर सावधपणे झोपले होते. गस्त घालणारे स्वत:च्याच डोळयांमधे बोट घालून अवसेच्या अंधाराचा आणि स्वत:चा अंदाज घेत होते. तेवढ्यात खिंडीजवळच्यांना काहीतरी हलतांना अंधूकपणे दिसलं. इकडे डोंगरावर ज्या चौक्या होत्या

त्यांना हैदरच्या तळावर फारच सामसूम आहे हे जाणवलं. वामनराव पटवर्धन, नरसिंगराव धायगुडे मंडळींच्या फौजांना रात्र शांतच वाटत होती. २०० राऊतांनिशी माणकोजी बल्लाळाला पट्टणाच्या रस्त्यावर ठेवलं होतं. शत्रू बाहेर आल्यावर माणकोजीला चाहूल लागली. त्यांनी विठ्ठल शिवदेव विंचूरकरांना मामांकडे वर्दी द्यायला पाठवलं. इतक्यात हुजराती फौजेलाही कळलं आणि गच्च अंधारातही त्यांना लख्खपणे हैदरने तळ हलवला हे स्पष्ट दिसलं. ते धावत पेठेमामांकडे आले. हैदर हलला हे तर खरं, पण कुठे गेला ? दक्षिणेला आपल्या राजधानीकडे श्रीरंगपट्टणाला गेला की आपल्या आवडत्या बिदनूरच्या रक्षणाला गेला ? मराठ्यांच्या छावणीवर गडबड उडाली. नगारे वाजायला लागले, सारा तळ जागा झाला, काहीतरी गडबड आहे हे स्वारांना, प्याद्यांना लगेच कळलं.

घोड्यांवर जीन घालून फौज तयार झाली. मामांचा हुकूम सुटला. काहीजण कडूरच्या रोखाने, काही फौजा श्रीरंगपट्टणाच्या दिशेने घोडदौड करत निघाले. इतक्यात दोन घोडेस्वार हैदरच्या फौजेतून निघून मामांकडे पोचले आणि हैदर पट्टणाकडे चालल्याची बातमी देऊन बक्षीस घेऊन निघून गेले. सगळी फौज भर अंधारात पट्टणाकडे चालली. हैदर अजून कोसभरच दूर गेला होता. तेवढ्यात मराठ्यांची गस्तीची फौज परत येत होती. त्यांना हैदरची फौज

चाललेली दिसली. तातडीने त्यांनी पटवर्धनांकडे आणि मामांकडे निरोप पाठवला. भर मध्यरात्री लढाईला सुरूवात झाली. गस्तीची माणसं, आणि पटवर्धन, धायगुडे सुपेकर यांची फौज लढायला लागली. हैदरने बुरुजांच्या आकाराने गारदी, फिरंगी, बारवाले यांची फौज लावून, या पाठलाग करणाऱ्या फौजेवर सतत मारा करत पट्टणाकडे सरकायला सुरुवात केली. तोफांचाही चौफेर मारा सुरू केला. पाठोपाठ सूर्योदयाला डोंगरावरून तोफा वगैरे सामान घेऊन हुजरातीचीही फौज हैदरसमोर पोचली. तेव्हा मराठी फौजा सगळीकडे पसरल्या आणि सगळीकडून शत्रूवर हल्ला चढवला. पण हैदरच्या तोफांपुढे घोडे जाईनात. ते आगीची झळ चुकवायला लागले. मराठ्यांच्या तोफा, बैलगाडीवर घालून लढाईच्या ठिकाणी पोचायला उशीर झाला. त्यामुळे त्यांचा वापर झाला नाही. काही इलाज नव्हता.

श्रीरंगपट्टणाच्या मार्गावर अलिकडे ३ कोसांवर मोती नावाचं तळं होतं. तिथपर्यंत हैदर पोचला. आता पट्टण अवघं तीन कोसांवर होतं. त्याच्या आत हैदरला गारद करणं जरूरीचं होतं, नाहीतर हातचा निसटला असता. हैदरच्या डाव्या बाजूने हुजरातीची फौज, पाठीमागून रास्ते आणि हिंदुरावांची फौज, उजव्या बाजूने वामनराव पटवर्धन, आनंदराव गोपाळ सुपेकर, नरसिंगराव धायगुडे, आणि गायकवाड यांच्या फौजा होत्या. मराठी फौजेने हैदरला घेरून

टाकलं होतं. तेवढ्यात मराठ्यांच्या तोफाही येऊन पोचल्या. त्याही लागू केल्यावर हैदरच्या फौजेची दाणादाण उडाली. जे गोलाकार चालले होते, ते गोल एकदम मोडून पडले. त्याच क्षणी धायगुडे, पटवर्धन रास्ते, गायकवाड, घोरपडे, कडप्पाचे महिपतराव, जे जे म्हणून सरदार होते, ते सारे हैदरच्या फौजेवर मागच्या बाजूने तुटून पडले. सर्वांनी घोडी चालवली आणि गारदी फिरंग्यांचे बुरुज मोडून काढले. हैदर अगदी पुढे होता. त्याला हा मागच्या बाजूने होणारा हल्ला कळल्यावर तो सड्या फौजेनिशी अंगावर चालून आला, पण मराठ्यांचा जोर फारच मोठा होता.

तेव्हा जीव वाचवायला लगतच एक डोंगर होता, त्यावर हैदर ५०००/७००० हजार फौजेसह चढला. मराठेही त्याच्यामागे २००० फौज घेऊन डोंगराकडे धावले. तेव्हा हैदर आपल्या घोड्यावरून खाली उतरला. क्षणभर त्याला काय करावं ते कळेना. तेवढ्यात गाजीखान बीड नावाच्या त्याच्या विश्वासू खिजमतगाराने त्याला डोंगराच्या शिखरावर नेलं. एका हंसराज नावाच्या उमद्या घोड्यावर बसवलं आणि श्रीरंगपट्टणाला नेलं. पट्टणाला पळून जात असतांना मराठयांनी त्याचा पाठलाग केला पण वेषांतर करून घोड्यावरून पळून पट्टणाला गेला.  टिपू सुलतान सय्यद महंमदच्या मदतीने भिकाऱ्याच्या वेषात पळाला. आपला मुलगा सुखरूप परत यावा म्हणून हैदर श्रीरंगपट्टणमधल्या कादिरवलीच्या दर्ग्यात

अल्लाची करुणा भाकत बसला होता. आपल्या मुलाला सुखरूप ठेवण्याची प्रार्थना  करत बसला होता. तिथे टिपू येऊन पोचला. दोघांची भेट झाली. किडामुंगी मारावेत तसं शत्रूला मारणारा हैदर स्वत:च्या मुलाच्या बाबतीत मात्र जीवदानाची भीक मागत बसला होता. टिपू जिवंत असणं म्हणजे त्याच्या खानदानाला राज्यसत्तेचं दान मिळणं होतं.

हैदरची फौज मेलूकोटेहून बाहेर पडत असतांना हैदरच्या तंबूत वेगळंच नाट्य घडत होतं. हैदरने टिपू सुलतानाला सैन्याची पिछाडी सांभाळायची कामगिरी दिली होती. त्यामुळे टिपूला बाहेर पडायची घाई नव्हती. फौज निघतेवेळी हैदरने टिपूला बोलावणं पाठवलं. पण टिपू सापडत नाही असा निरोप शिपायांनी आणला तेव्हा संतापाने बेभान झालेल्या हैदरने टिपूला शोधून काढण्याला सगळयांना पिटाळलं. टिपूला हैदरसमोर आणल्यावर हैदचा पारा आणखीनच वाढला. दोघांच्यात वाद झडला. आवाज वाढला हैदरने शेजारी उभ्या असलेल्या अंगरक्षकाच्या हातातली वेताची छडी घेऊन टिपूला तडाखे द्यायला सुरुवात केली. सर्वांसमक्ष झालेल्या या अपमानाने टिपूही खवळला. आपला फेटा जमिनीवर आपटत हैदरला म्हणाला की आज मी हातात तलवार धरणारच नाही. शेवटी जवळच्या लोकांनी त्याचा राग शांत केला. तरीही टिपू संतापलेलाच होता. माझ्या बापाच्या लढाईशी माझा काहीही


संबंध नाही, त्याची लढाई तोच पाहू दे, अशी त्याने घोषणा केली. त्यानंतर सर्वच बाहेर पडले. हैदरला मद्याची आसक्ती नव्हती. पण रोज रात्री तो थकून परत आल्यावर झोपण्यापूर्वी थोडं मद्य घेत असे. आणि मग झोपत असे. त्यादिवशी रात्री त्याने कदाचित जास्त मद्य घेतलं असावं.

मोती तलावावर मराठ्यांना फार मोठा विजय मिळाला. हैदरला मोठीच दहशत बसली. ४०/५० तोफा, २५ हत्ती, ७/८ हजार घोडे, जरी निशाणे, अंबारी, हौदे, जडजवाहिर, खजिना, साहेबी नौबत, खूप मोठी लूट मिळाली. डोंगरावरच्या शिपायांनी, सरदारांनी कौल मागितला. त्यांच्या चीजवस्तू ताब्यात घेऊन त्यांना सोडून दिलं. लढाईत हैदरची  खूप फौज ठार झाली. लालमियाँ, मीर रेजा वगैरे मोठे सरदार पकडले गेले. मग शरण आले. हैदरचा शोध चालवला पण सापडला नाही. तो कुठे पळून गेला ते कळलं नाही. मराठ्यांची अस्मानी फत्ते झाली. सगळे सरदार खूष झाले. पण या यशाला गालबोटही लागलंच. मामा पेठ्यांच्या कानाला घासून बंदुकीची गोळी निघून गेली. मोठी जखम झाली नाही. परमेश्वराने खैर केली. पटवर्धनांच्या घरातले नीलकंठ त्र्यंबक आणि अंतोजी माने तोफेचा गोळा लागून धारातीर्थी पडले. सरकारच्या निशाणाचा हत्ती होता, त्याच्या पायाला तोफेचा गोळा लागला आणि त्याचा पाय कापून काढावा लागला. हुजरातीचे

घोडे खूप मेले. खूप लोक जखमीही झाले. पण मोठा विजय हीच फार मोठी आनंदाची गोष्ट होती. दुसरे दिवशी मेलुकोट्यावर हल्ला करून मराठ्यांनी मोठी लूट मिळवली. मग सगळे १० मार्चला श्रीरंगपट्टणाकडे निघाले. १७ मार्चला श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यावर तोफा सुरु केल्या. पण हैदर बधला नाही. थकलाही नाही. खचलाही नाही. त्याने आधीच जवळपासचा सगळा मुलूख जाळून, ओसाड करून टाकला होता. त्याने लढाईचीही तयारी नव्याने सुरू केली.

तोपर्यंत एप्रिल महिना उजाडला. उन्हाळ्याला सुरूवात झाली होती. गवत मिळणं कठीण झालं होतं. पाणीही कमी झालं होतं. हैदरची रसद मराठी फौजांनी बंद केली होती. या विषयाचा सोक्षमोक्ष लावायचाच हा हैदरचा विचार होता. हैदरही तह करायच्या विचारावर आला. पेठ्यांचीही तीच इच्छा होती. पावसाळा जवळ आला होता, वेढा लांबवून काहीही फायदा होणार नव्हतं, कारण श्रीरंगपट्टण ताब्यात येणारच नव्हतं. शेवटी महिनाभर वेढा चालू ठेवून अक्षयतृतीयेला, १८ एप्रिलला वेढा उठवला. सगळी फौज मेलुकोट्याला गेली. आता बिदनूर गाठावं असं मामा पेठ्यांच्या मनात होतं. त्याप्रमाणे कावेरीच्या काठाने फौजा निघाल्या आणि वाटेतील चिन्नरायपट्टण, संकरापट्टम, नरसिंहपूर अशी ठाणी घेत पुढे गेले. हैदर या मराठ्यांच्या हालचालींनी सावध झाला आणि बिदनूर वाचवायला त्याने टिपूला बिदनूरला पाठवलं.

कुमेदान नावाच्या सरदाराला दुसरीकडे पाठवलं. पेठेमामा कुमेदानला पिटाळून लावलं. कुमेदानचे खूप लोक मेले. तो स्वत: मराठ्यांच्या वेढ्यात अडकला. रात्री तो पळून जायच्या बेतात असतांना त्याची फौज आक्रोश करायला लागली, तेव्हा मी तुमची व्यवस्था करतो असं त्यांना म्हणाला आणि ते स्वस्थ झाल्यावर क्रूरपणे त्या सर्वांची कत्तल करून तो निसटला.



## मेलुकोटे लढाईतील मराठ्यांच्या फौजेचा मुक्त संचार...

जुलै महिना सुरू झाला. इकडे मराठी फौजा एकेक प्रदेश, ठाणी, किल्ले जिंकत चालल्या. पटवर्धनांची फौज गर्दनगड नावाच्या किल्ल्याला वेढा घालून बसली. किल्ल्यातील लोकांनी थोडा प्रतिकार केला पण नंतर ती माणसं शेवटी शरण आली, आणि त्यांनी किल्ला स्वाधीन केला. तिकडे त्र्यंबकमामा पेठ्यांनीही देवरायदुर्ग, भैरवदुर्ग, असे किल्ले आणि नागमंगल, देवलपूर, किक्केरी अशी ठाणी जिंकून घेतली तेव्हा हैदरला तह करण्यावाचून गत्यंतर उरलं नाही. मनाची तयारी नव्हती पण ठाणी हातून सुटत चालली होती, म्हणून थांबणं भाग होतं. हैदरच्या आपाजीराम वकिलाला पेठ्यांनी आपल्या मागण्या सांगितल्या. १. हैदरने मामा पेठ्यांना जातीने भेटावे. २. हैदरने ६० लाख खंडणी द्यावी. ३. पाईन घाटाखाली जाण्याचा मराठ्यांचा मानस असेल तर हैदरने त्यास मदत करावी. ४. निजामाचे २८ लाख त्याला परत करावेत आणि पावती आणून द्यावी. हे जर हैदरने मान्य केलं तर मराठे श्रीरंगपट्टणाजवळचा त्याचा जिंकलेला प्रदेश परत करतील. पण हैदरने तहाची बोलणी लांबवली कारण माधवराव पेशव्यांची

प्रकृती नाजूक झाल्याची बातमी त्याला कळलेली होती. पण मामा पेठे हैदरला नमवायची वाट पहात होते. त्यांच्या या वाटाघाटी चालू असतांना तंजावरच्या तुळजाजी भोसले यांनी इंग्रजांविरूध्द मराठी फौजेची मदत मागितली. इंग्रज सेनापती स्मिथ याच्या मदतीने अर्काटचा नबाब महंमदअलीने तंजावरवर हल्ला केला होता. नोव्हेंबरमधे मामा पेठे आपली फौज घेऊन तंजावरकरांच्या मदतीला गेले. या फौजा येण्याचा सुगावा लागताच नबाबाची फौज निघून गेली.

मामांचा तंजावरला जाण्याचा हेतूही हैदर हाच होता. १. हैदरचा त्याबाजूचा प्रदेश फस्त करणं. २. भोसल्यांच्या मदतीला जाणं. ३. इंग्रज आणि अर्काटच्या नबाबाशी हैदरविरुध्द मदत मागणं. यात इंग्रजांनी हैदरविरूध्द मदतीची मागणी फेटाळली. मराठी फौजा आपला प्रदेश लुटायला गेल्याचं कळल्यावर हैदरने टिपूला त्यांच्या मागावर पाठवलं. पण मामाही हुशार होतेच. आपण पाईन घाट उतरलो की हैदर आपल्यावर चाल करून येणार हे माहीत असल्यामुळे मामांनी पटवर्धनांची फौज घाटमाथ्यावर ठेवली होती. वामनराव पटवर्धनांची आणि टिपूची गाठ पडली, लढाई झाली, आणि टिपू पळून गेला. बारामहाल भागात मराठी फौजा प्रदेश तुडवायला, साफ करायला लागल्या. अप्पा बळवंत मेहेंदळे आणि सखाराम हरीला मामांनी कोईमतूरवर पाठवलं.

मेहेंदळे आणि टिपूची सालेमच्या घाटात गाठ  पडली. तिथेही टिपूचा पराभव झाला आणि हैदरची फौज पळून गेली. तोपर्यंत मद्रास भागातला पावसाळा सुरू झाला होता. त्र्यंबकमामा पेठे परत घाटमाथ्यावर आले. वामनराव आपली फौज घेऊन बंगलोरमधेच होते. आता बिदनूरवर जायचा त्यांचा बेत होता. म्हणून वामनरावांनी त्यांची गाठ दोड्ड बाळापुरावर घेतली. पण आता फौज कंटाळली होती. शिपायांना घरची ओढ लागली होती. ३ वर्षं सातत्याने फौज लढत होती. सगळे सरदारही या दगदगीने थकले होते, कंटाळले होते.

## हैदर – मराठे तह -

हैदरही मराठ्यांच्या या लांबलेल्या मोहिमेमुळे कंटाळला होता. तेवढ्यात मराठ्यांचा पावसाळ्यात छावणी करण्याचा विचार चाललाय हे ऐकून त्याचा धीर सुटला आणि तो तहाला तयार झाला. तेवढ्यात पेशव्यांचाही हैदरशी सलूख करण्याचा हुकूम आला. शेवटी किक्केरीच्या मुक्कामावर तह झाला. १. हैदरने ५० लाख द्यावेत. २५ लाख रोख, २५ लाखाचं जवाहीर, आणि बाकीची सावकारी हमी. २. शिरे, मदनगिरी, गुर्रमकोंडा, दोड्बाळापूर, चिन्नरायदुर्ग, कोलार, होस्कोटे ही ठाणी आणि त्याखालचा अंमलाचा प्रदेश मराठ्यांकडे आणि नंदीदुर्ग, चिकबाळापूर, देवन् रायदुर्ग हा प्रदेश हैदरकडे राहावा. ३.. यापुढे मराठी मुलखावर हैदरने आक्रमण करू नये. तह तोट्याचा होता, पण इलाज नव्हता. पेशव्यांची प्रकृती बिघडत चालली होती. रास्ते आणि मुरारराव घोरपडे यासाठी मध्यस्थ झाले. हैदरने रोख रक्कम ताबडतोब दिली. बाकीची रक्कम फौज घेऊन आल्याशिवाय मिळणार नव्हतीच. २. वर्षांनी सर्व फौजा घरी परतल्या. पेठ्यांनी आणलेली रक्कम खजिन्यात भरली. या मोहिमेचा खर्च पेशव्यांना

१ कोटी ३९ लाख रुपये आला. पावसाळाभर सर्व लष्कराने, सर्व जखमींनी, सर्व घोड्यांनी बैलांनी, विश्रांती घेतली.

## माधवराव पेशव्यांचा मृत्यू. १८ नोव्हेंबर १७७२.

जूनमधे फौजा परतल्या. पेशव्यांना त्र्यंबकामांनी संपूर्ण वृत्तांत दिला. पेशव्यांची मात्र सर्व समाचार ऐकण्याचीही प्रकृती राहिली नव्हती. आधीच्या दोन वर्षांपासून तब्येत ढासळायला लागलीच होती. तरीही दरबारची कामं पेशवे उरकत होते. राजयक्ष्मा रोग पेशव्यांचं शरीर आतून पोखरत होता. १७७० सालात कामं हातून रेटेनात. कर्नाटकाच्या स्वारीवर जाणंही रहित करावं लागलं, इतकी प्रकृती बिघडली. ७१ साल हे औषधपाणी हवापालट यातच संपलं. पुण्यात त्यांना बरं वाटेनासं झालं की ते बाहेर पडत. जुलै ७१ ला पेशवे कटोरे इथे जाऊन राहिले. तिथे बरं वाटू लागल्यावर शेवटचे काही महिने पेशवे थेऊरास जाऊन राहिले. कार्तिकात म्हणजे नोव्हेंबरमधे पेशव्यांची प्रकृती खूपच बिघडली. सारे दरबारी रावांना भेटायला आले. पेशव्यांना राज्याची काळजी तर होतीच, पण आपल्यानंतर राज्य कसं चालेल याची जास्त काळजी लागून राहिली होती. त्यांनी राघोबादादांच्या हाती नारायणरावांचा हात देऊन यांचा सांभाळ करावा असं दादांकडून वदवून घेतलं. थेऊरच्या वाड्यातलं राहाणं सोडून देवळाच्या ओवरीत येऊन राहिले. दानधर्म सुरू केला. पोटातल्या वेदना इतक्या वाढल्या की

त्या साहवेनात म्हणून पोटात खुपसून घेण्यासाठी खंजीर मागू लागले. कुणी दिला नाही म्हणून खूप संतापले. इच्छारामपंतांनी खंजीर दिला नाही म्हणून त्यांना मुसक्या बांधून मार द्यायची शिक्षा सांगितली. कार्तिक एकादशीस खूपं गडबड झाली. सर्वांगाला सूज आली. जीव घाबरा व्हायला लागला. दुसऱ्याने हात उचलला तरच उचलला जातो एवढा अशक्तपणा आला. वैद्याला आधीच प्रार्थना करून विनंती केली की मरणसमयी कफ न होऊ द्यावा नाहीतर गजाननाचा उच्चार व्हायचा नाही. पाऊण एक तास आधी सर्व ब्राह्मणांना जवळ बोलावून नमस्कार केला. आम्ही महायात्रेस जातो, स्वारीची तयारी करा असं सांगितलं. प्राण जाऊ लागला तेव्हा गजानन गजानन म्हणत प्राण सोडला. डोळयांच्या वाटे प्राण सोडला. पत्नी रमाबाई सती गेल्या. माधवरावांच्या जाण्याने दुःखाचं सावट राज्यावर पसरलं. बुधवार कार्तिक वद्य ८ ला प्रातःकाळी पेशवे माधवरावांचा थेऊरच्या चिंतामणीच्या मंदिरात शेवट झाला. त्यादिवशी तारीख होती १८ नोव्हेंबर १७७२. महाराष्ट्राच्या राजकारणाला त्यानंतर एक मोठं वळण मिळालं. मोठ्या वेगाने राज्याचा गाडा घसरायला लागला.

हैदरच्या दृष्टीने एक मोठा शत्रू नाहीसा झाला. निजाम-इंग्रजांना तो घाबरतच नव्हता. कर्नाटक आता आपलंच आहे या स्वप्नसुखात तो राहिला. पेशव्यांचा मृत्यूनंतर नारायणराव

पेशवेपदी पण राघोबादादांचा पेशवेपद मिळवण्याचा हट्ट संपला नव्हता. त्यामुळे पुण्याच्या दरबारात राघोबादादांच्या साथीदारांच कारस्थान सुरु झालं. नारायणराव पेशव्यांना अटक करून सत्ता हाती घेण्याचा कट रचला गेला. भाद्रपदात शनिवार वाड्यात दरसालप्रमाणे गणेशोत्सव सुरु झाला. ३० ऑगस्ट, १७७३. या दिवशी शनिवारवाड्यात मोठाच अनर्थ घडला. नारायणराव पेशव्यांना धरावे या हुकुमाच्या ऐवजी '' मारावे '' असा शब्द फिरवला गेला आणि पेशव्यांचा गारद्यांनी खून केला. या सगळ्या घडामोडी हैदरचा वकील

आपाजी राम पुण्यात कैदेत बसून हैदरला कळवत होताच. पण शनिवारवाड्यातील खुनांनतर हैदरला पत्र लिहून “ आता संधी उत्तम आहे. आपण क्षणाचाही विलंब न करता फौजा पाठवून शिरे, मदगिरी, होस्कोटे वगैरे स्थळ काबीज करा. " त्याने असा निरोप पाठवला. हैदरने ही नामी संधी सोडलीच नाही.

## हैदर-राघोबा-कल्याणदुर्गाचा तह – इ. सन १७७४.

नारायणरावांच्या मृत्यूनंतर दादासाहेबांच्या हाती सत्ता आली. खुनाच्या दिवसापासून, चौथ्या दिवशी राघोबादादांनी नागपूरच्या मुधोजी भोसल्यांना पुण्याला भेटायला बोलावलं. ही बातमी मुधोजींचे बंधू साबाजी यांना कळताच, आता माधवराव पेशव्यांनी आपल्याला दिलेलं सेनासखेल हे पद आपल्या हातून जाणार याचा अंदाज साबाजींना आला. त्यांनी लगेच आपली बाजू भक्कम करण्यासाठी निजामाची मदत मागितली. साबाजी आणि निजाम एक होणार हे कळताच दसऱ्याला दादा लगेच निजामावर स्वारी करायला निघाले. पण मनात हेतू निजामावर स्वारी करायची, नाही जमलं तर आपल्या विरोधकांना लगामात ठेवण्यासाठी त्याच्याशी मिलाफ करायचा असाच होता. हैदरने जे तालुके बळकावले होते, ते त्याच्याकडून परत घेण्यासाठी त्याच्यावर मोहीम होतीच. पण शेवटी स्वारीचा बेत सोडून हैदरशी राघोबादादांनी तहच केला. हा कल्याणदुर्गाचा तह फेब्रुवारी १७७४ मधे झाला. या तहाने तुंगभद्रा आणि कृष्णा नदीच्या चिमटीतला सगळा मुलूख दादांनी हैदरला देऊन टाकला. याच्या बदल्यात हैदरने दरसाल ६ लाख खंडणी

मराठ्यांना द्यावी आणि राघोबादादांचा पेशवाईवरचा हक्क हैदरने मान्य करावा असा करार झाला.

माधवराव पेशव्यांनी दरसाल कर्नाटकात स्वाऱ्या करून मेहनतीने आणि ध्यासाने मिळवलेला मुलूख एका वाक्याने राघोबादादांनी स्वार्थासाठी हैदरला देऊन टाकला. यात दुसरा द्वेषमूलक घटक असा होता की या करारातून पटवर्धनांच्या जहागिरीतला बराचसा मुलूख हैदरला आपोआप मिळाला. दादांनी अशातऱ्हेने पर्यायाने माधवरावांच्या पक्षातील लोकांवर, पटवर्धनांवरही सूड उगवला. दादांच्या पाठलागावर त्र्यंबकमामांसारखा शूर पुरुष होता. त्यांच्या मदतीला पटवर्धन, बिनीवाले आणि त्र्यंबकमामांची फौज होती. हैदरशी तह करून दादा पुण्याला यायला निघाले, तेव्हा कासेगाव मुक्कामावर फौज असतांना दादांनी त्र्यंबकमामांवर जोरदार हल्ला केला. त्यात मामांच्या तोंडावर जखम होऊन मामा पकडले गेले. दोन दिवसांनी त्यांचा अंत झाला. तोपर्यंत बारभाई कारस्थान सिध्द होऊन दादांच्या हातची सत्ता निसटली. १७ एप्रिल १७७४ ला पुरंदरावर नारायणराव पेशव्यांच्या पत्नी गंगाबाई यांना मुलगा झाला. नाव सवाई माधवराव ठेवलं. आणि ४० दिवसांच्या या मुलाच्या नावाने पेशवाईची वस्त्रं आणून नाना फडणीस आणि सखारामबापू बोकील यांच्या हातात कारभाराची सूत्रं गेली. हैदरच्या दृष्टीने त्याच्या एका

शत्रूच्या राज्यात ही मोठी राजकीय कलाटणी होती. मराठ्यांच्या फौजा कर्नाटकात उतरण्याची शक्यता आता काही दिवसांसाठी तरी कमी होती. पुणे दरबाराची व्यवस्था अजून नीट लागायची होती. त्याचा दुसरा शत्रू होता इंग्रज. पण तिथेही शांतता होती.

## कूर्ग. इ. स. १७७३.

हैदरला आता इंग्रज आणि मराठ्यांच्या आजपर्यंत युध्दामुळे झालेल्या खर्चामुळे नवीन वसूलाची, खजिन्यात भर घालण्याची आवश्यकता निर्माण झाली. म्हणून त्याने टिपूला कर्नाटकातला मराठ्यांचा उत्तर भाग परत घ्यायला पाठवलं आणि स्वत: मलबारवर स्वारी करायला निघाला. मैसूरवरून मलबारवर जायला त्याला लांबचा वळसा पडत असे. म्हणून पश्चिम किनारा आणि मैसूर यांच्यामधल्या कूर्ग प्रांतावर त्याचा डोळा होता. तो एकदा हाती आला की त्याच्या हातात सर्वात जवळचा मार्ग दळणवळणासाठी मिळणार होता. या अवधीत त्याला इ. स. १७७३ मधे कूर्ग प्रांताकडून हवी तशी संधी चालून आली. कूर्ग प्रांत हा सगळा लिंगायतांचा. या कूर्गच्या गादीच्या हक्कावरून वाद सुरू झाले. लिंगराज हा दुसऱ्या हकदाराचा काका हैदरकडे मदत मागायला आला. राजा वीर राजेंद्राविरूध्द त्याच्या विरोधकांना हैदरची मदत हवी होती. हैदरने ती सुवर्णसंधी क्षणभरही दवडली नाही. याचं कारण म्हणजे कूर्गमधून मलबारमधे उतरायला सोपा सहज मार्ग जात होता. हैदर फौज घेऊन अचानक, अकस्मातपणे कूर्गवर गेला. कूर्गवर त्याने जोरदार हल्ला केला. कूर्गचा राजा देवैया

पळून गेला.  हैदरने कूर्गमधे मडकरीला भक्कम किल्ला बांधला. नवीन वाढीव सारा लागू करुन तो मैसूरला परतला. पण परत लवकरच त्याला कूर्गमधला बंडावा मोडायला यावं लागलं. कूर्ग जिंकल्यावर आपल्या वतीने त्याने एक ब्राह्मण अधिकारी पैशाच्या वसुलीसाठी तिथे नेमला. या ब्राह्मण अधिकाऱ्याचं आणि कूर्ग जनतेचं अजिबात पटलं नाही. त्या लोकांनी या अधिकाऱ्याविरूध्द बंड पुकारलं. हैदरने तातडीने येऊन ते बंड चिरडलं. बंडखोरांना क्रूरपणे फाशीला लटकवलं आणि निघून गेला. पण हैदरच्या हयातीच्या शेवटपर्यंत कूर्गकरांनी आपला विरोध सतत चालूच ठेवला होता. हैदरला यांच्याशी सतत सामना करावा लागला.

राजधानीत परतल्याबरोबर हैदरला आपली फौज परत कालिकतला पाठवावी लागली. श्रीनिवासराव बार्की आणि सैदसाहेबाच्या हाताखाली फौजा वायनाडवरून घाटातून खाली सरळ आटाखाली उतरल्या आणि कालिकत सहज हाती पडलं. टिपूनेही शिरे,चिन्न रायदुर्ग, दोड् बाळापूर, होस्कोटे, गुर्रमकोंडा वगैरे ठाणी परत जिंकून घेतली. आता या आधी  हातून गेलेला सर्व प्रांत हैदरच्या हातात आला. इ. स. १७७५ पर्यंत हैदरच्या सर्व मोहिमा यशस्वी होऊन त्याला जरा शांती लाभली. पश्चिम किनाऱ्याचा बराचसा भाग हैदरच्या ताब्यात आलेला होता, पण त्रावणकोरला जिंकणं हाही हैदरचा उद्देश होताच. कारण आजवर

जेवढ्या म्हणून हैदर आणि मलबार-कालिकतच्या लढाया झाल्या होत्या, तेवढ्या लढायांच्या वेळी त्रावणकोरच्या राजाने, हैदरच्या विरोधकांना गुप्तपणे मदत केलेली होती. हैदरला त्यामुळे त्रावणकोरवर राग होता. त्रावणकोरवर जायला हैदर डच लोकांकडून त्यांच्या प्रदेशातून जाणारा मार्ग वापरायला मागत होता. डच लोकांनी ते सपशेल नाकारलं होतं. शिवाय त्रावणकोरच्या राजाने त्रावणकोरच्या उत्तरेला किल्ला बांधून उत्तर सीमेची सुरक्षा वाढवायला सुरुवात केली होती. त्यामुळेच हैदर त्रावणकोरवर चढाई करायची योजना करायला लागला. हैदरने कोचीनकडून ४ लाख रुपये खंडणी आणि १९ हत्ती मागितले आणि त्रावणकोरकडून दीड कोटी रुपये खंडणी आणि ३० हत्ती भेट म्हणून मागितले. त्रावणकोर राजाला इंग्रजांची मदत असल्यामुळे त्याने ते सपशेल नाकारलं. हैदरची फौज मग त्रावणकोरकडे चालायला लागली. हैदरने त्रावणकोरला जायचा मार्ग डच लोकांनी नाकारल्यावर कोचिनच्या उत्तरेकडून वाट धरली. हैदरने त्रिचुरचा किल्ला जिंकला आणि आपला पाय रोवला. कोचीनचा राजा त्याला शरण आला. डच लोकांनी करगनुरचा आपला किल्ला नायर लोकांच्या मदतीने वाचवला. हैदरला पराभूत केलं. करगनुरचा राजा हैदरला शरण गेला पण डच लोकांनी हैदरला राजवाड्यापर्यंत पोहचूच दिलं नाही. त्यांनीच राजवाड्याचा ताबा

घेऊन टाकला. हैदरच्या सतत लहान मोठ्या चकमकी या डच, नायर आणि इंग्रजी फौजांशी होत राहिल्या पण निर्णायक लढाई एकही झाली नाही. तेवढ्यात हैदरला मैसूरला ताबडतोब परत जाण्याची वेळ आली म्हणून त्याने त्रावणकोर मोहीम  बंद करून तो मैसूरला परतला. त्रावणकोर जिंकायचं हैदरचं स्वप्न परत अधुरंच राहिलं.

## नंजराज वोडीयार –

## इ. सन १७६६ ते २ ऑगस्ट १७७२.

या वेळी मैसूरच्या राजवाड्यात एक अशुभ घटना घडली. १७६६ साली कृष्णराज वोडीयार मरण पावला तेव्हा हैदर मलबारच्या मोहिमेत गुंतला होता. त्यामुळे किल्लेदार मकदूमअलीला जरी हैदरची बालवयातील दुसऱ्या राजपुत्राला गादीवर बसवण्याची गुप्त आज्ञा होती तरी दरबारी प्रतिष्ठीत आणि राजमातेमुळे थोरला नंजराज राजपुत्रच राजा झाला होता. हा राजपुत्र लवकरच सज्ञान झाला. हैदरला हा वोडीयार आपल्या सत्तेला शह देणारा ठरणार याची दु:चिन्ह दिसायला लागली होती. हा सर्वाधिकारी नंजराजैय्याचा नातूही होता हा आणखी एक धोका हैदरला वाटत होता. कृष्णराज वोडीयारनंतर ३ वर्षांनी त्याची आई देवजम्माही १७६९ मध्ये मरण पावली होती. आता कृष्णराज वोडीयारची राणी लक्ष्मणीअम्मा राजमाता म्हणून हुशारीने वागत होती. ती कट्टी गोपलराज अरसची कन्या होती. त्यामुळे दरबारातील राजकारण तिला चांगलं कळत होतं आणि हैदरचा राजकीय प्रवासही तिने जवळून पहिला होता. आपली सत्ता भ्रष्ट करण्याची तिची धडपड चालू आहे हे हैदरलाही माहीत होतं.

त्यामुळे हैदरला हा राजा नकोसा झाला होताच. त्यातच मराठ्यांच्या मदतीने आपली सत्ता काढून घ्यायची हा नंजराज वोडीयार प्रयत्न करतो आहे हे कारस्थान फुटल्यावर हैदरने नंजराजाला अटक करून नजरकैदेत ठेवलं. २ ऑगस्ट १७७२ या दिवशी नंजराज वोडीयार आपल्या बिछान्यात मरण पावलेला आढळला. तेव्हा त्याचं अवघ २२ वर्षे वय होतं. मध्यरात्री तो दूध प्यायला पहाटे २ वाजता उठला आणि हैदरने पाठवलेलं दूध प्यायला. सकाळी डॉक्टर बोलावण्यात आले. त्यांनी नंजराज वोडीयार विष पोटात गेल्यामुळे मरण पावल्याचं घोषित केलं. नंजराजाचा कारभार १७६६ सालापासून १७७२ सालापर्यंत चालला.

## बेट्टद चामराज वोडीयार –

## १६ ऑगस्ट १७७२ ते ७६.

नंजराज वोडीयारचा शेवट असा झाल्यावर त्याचा धाकटा भाऊ बेट्टद चामराजाला १६ ऑगस्ट या दिवशी सुतकाचे १३ दिवस पार पडल्यावर हैदरने गादीवर बसवलं. हा सत्तेत आला तरी हैदरच्या हातातील बाहुलं बनूनच राहिला. तोही ४ वर्षात अचानक वारला. लक्ष्मणीअम्माला यामागचा सूत्रधार नक्कीच माहीत होता. चार वर्षांमध्ये महाराणीचे दोन तरुण पुत्र अचानक मरण पावले होते. पण खचून जाणारी ती स्त्री नव्हतीच मैसूर सिंहासनाला पुढचा वारस कोण असेल याचा तिनेही विचार करून ठेवला होताच. तिने आपल्या धाकट्या बहिणीचा मुलगा नरसराजैय्या याला वारस म्हणून निवडायचं ठरवलं होतं. दुसरा मुलगा होता तिच्या सावत्र मुलीचा मुलगा सिध्दराजैय्या. पण हे दोन्ही मुलगे हैदरने नाकारले, कारण त्यांच्यात राज्य सांभाळण्याचं पाणी नव्हतं असं त्याचं म्हणणं होतं.

## खासा चामराज वोडीयार –
## इ. सन १७७२ ते १७९६.

नवीन वारस निवडण्याची जबाबदारी हैदरवर आली. हैदरने यासाठी एक वेगळाच अचंबित करणार अकल्पित मार्ग निवडला. राजधानीतील सर्व प्रतिष्ठित, सर्व दरबारी आणि राजघराण्यातील सर्व लोकांना त्याने आमंत्रित केलं. राजघराण्यातील सर्व शाखांच्या लहान मुलांनाही आणवलं. एका मोठ्या दिवाणखान्यात तऱ्हतऱ्हेच्या वस्तू मांडल्या. त्यात पुस्तकं, खेळणी, फळं, खाद्यपदार्थ, कपड अशा नाना प्रकारच्या वस्तू होत्या. हैदरने त्या सर्व मुलांना तुम्हाला काय हवं ते घ्या असं सांगून मोकळं सोडलं. सर्व मुलांनी खुषीत येऊन आपल्याला हव्या त्या वस्तू उचलायला सुरुवात केली. मात्र एक छोटा मुलगा एका रत्नजडित कट्यारीकडे गेला आणि त्याच्याशी खेळू लागल्या. त्यापुढे जाऊन त्याने आपल्या डाव्या हातात एक लिंबूही उचलून घेतलं. हैदरचं या सर्वांवर बारीक लक्ष होतं. या मुलाचं नाव चामराज होतं. अरिकुठार देवराज अरस आणि होनाजम्मा अरस याचं ते बालक होतं. हैदरने मुलाला पाहिलं आणि एकदम तो मोठ्याने म्हणाला,

“हा आपला उद्याचा राजा. ह्याची पहिली आवड लष्करी संरक्षण आणि दुसरी आवड पीकपाणी.”

जमलेले लोक हैदरच्या या निवडीने आश्चर्यचकित झाले. हैदरने त्या मुलाला जवळ बोलावलं आणि आपल्या उराशी धरलं. राणी लक्ष्मणीअम्मानेही या निवडीला मान्यता दिली. त्यानंतर हैदरने शास्त्रशुध्द पद्धतीने त्याला दत्तक घेण्याचा समारंभ राजघराण्याला करायला लावला आणि मग l³ççuçç jçpçÒççmççoçlç vçíTvç jçpçç®çí mçbmkçÀçj kçÀ©vç iççoçÇJçj yçmçJçuçb. २७ सप्टेंबर १७७६ या दिवशी राज्यारोहण समारंभ पार पडला. l³çç®çb vççcçkçÀjCç खासा ®çççcçjçpç®ç kçíÀuçb. त्यानंतर त्या मुलासाठी मुदजम्मा नावाची एक नवीन दाई नेमली आणि लक्ष्मणीअम्मा हिच्याशी त्या मुलाचा संपर्क येऊ नये, आपल्या सत्तेला धोका होऊ नये, राणीने बालराजाशी दुष्टपणे वागू नये म्हणून राणीला नजरकैदेत ठेवली. हैदरअली आता निर्धास्त झाला. त्याच्यानंतरही सत्ता त्याच्याच घराण्यात राहील याची सोय झाली होती कारण टिपू सुलतान हा आता २७ वर्षांचा झाला होता. आणि हा नवीन वोडीयार फक्त ३ वर्षांचा होता. हैदरला आणखी एक करीम नावाचा मुलगा होता. अशारितीने हैदरने आपल्या दोन्ही मुलांच्या भविष्याची व्यवस्था या कल्पकतेतून पूर्ण केली.

# हैदर आणि पर्शिया

हैदरने यानंतर आपलं लक्ष परकीय सत्तांशी संबंध सुधारण्याकडे वळवलं. पर्शियाकडे उत्तम घोडे असल्याचे त्याला माहिती होते, पण त्या देशाशी संबंध नव्हते. हैदरने शहा नुरौल्ला नावाचा पर्शियन दूत आपल्या वतीने पर्शियाला पाठवला. शिराज इथे या दूताचं पर्शियाच्या राजाकडून - करीम खानकडून थाटाने स्वागत केलं गेलं. मग १००० फौज उभी करण्याची परवानगी देण्यात आली. शहा नुरौल्ला ही फौज आणि उत्तम घोड्याचं दळ घेऊन मैसूरला परतला. हैदर ही फौज आणि घोडे पाहून खूष झाला. पण थोड्याच दिवसांमधे या पर्शियन फौजेच्या वागण्याने त्याचा भ्रमनिरास झाला. हळूहळू हे पर्शियन फौजी कुठे नाहीसे झाले ते कळलं नाही, पण त्यांच्याबद्दलचं हैदरचं प्रेम मात्र नाहीसं झालं होतं.

## बल्लारीची स्वारी -

हैदरची यापुढील कामगिरी बेल्लारीवर झाली. नोव्हेंबरमधे तेथील हिंदू राजाने तातडीने त्याला मदतीला बोलावलं. हा राजा आधी बसालतजंगचा मांडलिक होता, पण १७६९ सालापासून तो हैदरला आपली खंडणी पोचवायला लागला होता. त्या रागावर बसालतजंगाचा दिवाण भोजराज याने फ्रेंच लष्करी अधिकारी लॅली याला घेऊन बेल्लारीवर हल्ला केला होता, आणि किल्ल्याला वेढा घातला होता. त्यामुळे स्वत:च्या सुटकेसाठी हैदरसारखा कुणीही त्राता त्याच्या नजरेसमोर दुसरा नव्हता. हैदरलाही हा हल्ला परतवून लावणं जरूरीचं होतं. हैदरची फौज त्वरेने बेल्लारीला निघाली. तोपर्यंत हैदरच्या ' मुत्सद्दी लोकांनी ' बसालतजंगाच्या जवळपासचे पाळेगार फोडून त्याच्याविरुध्द फितवून ठेवले होते. हैदरच्या ताफ्यामधे असे मुत्सद्दी लोक खूप होते. त्यांची हीच कामगिरी असे. हैदर जिथे स्वारी करणार असेल, त्याच्या जवळपासच्या भागातले पाळेगार-देसाई फोडून ठेवायचे आणि हैदर आला की त्यांनी हैदरला सामील व्हायचं, हाच हैदरचा परिपाठ असे. त्याप्रमाणे बसालतजंगाची एक बाजू लंगडी झालेली होती. हैदरची फौज ५ दिवसांमधे २५० मैल अंतर कापून

बेल्लारीला पोचली तेव्हा त्याच्या फौजेतील काही सैनिक केवळ श्रमाने मेले. हैदरने आपली फौज लॅलीच्या फौजेच्या समोर न आणता, त्या फौजेच्या पिछाडीकडून जोरदार हल्ला चढवला. तो हल्ला इतका अनपेक्षित होता की लॅलीची फौज पळत सुटली. शत्रूची सर्व युध्दसामग्री हैदरच्या हाती लागली. लॅली जीव वाचवून पळून गेला आणि भोजराज लढाईत मारला गेला. हैदरने प्रचंड मोठी रक्कम बसालजंगाकडे मागितली.

## मिरजेच्या पटवर्धनांचा पाडाव – सांवशीची लढाई – जुलै १७७७

हैदरला सव्वा कोटीचा मराठ्यांच्या पदरचा मुलुख राघोबादांकडून तहामुळे मिळाला होता. पुणे दरबार राघोबादादांचा गुंता सोडवण्याच्या मागे अडकले होते. हे पाहून त्याने धूर्तपणाने मराठी मुलूखात आता शिरकाव करून तोही प्रदेश हडपायला सुरुवात केली. इ. स. १७७४ मधे त्याने मदगिरी-बाळापूर- होस्कोटे, वगैरे ठाणी जिंकून घेतली आणि धारवाडवर आपला सरदार शिवमोघे याला पाठवलं आणि पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर परगण्याला उपद्रव द्यायला सुरूवात केली. इतक्यात इंग्रज-मराठे तह झाला, मैसूरचा राजाही मेला आणि मद्रासकर इंग्रजांनी हैदरला छळायला सुरूवात केली. त्यामुळे हैदर मैसूरला परत गेला. पण जातांना शिवमोघे सरदाराला बंकापूरावर पाठवलं. तो धारवाडपर्यंत येऊन पोचला. त्यांनी मिरजेच्या पटवर्धनांना हैदरविरुध्द जायला सांगितलं.

मिरजेच्या गोपाळराव आणि वामनराव या बंधूंचा कैलासवास झाल्यावर या सरदारीची सूत्रं वामनरावांचे धाकटे बंधू पांडुरंगतात्यांकडे आली. पटवर्धन घराण्याचे परशुरामभाऊ हे फौजेची जबाबदारी घेत होते कारण मिरजेचे पांडुरंगराव यांना

लष्करी शिक्षण नव्हतं, ते लष्करी डावपेच जाणणारेही नव्हते. पण पटवर्धनांच्या घरात यावेळी फुटीने शिरकाव केला होता. पटवर्धनांच्या तीन शाखांमधे पैशावरून वाद निर्माण झाले. कुरुंदवाड-तासगाव शाखा मिरजेपासून फुटल्या. मिरजेची सनद गोविंदपंतांच्या नावाने होती. त्यांनी स्वारी- मोहिमेची जबाबदारी. कर्जफेड वगैरे जबाबदारी उचलायची आणि कुरुंदवाड-तासगाव शाखांनी आपली फौज घेऊन मुख्य शाखेला सामील व्हायचं हा शिरस्ता असतांना पांडुरंगतात्यांनी अचानकपणे रीत बदलली. कुरुंदवाड आणि तासगाव शाखांनी आपापला खर्च-कर्ज जबाबदाऱ्या उचलाव्यात असा नवा फतवा काढला. त्यामुळे तासगावशाखेचे मुख्य म्हणून परशुरामभाऊंनी त्याचा तीव्र निषेध केला. कुरुंदवाड शाखेनेही निषेध केला. तरीही पांडुरंगतात्यांनी काही ऐकलं नाही. नाईलाजाने भाऊंनी होकार दिला. दैवाचे फेरे उलटले.

पुण्याहून कारभाऱ्यांनीही हैदरवर जाण्याचा तगादा लावला. त्यामुळे हैदरविरुध्द आपणच फौजेचं नेतृत्व करणार हा निर्णय पांडुरंगरावांनी घेतला. परशुरामभाऊ कोकणात जायच्या तयारीला लागले. आणि पांडुरंगतात्या हैदरवर निघाले. हैदरने भल्याभल्यांना झुकवलं होतं. पांडुरंगतात्या त्याच्यापुढे किस झाडकी पत्ती ! पांडुरंगतात्या पटवर्धन फौज घेऊन बाहेर पडले. एकेक ठाणी जिंकत

चालले. धारवाडवर वेढा घालून बसलेला शिवमोघे सरदार बंकापूरावर आला. त्यांच्याबरोबर दुसरा सरदार श्रीपतरावही होता. या दोघांनी हैदरकडे जास्त फौजेची मागणी केल्यावर हैदरने लगेच कुमदान नावाच्या सरदाराला फौज घेऊन पाठवलं. कुमदान रट्टेहळ्ळीच्या जंगलात दडून राहिला. पांडुरंगतात्या फौज घेऊन पुढे पुढे सरकायला लागले आणि मुरगोडची बारी ओलांडून पुढे आले. आणि हळूहळू शत्रूच्या जाळ्यात अडकत गेले. पटवर्धनांची फौज इंडिगोल ओढ्यावर येऊन विसावली. मागून रसद, फौज मिळवण्याच्या टप्प्याबाहेर ते पोचले. कुमदान बंकापूरावरून निघाला आणि सांवशीच्या किल्ल्यात आला. पांडुरंगतात्यांनी स्वत:च त्याच्यावर हल्ला करायचा ठरवलं.

पटवर्धनांच्या फौजा सांवशीच्या जवळ येणार ही बातमी आल्यावर कुमदान सांवशीच्या किल्ल्यात लपून बसला. आपली फौज त्याने तुरीच्या शेतात लपवून ठेवली. आणि तो पटवर्धनांची फौज येण्याची वाट पाहात बसला. पांडुरंगतात्या, आणि त्यांचे चुलतभाऊ कोन्हेरेराव पटवर्धन सांवशीला पोचले. त्यांची फौज तोफांच्या टप्प्यात आली, हे पाहिल्याबरोबर कुमदानने इशाऱ्याचा रुमाल किल्ल्याच्या आतून हवेत फिरवला आणि आपल्या फौजेला इशारा दिला. लगेच कुमदानच्या तोफा धडधडू लागल्या. शेतात लपलेलं सैन्यही बाहेर आलं. आणि एकच कापाकापी सुरू

झाली. मराठी फौजेत हाहा:कार माजला. सैन्य सैरावैरा पळू लागले. प्रचंड कापाकापी सुरू झाली, तेव्हा कोन्हेरेराव पटवर्धन तात्यांकडे गेले आणि परत फिरण्यात शहाणपण आहे म्हणाले. पण पांडुरतात्यांनी ते मानलं नाही. कोन्हेरेराव स्वत: धारातीर्थी पडले. पटवर्धनांची वाताहत झाली. सारी सामग्री लुटली गेली. पांडुरंग तात्यांना भाल्याची भारी जखम झाली. ते कुमदानकडे पाडाव झाले. त्यांना कैद करून साखळदंड घालून कुमदानने श्रीरंगपट्टणाला पाठवलं. दहा महिन्यांनी नोव्हेंबरमधे पांडुरंगतात्यांचा श्रीरंगपट्टणच्या कैदेत असतांनाच ताप येऊन मृत्यू झाला. पटवर्धन घराण्याला प्रचंड फटका बसला. सावकारी कर्जाने कंबरडं मोडलेलं होतंच, लुटीमुळे नुकसानही खूप झालं. ज्या गोपाळरावांचा धाक हैदरने कायम घेतला, त्याच गोपाळरावांच्या धाकट्या बंधूंच्या हातून पटवर्धन घराणं कर्जाच्या ओझ्याखाली, पराभवाच्या दु:खाच्या ओझ्याखाली  काही काळ खचलं. दडपलं गेलं. पण परशुरामभाऊंनी पराभव सावरला. घरही सावरलं. स्वत: फौज घेऊन गेले कुमदानाशी लढाया झाल्या. मनोळीच्या बारीवर दोघांच्या अनेक चकमकी झाल्या. हैदरने कोल्हापूरकरांनाही पटवर्धनांच्याविरूध्द चिथावलं. पण परशुरामभाऊंनी मनोळीहून कुमदानला घालवलं. आणि ते परत फिरले.

## गुत्तीच्या मुरारराव घोरपड्यांचा अंत.

## इ. स. १७७६..

कर्नाटकातील गुत्तीचे मुरारराव घोरपडे. हा मराठी रियासतीला मिळालेला आणखी एक शूर पुरुष. राजस्थानातील सिसोदे वंशातले दोन पुरुष आपला देश सोडून चाकरीसाठी महाराष्ट्रात आले. त्याच घराण्यात जन्मले शुभकृष्ण आणि करणसिंग. कधी लष्करात चाकरी आणि उरलेल्या वेळी शेती असा उद्योग करत दोघांनी आपला जम बसवला. शेतीवाडी घेऊन संपन्नतेकडे वाटचाल करायला लागले. करणसिंगाने हसन गंगूच्या फौजेत लढाई करत असतांना खेळणा किल्ला घोरपड लावून जिंकला. तेव्हापासून त्याला घोरपडे बहाद्दर हा किताब आणि मुधोळजवळची ८१ खेडी इनाम मिळाली. मुधोळकर घोरपडे या नावाने करणसिंगाचा वंश ओळखला जाऊ लागला. वेरूळला स्थिरावलेला शुभकृष्णचा वंश म्हणजे भोसले घराणं शहाजी-शिवाजीराजांचं भोसले घराणं. मुधोळच्या शूर घराण्यात जन्मले मुरारराव घोरपडे. त्यांच्या वंशजांनी गुत्तीला वेगळी शाखा सुरू केली. म्हणून हे गुत्तीचे मुरारराव. मुराररावांना कर्नाटकाचं नेतेपद आपल्याला मिळावं ही मोठी महत्वाकांक्षा होती. मराठ्यांच्या

फौजा कर्नाटकात आल्या की त्यांच्या मदतीला जाणं हाच त्यांचा परिपाठ होता. पण नानासाहेब पेशव्यांच्या काळात सावनूरच्या विजयानंतर मुराररावांना हवं ते सेनापतीपद मिळालं.

ज्या मार्गाने हैदरने आपला भाग्योदय खेचून आणला होता, तो हैदरचा भाग्योदय मुराररावांनी फार जवळून पाहिला होता. शत्रूसाठी ज्या मार्गाचा हैदर अवलंब करत होता, तेही त्यांनी जवळून पाहिलं होतं. स्वत: दगाबाजी करेल ते क्षम्य पण दुसऱ्याने त्याच्याविरोधात केली की ते मात्र चूक हा हैदरचा न्याय. आणि मग हैदरसारखा क्रूर कुणी नाही. मुरारराव हैदरविरुध्द इंग्रजांना मिळाला तेव्हा त्याच्या गोटात शिरून दंगा करण्यापर्यंत हैदरची मजल गेली. हैदर तसा दीर्घद्वेषी.

कर्नाटकाच्या रणभूमीवरच दोघांनी आपल्या शौर्याला, साहसाला, तलवारीला धार लावली. पण भाग्य हैदरच्या बाजूलाच कायम राहिलं. हैदरच्या विरोधकांना श्रीरंगपट्टणच्या तुरुंगाची हवा खायला घालण्यात नियतीचा हात मोठा, म्हणूनच मुराररावांचा हृदयद्रावक अंत हैदरच्या हातून झाला. यासाठी माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घ्यायला हवी. त्यानंतर नारायणरावांचा मृत्यू, राघोबादादांनी चालवलेले चंचल मनोवृत्तीचे नाना खेळ, इंग्रजांनी त्या राजकीय परिस्थितीचा

घेतलेला फायदा या सर्वात पुण्याचे नाना फडणीस, सखारामबापू असे कारभारी गुंतून पडले. मराठी फौजाही राघोबांच्या मागेच धावत राहिल्या. या परिस्थितीचा फायदा हैदरने घेतलाच घेतला.

इंग्रजांनी राघोबादादांच्या पक्षाची बाजू घेऊन पेशवाईतील भांडणांच्या निमित्ताने पुणे दरबार खिळखिळा करण्याचा जो डाव मांडला तोच हैदरनेही स्वीकारला. आता त्याने कर्नाटकातील सर्व ठाणी जिंकायला सुरुवात केली. इ. स. १७७५ मधे करवीरकर आणि कित्तूरकरही हैदरला सामील झाले. पण कुरुंदवाडच्या कोन्हेरेराव पटवर्धनांनी या सर्वांवर वचक ठेवला आणि त्यांना रोखून धरण्यात यश मिळवलं. कित्तूरकरांचा साफ बीमोड केला.

पुण्याहून पेशव्यांची फौज मदतीला येणार नाही हे ओळखलेल्या हैदरने आता मुराररावांच्या गुत्तीवरच हल्ला करायचं ठरवलं. यावेळी मुराररावांचं वय ७० वर्षांचं होतं. त्यांनी अनेकवेळा हैदरशी सामना केला होता. हैदरला पूर्ण ओळखून असणारा तो एकमेव योध्दा होता. हैदरने गुत्तीजवळ येऊन मुराररावांना निरोप पाठवून सांगितलं, की मला शरण ये, माझा ताबेदार हो, खंडणी देण्याचं कबूल कर, नाहीतर तुझं संस्थान काबीज करतो. मुराररावांनी उलट उत्तर पाठवून म्हटलं की मी या देशाचा सेनापती आहे, तुझ्यासमोर मान वाकवणार नाही. तू तर कालचा ५ प्यादांचा

शिपाई. मी तुझ्याशी लढायला तयार आहे. पेशव्यांची लाज घालवायची नाही म्हणून मुराररावांनी हैदरशी लढण्याचा निर्णय घेतला. आपल्या मुलामाणसांना मडकशिऱ्याला भावाकडे, शिवराव घोरपड्यांकडे पाठवून दिलं. १७ जानेवारी १७७६ ला हैदरने गुत्तीच्या किल्ल्याला वेढा घालून २२ दिवस तो वेढा चालवला. किल्ल्यात १०,००० उत्तम लढवय्ये पठाण होते. हैदरने किल्ल्याच्या पेठेवर चार वेळा हल्ला केला पण त्याला माघार घ्यावी लागली. ५ आठवड्यांच्यानंतर हैदरने गुत्ती गावावर ताबा मिळवला. मुराररावांची २००० घोड्यांची मोठी पागा, संपत्ती फार मोठ्या प्रमाणात त्याच्या हाती लागली. २ महिन्यांच्या नंतर मात्र मुराररावाकडून सल्ल्याची बोली दोन-तीन वेळा लागली.१२ लाखांचा ठरावही झाला. २ लाखाचं जवाहीर मुरारावांनी हैदरला दिलं. पण हैदरने त्याची किंमत ६०,००० रुपये ठरवली. त्यामुळे परत गोळागोळी सुरू झाली. तेवढ्यात कोन्हेरेराव मदतीला येतात ही बातमी मुराररावांच्या कानावर आली. हैदरही ह्या बातमीनंतर सलुख करून निघावं या विचाराला आला. मुरारराव घोरपडे शौर्याने लढायला लागले. मर्दानगी तर एवढी, हिंम्मत तर मोठीच. किल्यावरून गोलंदाजाने तोफेचा एक गोळा उडवला तरी चारपाच माणसं मरत होती. श्रीमंतांशी एकनिष्ठ राहू अशी शपथ राखून सर्वस्व गमावून लढाई केली. मीर रेझा बोलीस आला तेव्हा

त्याच्याबरोबर २ लाख रुपये किल्ली कुलुप लावून पेटाऱ्यातून पाठवले. मागाहून आमचे वकील येऊन कुलूप काढून ऐवजाचा भरणा करतील म्हणून सांगितलं. दोन दिवस वकील आले नाहीत तेव्हा हैदरने कुलूप काढवलं. तर पेटाऱ्यांमधे ४ पेटारे गारगोट्या, ४ पेटारे खापऱ्या, बाकी चारमधे कलांवंतीणींच्या पादरक्षा. हैदर संतापाने बेभान झाला. त्याने किल्ल्याला दुतर्फा तोफा लावल्या. २ दिवस २ रात्र तोफा चालवल्या. तिसरे दिवशी हल्ला केला त्यात १०००/१२०० माणूस ठार झालं. हैदर चिडला पण त्याचा उपाय चालला नाही. शेवटी किल्ल्यातले पाणी संपलं. किल्ल्यातील लोकांनी आणि मुराररावांनी निर्जळी राहून चार दिवस युध्द केलं. नंतर चिखल आणि हिरवे तांदूळ खाऊन दिवस काढले. तेही संपलं तेव्हा हैदरशी सलूखाची बोली लावली. आता हैदर हटून बसला. हैदरने ऐकले नाही. खूप निकड केली तेव्हा येऊन भेटावे असा निरोप हैदरने पाठवला. किल्लेदार मुसलमान होता, त्याने मुराररावांना खाली आणलं. हैदरने लगेच चौक्या लावल्या. टिपूने गुत्तीचा किल्ला ताब्यात घेतला.

पण यावेळी हैदरने आपला सूडाचा, क्रूरतेचा, निर्दयीपणाचा खरा चेहरा उघड केला. गुत्तीनंतर मडकशिऱ्याला शिवराव घोरपड्यांवर हल्ला केला. शिवराव  लुटला गेला. हैदरने सेनापती मुरारराव घोरपडे अणि त्यांच्या मुलामाणसांना कपालदुर्गच्या

किल्ल्यात रुपेरी बेडी घालून ठेवलं. सर्वांना मुलामाणसांसह हालहाल करून ठार केलं. मुराररावांचे मुलगे व्यंकटराव आणि नरसिंगराव यांनाही बेड्या घातल्या. मुराररावांचा मृत्यू कधी झाला ते कळत नाही. इ. स. १७७८ च्या आरंभी कधीतरी झाला असावा. एकदा मुरारराव कैदेतून पळून गेले अशी अफवाही उठली. पण ती अफवाच होती. सेनापतींची पत्नी राणूबाई आणि शिवराव घोरपड्यांची पत्नी सुबाबाई ह्या दोघींना अर्काटच्या नबाबाने कपालदुर्गावर छापा घालून सोडवून आणलं असं कागदपत्रांवरून दिसतं. एकूण, स्वाभिमानी, शूर, साहसी मुराररावांचा असा अंत झाला.

## निजाम-मराठे हैदरविरुध्द- इ. स. १७७७.

कोल्हापूरकर आणि हैदर यांच्या बंदोबस्तासाठी मराठे आणि निजाम एकत्र आले. हरिपंत फडक्यांच्या हाताखाली परशुरामभाऊंना मिळायला फौजा पुण्याहून निघाल्या. निजामातर्फे घौशा हा सरदार निघाला. हरिपंत आणि परशुरामभाऊ सर्व ठाण्यांच्या खंडण्या घेत घेत पुढे जात होते. यात ८/९ महिने संपले. हैदरही आता बाहेर येऊन चित्रदुर्ग आणि हरपनहळ्ली घेण्याच्या मागे लागला.  या पूर्ण मोहिमेत घौशाची जराही मदत झाली नाही.

## हैदरची चित्रदुर्गावर स्वारी

मराठी दरबार राघोबादादा - इंग्रज यांच्या गोंधळात अडकलेले असतांना हैदरने कर्नाटकातील ठाणी घ्यायचा सपाटा लावला. कोप्पळ, गजेंद्रगड, धारवाड, चित्रदुर्ग ठाणी त्याच्या फौजांनी पोळली जाऊ लागली. चित्रदुर्गाच्या मडकरी नायकाने हैदरला मदत केली नव्हती म्हणून हैदरचा त्याच्यावर खूप राग होता. हैदरने चित्रदुर्गावर स्वारी केली. मराठी फौजा आपल्या मदतीला याव्यात म्हणून चित्रदुर्गाचा कारभारी हरिपंतांना भेटायला आला. पण हैदरने अचानक येऊन किल्ल्याला वेढाच घातला. हा वेढा ३ महिने चालला. त्याने १४ लाखांची खंडणी मागितली ती राजाने नाकारली आणि युध्दाला सुरुवात झाली. पण शेवटी चित्रदुर्गकराला हैदरशी तह करावा लागला. हैदर निघून गेल्यावर त्या राजाने परशुरामभाऊंनानिरोप पाठवून, तुम्ही मला मदत केलीत तर मी तह मोडून टाकेन आणि तुम्हाला पैशाची मदतही करीन असा निरोप पाठवला. त्यावरून नोव्हेंबर १७७७ मधे परत मराठी फौजांनी तुंगभद्रा ओलाडली. आणि मराठे आणि हैदर यांच्या मोठ्या लढाईला सुरुवात झाली.

परशुरामभाऊ चित्रदुर्गावर जाणार हे कळल्यावर त्यांचा रस्ता अडवण्यासाठी हैदर फौज घेऊन त्यांच्या पिछाडीवरून चालू लागला. मराठे जवळपासच्या खंडण्या घेत चालले. त्यात निजामाकडून आलेल्या घौशाचा काडीमात्र उपयोग झाला नाही. हैदरने मराठ्यांना येणारी रसद बंद केली होती. आणि स्वत: मुरगोडला येऊन बसला. इतक्यात मराठ्यांची कही लुटली गेली. तो दिवस होता १ जानेवारी १७७८.

आपल्याजवळ एवढी फौज असतांनाही हैदर एवढं धाडस दाखवत पुढे येतो आहे हे पाहिल्यावर परशुरामभाऊ पटवर्धन आणि हरिपंतांना आपल्या फौजेत फितुर असल्याची शंका यायला लागली. त्यांनी फितुरीचा शोध घ्यायला सुरूवात केली. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की मानाजी फाकडे सरदाराने १ लाख होन घेऊन फौजेत वाटले होते. हरिपंतांबरोबर बाजीराव बर्वे हे राघोबादादांचे मेहुणे होते. त्यांच्या मार्फत हैदरने फडक्यांचा एक सरदार मानाजी फाकडे याला १ लाखांची लाच देऊन फोडलं. ही गोष्ट सिध्द झाल्यावर मानाजीचा गोट लुटला गेला, मानाजीचे साथीदार यशवंतराव माने याला फाशी दिली. मानाजी फाकडे पळून गेला. परत परशुरामभाऊ आणि हरिपंत हैदरच्या मागे लागले आणि चित्रदुर्गाच्या राजाला मदत करायला निघाले. पण तेवढ्यात पुण्यात नाना फडणीसांच्या बंधूंनी, मोरोबादादांनी, आपल्या हातात

कारभार घेऊन नानांना काढून टाकण्याचं आणि राघोबादादांना पेशवेपदी बसवण्याचं कारस्थान रचलं. हे कारस्थान उघडकीला आल्यामुळे भाऊ आणि हरिपंतांना हैदरवरची मोहीम सोडून मार्च १७७८ मधे घाईघाईने पुण्याला परत जावं लागलं. हैदर आणि टिपू परत कर्नाटकात संचार करायला मोकळे झाले.

मोरोबादादांच्या या कारस्थानाने पुणे दरबारातलं वातावरण परत अस्थिर झालं. पण महादजी शिंदेंनी मुत्सद्दीपणाने सूत्रं हलवून मोरोबांचा डाव उलटवला. आणि नाना फडणीस परत सत्तेत आले. मराठ्यांच्या फौजा निघून गेल्यावर हैदर आता चित्रदुर्ग नायकाबरोबर लढाईला मोकळा झाला. ही जमात खूप शूर पण शेवटी हैदरचा विजय झाला. नायक पळून गेला. हैदरने त्याला पकडून, अटक करून श्रीरंगपट्टणाला पाठवून दिलं. चित्रदुर्गाच्या या फौजेत ३००० मुसलमान होते, त्यांना हैदरने त्या गावच्या एका फकीरातर्फे पैसा पुरवला. मडकरी नायकाचा पराभव होणं स्वाभाविकच होतं. पळून गेलेली रयत हैदरने शोधून परत आणली. हैदरने त्याही पुढे जाऊन चित्रदुर्गातले २०,००० तरुण, लहान अनाथ मुलं यांना पकडून श्रीरंगपट्टणाला आणले. त्यांना मुसलमान केलं. त्यांना लष्करी शिक्षण दिलं आणि त्यांची चेला नावाची लष्करी फौज तयार केली. हैदरने चित्रदुर्गावर आपला मुलासारखा वाढवलेला मुलगा शेख ऐयाजला ठेवायचं ठरवलं. शेख ऐयाज हा

खरं तर मलबारहून आणलेला पोरसवदा मुलगा. त्याला हैदरने मुसलमान करून घेतलं आणि लष्करी शिक्षण देऊन तयार केलं. ऐयाज हा संकटात सापडलेल्या हैदरसाठी उजवा हात होता, इतका प्रसंगावधानी, धाडसी, चाणाक्ष आणि हुशार होता. त्याचं देखणेपण, हुशारी, यावर हैदर खूष होता. ऐयाजने चित्रदुर्गावर राहायचा प्रस्ताव नाकारला. तो निरक्षर होता, त्यामुळे आपल्या हातून ही जबाबदारी निभावणार नाही असं त्याला वाटलं. तेव्हा हैदरने त्याला दिलेला उपदेश हैदरचं व्यक्तिमत्व दाखवून जातं. हैदर ऐयाजला म्हणाला," तुला एक सांगतो. तुझ्याजवळ एक चाबूक ठेवत जा. तुला त्याचा भरपूर वापर करावा लागेल. त्यामुळे जे लबाड अफरातफर, चहाडखोर असतील ते तुझ्या लगामी राहतील. तू तुझ्यावर विश्वास ठेव. त्या आत्मविश्वासावर तुझं कुणीही वाकडं करू शकणार नाही. फक्त प्रचंड आत्मविश्वास पाहिजे. माझ्याकडे बघ ! मी असाच निरक्षर असूनही, मी नाही का मोठा झालो ? ”

## कडप्पाची स्वारी इ. स. १७७९. –

## हैदरवर जीवघेणा प्रयत्न-

हैदर चित्रदुर्गावर असतांना हैदरने आपला सरदार अलीरझा याला कडप्पाच्या स्वारीवर पाठवलं. अली रझा जेव्हा कडप्पाला गेला तेव्हा त्या नबाबाने स्वत:जवळ अफगाणी फौज बाळगली होती. हे अफगाणी अत्यंत शूर, पराक्रमी, कडवे आणि तेवढेच फसवे म्हणून प्रसिध्द होते. त्यांच्या घोडदळासमोर अली रझाचं काही चाललं नाही. तोपर्यंत हैदरची चित्रदुर्ग स्वारी संपत आली होती. हैदर आपली फौज घेऊन पेन्नूर नदीच्या काठी जाऊन पोचला आणि अली रझाच्या फौजेला जाऊन मिळाला. हैदरचा तळ नदीच्या काठावर असल्याने कडाप्पाच्या पठाणांना आपल्या धन्याचा शत्रू म्हणजे अलीरझाची फौज एवढंच माहिती होतं. त्यामुळे हे अफगाण हैदरच्या तळावर स्वस्थचित्ताने नदीच्या पलिकडे गेले आणि अचानक हैदरच्या तडाख्यात सापडले. हैदरने आपल्या घोडदळाने त्या अफगाणांना वेढून टाकलं. त्यातच अली रझाही आपली फौज घेऊन आला. हैदरच्या घोडदळाने अफगाणी फौजेला वेढा घातला. जोरदार लढाई झाली, पण अफगाणी फौजेचं काहीही चाललं नाही. शेवटी अफगाणी फौज हैदरला शरण गेली.

हैदर त्या अफगाणांच्या पराक्रमाने इतका प्रभावित झाला होता की त्यांना आपल्या फौजेत सामावून घेण्याचा त्याने विचार केला आणि अफगाणीही त्याच्या फौजेत चाकरीला तयार झाले. हैदरने त्यांना शस्त्र खाली टाकून शरण यायला सांगितलं. पण त्यांच्यातल्या ८० अफगाण्यांनी शस्त्रं खाली ठेवायला नकार दिला.त्यांच्या स्वाभिमानाला धक्का पोचू नये म्हणून हैदरने ते उदार मनाने कबूल केलं.

रात्री सगळे झोपले. हैदरच्या तंबूबाहेर त्याची अंगरक्षक फौज तेवढी पहाऱ्याला जागत होती. हैदरच्या तंबूबाहेरच हे कैद झालेले कैदी झोपले होते. मध्यरात्र उलटली. हे ८० अफगाण, ज्यांनी हत्यार टाकायला नकार दिला होता, ते गुपचुप उठले आणि त्यांनी हैदरच्या तंबूबाहेरच्या फौजेवर हल्ला केला. जोरदार कापाकापी झाली. बेसावध असलेली फौज एकदम भानावर आली आणि गोंधळ माजला. आपल्या तंबूत गाढ झोपलेल्या हैदरला या गलक्याने अचानक जाग आली. तेव्हा बाहेर काय घडलंय याचा त्याला अंदाज आला. तोपर्यंत अफगाणी त्याच्या तंबूच्या दिशेने यायला लागले होते. हैदरचा प्रसंगावधानी स्वभाव जागा झाला. त्याने आपल्या पलंगावर गाद्या-उशा रचून आपणच झोपलो आहोत असा देखावा तयार केला आणि कनातीला भोक पाडून त्यातून तो निसटला आणि वाचला. दुसरे दिवशी सगळ्या

दगाबाजांना त्याच्यासमोर आणलं गेलं. सगळ्यांना ठार मारण्यात आलं. काहींना हत्तीच्या पायाला बांधून फरपटत नेऊन मारलं. सर्व फौजेवर हैदरची दहशत बसली. कडप्पाचा नबाब पळून गेला होता, त्याला पकडून आणलं आणि श्रीरंगपट्टणाला पाठवलं. तिथे तोही कैदेत पडला. हैदरने कडप्पाच्या सुंदर बहिणीशी लग्न लावलं आणि आपल्या जनानखान्याचं बक्षीपद तिला दिलं. त्याकाळात बक्षीपद हे फार मानाचं स्थान मानलं जात असे.

## सावनूरवर स्वारी. इ. स. १७७९.

हैदरचं पुढचं लक्ष्य होतं सावनूरचा नबाब. हा खरं तर मराठ्यांचा मांडलीक. मराठ्यांनी त्याच्या राज्याचा अर्धा भाग घेतलेलाच होता. उरलेला भाग हैदरला हवा होता. हैदर सावनूरवर चालून आला पण पुणे दरबारच दादांच्या उचापतींमुळे हतबल झालेलं असतांना सावनूरच्या नबाबाला मदतीला येणार तरी कोण ? हैदरने तीच संधी साधली आणि तो सावनूरवर चालून गेला. पण यावेळची त्याची स्वारी क्रौर्य आणि दहशतीची नव्हती. त्याने सावनूरच्या नबाबाला आपला व्याही करून घेतलं. आपली मुलगी त्याच्या मुलाला दिली आणि त्याची मुलगी आपल्या मुलाला म्हणजे करीमला करून घेतली. हा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात श्रीरंगपट्टणाला पार पडला. सावनूरच्या नबाबाला फायदा एवढाच झाला की त्याची खंडणीची रक्कम निम्म्यावर आली.

## हैदर-मराठे-निजाम- इंग्रज दुसरं युध्द.

## इ. स. १७७९.

ह्या देशातील दक्षिणेकडील तीन प्रमुख राज्यकर्ते म्हणजे मराठे-निजाम- हैदर. या तिघांनी एक होऊन इंग्रजांशी म्हणजे वॉरन हेस्टींगच्या कुटील स्वभावाशी दिलेला लढा हा या लढाईचं मूळ गाभा..या लढ्यात संपूर्ण देशभर लढायांचा, राजकारणाचा, नीती अनीतीचा गदारोळ उठला. धुरळा उठला. हेस्टींग आणि नाना फडणीस या दोघांना हे ४ वर्षे चाललं युध्द आटोक्यात आणता आणता नाकी नऊ आले.  याचा मुख्य रचयिता पुण्याचा नाना फडणीस असला तरी मूळ कल्पना निजामअलीची. . हैदर कर्नाटकात प्रचंड साहसाने, ताकदीने इंग्रजांवर घसरला आणि इंग्रजांना त्याने पळता भुई कमी केली. मराठ्यांतर्फे होळकर-महादजी शिंदे यांनी इंग्रजांविरुध्द शस्त्र धरलं. नागपूरकर भोसलेही इंग्रजांविरुध्द चिडले होते. बंगालची खंडणी इंग्रजांनी आजवर बुडवली होती, म्हणूनच नानांच्या कारस्थानात ते सामील झाले, पण इंग्रजांनी वेगळीच चाल केली. नागपूरकर मुधोजी भोसले हे नाना फडणीसांना मानतच नव्हते. त्यांना ३ मुलगे होते. रघूजी, खंडूजी आणि व्यंकोजी. हुशार, मुत्सद्दी रघूजीला नागपूर संस्थान

मिळालं. दुसरा मुलगा खंडूजी स्वभावाने दांडगट, हूड. हा कटक प्रांताचा कारभार पाहात असे. वेगवेगळया स्वभावाच्या खंडूजी आणि रघूजी यांचं पटत नव्हतं हे चाणाक्ष हेस्टींगने पुरेपुर ओळखलं आणि त्याचा फायदा करुन घ्यायचं ठरवलं. मुधोजी हा थोरल्या शाहूराजांच्या मेहुणीचा मुलगा. इ.स. १७४८ मधे स्वत:च मुधोजीला शाहूराजे दत्तक घेऊन सातारची गादी देणार होते. पण तेव्हा तो योग आला नाही.

हेस्टींगने आता तो घाट रचला. सातारचा रामराजा आजारी झाला तेव्हा मुधोजीस त्याने दत्तक घ्यावे आणि छत्रपतीपद द्यावे असा घाट घातला. पुणे दरबारला हे कळल्यावर त्यांनी घाईघाईने रामराजास दुसरा मुलगा दत्तक देऊन हे प्रकरण थोपवलं. पुणे दरबारपासून मुधोजीस साफ अलग करण्याचा हेस्टींगचा डाव यशस्वी झाला. छत्रपतीपदाचं गाजर नागपूरकर भोसल्यांना दाखवल्यावर त्यांनी त्यांची तलवार म्यान केली आणि या उठावाला इंग्रजांना सामील होऊन या उठावाला कमकुवत केलं. साम-दाम-दंड-भेद या चारही मार्गांचा जो धुमाकूळ मांडला गेला त्याचा इतिहास.

नाना फडणीसांनी इंग्रजांचं जे वर्णन केलंय ते वाचलं की ह्या देशातल्या सर्व सत्ता इंग्रजांच्या हकालपट्टीवर का पेटून उठल्या

त्याचा अंदाज येतो. नाना फडणीस लिहितात, "इंग्रजांना सांप्रत काळी फार गर्व झाला आहे. ५ वर्षे त्यांच्या चालीची पक्की माहिती झाली. कौल-करार-इमान त्यांच्या गावीही नाही. प्रथम लिहिणे बोलणे फार गोड. दुसऱ्यास असे वाटावे की काय इमान, वचन आहे ते यांच्यापासी..खरेपणाची रास पडावी असी यांची भूलथाप पडावी..नंतर परिणामी उमजते की यांची नजर केवळ वाकडी. सर्व मुलूख काबज केला..एकास मिळवून घ्यावे, एकास हलके करावे ही जात करण्याची..फोडाफोड करावी, नाद राखावा. ऐसे आहे. ज्यांचे इमान सुटले आणि वचनाची कायमता नाही, ते दौलत एका दिवसात बुडते हा नेम..ईश्वरे असे जाणूनच राव पंतप्रधान, निजाम, हैदर व भोसले इतक्यांचा एक होऊन ताण बसवावा असे ठरविले... दौलत देणे हा अखत्यार ईश्वराचा..."

यावरुन इंग्रजांनी त्या काळातच काय पण सत्तेत असेपर्यंत कायमं भारतात खेळवलेल्या राजकारणाचं चित्र स्पष्ट होतं. या सर्वांनी एकत्र यायला इंग्रजांचा लोभी आणि कपटी स्वभाव कारण ठरला. वॉरन हेस्टींग हा या रोषाचा मुख्य नायक. मराठ्यांच्या दरबारात राघोबादादांचा पक्ष घेऊन मराठी दरबारात त्यांनी जी तोडफोड चालवली, त्यामुळे पुणे दरबार इंग्रजांविरुध्द उठावाला तयार झाला. इंग्रजांचा लोभीपणा इतका वाढला की राघोबादादाला घेऊन पुण्यात पेशवेपदी बसवण्याची त्यांची घाई त्यांना चांगलीच

महागात पडली. इंग्रजांतर्फे पुण्यात राहणारा वकील याने हा सगळा घाट घातला. राघोबादादांना घेऊन इंग्रज पुण्याकडे यायला लागले, पण वडगावावर मराठी फौजेने महादजी शिंद्यांच्या नेतृत्वाकाली इंग्रजांना सपाटून मार दिला आणि कोऱ्या कागदावर तुम्ही म्हणाल त्या अटी आम्ही मान्य करू असं इंग्रजांना लिहून द्यावं लागलं. खुद्द नाना फडणिसांना काढून टाकून आपल्या हाती कारभार घेण्याची मोरोबा फडणीसांची स्वप्नंही इंग्रजांच्या ढवळाढवळीमुळेच दादांच्या माणसांनी पाहिली होती. तीही कारस्थानं नाना फडणीसांना फोडावी लागली. त्यामुळेच नाना फडणीसांना इंग्रजांविरुध्द लढण्याची तयारी करावी लागली.

इ. स. १७७९ साल पुण्याच्या कारभाऱ्यांना अनंत अडचणी घेऊन उगवलं. कर्नाटकात हैदरने धुमाकूळ मांडला, सुरतेस गॉडर्डने फौज घेऊन पुण्यास शह दिला, दादा पळून सुरतेस गेले, हेस्टींगने वडगावचा तह झुगारला. वडगावला झालेला लांछनास्पद तह हेस्टींगला फारच झोंबला. सर्व भारतभर त्याची नाचक्की झाली. त्यामुळे हेस्टींगही नानाला शह देण्याचा विचार करायला लागला होता. यावरून नाना फडणीसांच्या लक्षात आलं की इंग्रजांशी टक्कर देणं हे आपलं एकट्याचं काम नाही. तेवढी आपली ताकद नाही, पण या परकीयांना हाकलून देण्याशिवाय या देशात शांतता नांदायची नाही. दुसरीकडे निजामाची व्यथाही हीच होती. तोही

इंग्रजांविरूध्द संतापला होता. त्याची कारणं वेगळी होती. इंग्रजांच्या हाती बंगाल आणि मद्रास प्रांत होते. या दोन्हीमधे कटक प्रांत होता तो निजामाच्या सत्तेतला होता. कटक प्रांतातील महानदीच्या मुखापासून ते कृष्णा नदीच्या तीरापर्यंतच्या प्रदेशाला उत्तर सरकार या नावाने ओळखलं जात असे. इंग्रजांना बंगालहून मद्रासला जातांना हा कटक प्रांत अडथळयाचा ठरायला लागला. तो काबीज करण्याची त्यांची धडपड सुरू झाली. त्यासाठी कुटील कारस्थानं सुरू झाली.  कटकमधील गुंटुर आणि नेल्लूर प्रांत निजामाने आपल्या भावाला-बसालतजंगला दिले होते. तो तिथला अधिकारी होता. या बसालतजंगाने आपल्याजवळ फ्रेंच फौज बाळगली होती, तीही या इंग्रजांच्या डोळ्यात सलत होती. फ्रेंचांशी त्याचं वैर इतकं वाढलं होतं की कुठेही फ्रेंच दिसले की इंग्रजांचा तिळपापड व्हायचा. तसंच बसालतजंगाच्या फ्रेंच फौजेबद्दल होतं.

हैदरने गुंटुरवर स्वारी करून बसालतजंगाकडे ४ लाख खंडणी मागितली तेव्हा बसालतजंगाने मद्रासच्या रॅम्बोल्डकडे आणखी फौजेची मागणी केली. एवढी फट इंग्रजांना गुंटुरमधे शिरायला पुरेशी झाली. या फौजेच्या बदल्यात बसालतजंगाकडून मद्रासच्या इंग्रजांनी गुंटुर प्रांत मागून घेतला. निजामअलीच्या नकळत हे घडलं म्हणून निजामअली चिडला. खंडणी बुडली म्हणून हैदर चिडला आणि वर इंग्रजांची मगरूरी तर इतकी की गुंटुर ताब्यात घ्यायला

इंग्रजांच्या फौजा बिनदिक्कत निजामाच्या आणि हैदरच्या प्रांतांमधून दोघांची परवानगी न घेताच पिकं तुडवत गेल्या त्यामुळे हे दोघे आणखीनच संतापाने बेभान झाले. हैदर तर अशा उध्दटपणाला खपवून घेणारा नव्हेच. तेव्हा निजामाने नाना फडणीसांकडे आग्रह धरला की या लोकांना घालवलं नाही तर हे लोक आपल्याला खाऊन टाकतील. म्हणून काहीतरी करा. त्यामुळे ह्या युध्दाचं मुख्य श्रेय निजामाकडे जातं.

तिसरीकडे हैदर तर इंग्रजांना घालवायला बसलाच होता. त्यांच्यासारखी नीच जात जगाच्या पाठीवर दुसरी कुणीही नाही असं त्याचं स्पष्ट मत होतं. त्याची कारणं वेगळी होती. त्या कारणांना युरोपमधे चाललेल्या इंग्रज-फ्रेंच युध्दाची पार्श्वभूमी होती. अमेरिका इंग्रजांच्या तावडीतून मुक्त झाली होती. फ्रेंचांशी लढण्याचे परिणाम भारताच्या राजकारणावरही झाले. भारतातील फ्रेंच आणि इंग्रज वसाहतींमधे शिरजोरीला वेग आला. इंग्रजांनी पश्चिम किनाऱ्यावरचं फ्रेंचांचं माहे हे बंदर १९ मार्च १७७९ ला जिंकलं. पाँडेचेरी तर त्यांनी ऑक्टोबर१७७८ मधे जिंकलं होतंच. माहे बंदर इंग्रजांकडे गेल्यामुळे हैदरला त्या बंदरातून फ्रेंच युध्दसामग्रीचा जो पुरवठा होत असे तो थांबला. हैदरने इंग्रजांविरुध्द नाना फडणीसांना सामील होण्याचं ते एक महत्वाचं कारण होतं. शिवाय इंग्रजी फौजा त्याचा प्रांत तुडवत गेल्या या कारणाने आणखी एक त्यात पेटती

काडी पडली. हैदरचं आणि महंमद अली या अर्काटच्या नबाबाचं वाकडं होतंच. त्या नबाबाला इंग्रजांनी आश्रय दिला हेही निमित्त इंग्रजांविरूध्द नाना फडणीसांना सामील होण्यात होतं. हैदर आणि इंग्रजांचं जे युध्द झालं होतं त्यावेळी झालेल्या कराराप्रमाणे इंग्रजांनी हैदरला मदत लागेल तेव्हा त्याच्या मदतीला जाण्याचं कलम घातलं होतं. पण इंग्रजांनी तो करार कधीही पाळला नव्हता. तोही राग हैदरला होताच.

हैदरने दिल्लीच्या बादशहाकडून कर्नाटकाची सनद आपल्या नावे करून घेतली म्हणून इंग्रज हैदरवर चिडले होते. तिकडे उत्तरेत अयोध्येचा नबाब इंग्रजांविरूध्द उठला आणि बादशहाची नेमणूक इंग्रजांनी रद्द केली. म्हणून दिल्लीचा बादशहाही इंग्रजांविरूध्द खवळला. होता होता,सारा भारत इंग्रजांविरूध्द असंतोषाने पेटला. नाना फडणीसांना उत्तरतील या कमकुवत सत्ताधीशांची इंग्रजांना हाकलण्यासाठी मदत होणार नव्हती. त्यांचा भर होता तो सारा हैदर आणि निजामावर. इंग्रजांनाही हैदर आणि नाना हेच बलवान शत्रू वाटत होते. निजामाचा निरोप आल्यावर १७७९ च्या मे-जून मधे ह्या कारस्थानाला सुरुवात झाली. नाना आणि महादजी शिंदे यांच्यात निजामाकडून आलेल्या प्रस्तावाची चर्चा झाली, मराठ्यांना हैदर आणि इंग्रज हे दोघेही त्यांच्या राज्याला छळणारे शत्रू होते, पण महादजींनी नानांना तूर्तास हैदरशी समझोता करू

असा सल्ला दिला.. त्याप्रमाणे नानांचे अत्यंत विश्वासू सातारचे कृष्णराव जोशी यांना नानांनी हैदरच्या दरबारी इंग्रजांविरूध्द लढण्याचा प्रस्ताव घेऊन पाठवलं. त्यावेळी हैदरच्या मुलाचं श्रीरंगपट्टणात लग्न होणार होतं. म्हणून हैदर त्या कार्यात दंग होता. कृष्णराव जोशी नाना फडणीसांचा प्रस्ताव घेऊन गेले तेव्हा श्रीनिवास बार्की त्यांच्या स्वागतासाठी आले. कृष्णरावांना किल्ल्याजवळच्या जागेत उतरवलं. मग दोन दिवसांनी त्यांना हैदरच्या भेटीसाठी नेण्यात आलं. हैदरने ख्याली खुशाली विचारून दोन चार दिवसांमधे बोलावू असं सांगून कृष्णरावांना निरोप दिला. आणि मग शांतपणे बोलणी झाली. करार झाले. काही कलमं हैदरला पसंत नव्हती ती बदलली आणि कारस्थान सजलं. पुणे आणि मैसूरमधे करार झाले तरी इंग्रजांना पुढचे सहा महिने त्याचा पत्ता लागला नव्हता इतक्या गुप्तपणे सगळं कारस्थान रचलं गेलं. दोघांच्यात जे करार झाले त्याप्रमाणे :- १. हैदरने तुंगभद्रेच्या खालचा सगळा प्रांत घ्यावा. पण मराठी मुलुखाला त्याने त्रास देऊ नये.

२. हैदरने अर्काट, त्रिचनापल्ली जिंकावी, मराठ्यांनी गुजराथ जिंकावी. आणि निजामाने शिकाकोल-राजमहेंद्री मिळवावं.

३..   जरुर पडल्यास पेशव्यांना हैदरने ५००० फौजेची मदत करावी.

४. राघोबादादा आणि त्याच्या सहकाऱ्यांना हैदरने आश्रय वा मदत देऊ नये.

५.. हैदरने चालू वर्षांची १५ लाख देण्याची तोड काढली आहे. त्याप्रमाणे ती द्यावी. पुढील वर्हांपासून १२ लाख खंडणी द्यावी.

६. मिळेल तो प्रदेश अर्धा अर्धा वाटून घ्यावा.

७. इंग्रजांशी तह एक विचाराने करावा.

८.. तंजावरला इंग्रज त्रास देतात, त्यांना हैदरने शह द्यावा. ते राज्य निर्वेध करावं.

९. रास्ते १००० स्वारांसह हैदरच्या मदतीला राहतील.

हा तह हैदर आणि पुणे दरबारात ९ ऑगस्ट १७७९ ला कायम झाला.

नाना फडणीसांनी आपल्या लोकांना सामील करून घेतलं नाही तर डच-फ्रेंच-पोर्तुगीजांनाही सामील करुन घेतलं. सर्व भारतभर मग युध्दाचा मोठाच कल्लोळ माजला. त्यातही अनेक रंग होते. पेशवे प्रबळ होणं कुणालाही नको होतं, हाही एक राजकारणाचा पदर यावेळी राजकारणाला होता. या लढाईत हैदरने

आपलं कर्तव्य चोख बजावलं. स्वराज्यात महादजी शिंदेही आपला कार्यभाग मनापासून राबवत होते. पण भोसले निष्क्रिय राहिले आणि निजामाने काहीही हालचाल केली नाही. जी केली ती फारच थंडपणे केली. मलबारच्या नायर लोकांना हैदर नको होता, म्हणून ते इंग्रजांना सामील झाले. इंग्रजांकडे वेगळंच राजकारण शिजत होतं. अर्काटच्या नबाबाने आणखी एक मगरूरपणा केला होता. त्याने आपला एक माणूस सरळ इंग्लंडला पाठवला आणि जे काही संबंध इंग्रजांशी ठेवायचे त्यात त्याने मद्रासकरांना वगळूनच टाकलं. आणि सरळ इंग्लंडशीच संपर्क ठेवला होता. त्या कराराला अनुसरून इंग्लंड सरकारने सर लिंडसे नावाचा एक अधिकारी अर्काटकराकडे पाठवला आणि मद्रासकरांना काहीही विचारलंच नाही. या नवीन घडामोडींमुळे मद्रासकरांची शक्ती क्षीण झाली. सर लिंडसे यांनी मद्रासकर. महंमद अलीला हैदरविरूध्द लढायला एक होण्यास सांगितलं.

पूर्वी १७७१ मधे पेशव्यांनी इंग्रजांविरूध्द एक होण्यास हैदरला बोलावलं, तेव्हा ही बातमी हैदरने इंग्रजांना कळवली होती. हैदरने इंग्रजांना सांगितलं की हैदर-मराठे एक झाले तर युध्द संपल्यावर मराठे प्रबळ होतील. त्यालाही धोका निर्माण होईल आणि हैदरला मद्रासच्या इंग्रजांनी नाकारलं तर त्याला फ्रेंचांची मदत घ्यावी लागेल. त्यावेळी अर्काटच्या नबाबाने इंग्रजांना घाबरवलं आणि

हैदर तुम्हाला घालवू पाहात आहे, त्यासाठी त्याने ही खेळी केली आहे, असं सांगितलं. मद्रासकर इंग्रज त्यामुळे हैदरकडे गेलेच नाहीत. हैदरने मग पाँडिचेरीचा फ्रेंच अधिकारी वेलकॉम्ब याच्याशी सलूख केला.

हैदर-इंग्रज संबंध विकोपाला जाण्याचं शेवटचं कारण ठरलं ते मद्रासचा गव्हर्नर थॉमस रॅम्बोल्ड याने श्वार्टझ् नावाचा एक मिशनरी हैदरकडे पाठवला तेव्हा. माहे बंदर घेतल्याबद्दलची आपली तीव्र नाराजी हैदरने कडक शब्दांमधे मद्रासला कळवली होती आणि परिणाम भोगायला तयार रहा असाही धमकीचा इशारा त्यात दिला होता. श्वार्टझ् हैदरला भेटायला आल्यावर हैदरने आपली मैत्री ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याला संबंध तणावाचे करायचे नव्हते हे त्याने स्पष्ट केलं. श्वार्टझ् रँबोल्ड निघतांना आजवर केलेल्या इंग्रजांच्या सर्व लबाड्यांचा पाढा त्याने त्याच्यासमोर वाचला. त्यात इंग्रजांनी केलेला मदतीचा करार, माहेचाही उल्लेख होता. पण मद्रासकरांनी त्याची बिलकुल दखल घेतली नाही. उलट आणखी एक फाजीलपणा असा केला की आणखी एक वकील पाठवून आपले इंग्रजी कैदी हैदरने मोकळे करावेत अशी मागणीही केली. तेव्हा हैदर संतापलाच संतापला. कारण हा वकील येण्याआधीच हैदरने हे कैदी मोकळे केलेले होते. हैदरने या वकीलाचा चांगलाच समाचार घेतला. त्याचा भरपूर अपमान केला

आणि त्याला हाकलून लावलं. तो निघाला तेव्हा त्याला " तू हेरगिरी करायला आलेला आहेस असंही सुनावलं.

## हैदर विरुद्ध इंग्रज इ.स. १७७९

आता हैदरने इंग्रजांशी कसा लढा दिला ते पाहायचं आहे. हैदरने इंग्रजांशी लढायचं ठरवलं तेव्हा फ्रेंचांनी त्याला मदत करायला होकार दिला. इंग्रजांना हा मोठाच धक्का होता. श्रीरंगपट्टण, मैसूरची भक्कम मजबूती करून बंगलोरमधे त्याने मोठी फौज गुप्तपणे जमवली. हैदरने 83000 फौज उभी केली. सावनूर नबाबाची २००० फौज, १५००० कवायती फौज, १२००० पायदळ, १८००० इतरांकडून मिळालेली फौज, १०००० पाळेगारांकडून मिळालेली फौज, १४००० हुजरातीचं घोडदळ, १२००० बारगीर, अशी प्रचंड फौज तयार केली. त्याचं हेरखातंही उत्कृष्ट होतंच. हैदरचा विश्वासू दिवाण पुर्णैय्याच्या हाताखाली तोफखाना सज्ज होता.

एवढी मोठी फौज घेऊन हैदर अचानक इंग्रजांवर कोसळला. ते साल होतं १७८०. अर्काटचा नबाब महंमदअलीने इंग्रजांना या छाप्याची आगाऊ बातमी दली होती, पण ढिसाळ इंग्रजांनी त्याकडे लक्षच दिलं नव्हतं. नबाबाने स्वत:सुध्दा काहीही तयारी केली नव्हती. हैदर मद्रासपासून ९ मैलांवर येऊन उभा राहिला आणि त्यांचे गाव जाळायला लागला तेव्हा त्यांना जाग आली. ह्या

वादळाला रोखण्यासाठी मग त्यांची धावपळ सुरू झाली. हैदरची रणनीती वेगळी होती. इंग्रजांना बंगालहून मदत मिळू नये म्हणून सेंट जॉर्ज किल्ला बाजूला ठेवायचा. पाँडेचेरी, पुलकेत लेक एवढा प्रदेश ताब्यात घ्यायचा आणि इंग्रजांची रसद बंद करायची. पाँडेचेरीच्या फ्रेंचांची मदत त्याला मिळणारच होती. हैदरच्या येण्याने हादरलेले इंग्रज मागे सरले आणि गुंटुरहून कर्नल हार्परच्या फौजेची बचावासाठी वाट पहायला लागले. कर्नल ब्रेथवेटला पाँडेचेरीहून चिंगलपेट मार्गाने बोलावून घेण्यात आलं. त्रिचनापल्लीची फौजही मद्रासकडे निघाली. अर्काट नबाब महंमदअलीच्या विश्वासघातकी स्वभावाचा इंग्रजांना आता चांगलाच अनुभव आला. त्याच्यावर विश्वास न ठेवण्याचं त्यांनी ठरवलं. जिंजी, वाँदिवॉश ही ठिकाणं त्यांनी ताब्यात घ्यायचं ठरवलं. ले. पार याला कर्नाटकगृह घ्यायला पाठवलं. तो आपल्या चेहऱ्याला काळा रंग लावून गावकऱ्यांच्या पोशाखात आड वाटेने चालत कर्नाटकगृह किल्ल्याकडे निघाला. त्याच्या जवळपास हैदरची फौज होती, त्यामुळे हैदरला चुकवत तो कर्नाटकगृहला पोचला, तेव्हा त्याचे पाय रक्ताने भरलेले होते, सुजलेले होते, आणि दाढी वाढलेली होती. पण पारला दिलेली कामगिरी त्याने पार पाडली होती. त्यांच्या सेनापती फ्लींट याने फक्त वाँदिवॉश जिंकून घेतलं. फ्लींट फौज घेऊन वांदिवॉशला पोचला. तिथे

महमंदअलीचा किल्लेदार रक्षणासाठी नेमलेला होता. फ्लींटला या किल्लेदाराने अडवलं आणि किल्ला ताब्यात द्यायला नकार दिला. तेव्हा फ्लींटने आपण महंमदअलीकडून तुमच्यासाठी एक महत्त्वाच पत्र द्यायला आलो आहोत असं खोटंच सांगून भेटीची निकड दाखवली आणि किल्ल्यात प्रवेश मिळवला. त्यासाठी चारच माणसं बरोबर घेऊन या असा किल्लेदाराने निरोप दिला. फ्लींट किल्ल्याच्या प्रवेशदारातून आत शिरला तेव्हा किल्लेदार आपल्या फौजेच्या गराड्यात सुरक्षितपणे, जाजमावर बसला होता. त्याच्यासमोर उभं राहिल्यावर फ्लींटने आपल्याकडे पत्र वगैरे काही नाही, पण अत्यंत निकडीचा निरोप आहे असं सांगितलं आणि किल्ला ताब्यात द्यायला सांगितलं. तेव्हा किल्लेदाराने फ्लींटला आलास तसा निघून जा असा हुकूम दिला आणि तो जायला उठला. त्याबरोबर फ्लींट चपळाईने पुढे झाला आणि त्याने किल्लेदाराला पकडून त्याच्या सैनिकांना धमकावलं आणि जर गडबड केलीत तर याला उडवू असा दम भरला. तिथे जमलेल्या जमावाला, आणि  किल्लेदार आणि सैनिकांना उद्देशून खरी परिस्थिती समजावली. आणि किल्ला ताब्यात घेऊन किल्लेदाराच्याच हवाली केला. पण तो किल्ला इंग्रजांच्या हुकूमाखाली आला.


हैदर बारामहाला, चंगमवरून फौज घेऊन आला आणि आपला दुसरा मुलगा करीम याला फौज देऊन पोर्टो नोव्होवर हल्ला करायला पाठवलं. हैदर स्वत: अर्काटवर वेढा घालायला गेला. पण २९ ऑगस्टला सर मनरो फौज घेऊन येतोय हे कळल्यावर त्याने वेढा उठवला आणि त्याच्यावर नजर ठेवायला गेला. मनरो कांजीवरम्ला पोचला. पण तिथे त्याला दाणागोटा, रसद काहीच मिळाली नाही म्हणून तो गुंटुरहून निघालेल्या कर्नल बेलीची वाट पहात थांबला. कर्नल बेली वाटेत कोर्तुलर नदीच्या दक्षिण तीरावर थांबला. त्याने नदी न ओलांडण्याची मोठीच चूक केली कारण त्याच रात्री धोधो पावसामुळे नदीला पूर आल्याने त्यात अडकला. तिथे त्याचे ८ दिवस मोडले.

कर्नल बेली फौज घेऊन मनरोला भेटण्याआधी त्याला गाठून उधळून लावावं म्हणून हैदरने टिपूला फौज देऊन पाठवलं. ६ सप्टेंबरला हैदरने टिपूला पेरांबक्कम्ला पाठवलं. आणि स्वत: कांजीवरम्जवळ मनरोची वाट पाहात थांबला. टिपूने वाटेत बेलीला गाठून हल्ला केला पण बेलीने तो परतवून लावला. बेलीची ही हकीकत कळल्यावर मनरोने कर्नल फ्लेचरच्या हाताखाली बेलीच्या मदतीसाठी फौज पाठवली. फ्लेचरच्या वाटाड्यांना हैदरने पैसे चारले होते, म्हणून ते वाटाडे फ्लेचरला चुकीच्या मार्गाने नेत होते. पण फ्लेचरही कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तो बेलीला

जाऊन मिळालाच. त्याच रात्री बेलीने कूच करायचं ठरवलं. अर्धा मैल पुढे सरकला. टिपू त्याच्या मागावर होताच. पेरांबक्कम् सोडून रात्री बेलीच फौज चालायला लागली. तो फार दूर, मैलभर गेलाही नव्हता, इतक्यात त्याच्या फौजेवर पाठीमागून टिपूने सोडलेले तोफांचे गोळे धडाधड अंगावर पडायला लागले. त्या तोफा ताब्यात घेण्याचा इंग्रजी फौजेचा प्रयत्न साफ फसला. सैन्याची गाळण उडाली. शिपाई जमिनीवर पडायला लागले. चिखल आणि वाईट रस्ते यामुळे बेली काहीही करू शकला नाही. फ्लेचरने बेलीला रात्री मुक्काम करू नकोस असं सांगितलं तरी त्या रात्री बेली पेरांबक्कम्ला मुक्काम करून राहिला. त्या अवधीत टिपूने आपल्या तोफा बेलीच्या जाण्याच्या पुढच्या मार्गावर रचल्या. तेवढ्या अवधीत हैदरही आपलं घोडदळ घेऊन बेलीपर्यंत पोचला.

१० सप्टेंबरला बेलीची इंग्रज फौज परत चालायला लागली. फौज २ मैलसुध्दा गेली नसेल इतक्यात हैदर राक्षसासारखा त्याच्यापुढे येऊन उभा राहिला. हैदरने त्याच्या पुढच्या आणि मागच्याबाजूने तोफांचा मारा सुरू केला. इंग्रजांच्या फौजेची दोन्हीकडची तोंडं हैदरच्या घोडदळामुळे बंद झाली. त्यांनी हैदरच्या तोफा ताब्यात घेण्याचा क्षीण प्रयत्न केला तोही फसला. इंग्रजांची फौजेची गाळण उडाली. पण लगेच इंग्रजी फौज सावरली आणि त्यांनी इतका जोरदार प्रतिहल्ला केला की एकवेळ अशी आली की

हैदरलाच स्वत:चा पराभव समोर दिसायला लागला. इंग्रजांच्या फौजेतल्या रॅमले आणि गौडी या सेनापतींनी टिपूच्या तोफा बळकावायचा प्रयत्न केला. पण बाकी फौजेत पळापळ सुरू झाली. हैदरवरही या प्रतिहल्ल्याने परत फिरायची वेळ आली. पण हैदरबरोबर असलेल्या फ्रेंच अधिकारी लॅलीने त्याला सावरलं.




***पल्लालुर युध्द.***

ह्या फौजेच्या मदतीला कदाचित मन्रो येईल आणि आपल्याला मन्रोसुध्दा सापडेल असा धीर दिला. तोपर्यंत टिपूने आपल्या तोफा परत गोळा केल्या. याचवेळी बेलीचा दारुगोळा

संपत आला. हैदरच्या गोटात ही बातमी पोचल्याबरोबर हैदरने आपली मुख्य फळी घेऊन इंग्रजांवर जोरदार हल्ला चढवला. बेली स्वत: लढाईत जखमी झाला आणि शरण आला पण त्याच्या गोटातल्या इतरांनी लढा चालूच ठेवला. शरणागतांना जेव्हा शस्त्र खाली ठेवण्याचं सांगण्यात आलं, तेव्हा शरणागती नाकारणाऱ्या इंग्रजी फौजेतल्या शिपायांनी हैदरवर अचानक हल्ला केला.

या लढाईत ७०० युरोपियन्स मेले. ४००० इंग्रज कैदेत पडले. बेलीही त्यात होता. हैदरचे ५००० शिपाई मेले. ही लढाई इतकी भयंकर झाली आणि हैदरचा विजय एवढा मोठा होता की त्याने आनंदाच्या उधाणात तिथल्या तिथे फौजेला बक्षीसं वाटली. मेलेल्यांची मुंडकी पाहून तो अतोनात खूष झाला. हैदरने श्रीरंगपट्टणला गेल्यावर ह्या प्रसंगावर एक भव्य चित्र काढून दौलत गार्डनमधे ठेवले. हैदर या लढाईनंतर परत अर्काटला वेढा घालायला गेला. मनरो कडलूरला वेढा घालायला गेला. त्याला वाटभर हैदरने हल्ले करून भरपूर दमवलं. मन्रो कडलूरला पोचला पण रसद नाही, दाणागोटा नाही म्हणून ४ महिने अडकून पडला. मनरो तिथून चिदंबरम्कडे गेला. हैदर त्याच्या मागे कडलूर आणि चिंदबरम्च्यामध हल्ला करण्यासाठी थांबून राहिला. यानंतर मनरोची निराशजनक कामगिरी पाहून मन्रोला मद्रास गव्हर्नरकडून परत बोलावण्यात आलं. १० सप्टेंबरला पोलिलूरजवळ झालेल्या

या लढाईत ब्रिटीशांची नाचक्की तर झालीच पण नुकसानही मोठं झालं. त्याचवेळी भारतातील सूत्रं वॉरन हेस्टिंग्जच्या हाती गेली होती. सर आयर कूट हा भारतात आला होता. हेस्टिंग्जने आग्रहाने त्याला मद्रासला परिस्थिती सुधरवायला पाठवलं. सर आयर कूट हा महासेनानी त्याआधी भारतात क्लाईव्हच्या काळात इ. स. 1757 मधे आला होता. भारतीय युध्दाशी तो चांगलाच परिचित होता. कलकत्याच्या लढाईत हा क्लाईव्हबरोबर होता. इ. स. 1759 मधे फोर्ट विलियम कुणी घ्यायचं यावरून क्लाईव्ह आणि त्याच्यात जोरदार खडाजंगी झाली आणि दोघांनी आपल्या बंदुका काढेपर्यंत मजल गेली. या पर्यवसनानंतर ते दोघे कायमच एकमेकांचे शत्रू झाले होते. असा हा कूट फ्रेंचांना हरवून वाँदिवॉश मिळवून देणारा मातब्बर सेनानीही होता. नोव्हेंबरमधे 1779मधे सर आयर कूट मद्रासला पोचला तेव्हा हैदरने अर्काटला वेढा घातला होता. फ्रेंचांच्या मदतीने अर्काट किल्ल्याला दोन भगदाड पाडली होती. आणि किल्ला जिंकला होता. तोपर्यंत आयर कूटने करांगुली हा किल्ला जिंकून घेतला. आयर कूटने लगेच फौज घेऊन वाँदिवाशला फ्लींटला जाऊन मिळायला कूच केलं. पण तेवढ्यात त्याच्या लक्षात आलं की फ्रेंचांनी त्याची रसद अडवली आहे. ती मिळवायला चालायला लागला आणि कडलूरला पोचेपर्यंत हैदरच्या फौजेने त्याला भंडावून सोडलं. चार महिने तो अडकून

पडला. त्याला रसदही मिळेना. त्याच्या फौजेचे भयंकर हाल झाले. थोड्याच दिवसांनी एडवर्ड ह्यू त्याला येऊन मिळाला. दोघांनी कडलूर जिंकलं आणि त्यांनी चिदंबरम्वर हल्ला करायचं ठरवलं. तेही त्यांनी जिंकून घेतलं. यानंतर आयर कूट पोर्टो नोव्होच्या दिशेने निघाला.

हैदरला लगेच ही बातमी कळली. तो 2 दिवसात 100 मैल पार करायचं साहस करून कूटच्या वाटेवर जाऊन गुडलूरजवळ थांबला. कूट हैदरशी लढायला आला. कूट आणि हैदरमधे जोरदार लढाई झाली. हैदरचं यावेळी प्रचंड नुकसान झालं. हैदरने मग आपल्या फौजेला तुटून पडण्याचा हुकूम दिला तेव्हा प्रचंड धुमश्चक्रीत हैदरही अडकला. त्याचा डोक्यावरचा फेटाच लढाईत खाली पडला. हैदरचं फार मोठं नुकसान झालं. त्याचे 10,000 लोक या लढाईत मेले. इ. स. 1781 च्या 1 जुलैला ही अतिशय भीषण लढाई झाली. गुडलुरची लढाई हैदर सपशेल हरला. आता कूटला हैदरने बंद करून ठेवलेला पुलिकेत लेक ते पाँडेचेरी मार्ग आता मोकळा करायचा होता. कूटने हैदर पोचण्यापूर्वीच थिरुपत्तूर जिंकून घेतलं होतं. पोर्तुगालची  समुद्र मार्गाने येणारी इंग्रजी मदत अडवण्याचा हैदरने खूप प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही.

सर आयर कूट थिरुपत्तूरच्या स्वारीवर असतांना हैदरने तंजावरवर एवढा प्रचंड हल्ला चढवला आणि प्रदेश बेचिराख केला की जवळजवळ सर्व प्रदेश हलाखीच्या संकटात सापडला. तंजावरचं आर्थिक बळ इतकं गडगडलं की त्या नुकसानीतून बाहेर यायला पुढची 15/20 वर्षं जावी लागली. ऑगस्टमधे सर आयर कूट मागील वर्षी बेलीने मार खालेल्या ठिकाणी म्हणजे पॉलिलुरला आला. त्याला हैदर सामोरा गेला. हैदरने इंग्रजी फौजेवर तुफानी गोळे चालवले. पण या लढाईत जयविजय कुणाचाच झाला नाही. दोघांनाही सारखाच तोटा झाला. आयर कूटला या मोहिमेमुळे मनासारखं यश मिळालं नाही म्हणून त्याने आपण होऊन आपली जबाबदारी सोडायची तयारी केली. कलकत्याला हेस्टिंग्ज जाऊन लॉर्ड मॅकर्टन आला होता. पण लॉर्ड मॅकर्टनने कूटला आपलं पद सोडू दिलं नाही. वेल्लोर सोडवेपर्यंत थांबा असे त्याने कूटला सांगितले. मग फौज घेऊन कूट वेल्लोरकडे गेला. हैदरने आता वेल्लोरला वेढा घातला होता. वेल्लोरजवळ शोलिंगरला कूट जवळ येइपर्यंत हैदरला त्याचा पत्ताच नव्हता. हैदरची फौज तळावर आराम करत होती. बैल चरायला गेले होते. माणसं पांगली होती. कूटचा हल्ला येतोय कळल्यावर धावाधाव झाली. चरणीला गेलेले बैल माघारी ओढून आणले आणि गाड्यांना बांधले गेले. त्यावर तोफा चढवल्या गेल्या. समोर येऊन ठेपलेल्या इंग्रजी फौजेवर

हैदरने तोफा सुरू केल्या. इंग्रजांच्या फौजेची पहिली फळी मोडली. पण हैदरच्या तोफा नीट चालल्याच नाही. हैदरला वेल्लोरवर माघार घ्यावी लागली. कूटने मग किल्ला हाती घेतला आणि तिथे शिबंदीची व्यवस्था केली. वेल्लोरमधे आल्यावर कूटला कळलं की वेल्लोरमधे अन्नपाण्याचं दुर्भिक्ष आहे. तो मग दाणागोटा मिळवायला चित्तूरला गेला. पण हैदरने जवळपासचा सर्व प्रदेश बेचिराख करुन टाकला होता. त्यामुळे तिथेही कूटला धान्य मिळालं नाही.फक्त 6 आठवडे पुरेल इतकाच दाणागोटा कूटला तिथे मिळाला. त्यानंतर आयर कूट मद्रासला गेला. त्याला खरं तर बंगालला जायचं होतं. पण जमलं नव्हतं.

आणखी एक महत्त्वाची लढाई हैदर आणि इंग्रजांमधे झाली. लॉर्ड मॅकर्टनला इंग्लंडहून हुकूम आला की त्याने नेगापट्टण हे डच लोकांचं ठाणं जिंकून घ्यावं. हैदरने ही संधी सोडली नाहीच. त्याने लगेच डच लोकांची बाजू घेतली आणि त्यांना डच गव्हर्नरला, इंग्रजांचा नागूर परगणा मी तुम्हाला जिंकून देतो असं कबूल केलं. पण इंग्रजांनी हैदरचं काही चालू दिलं नाही. इ. स. 1781च्या ऑक्टोबरच्या अखेरीला 3 आठवड्यांच्या वेढ्यानंतर नेगापट्टण पडलं आणि इंग्रजांच्या हाती आलं. पण थोड्याच काळासाठी इंग्रजांकडे नेगापट्टण राहिलं. कारण हैदरचा मुलगा टिपू परत जोरदार तयारी करुन आला आणि फेब्रुवारी 1782 टिपूने नेगापट्टण जिंकून

ब्रेथवेटचा पराभव करुन त्याला कैद केलं. त्याचे 2000 लोक टिपूने पकडले. नोव्हेंबरनंतर पूर्व किनाऱ्यावरच्या पावसाळयामुळे लढाया परत थांबल्या. आणि जानेवारीत सुरू झाल्या. या सर्व लढाईत हैदरच्या बाजूने ना स्थानिक पाळेगार, देसाई होते, ना मराठे-निजाम, ना फ्रेंच. पाँडेचेरी पडल्यावर फ्रेंचांची पूर्व किनाऱ्यावरून गच्छंती झालेली होती.

जानेवारीत सर आयर कूट परत वेल्लोरच्या बंदोबस्तासाठी निघाला. तिथे दाणागोट्याचा साठा, शिबंदी ठेवण्यासाठी तो निघालाय ही बातमी हैदरला कळल्यावर त्याने इंग्रजी फौजेचा पाठलाग केला. त्रिपसूरला दोन्ही फौजांच्या चकमकी झाल्या पण त्या जुजबी होत्या. आयर कूटने शिबंदी व्यवस्थितपणे वेल्लोर किल्ल्यात पोचवली. हैदरला काही करता आलं नाही. या लढाया सुरू असतांना हैदरला मलबारकडून नायर लोकांनी बंडावा चालू केल्याच्या बातम्या यायला लागल्या. तेलिचेरीला त्याने आपली फौज ठेवली होती, त्यावर बंडखोरांनी हल्ला करून त्यांया तोफाही हिसकावून घेतल्या होत्या. हैदर मलबारवर निघाला असतांनाच त्याला १० मार्च रोजी फ्रेंच फौजा पोर्टो नोव्हाला पोचल्याची खबर मिळाली. पण त्यांची संख्या खूपच कमी होती. त्याती इंग्रजांनी या फ्रेंचांना अडकवून ठेवलं होतं. फ्रेंचांनाही इंग्रजांशी लढत लढतच यावं लागलं. हैदरने त्यांच्या स्वागतासाठी टिपू सुलतानला

पाठवलं. तो स्वत:ही अर्काटहून निघाला. फ्रेंच सेनापती सॉंफ्रॉं याच्याशी भेट झाली. त्यावेळी जी रणनीती आखली गेली त्यात कडलूर परत जिंकायचं एवढं ठरलं. त्याप्रमाणे फ्रेंचांनी कडलूर जिंकून घेतलं. या ज्या लढाया झाल्या त्या निर्णायक झाल्या नाहीत..सेनापती सर आयर कूटलाही आपल्या फौजा लांब असतांना फ्रेंचाँशी लढण्याची जोखीम घ्यायची नव्हती.

## अरणीची लढाई – २ जून १७८२.


कूटने मग वेगळीच रणनीती आखली. घाटाखाली अरणी या ठिकाणी हैदरचा शस्त्रसाठा, युध्दसामग्री भरपूर प्रमाणात साठवून ठेवली होती. अरणीच्या रक्षणासाठी फौजही हैदरनेचीच ठेवली होती. या ठिकाणावर हल्ला केला की भरपूर लूट मिळेल आणि फ्रेंच अधिकारी लॅलीही बाहेर येईल या विचाराने कूटने अरणीकडे फौज वळवली. हैदरला ही बातमी मिळाल्याबरोबर तो चमकला आणि टिपूला त्याने अरणीवर पाठवलं. तोही स्वत: मोठी फौज घेऊन अरणीवर निघाला. आणि अरणी नदीवर येऊन थांबला. यावेळी जून महिना सुरू झाला होता.

आयर कूट 2 जून 1782 या रोजी अरणी किल्ल्याजवळ पोचला. टिपू आणि लॅलीने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. आयर कूटही जोरदार लढत द्यायला लागला. पण तेवढ्यात हैदरने कूटच्या पिछाडीवरून तोफा चालू करेल्या. आणि पुढच्या बाजूने टिपू सुलतान आयर कूटला भाजून काढायला लागला. तेव्हा इंग्रजी फौजांनी तोंड वळवून हैदरवर हल्ला चढवला. हैदरने तात्पुरती माघार घेतली पण ती त्याची एक खेळी होती. हैदर मागे सरकला

तेव्हा तो माघारी गेला अशीच आयर कूटची समजूत झाली. म्हणून 4 जूनला तो परत अरणी किल्ला घ्यायला आला तर हैदर आणि हैदरच्या फौजा तिथेच होत्या. शेवटी कूटला मद्रासलाच परत जावं लागलं. अरणिचा विजय घेऊन हैदर आणि टिपू अर्काटला परतले. पावसाळ्याला सुरुवात झाली होती. हैदरने मग युध्द थांबवून चित्तूरला तळ ठोकला. चित्तूरजवळच्या नरसिंगरायनपेटजवळ हैदरने आपली छावणी केली आणि पावसाळाभर तिथेच विश्रांतीला राहिला.मराठे, निजाम आणि हैदर यांच्या या इंग्रजांविरूध्द झालेल्या सगळया उठावात हैदरने अत्यंत उद्विग्नपणे आपला विश्वासू मंत्री पुर्णैयाकडे आपली व्यथा उघड करत म्हटलं,

''मी एक मोठी घोडचूक केली. एक लाख रुपयाला शिंदी दारू विकत घेतल्यासारखा मूर्खपणा केला. माझ्यात आणि इंग्रजांमधे अर्काटच्या महंमद अलीवरून नाराजी होती. पण मी महंमदअलीला सहन करायला हवं होतं. अनेक युध्द खेळण्याइतका बेबनाव आमच्यात नको होता. **अनेक ब्रेथवेट आणि बेली यांचा पराभव करूनही हे इंग्रज संपणार नाहीत, मी ही भूमी ओसाड-रुक्ष करून टाकू शकेन पण समुद्र संपवू शकणार नाही हे मला कळायला हवं होतं.** मराठा लोक विश्वास ठेवण्यासारखे नाहीत आणि ते स्वत:ला तसं समजतही नाहीत हे

मला कळायला हवं होतं. फ्रेंचांची अपेक्षा करणं हेही चुकीचंच झालं.”



हैदरचा पूर्वेकडचा शह कमी करण्यासाठी जानेवारी 1782 मधे हैदरला शह द्यायला इंग्रजांनी मलबारवर ॲबिन्गटन नावाच्या कमांडिंग ऑफीसरला मलबारवर फौज घेऊन पाठवलं. हम्बरस्टोनही त्याला मिळाला. त्याने तेलिचेरीच्या सरदारखानला जिंकून घेतलं सरदारखान आणि त्याचे 1200 शिपाई कैद झाले. ही मानहानी सरदारखानला सहन न होऊन त्याने आत्महत्या केली. हैदरकडे ही बातमी पोचली. पुढच्या दोन तीन महिन्यांमधे इंग्रजांनी कालिकतही जिंकलं. लहानसहान किल्ले जिंकून घेतले. ही बातमी कळल्यावर हैदरने मकदूमअलीबरोबर फौजा पाठवल्या पण मकदूमअलीही मारला गेला. सर्वात वाईट बातमी हैदरला कळली ती म्हणजे इंग्रजांनी फ्रेंचांचं माहे बंदर जिंकलं होतं. फ्रेंचांचा पराभव होणं आणि माहे बंदर जाणं म्हणजे हैदरला फ्रेंचांकडून होणार युध्दसामग्रीचा पुरवठा बंद होणं हे होतं. हैदरला ही निराशजनक बातमी कळल्यावर त्याने टिपूला पाठवण्याची योजना केली. हैदरचे इतर अधिकारी मलबार सांभाळायची आणी इंग्रजांशी लढण्याची प्राणपणाने धडपड करत होते. कालिकत, पालघाट, माहे पडलं हे कळल्यावर टिपूशिवाय मोठा योध्दा कुणीच नव्हता.

# टिपू सुलतान मलबारवर – नोव्हेंबर १७८२.

नोव्हेंबरमधे हैदरची आज्ञा घेऊन टिपू लांब लांब मजली मारत मलबारवर पोचला. त्याच्या इंग्रजी फौजेशी झुंजी चालू झाल्या. टिपूने पोन्नाणी नदीवर इंग्रजी फौजांची कोंडी केली. पण इंग्रजी फौजांनी उतार शोधून पुरुषभर उंचीच्या त्या प्रवाहातून वाट काढत रात्रभरात नदी ओलांडली आणि पोन्नाणि गावात आसरा घेतला. आता ते सुरक्षित होते, कारण त्यांचच्या एका बाजूला समुद्र, दुसरीकडे पाण्याने भरलेली नदी आणि समोर जंगल आणि पाणथळ जागा होती. टिपू ही हार मानायला तयार नव्हता. त्याने जंगलात शिरून त्यांच्यावर तोफा चालू करायचा बेत केला होता. लॅली त्याच्याबरोबर होताच.आणि एक दिवस टिपूचा शामियाना रिकामा झाला.

# झंझावाती वादळ शमलं. 7 डिसेंबर 1782.

हैदर चित्तूरच्याजवळ नरसिंगरायनपेटला पावसाळ्यात विश्रांती घेत असतांना नोव्हेंबरमधे मानेला गळू झालं. कडलूरहून आलेला फ्रेंच आणि हिंदुस्थानी वैद्यांनी त्याला तपासलं. मानेजवळचं गळू खूपच मोठं होतं. त्याला पाठीच्या मणक्यात कर्करोग झाला होता. मानेजवळ सूज आली. सततच्या लढायांनी तो अतिशय थकून गेला होता. उमरही साठीची झालेली होती. हैदरची प्रकृती खालावायला लागली. हैदरला आपल्या आजाराचा अंदाज आला. त्याने महामिर्झाखानला टिपूला आपल्याजवळ बोलावून घेण्याचं पत्र देऊन त्याला ताबडतोब घेऊन यायला सांगितलं. त्यावेळी त्याच्याजवळ त्याचे विश्वासू पुर्णैय्या आणि कृष्णराव हे दोन मंत्री होते. हैदरवर उपचार सुरू झाले. **पण 7 डिसेंबर 1782 या दिवशी हैदरची प्राणज्योत मालवली**. त्या दिवशीच दुपारी हैदरने आपल्या सर्व विश्वासू दरबाऱ्यांना टिपूला गादीवर बसवण्याची आणि त्याला पूर्ण विश्वासाने साथ देण्याची इच्छा प्रगट केली होती. सर्वांनी त्याच्या इच्छेला मान दिला. फौजेने दंगा करू नये म्हणून पुर्णैय्या आणि कृष्णराव या दोघांनी हैदरच्या मृत्यूची बातमी गुप्त ठेवली. फौजेचे व्यवहार नित्य नेमाने चालू

ठेवले. फौजेचा पगार वेळेवर दिला जात होता. बाहेर देशातून आलेल्या लोकांना, हैदर खूप आजारी असल्याने त्याला बोलण्याची शक्ती नाही आहे असं सांगून परत पाठवलं जात होतं. सगळीकडे पत्रव्यवहारही दोन्ही मंत्र्यांनी नेहमीसारखा चालू ठेवला होता. त्यामुळे हैदर खूप आजारी आहे आणि जिवंत आहे एवढीच कल्पना तळावरच्या फौजेत होती. हैदरच्या मृत्यूची कुणाला शंकाही आली नाही.

टिपूला त्वरेने बोलवून घेण्यासाठी सांडणीस्वार पाठवले. तोपर्यंत हैदरच्या शवावर संस्कार करून ठेवले. त्याची शवपेटिका कपाटासारखी दिसणारी करून घेतली आणि त्यात देह ठेवला, त्यात अबीर ठेवला. सुगंधी द्रव्ये ठेवली. त्यात दागिनेही ठेवले. ज्या लोकांनी हैदरचं शव पेटीत ठेवलं, त्यांना वेगवेगळया दारांनी बाहेर काढलं गेलं आणि लगेच कैद करुन वेगवेगळया तुरुंगात अडकवलं गेलं. बाहेरच्या जगालाच काय पण त्या मजूरांनाही आपण सगळे कैदेत पडलो आहोत हे कळलं नाही. त्यामुळे बातमी फुटली नाही. लुटीत जे सामान गोळा होतं त्याच ठिकाणी ते कपाट ठेवलं. फक्त काही विश्वासू अधिकाऱ्यांनाच ही बातमी सांगितली. लुटीचं सामान प्रथेप्रमाणे श्रीरंगपट्टणाला निघालं. तेव्हा ते कपाटही निघालं. त्या फौजेत काही विश्वासू लोक गेले. त्यांना ते " कपाट " कोलारला उतरवण्याची सूचना दिली गेली. कोलारला हैदरच्या

वडिलांच्या कबरीशेजारी हैदरचं दफन होणार होतं. हैदरची ही शवपेटिका फत्तेअलीच्या कबरीशेजारी दफन केली गेली.

टिपूला बातमी देण्यासाठी 11 डिसेंबरला महामिर्झाखानबरोबर माणसं पाठवली गेली. टिपू सुलतान लगेच चित्तूरला निघाला. आधी तो कोईमतूरला गेला. सईद महंमद महदवीला फौज सांभाळायला सांगितलं. अर्शद अली बेगवर मलबार सांभाळून ठेवण्याची जबाबदारी सोपवली. मग लांब लांब मजली मारत चित्तूरकडे निघाला. 21 डिसेंबरला टिपूला भेटायला पुर्णैया आणि सारे दरबारी नरसिंगरायनपेट सोडून कूच करून गेले. पेन्नार नदीच्या काठावर असलेल्या चिकमलूर गावात दोन्ही फौजा एकमेकांना भेटल्या. या गावाची निवड करण्याचं कारण म्हणजे यदाकदाचित जर हैदरचा परलोकवास फौजेला कळला आणि त्यांनी बंड केलं, उठाव केला तर फ्रेंचांची फौज जवळच होती. ती मदतीला येणार होती. चिकमलूरला जातांनाही एक रिकामी पालखी पडदे ओढून चालली होती. त्याच्या आत " हैदर " आराम करत आहे असं सगितलं जात होतं. तेही नाटक पूर्णपणे वठवलं जात होतं. चिकमलूरला टिपू फौजेत दाखल झाला.

28 डिसेंबरला टिपूने छावणीत साधेपणाने प्रवेश केला. हैदरच्या मसनदीवर न बसता खाली गालिचावर बसून सर्वांच्या

भेटी घेतल्या. 29 तारखेला सर्वांच्या सांत्वनपर भेटी घेतल्या. दिवसभर महत्वाच्या मंत्र्यांशी बोलणी केली आणि रात्री 9 वाजता सत्ताग्रहणाचा समारंभ झाला. नबाब टिपू सुलतान बहादूर या बिरुदावलीने त्याने सत्ताग्रहण केलं. 121 तोफांची सलामी दिली गेली. लगेच फ्रेंचांनी 21 तोफांची सलामी दिली. टिपूच्या सत्ताग्रहणातसुध्दा एक छोटसं नाट्य घडलं. हैदरच्या महंमद अमीन नावाच्या चुलत भावाने फ्रेंचांच्या एका सरदाराला आपल्याकडे वळवून घेतलं. हा भाऊ 4000 घोडदळाचा मुख्य होता. त्याने शमसुद्दीन बक्षीलाही सामील करुन घेतलं. दोघांनी टिपूचा धाकटा भाऊ करीम याला राज्य देण्याचं ठरवलं. करीमला गादीवर बसवून स्वत: कारभार करण्याचं त्याचं स्वप्न होतं. पण हा कट पुर्णैयाच्या कानावर गेला. त्याने त्या फ्रेंच अधिकाऱ्याला बोलावून शहानिशा केली. आणि सल्ला मसलत करण्याचं निमित्त सांगून बक्षी आणि हैदरच्या भावाला बोलावून घेतलं. त्यांनी आपल्या कटाची कबुली दिल्यावर साखळदंडाने बांधून त्यांची छावणीतून मिरवणूक काढत गजाआड केलं. अशा तऱ्हेने एक बंड मोडून काढलं. आणि हे बंड करणाऱ्यांना हैदरच्या सल्ल्यानेच शिक्षा दिली जात आहे असं भासवलं.


युध्द म्हणजे युध्दासारखंच युध्द खेळणारा, दयामाया न दाखवत युध्द खेळणारा हैदर. राजकारण म्हणजे राजकारणासारखं

साम-दाम-दंड-भेद वापरून खेळणारा हैदर. स्वत:च्या बुध्दिमत्तेवर, राजकीय नैपुण्यावर अचाट क्षमतेवर, राजकारणात शिरला, वर चढला, यशस्वी झाला तो हैदर. इंग्रजांसारख्या ताकदवान शत्रूशी लढत जीवनाच्या अखेरीला रणांगणावरच  मातीत मिळाला तो हैदर.  सत्तेच्या साप-शिडीच्या खेळात अनेकवेळा हैदर खालच्या स्थानावर घसरला पण हताश झाला नाही, खचलाही नाही. उलट दुप्पट त्वेषाने उसळला. बेबंदपणे लढत परत वर चढला. वोडियारांच्या मैसूरचा विस्तार करत राहिला. **वोडियारांच्या मैसूरला संपन्न करत राहिला. मैसूरसाठीच जगला. मैसूरमधेच जगला आणि मैसूरसाठीच आयुष्य दिलं. एक झंजावाती वादळ शांत झालं.**


**दक्षिणेतील राजपटावर एक प्यादं वजीर बनलं होतं ते काळाच्या संदूकीत जाऊन बसलं.**

**हैदरनाईक. नबाबबहादूर हैदर नाईक.. अखेरचा प्रवास. चित्तुर ते श्रीरंगपट्टण**

चित्तूर ते श्रीरंगपट्टण अखेरचा प्रवास.



# टिपू सुलतान.



# टिपू सुलतान - मैसूरचा वाघ.

१७८३ साल उजाडलं. हैदरअलीने आपल्याकडे वळवलेला राजप्रवाह त्याच्या पुत्राने तसाच चालू ठेवला चित्तूरला पोचल्यावर टिपू सुलतानने कारभाराची सूत्रं हातात घेतली. याला इतिहासाने मैसूरचा वाघ म्हणून ओळखलं. तरुणपणी जंगलात वाघाच्या शिकारीला गेला असतांना हिंस्त्र वाघाने अचानक टिपू सुलतानावर झडप घातली. त्या उग्र, ताकदवान प्राण्याला टिपूने न घाबरता आपल्या कट्यारीने कापून काढलं, त्यादिवशीपासून सुलतानाच्या आयुष्यात वाघ या प्राण्याला अनन्य साधारण महत्वाचं स्थान मिळालं. सुलतान या प्राण्याच्या इतका प्रेमात पडला की सिंहासन, तलवारी, तोफा, स्वत:च्या शिक्क्याचे कागद, सर्वत्र त्याने वाघाचीच प्रतिमा निर्माण केली. मरण पत्करलं तेही वाघाच्याच काळजाने...टिपूचं बालपण देवन्हळ्ळीमधे गेलं. कारण हैदरअली तेव्हा तिथे होता. सन १७६१ पासून वडिलांबरोबर तोही श्रीरंगपट्टणात आला. हैदरने त्याला उत्तम शिक्षण दिलं. गाझीखान हे त्याचे लष्करी शिक्षणातले गुरु. धाडसी, पराक्रमी, चपळ, रगेल, बुद्धीमान, बेदरकार, नि आक्रमक हे त्याचे गुण हैदरच्या लक्षात यायला लागले. वयाच्या १५ व्या वर्षापासून टिपू हैदरबरोबर

स्वारीत भाग घ्यायला लागला. फ्रेंचांचे डावपेच आणि युद्धकौशल्य यात दोघांनाही सारखाच रस होता आणि गती होती. हैदरची महत्त्वाकांक्षा, इंग्रजांची विस्तारवादाची धडपड आणि फ्रेंचांचं प्रतिस्पर्ध्याला भरतभूमीवर शह देणं याचे संस्कार त्याच्यावर होत होते.

हैदर टिपूकडे भावी नबाब म्हणून पाहात होता. टिपूच्या धार्मिक कट्टरपणामुळे तो हिंदूंचा रोष ओढवून घेतोय हे त्याला दिसत होतं. त्यामुळे अनेकवेळा बापाच्या हातचे चाबकाचे फटके आणि कैद टिपूला सहन करावं लागलं. वयाच्या २४ व्या वर्षी टिपूचा विवाह मंडपात एकाच वेळी दोन सुंदरींशी झाला. त्याला कारण त्याच्या आईवडिलांचा कोणत्या मुलीला सून म्हणून आणायचं हा वाद आणि त्यावर निघालेला हा तोडगा. हैदरला अर्काटच्या इमामसाहेब बक्षींच्या सुलतानखान नावाच्या मुलीला सून करायचं होतं तर त्याच्या आईला फातिमाला, बुऱ्हानउद्दीनची बहीण, रुकायाखान हीच सून हवी होती. त्यावेळी हैदर नबाब वगैरे न होता, फक्त एक नवरा होता. त्याचं काही चाललं नाही. टिपूला १२ मुलगे झाले. आपल्या मुलांना फ्रान्सला शिक्षणासाठी पाठवण्याचा टिपूचा बेत होता पण जमलं नाही. टिपूची आई आणि वडिलांवर भक्ति होती, आणि बहिणी आणि मंदबुद्धि सावत्र भाऊ

करीम यांच्यावर माया होती. स्वारीवर असला तरी याच आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष असे.

वैद्यकशास्त्राचा टिपू सुलतानाचा मोठा अभ्यास होता. कुणी माणूस मुतखडयाने आजारी असो, वा जुलाबाने, कुणाचा घोडा आजारी असो वा बैल अशक्त असो, सर्वांना टिपूच औषध सांगे. झाडे, भाज्या, फुले यांचंही त्याला मोठं ज्ञान होतं. लालबाग ही त्याचीच निर्मिती. रोज सकाळी तो बागेतून फेरफटका मारत असे. नवीन लावलेल्या फुला-फळांच्या रोपांची पाहणी करून माळयांना सूचना देई, त्या बागेतील भाजीपाला गावात विकला जाई. शृंगेरीच्या स्वामींशी त्याचे घनिष्ठ संबंध होते. मठाच्या सहस्त्र भोजनासाठी लागणारी भांडी आणि शिधा त्याने आपल्या खजिन्यातून दिलं होता. मेलूकोट्याच्या नारायण स्वामींच्या देवळासाठी त्याने ११ हत्ती, सुवर्णालंकार आणि जवाहीर भेट दिले होते. अनेक देवस्थानांना जमिनी दान दिल्या होत्या.

त्याचा रोजचा दिनक्रम म्हणजे पहाटे उठणे, आंघोळ करून कुराण वाचणे, मग रोजचा पोशाख करून अधिकाऱ्यांच्या भेटी घेई. त्यावेळी डोक्यावर मंदील, लांब पांढरा अंगरखा, त्याला हिऱ्याची बटणे, खिश्यात युरोपियन घड्याळ, आणि चामडयाचे बूट, हा पोशाख असे. नंतर जामदारखान्यात जाऊन त्याची पाहणी करत

असे. तिथे ज्योतिषी त्याची वाट पाहत असत आणि त्यादिवशीचा शुभ रत्नाचा दागिना त्याला संगत असत. राम नाव कोरलेली अंगठी कायम त्याच्या बोटात असे, त्या दिवशीच्या  दानधर्माची माहिती सांगत. शनिवार असेल तर परातभर तेल, काळी बकरी, निळा कोट आणि टोपी वगैरे.. मग चांदीच्या स्टूलावर बसून हजामत करून घेई. त्या आधी गालाला बदामाचं तेल लावत असे. ९ वाजता न्याहारीला अधिकारी असत. त्यांच्याशी होणारी चर्चा कानावर पडावी म्हणून मुलगेही त्यावेळी हजार असत. त्यानंतर दिवाण- इ - आममध्ये, दरबारात जाई.  तिथे पांढरी शुभ्र चादर पसरलेले गालिचे, तखतावर सोनेरी धाग्यांनी विणलेली चादर, तशाच उशा, उजवीकडे रत्नाजडीत खंजीर, व्याघ्रमुखी पिस्तूल,ठेवलेलं असे. बागेतील ताज्या फुलांनी महाल सुंगधी होई. त्यावेळी तो भरजरी पोषाखात असे. जरतारी फेटा, त्यावर मोत्याचा तुरा, हिऱ्याची बटणे लावलेला जरतारी झगा वापरत असे. भालदार चोपदारांच्या ललकारीने त्याचा दरबारात प्रवेश होई. मागे चवऱ्या ढळणारे उभे असत. दरबारात प्रधान मंत्री मंडळ, सर्व खात्यांचे अधिकारी, सेवक, पर्शियन-कानडी-तेलगू-उर्दू- भाषेचे लेखनिक, शेवटच्या रांगेत लेखक, संगीतकार, नट, हजर असत. सुलतानासमोर प्रश्न ठेवले जात आणि सोडवले जात, उत्तरं दिली जात, लेखनिक ते लिहून घेत आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे

सोपवली जात. दुपारी ३ वाजेपर्यंत ही कामे झाली की दुपारी जेवण आणि नमाज पढणे करत असे. संध्याकाळी शस्त्रागारात पाहणीसाठी जाई. रात्री देशभरच्या गुप्तहेरांशी बैठक होई. मग खास मंत्री मंडळाशी खास गुप्त चर्चा झाली की रात्रीचं जेवण प्रतिष्ठित पाहुण्यांबरोबर घेत असे. त्यानंतर सुलतानाचा दिवस संपे. मग तो एकटाच आपल्या बागेत फेरफटका मारायला जाई. महालात आल्यावर एकतरी पुस्तक वाचल्याशिवाय झोपत नसे.

संगीताची आणि नृत्याची त्याला मनस्वी आवड होती. इतिहास, विज्ञान, खगोलशास्त्र, युद्धशास्त्र, राजकारण, वैद्यक शास्त्र, हे त्याचे आवडीचे विषय होते. त्यावर त्याचं खूप वचन चाले. त्याने स्वत: ४० / ५० पुस्तकं लिहिली होती. जबरजाद हे खगोल शास्त्रावर आणि सुलेखन कलेला नवीन सूचना देणारं त्याने पुस्तकं लिहिलं होतं. त्याच्या वाचनालयात २००० पेक्षा जास्त पुस्तकं होती. त्यांना सुंदर वेष्टण होतं. पुस्तकाच्या मध्यावर पैगंबरचं नाव आणि चार कोपऱ्यांमधे चार खलीफांची नावं लिहिलेली असत.

वाघाच्या प्रेमात पडलेल्या टीपू सुलतानाने तोफा, बंदुकी, दिसेल त्यावर वाघाचा चेहरा कोरला. त्याचं सुवर्ण सिंहासनही व्याघ्रमुखीच होतं. ८ फूट लांब आणि ५ फूट रुंद असलेल्या लाकडावर सुवर्णाचा पत्रा चढवला होता. चारी बाजूंनी कठडा होता. त्यावर डोळ्यांना माणके जडवलेल्या सोन्याच्या वाघांचे १०

चेहरे होते. तख्ताच्या छताला मोत्याची झालर होती. टिपूचा पाडाव झाल्यावर इंग्रजांनी ते विंडसर पॅलेस सजवायला लुटून नेलं. टिपूणे आपल्या प्रासादासमोर बाग करून त्यात अनेक वाघ पाळले होते. टिपच्या वीर मारणांनंतर त्या वाघांचं काय करायचं असा आर्थर वेलस्लीला प्रश्न पडला होता. शेवटी त्याने सर्व वाघ मारून टाकले.

टिपू सुलतानाने अनेक सुंदर रस्ते बांधले. त्याकाळात मलबार किनाऱ्यावरील सर्व दळण वळण पाण्यातूनक होत असे. त्या समुद्र किनाऱ्याला समांतर असे रस्ते सुलतानाने बांधून काढले. त्यामुळे व्यापाराला गती मिळाली. अनेक गाड्या या मार्गाने धावू लागल्या. घाटातले रस्तेही त्याने छान बांधून काढले. एवढं करून तो थांबला नये. त्याने पांथस्थांच्या सोयीसाठी अन्नछत्रे चालू केली. ती हिंदू लोकांना चालवायला दिली. ( प्रवासातील मार्गावरील हॉटेल चालवण्याच्या उद्योगाचा तो जनक मानायला हरकत नाही. ) युद्धशस्त्रांमद्धे टिपू सुलतानाला विलक्षण गती होती.. फ्रेंचांकडून आणलेल्या युद्धासाहित्यामध्ये त्याने फेरबदल करून जास्त उपयोगी केली होती. त्याने स्वत: एका रॉकेटचा शोध लावला आणि ते रॉकेट १७८० सालच्या इंग्रजांच्या विरुद्धच्या लढाईत वापरलं. या रॉकेटमध्ये ८ इंच लांब आणि ३ इंच गोल, आणि एका बाजूने बंद अशा लोखंडी नळकांड्याला त्याने एक तलवारही जोडली होती. त्यात दारू भरली जाई. या

नळकांड्यासाठी त्याने एक लाकडी स्टँड बनवला होता. शत्रूचे स्वार स्वार दूर असतांना त्या नळकांड्यातीळ दारूला बत्ती दिली जाई. हे नळकांडं दूर जाऊन शत्रूवर पडत असे आणि अचानक हल्ल्यात ते मरत.. यदाकदाचित दारू विझली तरी तलवार तरी त्याला जखमी करून जाई. या रॉकेटचं नाव त्याने शुहाब ठेवलं होतं. हा अरबी शब्द आहे. त्याने इतर शस्त्रांचीही नावं बदलली होती. बंदुकीला तफंग आणि तोफेला वीज नाव होतं. सन १७८० च्या इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत या रॉकेटचा प्रथम वापर झाला. इंग्रजांच्या फौजेवर अचानक निळया प्रकाशातील आग, तलवार आणि नळकांडी पडायला लागली. पायदळ आणि घोडदळ कोसळायला लागलं. इंग्रजांच्या दारू साठयाला आग लागली आणि दारूचा प्रचंड स्फोट झाला. इंग्रजी सेनापतीला हे काय नवीन शस्त्र आहे ते कळेनाच..त्याचा परिणाम म्हणजे कर्नल बेलीला शरण यावं लागलं. ही रॉकेट्स चालवण्यासाठी सुलतानाने ६००० शिपायांची फौज उभी केली होती. त्यांना रॉकेट्सचा कोन कसा बादलायचा आणि बांबूच्या टेकूवर ठेवायचा त्याचं शिक्षण दिलं जाई. टिपूचा मृत्यू झाल्यावर इंग्रजांनी ती सगळी रॉकेट्स गोळा केली आणि त्यात सुधारणा करून नेपोलियनच्या विरुद्ध वापरली.

त्याने शेतीतही सुधारणा केल्या. त्या म्हणजे कसेल त्याची जमीन आणि श्रीमंत शेतकऱ्यांनी गरिबांचे पाठीराखे व्हायचं. गरीब

शेतकऱ्यांनी जमीनदाराला भाडं द्यायचं. शेतीला उद्योगाची चालना दिली. भाडं देणाऱ्या शेतकऱ्याला सरकारकडून अभय असे. या दोघांची गाठ घालून दिल्यामुळे लुटालूट कमी झाली. सारावसुलीत भ्रष्टाचार करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना कडक शिक्षा ठेवल्या. कर्नाटकातील मुख्य पीक भात आणि उस असल्यामुळे त्याच्या पाण्यासाठी मोठे मोठे तलाव बांधले आणि त्यांची निगा ठेवण्यासाठी माणसे नेमली, त्यांची दुरुस्तीही केली. ..शेती हे देशाचं रक्त आणि जीवन आहे असं तो म्हणे.

इंग्रज हे व्यापारामुळे श्रीमंत झाले आहेत आणि त्यातून मिळवलेल्या पैशातून राजकारण खेळवू शकले हे कळल्यावर टिपू सुलतानाने मैसूर राज्य श्रीमंत करण्याची चालना दिली. कर्नाटकातील चंदन, नारळ, तंबाखू, सोन्याच्या खानी, रेशीम आणि हत्ती यांचा व्यापार आणि निर्यात वाढवण्यासाठी त्यात लक्ष घातलं. मस्कत आणि चीनमधून रेशमी किडे आणून रेशमाचं उत्पादन आणि दर्जा वाढवला. परदेशी कारागीर आणून काच कारखाना सुरू केला. बंगलोर, बिदनूर, श्रीरंगपट्टणमध्ये कागदाचे कारखाने सुरू केले आणि त्यांना उद्योग नगरी बनवलं. उत्तम साखर बनवायचा कारखाना सुरू करून हा माल परदेशात विकायाला सुरुवात केली. लष्कराच्या सामर्थ्यासाठी तोफा ओतणे, गलबते बांधणे, दारूगोळा बनवणे, बंदुकी बनवणे, यांचे कारखाने चालू

केले. घड्याळे बनवायचाही कारखाना काढला. उद्योगांमुळे लोकांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, उद्योगाची भरभराट होते, त्यातून नागरिकांची उन्नती होते म्हणून त्याने उद्योगांना प्रोत्साहन दिलं. एवढाच नव्हे तर शेअर होल्डर ही कल्पना नव्याने सुरू केली. लोकांनी गुंतवलेल्या पैशामुळे त्यांना परतावा मिळू लागला आणि पैसा खेळायला लागला. वेठबिगारीबद्दल त्याला अत्यंत चीड होती. चीनने बांधलेली लांब लचक भिंत, ईजिप्तमधील पिरामीड्स ही मजुरांच्या शिक्षेच्या भीतीने, उपासमारीने श्रमांची केलेली स्मारके आहेत असं त्याला वाटे.

दारुला त्याचा सक्त विरोध होता. त्याने राज्यात दारूबंदी केली होती. त्याच्या एका मंत्र्याने दारुविक्रीतून आपल्याला मोठा महसूल मिळेल आणि आपला खजिना भरेल असा सल्ला दिला होता, त्यावर, समाजाचा आरोग्याचा आणि नैतिकतेचा र्हास करणारा पैसा आपल्याला नको असं म्हणत त्याने त्या मंत्र्याला फटकारलं होतं. एकदा त्याला त्याच्या प्रवासात चोळी न घातलेल्या स्त्रिया दिसल्या तेव्हा, त्याने काढलेले उद्गार मननीय आहेत.. तो म्हणाला की स्त्रिया आपली लाज झाकण्यासाठी कपडे घालू शकत नाहीत, त्यामागे गरिबी हे जर कारण असेल तर ते तिथल्या राजाचं कर्तव्य आहे आणि ती जर प्रथा असेल तर समाजाच्या प्रमुखाने समाजाचं मन वाळवून ही रूढी बंद करणं हे

कर्तव्य आहे आणि ही दोन्ही करणे नसतील तर समजतील तरुणांनी पुढाकार घेऊन ही प्रथा बंद करण्याची जरूरी आहे.

**टिपू सुलतानाला सूचक स्वप्ने पडत त्यावर त्याने अनुभवावर अभ्यासपूर्ण पुस्तकही लिहिलं होतं.** सत्ता मिळाल्यावर टिपू सुलतानाने वेगवेगळी नाणी निर्माण केली. त्यात अबिदी -अधेली, बकीरी-पावली, अफरी-चवली, त्याशिवाय तांब्यांची नाणी प्रचारात आणली. त्यांना उस्मानी, अख्तर, कुत्ब, जुहारा, मुश्तरी म्हणत. त्याने मौलदी नावाने नवीन पंचांग सुरू केलं. त्यांची नावं अहंमदी २९ दिवस, बहारी ३० दिवस, जाफरी ३० दिवस, दराई २९ दिवस, हाशमी २९ दिवस, वासी ३०दिवस, जबरजाडी ३० दिवस, हैदरी ३० दिवस, तुलाई २९ दिवस, यूसुफी ३० दिवस, इजादी २९ दिवस, बायजी ३० दिवस, असे ते महिंने ओळखले जात. सन १७८७ मध्ये परत त्याने काही नावं बदलली. दराईच्या जागी सामरी, जबरजाडीच्या जागी खुशरावी हे इराणच्या राजाचं नाव तुलाईच्या जागी झाकेरिया, आणि यूसुफीच्या जागी रहमानी अशी नावं केली. हिजरी आणि मौलदी कालगणनेत १३ वर्षांचं फरक आहे. टिपू सुलतानाने फ्रेंच लष्करातून आलेल्या,

आपल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हुद्द्यांची नावंही बदलली. अनेक शस्त्रांची नावं बदलली.

शासनाकर्ता म्हणून वाघ असलेला टिपू बाप म्हणून कसा होता याचं मनोज्ञ दर्शन मराठ्यांचे सेनापति हरिपान्त फडके यांच्या पत्रातून दिसतं. सन १७९२ च्या युद्धात कॉर्नवॉलीसने सुलतानाचा पराभव केला. त्यावेळच्या करारात सुलतानाला आपलं अर्ध राज्य, ३ कोटी रुपये द्यावे लागले. कराराप्रमाणे या सर्वाची फेड होईपर्यंत सुलतानाने आपले दोन मुलगे इंग्रजांकडे ओलिस ठेवायचं कलाम त्यात घालण्यात आलं. सुलतानाचे ७ आणि १० वर्षांचे मुलगे मिरवणुकीने कॉर्न वॉलिसकडे पाठवण्यात आले तेव्हा टिपू सुलतान तटबंदीच्या पलीकडून ते पाहत बसला होता. इंग्रजी तलवार आल्यावर दोन्ही मुलांचं कॉर्नवॉलीसने स्वागत केलं. त्यांना जवळ घेतलं, त्यांची नावं विचारली, त्यांना एकेक पिस्तूल, घड्याळ, आणि एकेक बंदूक भेट म्हणून दिलं. मुलांबरोबर आलेल्या टिपूच्या अधिकाऱ्याने आता तुम्हीच त्यांचे वडील व्हा अशी विनंती केली. ही बातमी सुलतानाच्या कानावर पोचवण्यात आली तेव्हा सुलटणाने तोफांचे दोन बार काढून आपली खुशी जाहीर केली. नंतर एक दिवस ते दोन्ही लहान मुलगे हरिपंत फडक्यांच्या डेऱ्यात गेली. हरिपान्त फडके आपल्या पत्रात लिहितात, “ थोडा वेळ त्यांच्याशी इकडील तिकडील विषय

बोललो. मग मुले म्हणाली की आम्हाला भूक लागली. तेव्हा त्यांना शेजारच्या राहुटीत नेऊन पेढे, बर्फी, बदाम, फळं, खायला दिली.. ''

हैदरअली मैसूरचा सर्वाधिकारी, प्रधानमंत्री, आणि दलवाई या तिन्ही भूमिका वठवत असतांना त्याने राजघराण्याला संपवलं नव्हतं किंवा त्यांचं धर्मांतरही करवलं नव्हतं. त्याच्या कारकीर्दीत कृष्णराज वोडीयार, नंजराज वोडीयार, खासा चामराज वोडीयार, एवढे वोडीयार होऊन गेले होते. राजकारणातील त्यांचं महत्व हैदरअलीने संपवलं नव्हतं. ते त्या आधीच कसं संपवलं गेलं होतं, ते तरुणपणी दलवाई देवराजैय्या आणि नंजराजैय्या यांच्या कारभारातून हैदरअलीने पाहिलं होतं. त्या दोघांचं राजघराण्याची अवज्ञा करण्याचं धाडस पाहून देवराजैया आणि करचुरी नंजराजैया यांनाच शह देण्याचं राजकारण हैदरअली खेळला. पण राजघराणं चालू ठेवण्याचे त्याला फायदे जास्त होते हेही त्याने ओळखलं होतं. या राजघराण्यामुळेच त्याला आणि त्याच्या भावाला कर्तृत्वाचे दिवस दिसले होते हे तो विसरला नव्हता. जनमत त्याच्याविरुध्द न जाण्याचा त्याला त्यातून फायदा होत होता. सत्ता त्याच्या हाती होतीच, शत्रूशी लढायची जिगर आणि मैसूरला वाचवण्याची त्याची पराकाष्ठा, त्याच्या आंतरिक गुणांना, युद्धनीतीतील डावपेच, त्याच्या पराक्रमाला, वकुबाला आणि

राजनीतीला भरपूर संधी देत होती. त्यामुळे हैदरअली मैसूरचा सर्वाधिकारी होता पण राजा नव्हता हे त्याला मान्य होतं. त्याच्या अचानक मृत्यूने मैसूरचा कारभार आता टिपू सुलतानाच्या हाती आला. झंजावाती हैदरअलीच्या काळात स्वस्थ बसलेलं राजघराणं सत्ता उलथवयाची आणि आपल्या हाती परत कारभार घ्यायची योग्य संधीची वाट पाहात होतं. वादळी पाऊस कोसळावा आणि निमूटपणे आसरा धरून स्वस्थपणे वाट पहात थांबावं तसं राजकारण इंग्रज-फ्रेंच आणि हैदर अलीमध्ये चालू होतं ते वोडीयार घराण्याला दिसत होतं. इंग्रजांचा कावेबाजपणा, त्यांच्या सामर्थ्याची नस पुरेपूर ओळखून नबाब बहादूर हैदरअलींनी मैसूरला वाचवण्याची पराकाष्ठा केली होती हेही त्यांना दिसत होतं. पण त्याच्याविरूध्द जाण्याएवढ्या सामर्थ्याचं बळ वोडीयारमध्ये नव्हतं हे कटू सत्य होतं. राज्यातील हिंदूही हैदराच्या सत्तेपुढे वाकले होते त्यामुळे पुर्णैय्यासारखा मुरब्बी दिवाण हैदरच्या विश्वासाचा भाग बनला होता, तो आता टिपू सुलतानाच्या मागे उभा राहिला. अनेक दरबारी मनातून वोडीयार घराण्याच्या बाजूने होते पण आपल्या मनाचा कल दाखवू शकत नव्हते.

## बिदनूरावर स्वारी – इ. सन १७८३.

टिपू सुलतान आपल्या बापापेक्षा, हैदरअलीपेक्षा जास्त आक्रमक, जास्त कडवा, जास्त बुद्धिमान, जास्त कठोर, उग्र प्रकृती होता. पराक्रमी होता. वैद्यकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान, खगोलशास्त्र, युद्धसाहित्य अशा अनेक विषयांमध्ये त्याला गती होती. ही त्याची जमेची बाजू होती. पण त्याचा अहंकार, अवाजवी आत्मविश्वास आणि दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची वृत्ती एतद्देशीय राजकारण्यांनाही दुखावून ठेवत होती. हैदरअलीचं शव घेऊन निघालेली फौज कोलारला हैदरअलीची शवपेटिका उतरवून श्रीरंगपट्टणमध्ये पोचली. लगेच टिपू सुलतान बिदनूरवर गेला. तिथे त्याचा अमाप खजिना होता. हैदरअलीचा अत्यंत विश्वासू मानसपुत्र शेख ऐय्याज बिदनूराचा सुभा सांभाळत होता. टिपूचा आपल्याबद्दल असलेला मत्सरी स्वभाव माहीत असलेला शेख ऐय्याज इंग्रजांना जाऊन मिळाला. टिपू सुलतान बिदनूरावर येणार आणि आपल्याला मारणार हे त्याला माहीत होतं. इंग्रजांचा सेनाधिकारी मॅथ्युजने किल्ला काबीज केला होता. टिपू सुलतानाचा बिदनूरचा खजिना इंग्रजांच्या हाती पडला. टिपू तिथे पोचला तेव्हा खजिना इंग्रजी फौजेने पार लुटला होता. टिपूच्या

फौजेने किल्ल्याला मागून आणि पुढून वेढा घातला. १८ दिवसांच्या झटापटीनंतर मॅथ्युज शरण आला. सर्व फौज पकडली, त्यांची झडती घेतली आणि त्यांनी सफाईने दडवलेली रत्ने, मोहरा त्यांच्याकडून काढून घेतली. २८ एप्रिल ८३ या दिवशी सुलतानाने किल्ल्यात प्रवेश केला. बिदनूर ताब्यात घेऊन सुलतान मंगलोरकडे निघाला.

## मंगलोराची लढाई – इंग्रजांशी तह -

टिपू सुलतान आता सत्ताधीश झाल्यामुळे त्याच्या अहंकारी आणि आक्रमक स्वभावाची जाणीव असलेले निजाम आणि मराठे सावधपणे वागायला लागले. टिपू सुलतानने एकेका प्रतिस्पर्ध्याचा वचपा काढायला सुरुवात केली. मराठ्यांच्या प्रदेशात स्वाऱ्या सुरु झाल्या. यामुळे टिपूने सर्वश्रेष्ठ होऊ नये हेही राजकारण चालू झालं होतंच. त्या राजकारणाला आता दुहेरी रंग चढला. इंग्रज आणि फ्रेंचांचं युरोपातील राजकारण भारतीय भूमीवर खेळलं जाऊ लागलं. ज्यांची बाजू फ्रेंच घेतील त्यांच्या विरोधी पक्षाची बाजू इंग्रज घेतील हे समीकरणं आधीपासूनच होतं त्याला आता त्यांच्या देशात घडणाऱ्या राजकारणाची झालर मिळाली. सत्ता काबीज केली तरी टिपू सुलतानाला नबाब म्हणून मान्यता मिळणं अत्यावश्यक होतं कारण दरबारी शिष्टाचाराच्या दृष्टीने त्याने आजवर कोणतंच पद भूषवलं नव्हतं. हैदरअली सर्वाधिकारी या नात्याने एका पदावर होता, शिवाय त्याने नबाबी बसालतजंगकडून विकत घेतली होती. पण टिपू सुलतानाला दिल्लीच्या बादशहाची मान्यता मिळवायला हवी होती. ती मिळाली नाही तर अर्काटच्या

नबाबाकडून मिळायला हवी होती. पण त्याआधी कारभाराची घडी बसवायला हवी होती.

टिपू सुलतानला आपल्या कारकीर्दीत या जागतिक खेळाशी सामना करावा लागला. मराठे आणि मैसूर हे दोनच प्रतिस्पर्धी इंग्रज आणि फ्रेंचांना जड होते. उत्तरेत दिल्लीचा बादशहा हाती आल्याने ती सत्ता हातात आलीच होती. फक्त दक्षिण जिंकणं महत्वाचं होतं. त्यातही माधवराव पेशव्यांचा मृत्यू झाल्यावर त्यांचे काका राघोबादादांना हाताशी धरून महाराष्ट्र खिळखिळा करण्याची धडपड इंग्रजांची चालू झाली होती. पण नाना फडणीस आणि सखारामबापू बोकील यांनी त्यांची डाळ शिजू दिली नाही. महाराष्ट्रातही महादजी शिंदे उत्तरेतील राजकारण समर्थपणे सांभाळत होते, त्यांचा कल फ्रेंचांकडे होता, तर नाना फडणीसांची घालमेल फ्रेंच की इंग्रज अशी चालू होती. नाना फडणीस आणि महादजी शिंदे जोपर्यंत एक आहेत तोवर आपल्याला यश नाही हे इंग्रजांना कळून चुकलं होतं. या संबंधात महादजी आणि टिपू सुलतान यांचा गुप्तपणे पत्रव्यवहारही चालू होता.

टिपू सुलतान तर सरळ सरळ फ्रेंचांच्या आधुनिक शस्त्रांवर इंग्रजांशी लढत होता. त्यातच ९ व्या दशकात फ्रान्समध्ये त्यांचा राजा लुई याच्याविरुध्द वातावरण तापायला लागलं होतं. ही

इंग्रजांच्या बाजूने झुकतं मापं घालणारी घटना होती. कारण टिपूला मिळणाऱ्या मदतीमध्ये खंड पडायला लागला होता आणि इंग्रज-फ्रेंचांच्या लढायांचा आणि हारजीत निकालांचा भारत भूमीवरील त्यांच्यातील झगड्यावर परिणाम होत होता. या राजकारणाचा परिणाम म्हणजे वोडीयार राजघराण्याने आपल्या पुनर्वसनासाठी इंग्रजांची मागितलेली मदत यात झाला. टिपू सुलतान मलबारच्या लढ्यात व्यग्र असतांना इंग्रजांच्या मदतीने एक कट रचला गेला.

त्याची सुरुवात, हैदरअलीने वोडीयारचा विषप्रयोगाने मृत्यू घडवला तेव्हापासूनच राजमाता लक्ष्मणीअम्माच्या काळातच सुरु झाली होती. इ. सन १७७६ मध्ये राजमाता लक्ष्मणीअम्माने मद्रासला आपला विश्वासातील माणूस तिरुमलराव याला मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड पिगॉट याच्याकडे गुप्तपणे पाठवलं होतं. हा तिरूमलराव हैदरअलीच्या सरकारात वेगवेगळया खात्यांमध्ये कामाला होता. तेथून तो मैसूरमधून पसार झाला आणि तंजावरमध्ये त्याने आश्रय घेतला. तिथे तो ६ वर्षे होता. त्याकाळात त्याची रेव्हरंड श्वार्त्झ आणि सलीवन याच्याशी ओळख झाली आणि तो मद्रासच्या इंग्रजांच्या संपर्कात आला. महाराणीचा विश्वासू प्रतिनिधी अशी त्याला ओळख मिळाली. लॉर्ड पीगॉटच्या काळात काहीही प्रगती झाली नाही, पण नंतर लॉर्ड मॅककार्टनेच्या काळात, १७८२ मध्ये तिने एक पत्र गव्हर्नरला लिहून दिलं. त्यात तिने

वोडीयार परत सत्तेत आणण्यासाठी केलेल्या मदतीबद्दल १ कोटी इंग्रजी सैन्याच्या खर्चासाठी, १५ लाखाची जहागिरी कंपनीसाठी आणि ३६ लाख रुपये मैसूरच्या रक्षणासाठी फौजेचा खर्च म्हणून देण्याची तयारी दाखवली. ही महाराणी म्हणजे त्रिचनापल्लीचा किल्लेदार कट्टी गोपालराजा याची कन्या. चिक्क कृष्णराज वोडीयार द्वितीयबरोबर विवाह झाल्यावर मैसूरच्या राजघराण्यात आली. हा करार " हिंदू राजघराण्याच्या पुनर्स्थापनेचा राणी करार " म्हणून ओळखला गेला. २८ ऑक्टोबर १७८२ मध्ये तंजावरमध्ये हा करार अधिकृतपणे संपन्न झाला. तिरूमलराव त्याचा मुख्य प्रतिनिधी होता. लगेच दुसरे दिवशी २९ ऑक्टोबरला त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. टिपू सुलतानाची राजवट उलथवायला योग्य संधीची सर्वजण वाट पहात होते. ती संधी आता आली होती. हैदरअलीचा मृत्यू झाला होता. टिपू सुलतान मंगलोरच्या लढाईत गुंतलेला, ही योग्य वेळ होती. या कारस्थानात टिपूचे काही विरोधक, ज्याचं हैदरअलीमुळे आर्थिक नुकसान झालं होतं ते पाळेगारही सामील झाले.

## श्रीरंगपट्टणमध्ये बंडाळी- २४ जुलै. १७८३

आंचे शामैय्या, शामा अय्यंगार आणि त्याचा भाऊ रंगैय्या, रंगा अय्यंगार हे या कटाचे मुख्य सूत्रधार होते. ३ वर्षांपासून हा पोलीस खात्यात नोकरीला होता. राजघराण्याचे हे स्वामिनिष्ठ होते. हैदर अलीच्या काळापासून निर्माल्यावत झालेलं राजघराणं पाहून त्यांना मनस्वी दु:ख होत होतं. शामैय्या टपाल खात्याचाही मुख्य होता. गुप्तहेर खात्यात अधिकारी होता. स्वत: शामैय्या सुलतानाबरोबर मंगलोरच्या मोहिमेत सामील झालेला होता. त्याने श्रीरंगपट्टणमधल्या आपल्या भावाला, रंगैय्याला, आपल्या कटात सामील करून घेतलं. हा सरकारी कचेऱ्यांचा प्रमुख होता. शिवाय राजधानीतील फडणीस नरसिंगरावही सामील झाला. याच्याकडे पगार वाटपाचं महत्वाचं काम होतं. कोइम्बत्तुरचा प्रमुख सिंगैय्या त्यात गोवला गेला. देवराज घराण्याचा शुभराज अरसही यात सामील झाला. २ सुभेदार सामील झाले, त्यांच्या हाताखाली प्रत्येकी १०० शिपाई होते. त्यांच्यातील एक अम्बुरच्या लढाईत पकडला गेलेला कॅप्टन किट्सच्या तुकडीतील अधिकारी होता. अशातऱ्हेने टिपू सुलतानाची राजवट उलटवायच्या कारस्थानाची पूर्व तयारी पूर्ण झाली होती.

टिपू सुलतानाची राजवट उलथावयाची, वोडीयारला गादीवर बसवायचं, शामैय्या, रंगैय्या, नरसिंगराव यांनी कारभार हाती घ्यायचा, किल्लेदाराला पकडून ठार करायचं, त्याची फौज कापून काढायची, कैद केलेल्या युरोपियन आणि इतर फौजेला मोकळ करायचं, त्या लोकांनी शहराचा ताबा घ्यायचा, श्रीरंगपट्टणचा मुख्य दरवाजा ताब्यात घेऊन तिथे दारूगोळ्याची व्यवस्था ठेवायची, आणि परत राजघराण्याला प्रतिष्ठा मिळवून द्यायची असा तो कट शिजला. त्यातला महत्वाचा, कोइम्बत्तुरच्या इंग्रजी सैन्याच्या अधिकाऱ्यांना, मराठ्यांना आणि कूर्गला मदतीसाठी पत्रव्यवहार करण्याची जबाबदारी नरसिंगराव याने पार पाडली. कोइम्बत्तुरच्या इंग्रजी फौजेने कधी घाट चढून श्रीरंगपट्टणला यायचं ते कळवण्यासाठी सतत त्यांच्या संपर्कात राहण्याची जबाबदारी रंगैय्याने घेतली. कटात अनेक लोकांचा सहभाग असल्याने बातमी फुटू शकते म्हणून रंगैय्याने लवकरात लवकर काम यशस्वी करायची निकड नरसिंगरावकडे लावली. त्याप्रमाणे २४ जुलै, १७८३ हा दिवस निश्चित झाला. हा दिवस निश्चित करण्याचंही एक महत्वाचं विचारपूर्वक ठरवलेलं कारण होतं. ते म्हणजे हा फौजेचा पगाराचा दिवस होता. याचं मुख्य कारण म्हणजे पगार घ्यायला फौज सदरेवर गोळा व्हायची तेव्हा त्यांच्या हातात शस्त्रं नसायची. शस्त्र बाळगायची त्यांना बंदीच होती. शिवाय रक्कम वाटण्यासाठी

पैशाचे मोठाले पेटारे गोळा झालेले असायचे. ते पेटारे उचलून कचेरीवर न्यायला मोठे मोठे ताकदवान मल्ल बोलावले जायचे. त्यांना खंजीर बाळगण्याचा अधिकार दिलेला होता.. मल्लांना आधीच वश करून घेतलेलं होतं. म्हणून तेही नाण्यांनी भरलेले पेटारे ताब्यात घेण्याचा कट करणारांचा हेतू होता. अशारितीने काळजीपूर्वक केलेल्या कटाची आखणी पूर्ण झालेली होती. आता ती क्रांती अंमलात यायची शिल्लक राहिली होती.

२३ जुलैला दुसरे दिवशीच्या पगार वाटपाची तयारी पुर्ण करून किल्लेदार सैद महंमद खान  रात्री घरी जायला निघाला. तेव्हा रात्रीच्या अंधारात त्याच्या जवळ येऊन कुणी एक अज्ञात इसम काहीतरी कुजबुजून गेला. त्याने सर्व कट किल्लेदाराला उघड केला. मिळालेल्या बातमीने किल्लेदार हादरला. किल्लेदाराने वेगाने हालचाली केल्या. क. मॅथ्युजकडे जाणारा पत्र व्यवहार जप्त केला आणि मदतीला येणारी इंग्रजी फौज थांबवली. मग कारस्थानात भाग घेतलेले सर्व अपराधी पकडले. नरसिंगरावला पकडल्यावर माफी मिळण्याच्या आशेने त्याने सर्व कट उघड केला. सर्व अपराध्यांना पकडून हत्तीच्या पायाला बांधून त्यांची शहरातून मिरवणूक काढली. काहींचे नाक-कान कापले, सर्वांना तुरुंगात टाकलं. नरसिंगराव, पेटारे उचलणारे मल्ल यांना फाशी देण्यात आली.

टिपू सुलतानाला फसलेल्या बंडाळीची माहिती मंगलोरला पोचवण्यात आली. शामैय्या तेव्हा सुलतानाजवळच होता. सुलतानने त्याला आणि रंगैय्याला लोखंडी पिंजऱ्यात अडकलं आणि श्रीरंगपट्टणला पाठवण्यात आलं. त्यांना अर्धपोटी ठेवण्यात आलं. त्यांच्या पाठीवर मिरचीची आणि मिऱ्याची पूड चोळण्यात आली. इंग्रजी सेनाधिकारी मनरो याने लिहिलेल्या आठवणीप्रमाणे कट उघड करणाराचं नाव रिचर्ड हेगन होतं. तो कटात सामील होता पण फितूर झाला कारण त्याला ठार करण्याचा कट दोघेजण करत असल्याचा त्याला संशय होता. आपला जीव वाचवण्यासाठी त्याने कट उघड करून किल्लेदाराची सहानभूती मिळवली. टिपू सुलतानानेही त्याच्या या खास सेवेबद्दल ५०० पाईकांचा मुख्य केलं. कट उधळला गेला. राजघराणं परत सुलतानाच्या जास्त कडक नजरेखाली आलं. अनेक तुरुंगात गेले. सुलतान सावध झाला. वोडीयार घराण्याच्या आणि हिंदू राजनिष्ठांच्या आशेवर पाणी फिरलं. महाराणीचे प्रयत्न वाया गेले. या कटाच्या निमित्ताने ७०० माणसांना देहदंड भोगावा लागला.

टिपू सत्ता हाती घेतली तेव्हा घराचे आणि बाहेरचे या दोन्ही आघाड्यांवर राजकीय चालींमध्ये मैसूरचा नबाब म्हणून मैसूरचा काळ मोठा कठीण होता. तो काळ टिपू सुलतान मोठ्या जिगरीने लढत होता. मैसूरला वाचवण्यासाठी इंग्रजांचं वादळ अंगावर

झेलत होता. मंगलोरच्या लढाईत फ्रेंचांनी अचानक त्यांच्या देशातून आलेल्या आदेशानुसार सुलतानाचं पाठबळ काढून घेतल्यामुळे सुलतानाला तह करावा लागला होता. पेराँ द मोर्लेच्या मध्यस्तीने ठराव करार झाले. नंतर मंगलोरच्या किल्ल्यात मॅक्लीऑडच्या इंग्रजांना कसा प्रवेश करता आला याची चौकशी सुरु झाल्यावर सुलतानाला काहीतरी दगा फटका झाल्याचा संशय आला. त्यावरून त्याने किल्लेदार रोशन बेग याला अटक केली आणि त्याला ठार करण्याचा हुकूम दिला. त्याला फाशी द्यायचं ठरलं होतं, तेव्हा हैदरपासूनच्या काळापासून स्वामिनिष्ठ असलेल्या महंमदअली सरदाराने विघ्न आणलं. रोशन बेगला सोडवून घेऊन ते पट्टणकडे निघाले. ज्यांना माझ्याबरोबर यायचं असेल त्यांनी मला सामील व्हा अशी घोषणा केल्याबरोबर सुलतानावर नाराज असलेले अनेक सैनिक त्यांना सामील झाले..टिपू सुलातानासाठी ते बंडच होतं, आणि तेही त्यांच्या फौजेतील एका जुन्या जाणत्या हैदरअलीच्या लोभातील अधिकाऱ्याचं. टिपू सुलतानासाठी ती थक्क करणारी बातमी होती. बातमी ऐकल्यावर सुलतानाची आग मस्तकापर्यंत पोचली. त्याने महंमद अलींना अटक करून श्रीरंगपट्टणला पोचवण्याची जबाबदारी शेख हमीदवर सोपवली. प्रवासात जाताना महंमद साहेबांचा गळा आवळून त्यांना ठार मारायचा तोंडी हुकूम त्याला दिला. त्याप्रमाणे शेख हमीदने महंमद

अलीला ठार केलं. हैदर अलींच्या काळातील त्यांनी सांभाळलेले दोन मोहरे टिपूसुलतानाने गमावले. एक, बिदनूरचा शेख ऐय्याज, दुसरे महंमद अली. संतापाने बेभान झालेला सुलतान आणखी कठोर झाला होता. इतकं करून सुलतान थांबला नाही. त्याने अलीसाहेबांच्या बेगमला बायको म्हणून त्याच्या सेवकाला पत्नी म्हणून आपल्या घरी नेऊन ठेवण्याचा हुकूम दिला. त्या सेवकाने एवढ्या मोठ्या माणसाच्या पत्नीला हुकूमाप्रमाणे घरी नेलं पण मातेसमान वागवलं. टिपूच्या आईला जेव्हा ही बातमी कळली तेव्हा तिने त्या बेगमला आपल्या घरी आणून सन्मानाने राणीवशात ठेवून घेतलं. महंमद अलींच्या घराची जप्ती करण्यात अली तेव्हा क्षुल्लक रक्कम सापडली कारण महंमद अली हे प्रचंड दानशूर होते. मिळालेली रक्कम ते लगेच गोरगरीबांमध्ये वाटून टाकत. असा मोहरा सुलतानने गमावला.

# मराठ्यांशी गजेन्द्रगडचा तह – एप्रिल १७८७

त्यानंतर राज्याची घडी बसवण्यासाठी आणि प्रतिस्पर्ध्यांना ठिकाणी लावण्यासाठी टिपू सुलतान सतत मोहिमांमध्ये गुंतला. सावनूर, नरगुंद, धारवाड, सांवशी, बदामी, अशा अनेक मोहिमा आपल्या सरदारांना पाठवून काढल्या आणि यशस्वीही झाला. या मोहिमेत नरगुंदचे भावे यांची वाताहत झाली. या मोहिमांच्यानंतर एप्रिल १७८७ ला मराठ्यांशी गजेंद्रगड इथे त्याचा तह झाला.

## टिपू सुलतानाचा राज्याभिषेक.

त्यानंतर त्याला जरा फुरसत मिळाली आणि १७८७ मध्ये प्रचंड धूमधडाक्यात त्याने लगेच राज्याभिषेक करून घेतला. आपल्या सत्ताग्रहणाला आणि नबाब म्हणवून घ्यायला मान्यता मिळावी म्हणून त्याने आपले राजदूत कॉंस्टंटीनोपलला पाठवले होते. सुलेमान पाशाकडून मान्यता आणली आणि लगेच तख्तनशीन झाला. टिपू सुलतांनाच्या आयुष्यातील हे महत्त्वाचं वर्ष होतं आणि अविस्मरणीय घटना कारण या वर्षी त्याने सात:ल राज्याभिषेक करून घेतला. समारंभपूर्वक त्याने स्वत:ला पातशाहा हा किताब घेतला. आजवर दिल्लीच्या बादशाच्या नावाने खुतबा वाचला जायचा तो बंद झाला. त्याच्या नावाने खुत्बा वाचला जाऊ लागला. त्याने मैसूर राज्याला खुदादात नाव दिलं. स्वत: साठी त्याने सोन्याचं सिंहासन बनवायला सुरुवात केली. ८ फूट लांब, त्याला सोन्याचा कठडा, कथड्यावर थोड्या थोड्या अंतराने वाघाचे मुखवटे, त्यांच्या डोळयांमध्ये लाल भडक माणकांचा जडाव, मसनदीवर चढायला छोट्या पायऱ्या, तख्तावर मेघडंबरी, त्यालाही सोन्याच्या तारेत गुंफलेली मोत्यांची झालर, सबंध सिंहासनाला उचलून धरणार सोन्याच्या वाघाचा उग्र चेहरा, त्यात पाचू माणकांचा भरपूर वापर, सगळं व्याघ्रमय तखत. राज्याभिषेक समारंभ थाटात पार पडला. ४०,००० रुपये गरीबांना वाटले.

खलिफाची परवानगी मिळवण्याची प्रथा जुनी होती. तुर्की सुलतानांनाच खलिफा मानलं जायचं. दिल्लीच्या बादशहाकडून

अशी परवानगी मिळणं शक्य नव्हतं कारण तिथला बादशहा इंग्रजांच्या ताब्यात होता. दुसरी परवानगी अर्कोटच्या नबाबाकडून मिळाली असती. पण त्यांच्यात वैरच होतं. म्हणून सुलतानाने तुर्कस्तानच्या सुलतांनाकडून त्याच्या राज्याभिषेकची परवानगी आणायला आपले वकील पाठवले होते. ४ जहाजं भरून लोक निघाले. त्यात राजदूत होते, अनेक भेटवस्तू होत्या. सर्वजण मस्कतला पोचले. तिथल्या इमामाने त्यांचा भावी सत्कार केला. मग सर्वजण गलबताने अब्बासला पोचले. ऑगस्ट महिन्यात बसरा गाठलं. तिथल्या बंदरात एक दुर्घटना घडली. टिपूचं एक जहाज जळून खाक झालं. त्यात ७०लोक मेले, २ हत्ती जळले, २ चांदीचे हौदे, १ पालखी, ८० मण चंदन, जाळून खाक झालं. सुदैवाने राजदूत जीवंत राहिले. पुढचा प्रवास परत सुरू झाला. मोसूल वरुन सगळे कॉंस्टंटिनोपलला पोचले. युध्दात अडकल्यामुळे  सुलतान भेटला नाही पण त्याने मान्यता दिली हे लगेच मैसूरला कळवण्यात आल्यावर टिपू सुलतानाने राज्याभिषेक करून घ्यायचं ठरवलं आणि समारंभ पार पडला.

## कॉर्नवॉलिसचं भारतात आगमन.

पुढचा २ / ३ वर्षांचा काल काळे ढग जमा करणारा येणार होता. १२ ऑगस्ट १७८६ या दिवशी मैसूर साम्राज्याच्या राशीतील वक्र ग्रह मद्रासच्या बंदरावर उतरला. त्याचं नाव कॉर्नवॉलीस. गव्हर्नर जनरल आणि कमांडर इन चीफ ही दोन्ही पदं सांभाळण्यासाठी इंग्लंडने त्याला भारतात पाठवलं. भारत जिंकून साम्राज्यवादी होण्याची आस इंग्लंडला लागली होती. सप्टेंबरमध्ये कलकत्याला पोचल्याबरोबर त्याने वेळ न दवडता आपल्या व्यूह रचनेला सुरुवात केली. आधी ब्रिटीशांच्या भारतातील कारभारावर शिस्त लागू केली. सैन्यात सुधारणा केली. मग दक्षिणेतील पाळेगार, मैसूरचं राजघराणं, गनिमीकावा आणि चपळ घोड्यांची आपली तूट भरून काढणारे मराठे आणि आपल्याविरुध्द जाऊ नये म्हणून निजाम, अशी टिपू सुलातानाविरुद्धाच्या सर्वांशी बोलणी करून त्यांच्याशी तह करून तो दक्षिण स्वारीला स्वत: मद्रासमध्ये दाखल झाला. सुलतानही आपल्या साम्राज्याच्या संरक्षणासाठी सिध्द झाला. आपण एकटे आणि आपल्याविरुध्द सारा भारत ही त्याला जाणीव होती. जगाचं राजकारण खेळलेला, लष्कराचे डावपेच आखलेल्या, मुरब्बी राजकारणपटू, ग. ज. कॉर्नवॉलीस

याच्याशी गाठ आहे हेही त्याला माहीत होतं. त्याचा सारा भार फ्रेंचांच्या मदतीवर होता, पण तिथे त्याचं दुर्दैव आड आलं. फ्रान्समध्ये तेव्हाच क्रांतीचे वारे वाहायला लागले होते, फ्रान्सच्या राजाची सत्ता घसरणीला लागण्याचा काल आला होता. नेपोलियन नावाचं नवीन महत्वाकांक्षी नेतृत्व उदयाला येत होतं. पण नेपोलियनला तेव्हा भारतचं राजकारण खेळायला फुरसत नव्हती. भारतातील राजकारणावर त्याचा परिणाम झाला. मैसूरचा वाघ एकटा पडला. चहूबाजूंनी सुलतान घेरला गेला. पुण्याहून मराठ्यांची फौज, निजामाची फौज, इंग्रज फौज सारे एक झाले. सुलतानाचा पराभव अटळ होता. शत्रू एकेक परगणे जिंकत चालला. सुलतानाच्या गळ्याभोवतीचा फास आवळत गेला. ९१ साल जागोजागच्या लढायांमध्ये  संपलं. शत्रू श्रीरंगपट्टण जवळ पोचला.

## कॉर्नवॉलीसची चढाई. तह – फेब्रुवारी १७९२.

इ. सन १७९२. फेब्रुवारीचा महिना. श्रीरंगपट्टण राजधानीवरच इंग्रजांचा हल्ला झाला. टिपू सुलतान किल्ल्यावरून देखरेख करायला लागला. पराभव होणार हे दिसतच होतं. त्याने युद्धबंदीचा प्रस्ताव ग. ज. कॉर्नवॉलीसकडे पाठवला. शरणागत झाल्यामुळे सुलतानाला तह मान्य करावा लागला. तीन शत्रुंसाठी ३ कोटी ३० लाख रोख, आणि आणि मराठे-निजाम-इंग्रजांच्या हद्दीजवळच्या प्रदेश असं अर्ध राज्य कबूल करावं लागलं. त्याची फेड होईपर्यंत त्याचे दोन पुत्र ओलीस ठेवण्याचं कलमही मान्य करावं लागलं. युध्द संपलं. सुलतान मराठ्यांचे सेनापती हरिपंत फडके यांच्या शामियानात गेला. आपला खरा शत्रू इंग्रज आहे, आपण एकमेकांच्यात लढतो आहोत, हे त्यांना सांगून आला. मैसूरचं समृध्द साम्राज्य, अर्धमेलं, खिळखिळं झालं. इंग्लंडची साम्राज्याकडे वाटचाल सुरु झाली आहे हे महादजी शिंदेंनी ओळखलं, नाना फडणीसांनी ओळखलं, निजामाने ओळखलं होतं. म्हणूनच त्यांना टिपू सुलतानाला संपवायचं नव्हतं पण त्याचा जोर मात्र कमी करायचा होता. त्यासाठीच त्यांनी इंग्रजांना साथ दिली होती..निजाम आणि मराठ्यांमध्ये तसाच गुप्त करार झाला

होता. इंग्रजांशी समर्थपणे लढेल तर तो सुलतानच, हेही सत्य निजाम आणि मराठे यांना चांगलंच माहीत होतं.

## वोडीयारचा मृत्यू – इ. सन १७९६.

इ. सन १७९६ साल. खासा चामराज वोडीयारचा देवी येऊन मृत्यू झाला. त्याचा मुलगा खूप लहान ३ वर्षांचा होता. पण टिपू सुलतानने मैसूरचं सिंहासन रिकामं ठेवलं. त्यावर खासा चामराजाच्या मुलाला बसवलं नाही. उलट राणी, ते बालक यांना राजप्रासादात बंदूकधाऱ्यांच्या गराड्यात ठेवलं. एवढंच नव्हे तर त्या बंदिवान केलेल्या सर्वांचे अलंकार काढून घेतले. त्यावेळी इतकी बळजबरी सुलतानाच्या लोकांनी केली की आपल्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून घेतांना ते ३ वर्षाचं मूल रडायला लागलं. महाराणी लक्ष्मणीअम्मा तरीही निराश झाली नाही. सुलातानाविरुध्ह तिने लढ्याचा निर्धार कायम ठेवला होता.

## रिचर्ड वेलस्ली गव्हर्नर जनरल -

कॉर्नवॉलीसची मुदत संपली. १७९७ साल उजाडलं. त्याच्या जागी रिचर्ड वेलस्ली आला तो शेवटचा घाव घालून भारतीय साम्राज्य जिंकण्यासाठीच. तोपर्यंत फ्रान्सच्या नेपोलीयनशीसुद्धा इंग्रजांचं  लढणं चालू होतं. हिकमती डावपेच, जबर महत्वाकांक्षा, चपळ-अकस्मात लष्करी हालचाली यामुळे इंग्रजांसाठी नेपोलियन हा युरोपातील पहिल्या क्रमांकाचा

शत्रू बनला होता. त्याची साथ टिपू सुलतानाला मिळाली तर आपलं स्वप्न भंगणार आणि भारतीय साम्राज्य आपण घालवून बसणार हे इंग्लंड सरकार पुरतं जाणून होतं. टिपू सुलतानाला नेपोलीयनची मदत मिळू नये यासाठी इंग्रज रणनीती आखत होते. १८ जून १७९८ ला ग. ज. रिचर्ड वेलस्लीला टिपू सुलतानाचे २ राजदूत फ्रान्सला जाऊन आपल्याला घालवून देण्यासाठी मदतीची बोलणी करत आहेत, हे समजलं होतं. त्यांचा तिथे जाहीर सत्कार झाला ही बातमी आली. यामुळे टिपूची ताकद वाढणार आणि आपल्याला धोका उत्पन्न होणार हे इंग्रजांनी ओळखलं. कारण फ्रेंच सैनिकांना सुलतानाच्या फौजेत घेण्याबद्दल त्यात मान्यता होती. यावरून सुलतानाची अशी फ्रेंच फौज जमवणं हे युद्धाला

आमंत्रण देणं आहे अशा मजकूराची ग. जनरलची कलकत्त्याहून टिपू सुलतानाला पत्रे जाऊ लागली. त्याला उत्तर म्हणून सुलतान मैत्रीचं हात पुढे करत होता. दुसरीकडे फ्रेंच फौज मंगलोरवर उतरत होती.

पण ग.जनरल वेलस्ली आता मद्रासला फौज गोळा करण्याच्या निर्णयाप्रत आला होता. २० जून १७९८ ला त्याने मद्रासचा गव्हर्नरला फौज गोळा करण्याचा आदेश कळवला. लेफ्टनंट जनरल हॅरीसला सेनापती करण्यात आलं. फौज गोळा करण्याचा आदेश देणारं त्याचं दुसरं पत्र बॉंबेच्या ऑफिसला पाठवलं. हैद्राबादच्या निजामाशी मैत्रीकरार करण्याची जबाबदारी कॅप्टन कर्कपॅट्रीकवर सोपवली. इंग्रजांच्या सुदैवाने तेव्हाच निजामाच्या दरबारातील फ्रेंच राजदूत मरण पावला होता आणि इंग्रजांनी त्याचा ताबा घेतला होता. पुणे दरबाराशीही बोलणी करण्यात आली. मुंबईच्या फौजेला मलबारवर गोळा होण्याचा हुकूम झाला. कर्नल मॉंटेग्यूच्या हाताखाली बंगालची नेटिव्ह शिपायांची फौज मद्रासकडे चालायला लागली. इंग्रजांच्या फौजेसाठी मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची रसद साठवण्यात आली.

ही तयारी चालू असतांना टिपू सुलतानाकडून मैत्रीची, तहाची बोलणी करण्याचं पत्र मद्रासला येऊन पोचलं. ते ग. जनरलकडे कलकत्त्याला २५ डिसेंबरला पोचलं. ९ जानेवारी १७९९ ला ग. जनरलने त्यावर सुलतानाला पत्र लिहून एक दिवसात उत्तर पाठवण्याची सूचना केली. पण सुलतानाकडून काहीच उत्तर आलं नाही. इंग्रजांचा प्रतिनिधी त्याच्या दरबारात घेण्याचाही सुलतानने विरोध केला होता. टिपू सुलतानाविरुद्ध युध्द नियतीलाही ते मंजूर असावं म्हणूनच नेपोलियन ईजिप्तच्या स्वारीवर असतांना त्याने कैरोहून टिपू सुलतानाला आणि मक्केच्या शेरीफला पाठवलेलं पत्र जेड्डा इथे इंग्रजांच्या हाती लागलं. नेपोलियनची मदत टिपू सुलतानला मिळू नये म्हणून इंग्रजांनी सुलतानाला ते पत्र मिळू दिलंच नाही. याबद्दल आणखी एक प्रवाद आहे.

मैसूरचा इतिहास लिहिणारे थोर इतिहासकार विल्क्स यांनी लिहिलेल्या मैसूरच्या इतिहासात, नेपोलियनचा टिपू सुलतानाशी झालेला आधीचा पत्रव्यवहार ऐतिहासिक कागदपत्रात सापडला नाही असं लिहिलं आहे. पण नेपोलियन याने टिपू सुलतानाला लिहिलेल्या पत्राचा फ्रेंच भाषेतील मजकूर तळटीपेत छापला आहे.

त्याच पत्राबद्दल ‘’ हिस्टरी ऑफ मैसूर अँड यादवा डायनास्टी ‘’ चे लेखक जोस्येर हे इतिहासकार म्हणतात की नेपोलियनचं पत्र

सुलतानाला मैसूरला मिळालं होतं. लक्ष्मणीअम्मानी महाराणीला जेव्हा नेपोलियनकडून पत्र आलंय अशी कुणकुण लागली तेव्हा तिने त्या पत्राची प्रत मिळवली. राजघराण्याच्या निष्ठेचे लोक अजूनही सेवेत होतेच. त्यांनी त्या पत्राची प्रत राणीला दिल्यावर तिने ते पत्र तिचा इंग्रजांकडील प्रतिनिधी तिरुमलरावकडे मद्रासला पाठवलं. त्याने ते गव्हर्नरला दिलं. जनरल हॅरिसने ते पत्र कलकत्त्याला ग. जनरलकडे आणि इंग्लंडला पाठवलं. हे पत्र इंग्रजी भाषेतील आहे.

## गव्हर्नर जनरल वेलस्लीचा शेवटचा घाव- इंग्रजांशी युध्द .

ग. जनरलने आता युद्धाचा शंख फुंकण्याचं नक्की केलं. ९ फेब्रुवारीला ले.ज. हॅरीसला वेल्लोरवरून मैसूर राज्यात आणि ले. ज. स्टुअर्टला मलबारवर शिरण्याचे हुकूम गेले. दक्षिणेकडून बारामहालच्या मैसूर सीमेवरून, पूर्वेला मद्रासकडून, पश्चिमेला मलबारवरून सुलतानाच्या राज्याभोवती फास आवळला गेला. १५ मार्च १७९९ यादिवशी इंग्रजी फौज मैसूरच्या हद्दीत शिरली. मुंबई इंग्रजांची फौजही त्यांना येऊन मिळाली. निजामाची सेना मीर आलम बहादूरच्या हाताशी होतीच. मैसूरच्या वाघाची शिकार करायला इंग्रजांची सेना मैसूर राज्याकडे चालायला लागली.

या सर्वांशी फ्रेंचांच्या मदतीने एकट्याच्या शौर्यावर लढण्यास सुलतान तयार झाला. त्याच्या पराक्रमाला तोड नव्हती. ठिकठिकाणी युद्धाच्या ठिणग्या उडायला लागल्या. दोन्ही पक्ष हारजीत अनुभवायला लागले. मळवल्लीच्या लढाईने उग्र रूप धारण केलं. इंग्रजी फौजा पुढे पुढे सरकायला लागल्या. साल १७९९ च्या १ एप्रिलला श्रीरंगपट्टणपासून १३ मैलांवर आणि २ एप्रिलला इंग्रजी फौजा श्रीरंगपट्टणपासून २ मैलांवर येऊ पोचल्या.

करीघट्टा टेकडी इंग्रजांनी व्यापली. पूर्वेची शेरगंजकडची चौकी इंग्रजांनी घेतली. ४ एप्रिलला डावीकडून येणाऱ्या फौजा सुलतानाला दिसल्या. सुलतानाच्या रॉकेटचा त्यांच्यावर मारा चालू होता. आजूबाजूची खेडी जळत होती. ती खेडी उजाड झाली होती. नागरिक पळून गेले होते. इंग्रजांच्या जनावरांना चारा मिळू नये म्हणून कुरणं जाळून नष्ट केली होती. महिना उजाडला. किल्ल्याभोवती इंग्रजी फौजेचा लगेच फास आवळला गेला.पराभव समोर दिसायला लागल्यावर सुलातानाकडून ज. हॅरीसकडे तहाचा प्रस्ताव आला. पण हॅरीसला कलकत्त्याहून सक्त ताकीद होती की त्याने टिपू सुलतानाबरोबर काहीही बोलणी करायची नाहीत. कारण आता इंग्रजांना राज्यच घशात घालायचं होतं. श्रीरंगपट्टण किल्ल्याच्या तटबंदी तोफांच्या हल्ल्यात फुटू लागल्या. सुलतान रातोरात ते बांधायला लागला. खंदक-कोट ढासळू लागले.

# टिपू सुलतानाला वीरगती- ४ मे १७९९.

३ मे – राजधानीचा अंतकाळ जवळ आला होता. वैऱ्याची रात्र उजाडली होती. शत्रूला किल्याजवळ एक आत जायची फट सापडली. त्या बाजूच्या पडलेल्या भिंतींचं बांधकाम तसाच अर्धवट राहून गेलं होतं. शत्रूचा मार्ग सोपा झाला. त्या जागेवर बॅटरी उभारून चढून जायला शिड्या मागवण्यात आल्या. रात्रीच्या काळोखात त्या गोळा झाल्या. दुसरे दिवशी किल्ल्यावर हल्ला करण्याचं निश्चित झालं. मे. ज. बेअर्डच्या हाताखालची २४९४ युरोपियन आणि १८८२ नेटिव्ह फौज कावेरी ओलांडून रात्री किल्ल्याजवळ येऊन थांबली. बंदुका-गोळे लढाईची सर्व सामग्री गोळा झाली.

४ मे उजाडला. इंग्रज फौज सकाळी हल्ला करणार ही बातमी सुलतानाला मिळाली होती पण त्याला खरी वाटली नाही. दक्षिणेकडील बुरुजावरचा सय्यद गफूर हा सुलतानाचं अत्यंत विश्वासू इंग्रजांच्या तोफगोळ्याचा पहिला बळी ठरला. तो तटबंदीवरून खाली पडतांना मेजर डॅलसने त्याला ओळखलं. ‘ सैद साहेब ‘ तो एकदम उद्गारला. तुला काय माहीत ? सय्यद गफूरने अशक्त आवाजात विचारलं...मी मंगलोर लढाईच्या वेळी तुम्हाला

पाहिलं होतं. मेजर उत्तरला. मग सुलतान किल्ल्यात आहे की कुठे आहे हे त्याला इंग्रज अधिकारी विचारत राहिले. मरतामरता त्याने सुलतान राजवाड्यातच

असल्याचं खोटंच सांगितलं आणि प्राण सोडला.

तोपर्यंत आपलं भविष्य ओळखलेले आणि आजवरच्या सुलतानाच्या वागणुकीला कंटाळलेले, दुखावलेले, सुलतानाचे जवळचे सहकारीही सुलतानाला सोडून इंग्रजांच्या पक्षात गेले होते. त्यांना आपल्या सुलतानाचा पराभव स्पष्ट दिसत होता. तेच फितूर झाले. शहरात लढाईला तोंड फुटलं. जोरदार धुमश्चक्री सुरु झाली. किल्ल्याच्या तटबंदीवरून तो लढाईवर देखरेख करत होता. तिथून आपल्या ब्लंडरबस बंदूकीने गोळया झाडून सैनिक मारत होता. एवढ्यात त्याचा अत्यंत विश्वासू सरदार सैद गफूरच्या मृत्यूची बातमी मिळाल्यावर तिथे मीर कासीमची नेमणूक करून तो जेवायला आला. दुपारी जेवणाची वेळ झाली. सुलतान जेवायला बसला इतक्यात शत्रू आत किल्ल्यात घुसल्याची बातमी त्याला मिळाली. जेवण अर्धवट टाकून तो तसाच उठला. लढायला बाहेर पडला. त्याचा अंगरक्षक राजनखान त्याच्याबरोबर सावलीसारखा निघाला. टिपू सुलतान घोड्यावर बसला. शत्रूचे लोंढे अंगावर यायला लागले होते. मग तो वॉटर गेटकडे वळला. पण तिथला

दरवाजा मीर कासीमने उघडलाच नाही. त्यामुळे परत किल्ल्याकडे वळला. अंगावर येऊन आदळलेल्या इंग्रजी फौजेशी लढत असतांनाच एका इंग्रजी सैनिकाची गोळी त्याच्या शरीरात घुसली. पाठोपाठ आणखी दोन गोळ्या शिरल्या. राजनखान घोड्यावर बसलेल्या सुलतानाचा पाय रिकीबीतून बाहेर काढत असतांनाच गोळ्या लागल्यामुळे सुलतान घोडा आणि राजनखान तिघेही जमिनीवर कोसळले. सुलतानाच्या सहकाऱ्यांनी जखमी सुलतानाला पालखीत बसवलं. अर्धमेल्या अवस्थेत सुलतान पडून राहिला. इतक्यात त्याच्या हातातील रत्नजडीत तलवार पाहून दोन इंग्रज त्याच्याजवळून ती हिसकवायला आले. त्याही जखमी अवस्थेत सुलतानने तलवार चालवली आणि एकाला ठार केलं. तेवढ्यात दुसऱ्याने गोळी झाडली ती त्याच्या कपाळातून शिरली आणि गालात जाऊन अडकली. सुलतान गतप्राण झाला. अनेक शवांमध्ये त्याचंही शव पडलं.

**४ मे १७९९. दुपारी २ वाजता सुलतानाच्या वीरमरणाने लढाई संपली**. त्यादिवशी सकाळी त्याच्या ज्योतिषांनी त्याला सांगितलं होतं की दुपारी २ वाजेपर्यंतची काळ अत्यंत अशुभ आहे. त्यानंतर यश मिळेल. पण शत्रू जिंकला होता. दुपारी दोन वाजता मैसूरचा वाघ इंग्रजांची शिकार झाला. इंग्रजांनी तिन्हीसांजेच्या अंधारात शवांच्या खच पडलेल्या ढिगाऱ्यातून सुलतानाचा घोडा

आणि शव शोधून काढलं. सुलतानाचा मरणपंथाला लागलेला अंगरक्षक राजनखान सापडला. त्याने हाताने खूण करून टिपू पडलेली जागा दाखवली. सुलतानाचा देह त्याच्या प्रासादात नेण्यात आला. बकरीच्या काळजाने २०० वर्षे जगण्यापेक्षा वाघासारखं २ दिवस जगणं योग्य म्हणणारा टिपू सुलतान निश्चेष्ट पडला होता. नव्हे, भारताचं स्वातंत्र्य संपलं होतं. पुढच्या शतकात इंग्रजांना घालवण्यासाठी अनेकांनी प्राण दिले. टिपू सुलतान हा पहिला बळी होता. भारतावर मुसलमान आणि इंग्रज दोघांनीही राज्य केलं. पण मुसलमान राज्यकर्ते इथल्या मातीत मिसळले. अफगाणिस्तान- तुर्कस्थान देशात दौलत नेऊन ते समृध्द केले नाहीत. इंग्रजांनी सर्व भारतीय संस्थानिकांची दौलत स्वदेशात नेली. राजघराण्याचे पॅलेस सजवले. टिपू सुलतानाही आपला पराभव दिसल्यावर आपली अमाप दौलत गुंडाळून स्वदेशात निघून गेला नाही, मैसूरला आपली मायभूमी समजला हा या दोन परकीय राजकारण्यांचा फरक.

मैसूर पडलं. इंग्रजांच्या विजयी मदहोश सैनिकांकडून लुटालूट, जाळपोळ सुरु झाली, प्रचंड कापाकापी झाली. घरं, पापभीरू नागरिक लुटले गेले. स्त्रियांवर अत्याचार झाले. अमानुष अत्याचाराने हैदोस घातला. टिपूने बहरवलेल्या बागा जाळून खाक झाल्या. शहर आगीत धुमसत राहिलं. मैसूरची समृद्धी नागवली

जात होती. राजवाडा लुटला गेला. खजिन्याचे पेटारे, सुवर्ण मोहरा, अमूल्य, अलंकार हातोहात गायब झाले. मग आर्थर वेलस्लीने परिस्थिती काबूत आणली. टिपूचं सोन्याचं सिंहासन, हजारो किलो चांदी, सोनं, रत्नजडीत तलवारी, त्याची लायब्ररी, अमुल्य वस्तू इंग्लंडला गेलं. मानव दानव झाला. टिपू सुलतानाने मैसूर राज्य वाचवण्यासाठी कडवी झुंज दिली.

मैसूरचा वोडीयार घराण्यावरचा मुसलमानी पाश सुटला. सुलतानाच्या वीरगती मिळाल्याची खबर नाना फडणीसांना मिळाली आणि सबंध भारतभर आता इंग्रजच बळावणार हे पुण्यात नाना फडणीसांनाही कळून चुकलं. सुलतानसाहेब जितके जगातील तितके दिवस स्वराज्य टिकेल हे नाना फडणीसांना माहीत होतं. ५ मे, दुसरे दिवशी सुलतानाचा दफन विधी झाला. दुपारी ४.३० वाजता अंत्ययात्रेला सुरुवात झाली. हजारो लोकांच्या मिरवणुकीने हैदरअलीच्या कबरीशेजारी संपूर्ण शाही इतमामाने दफन विधी पार पडला. त्यावेळी विजांचा कडकडाट आणि धोधो पावसाला सुरुवात झाली. टिपू सुलतान कबरीत विसावला.

मैसूर राज्य वाचवण्यासाठी बलाढ्य इंग्रजांना तेवढ्याच ताकदीने लढा दिला. सन १७०४ नंतर वोडियार घराण्यात समर्थ राजा जन्माला नव्हता. त्यामुळे चिक्क देवरायनंतर सर्वाधिकारी,

दलवाई, अशा देवराजैया, नंजराजैया, करचुरी नंजराजैया, हैदर आली आणि टिपू सुलतानाने राज्याचा कारभार चालवला. राजी समृद्धीकडे नेलं. पण टिपू सुलतानाचं राजकरण जागतिक पातळीवर झालं. त्याने पर्शिया, तुर्कस्थानच्या सुलतानांकडे आणि नेपोलियनकडे लष्करी मदत मागितली. इंग्रज-मराठे-निजाम यांनी एकत्र येऊन पराभव केल्यावर हरिपान्त फडक्यांच्या डेऱ्यात जाऊन त्यांची भेट घेतली आणि इंग्रज हाच आपला खरा शत्रू आहे हे बजावून सांगितलं.

**ज्या मातीत जन्माला त्या मातीच्या रक्षणासाठी प्राण दिला. इंग्रजांना घालवण्याची मशाल पेटवली आणि त्याने आपला प्राण देऊन ज्वलंत ठेवली. तीच पुढे भगतसिंगपर्यंत अनेकांनी तेवत ठेवली. विझू दिली नाही. त्यासाठी काहींनी काळ्या पाण्याची शिक्षा भोगली, तुरुंगवास भोगला. वीरमरण पत्करलं. एक खगोलशास्त्राचा अभ्यासक, युद्धशास्त्राचा वाकबगार, सुलेखन कलेतील माहीतगार, वैद्यक शास्त्राचा जाणकार, रॉकेटचा जनक, व्यापार आणि उद्योगांचा पुरस्कर्ता, इतिहासाचा धर्मशास्त्राचा उपासक, वनस्पति-फळे-फुले यांचा शौकीन, बोटात कायम राम नावाची अंगठी घालणारा असा हा बेडर सुलतान भारतासाठी शहीद झाला.**

## वोडीयार घराण्याची पुनर्स्थापना – ३० जून १७९९.

आता ग. ज. वेलस्लीची जबाबदारी होती ती वोडीयार राजघराण्याला राजप्रासादात परत मसनदीवर बसवायची.

राज्याची वाटणी करायची आणि कारभाराची व्यवस्था लावायची. त्याप्रमाणे त्याने ४ जूनला एक कमिशन – समिति स्थापन केली. त्यात त्याचे दोन्ही भाऊ आर्थर आणि हेनरी वेलस्ली, जनरल हॅरिस, ले. कर्नल बॅरी क्लोज, ले. क. कर्क पॅट्रीक,यांच्यावर मुलुखाच्या वाटणीची जबाबदारी सोपवली. टिपू सुलतानाच्या मुलांना वेल्लोर इथे कायम वास्तव्यासाठी पाठवलं. २२ जूनला निजामाबरोबरचे करार पूर्ण केले. २५ जूनला या प्रादेशिक विभागणीची आणि वोडीयार घराण्याच्या स्थापनेची घोषणा केली. मग राजघराण्याची व्यवस्था हाती घेतली. लेफ्टनंट कर्नल क्लोज याची इंग्रजी सरकारचे रेसिडेंट म्हणून दरबारात नेमणूक केली. हैदरअलीच्या कारकीर्दीपासून दिवाणपदावर असलेल्या पुर्णैय्याची त्याच पदावर परत स्थापना केली. कर्नल आर्थर वेलस्लीला मैसूरमधील सैन्याचा कमांडर म्हणून नियुक्त केलं. २६ जून यादिवशी वोडीयार घराण्याबरोबर सारे करार पार

पडले. करारावर महाराणी आणि पुर्णैय्या यांनी सह्या केल्या. महाराणी लक्ष्मणीअम्मांणी यांना इंग्रजांशी गुप्तपणे बोलणी करण्यात मदत करणारा तंजावरचा तिरूमलराव याला मोठी पेन्शन दिली मात्र दरबारातील कोणतेही महत्वाचं पद दिलं नाही. तो मग मद्रासमध्येच जाऊन राहिला आणि तिथेच १८१५ साली वारला. ज्या दिवशी टिपू निधन पावला आणि वोडीयार घराण्याची स्थापना होणार हे लक्षात आलं तेव्हा राज्यात सर्व मोठ्या पदांवर मुसलमानांची नेमणूक असल्याने टिपूचा मुलगा गादीवर बसवावा अशी सूचना पुर्णैय्याने केली, पण वेलस्लीने ते ऐकलं नाही. दुसरीकडे इंग्रजांशी गुप्तपणे संधान बांधून महाराणीला मदत करणाऱ्या तिरूमलराव यालाही दिवाणपदावर नेमलं नाही. राज्याभिषेक सोहळा होईपर्यंत तिरूमलरावला मद्रासमधेच अडकवून ठेवलं.

नवीन राज्याभिषेकासाठी राजघराण्यातील ५ वर्षांचा स्वर्गवासी वोडीयारचाच पुत्र निवडला गेला. ३० जून या शुभ दिवशी शुभ मुहूर्त पाहून सिंहासनावर नवीन राजाला विधिवत बसवण्याचा समारंभ पार पडला. हा राज्याभिषेक समारंभ मैसूरमध्ये साजरा झाला. श्रीरंगपट्टण लढाईमुळे उध्वस्त झालं होतं. त्यासाठी मैसूरच्या लक्ष्मीनारायण मंदिराजवळ भव्य, मोठा, शाही इतमामाला शोभेल असा सजवलेला शामियाना उभारण्यात आला.

समारंभासाठी खास प्रतिष्ठित, दरबारी लोकांना आमंत्रण देण्यात आलं. जनरल हॅरिस घोडदळाच्या मिरवणुकीने समारंभपूर्वक तिथे आला. वोडीयार घराण्याच्या नवीन वारसाला कृष्णराज वोडियार तृतीय याला समारंभपूर्वक हॅरिसने सिंहासनावर बसवलं. नंतर नवीन राजाला तोफांची सलामी देण्यात आली. वोडीयार राजाला प्रतिवर्षी १३, ७४,०७६ रुपयांचा वसूल असलेला प्रदेश देण्यात आला. ४० वर्षे झगडणाऱ्या लक्ष्मणीअम्मांणी यांना अखेर यश मिळालं. राजलक्ष्मीने आपली वरमाला परत वोडीयार घराण्यात घातली. ती त्यांच्या प्रासादात आली.

इंग्लंडहून पंतप्रधान डंडाज याने आपला आदेश दिला होता की मैसूरला राजघराण्याची स्थापना न करता सर्व राज्य खालसा करावं आणि निजामाला एक इंच प्रदेशही देऊ नये. पण रिचर्ड वेलस्लीने हा हुकूम मानला नाही. वोडीयार घराण्याची परत स्थापना करून त्यांना त्यांचा मूळ प्रदेश परत केला आणि उरलेला मुलुख निजामाबरोबर वाटून घेतला. कारण गव्हर्नर जनरलला भविष्यात देश चालवायचा तर दक्षिणेत शांतता हवी होती. मराठ्यांनी या लढाईत भाग घेतला नव्हता तरी त्यांना काही प्रदेश देऊ केला पण नाना फडणीसांनी मुत्सद्दीपणाने तो नाकारला. कारण मग पुणे दरबार इंग्रजांच्या प्रभावाखाली गेला असता.

## दिवाण पूर्णैया.



वोडीयार-हैदर-टिपू-आणि इंग्रजांच्या हाताखाली मैसूरच्या बदलत्या राजवटीच्या काळात दुसऱ्या क्रमांकावर कायम

राहिलेला, आणि प्रत्यक्षात कारभार आणि आर्थिक नाड्या हातात असलेला पुर्णैय्या हा दिवाण, असाधारण चातुर्याचं, राजकारणाचे बदलते वारे ओळखणाऱ्या मुरब्बी राजनीतीचं, सत्ताधीशाच्या विश्वासाच्या पात्रतेचं, आणि असाधारण बुद्धिमत्तेच एक प्रखर व्यक्तिमत्व होऊन गेलं. इ. सन १७४६ साली कोइम्बत्तुरमध्ये एका ब्राह्मण घराण्यात याचा जन्म झाला. वयाच्या ११ व्या वर्षी वडील वारले तेव्हा अर्थार्जनासाठी एका व्यापाऱ्याकडे हिशेब मांडायचं काम तो करू लागला. जमाखर्चाच्या विषयातील त्याची अफाट गती, सुंदर हस्ताक्षर यामुळे तो मोठेमोठे हिशेब लीलया सांभाळू लागला. त्यामुळे व्यापाऱ्याच्या विश्वासाला पात्र ठरला. हा व्यापारी हैदरअलीच्या राजप्रासादात आणि लष्कराला धान्य पुरवठा करणाऱ्या आनंद शेट्टी नावाच्या मोठ्या व्यापाऱ्याला ओळखत होता. त्याच्यामुळे आपल्या मालकामार्फत पुर्णैय्याची हैदर अलीची ओळख झाली.

हैदरअलीसारख्या जवाहिऱ्याने या हिऱ्याचं मोल लगेच जाणलं आणि पुर्णैयाला आपल्या सेवेत घेतलं. हैदरसारख्या कावेबाज सत्ताधीशाचा विश्वास मिळवून अल्पावधीत पुर्णैयाने कारभारातील अत्यंत वरची पातळी गाठली. हैदरचा विश्वास मिळवल्यामुळे अर्थखातं, दरबारचा कारभार याच्या हाती आला. विलक्षण स्मरणशक्ती, संस्कृत, कन्नड आणि फारसी भाषेवरचं

प्रभुत्व हे त्याचे अंगभूत गुण त्याला कारभारात उपयोगी पडत. शिवाय त्याला लष्करी शिक्षणही उत्तम प्रकारे मिळालं होतं, त्यामुळे लष्करी डावपेचाताही तो हुशार होता. हैदरचा तोफखाना आणि टिपू सुलतानाचं रॉकेट खातं याने संभाळल होतं. टिपू सुलतान मंगलोरहून येईपर्यंत हैदरअलीच्या मृत्यूची गुप्तता राखणं, तेवढ्या काळात फ्रेंचांच्या मदतीने टिपू सुलतानाच्या चुलत भावांनी केलेलं बंड मोडून काढणं आणि टिपू सुलतानाला कारभारात पूर्ण सहकार्य देणं यामुळे तो टिपू सुलतानाच्या काळातही दिवाणपदावर राहिला. उघड्या डोळ्यांनी आणि मिटलेल्या ओठांनी त्याने वोडीयार - हैदर - टिपू हे तीनही सत्ताधीश फार जवळून पाहिले. सुलतानाच्या मुलांना त्याच्याच हाताखाली शिक्षणाचे संस्कार झाले. आणि शेवटी सुलतानाच्या पराभवाची पाऊलं जोखलेला आणि काळाची पाऊलं ओळखणारा हा मुरब्बी चतुर मुत्सद्दी, नंतर वोडीयार घराण्याचाही दिवाण बनला. महाराणीने खुशीने त्याला स्वीकारलं आणि या नवीन, बालवयातील वोडीयारच्या शिक्षणाचीही जबाबदारी त्याच्यावरच सोपवली. पुर्णैय्याने तेही पद राजघराण्याच्या अत्यंत विश्वासाने पार पाडलं. इंग्रजांचाही त्याचावरच विश्वास बसला. तरीसुद्धा पुर्णैय्याने टिपू सुलतानाच्या मृत्युनंतर नवीन राजवटीसाठी टिपू सुलतानाच्या मुलांची इंग्रजांकडे शिफारस केली, ते अनाकलनीय आहे. वोडीयार

घराणं सत्तेत आलं तर महाराणीचा विश्वासू कारभारी तिरूमलराव दिवाण होणार हे त्याला पूर्णपणे अवगत होतं. एकतर दिवाणी त्याच्याचकडे राहावी हा हेतू होता की सुलतानाचा वंश संपला की सारी दौलत इंग्रज लुटून नेतील ती वाचवण्याचा हेतू होता, हे कळायला मार्ग नाही.

पुर्णैय्या हा हैदर आणि टिपू सुलतान यांच्या राजनीतीतील भेदावरचा बोलका साक्षीदार आहे. पाताळयंत्री, कावेबाज, प्रचंड शारीरिक आणि मानसिक ताकद असलेला, लष्करी डावपेचातील निपुण असलेल्या हैदरचा विश्वास मिळवणं ही सोपी गोष्ट नव्हती. हैदरच्या मृत्युनंतर बापापेक्षा जास्त आक्रमक आणि जास्त कडवा टिपू, सुलतान बनल्यावर त्याचाही कारभार पुर्णैय्याच्याच हाती राहिला. पण त्याच्या उग्र प्रवृत्तीतील दोष त्याचा विनाशाला कारण ठरत आहेत हे वारे उमगल्यावर त्याने आणि सुलतानाच्या अनेक साथीदारांनी टिपू सुलतानाची साथ सोडली आणि इंग्रजांना सामील झाले. हा दोन्ही पिता पुत्रांच्या राजनीतीतील भेद कळतो. पुण्याचा कारभार समर्थपणे हाताळणारे कारभारी नाना फडणीस हेही पुर्णैय्यांचे समवयस्क. त्यांनीही माधवराव पेशवा, सवाई माधवराव पेशवा, दुसरा बाजीराव पेशवा हे तीन सत्ताधारी सांभाळले. इंग्रजांशी लढण्याचं मोठं राजकारण खेळले. नाना फडणीस, ज्यांच्या जाण्याने राज्यातील चातुर्य संपलं असे इंग्रजांनी उद्गार

काढावेत असे हे दोन कारभारी एकाच काळात भारतीय राजकारणावर आपला प्रभाव टाकून गेले.

इ. सन १७६० सालापासून संकटात सापडलेलं, पदच्युत झालेलं वोडीयार घराणं ३९ वर्षांनी शांततेत पुन्हा राजप्रासादात स्थिरावलं. पण आता ते इंग्रजांच्या ताब्यात गेलं. १८ व्या शतकातील त्याकाळच्या मैसूर आणि पुणे या दक्षिणेतील दोन प्रबळ राज्यांच्या राजकीय परिस्थितीचं आता सिंहावलोकन करताना वाटतं की मैसूर राज्य कधीच इंग्रज किंवा फ्रेंचांच्या ताब्यात गेलं असतं. हैदर अलीच्या आणि टिपू सुलतानाच्या अफाट पराक्रमामुळे ते संकट लांबलं.

पुणे दरबारात माधवराव पेशव्यांनीही फ्रेंचांच्या मदतीने इंग्रजांचा काटा काढायचा हीच नीती स्वीकारली होती. त्यासाठी माधवराव वासुदेव यांना नेमलंही होतं. पण अल्प आयुष्यामुळे आणि फ्रान्समधील अस्थिर राजकीय वातावरणामुळे ते त्यांना साध्य झालं नव्हतं. हैदर आणि टिपू यांनी इंग्रजांच्या बाबतीत जे धोरण आखलं तेच महाराष्ट्रातही घडत होतं. राघोबादादांना हाताशी धरून महाराष्ट्र जिंकायची स्वप्नं इंग्रज बघत होते. पण नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांच्या, इंग्रजांना दूर ठेवण्याच्या चतुर राजकारणामुळे माधवराव पेशव्यांच्यानंतर इंग्रजी

सत्ता महाराष्ट्रात यायला ५० वर्षे लागली. हैदरअली आणि टिपू सुलतान यांनी ४० वर्षे मैसूरला इंग्रजांपासून वाचवलं.

**टिपू सुलतानाच्या मृत्यूनंतर मैसूरच्या वोडीयार राजघराण्याचा दुभंगलेला राजप्रवाह प्रवाह परत मूळ सत्ताप्रवाहाशी एकरूप झाला. जशी कावेरीही पुढे जाऊन मूळ प्रवाहाशी एकरुप होते.**

# नेपोलीयनने टिपू सुलतानला लिहिलेले पत्र

.

French Republic

Liberty
Equality.

Head Quarter

Cairo,

7th pluviose

7th year of the Republic, one and Indivisible.

Bournoparte, Member of the National Convention, General in Chief, to the most Maginificent Sultan, Our greatest Friend Tipoo Sahib,

You have been already informed of my arrival on the borders of Red Sea, with an

innumerable and invincible army, full of the desire of delivering you from the iron yolk of England.


I eagerly embrace this apportunity of testifying to you the desire I have of being informed by you, by the way of Muscut and Mocha, as to your political situation.


I would further wish you could send some intelligent Person to Suez or Cairo, possessing your confidence with whom I may confer.

May the Almighty increase your power and destroy your enemies.

Bounoparte








ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली

डॉ. स्मिता दामले यांची इतर पुस्तके


**ONE** click on cover


Book will **OPEN**









**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.**

**डॉ. स्मिता दामले यांचे हे आठवे पुस्तक.**

डॉ. स्मिता दामले  या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. हल्लीच्या गुगगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत. डॉ. दामलेंसारखे ज्येष्ठ लेखक यांच्या-सारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा

(जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।